फलज्योतिष ग्रंथमाला

# विक्रमी मंगळ

✍ द. मा. लेले ✍

किंमत : ₹ १२५.००

प्रगती बुक्स

PP312

© सर्व हक्क प्रकाशकाधीन
क्रमांक : १५२८१० (POD)

**प्रकाशक**
**निराली प्रकाशन**
अभ्युदय प्रगती, १३१२, शिवाजीनगर,
जंगली महाराज रोड, पुणे ४११ ००५.
फोन : (०२०) २५५१ २३३६/३७/३९
फॅक्स : (०२०) २५५१ १३७९.
Email : niralipune@pragationline.com

**मुद्रक**
**रेप्रो इंडिया लि.**
५०/२ एम.आय.डी.सी.,
महापे, नवी मुंबई,
फोन : (०२२) २७७८२०११

**प्रमुख वितरक : निराली प्रकाशन**

**पुणे**
- ११९, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिर मार्ग,
  **पुणे** – ४११ ००२.
  ☎ (०२०) २४४५ २०४४, ६६०२ २७०८.
  **फॅक्स** : (०२०) २४४५ १५३८.
  Email : niralilocal@pragationline.com

**मुंबई**
- ३८५, एस.व्ही.पी. मार्ग,
  रसधारा को. ऑप. हाउसिंग सोसायटी लि.,
  गिरगाव, **मुंबई** – ४०० ००४.
  ☎ (०२२) २३८५ ६३३९/२३८६ ९९७६
  **फॅक्स** : (०२२) २३८६ ९९७६.
  Email : niralimumbai@pragationline.com

**धायरी (पुणे)**
- सर्वे नं. २८/२५ धायरी-कात्रज रोड, पारी कंपनीजवळ, **पुणे ४११ ०४१**.
  ☎ (०२०) २४६९ ०२०४ **फॅक्स** : (०२०) २४६९ ०३१६.
  Email : bookorder@pragationline.com; dhayari@pragationline.com

**पुस्तक मिळण्याचे ठिकाण**

**प्रगती बुक सेंटर : पुणे :** Email : pbcpune@pragationline.com
- १५७, बुधवार पेठ, रतन टॉकिजसमोर,
  **पुणे** ४११ ००२.
  ☎ (०२०) २४४५ ८८८७/६६०२ २७०७
- २८/अ, बुधवार पेठ, अंबर चेंबर,
  अप्पा बळवंत चौक, **पुणे** ४११ ००२.
  ☎ (०२०) ६६२८ १६६९/२०२४ ०३३५
- ६७६/ब, बुधवार पेठ,
  जोगेश्वरी मंदिरासमोर, **पुणे** ४११ ००२.
  ☎ (०२०) ६६०१ ७७८४/
  ६६०२ ०८५५
- १५२, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिराशेजारी,
  **पुणे** ४११ ००२.
  ☎ (०२०) ६६०९ २४६३/२४४५ २२५४

**प्रगती बुक कॉर्नर : मुंबई**
- इंदिरा निवास, शारदाश्रम हायस्कूलजवळ, १११/अ, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम),
  **मुंबई** ४०० ०२८. ☎ (०२२) २४२२३५२६/६६६२५२५४

**वितरक शाखा**

**निराली प्रकाशन :**
- ३४, व्ही. व्ही. गोलानी मार्केट, नवी पेठ,
  **जळगाव** – ४२५ ००१.
  ☎ (०२५७) २२२ ०३९५.
  **मो.** ९४२३४९१८६०
- न्यू महाद्वार रोड, केदार लिंग प्लाझा,
  पहिला मजला, आय. डी. बी. आय.
  बँकेसमोर, **कोल्हापूर** – ४१६ ०१२.
  **मो.** ९८५० ०४६ १५५

**प्रतिभा बुक डिस्ट्रिब्युटर्स :**
- लोकरत्न कमर्शियल कॉम्प्लेक्स, दुकान नं. ३,
  सीताबर्डी, **नागपूर** – ४४० ०१२.
  ☎ (०७१२) २५४७ १२९.

info@pragationline.com • www.pragationline.com
To Order * Email : bookorder@pragationline.com

# प्रस्तावना

सोलापुरात विद्यार्थ्यांना शिकविताना सर्व ग्रहांचा अभ्यास केला. त्याची टिपणे काढली आणि विद्यार्थ्यांपुढे अनेक कुंडल्या ठेवल्या. त्या अभ्यासातून मंगळ, शनी, गुरु या महत्त्वाच्या ग्रहांवर लिखाण झाले व प्रत्येक ग्रहाबद्दल बारा भावांतून अभ्यासासाठी वाचकांपुढे अनेक भावचलित कुंडल्या ठेवल्या आहेत.

मंगळ या ग्रहाबद्दल जनमाणसात बरेच गैरसमज पसरलेले आहेत. मंगळ हा शुभ फले देणारा नसून तो वैधव्य वा विधुरता उत्पन्न करणारा आहे. त्यामुळे काही विशिष्ट स्थानांत मंगळ आकडे कुंडलीत दिसल्यास मंगळ दोष असे मानून कुंडल्या त्याज्य समजल्या जातात. त्यास शनीचा जाब द्यावा असे जुने ज्योतिषी सांगतात.

मंगळ हा अमंगल आहे तर शनी काय मांगल्यदर्शक आहे ? शनी तर दुःख देणारा आहे असे म्हटले जाते.

कोणत्याही एकेरी योगाचा विचार करून फलित वर्तवणे योग्य ठरत नाही. विवाहसौख्याचा विचार करताना शुक्राचा विचार करावा लागतो. तसेच राहूचा आणि हर्षल, नेपच्यूनचाही विचार करावा लागतो. मंगळ हा खरोखर दोषास्पद असतो काय व केव्हा दोषास्पद असतो याचे उदाहरणांसह विवेचन या पुस्तकातील सप्तम भाव या प्रकरणात केले आहे. त्याकडे वाचकांचे लक्ष वेधतो.

मंगळ हा पराक्रमी, धाडसी असतो. तो अग्रणी म्हणजे पुढारी असतो. मंगळ देवांचा सेनापती आहे. व्यायाम, खेळ व साहसी कामे यांत मंगळच पुढे असतो. तो खरोखर पराक्रम व विक्रम करणारा आहे. याचे योग्य दिग्दर्शन या ग्रंथात करण्याचा प्रयत्न केला आहे.

भावचलित कुंडलीचा विचार केला जावा असा माझा आग्रह आहे. आकडे कुंडली बरेच वेळा फसवी ठरते.

– श्री. द. मा. लेले

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | मंगळ | १ ते १२ |
| १. | प्रथम भाव | १३ ते ४२ |
| २. | द्वितीय भाव | ४३ ते ६४ |
| ३. | तृतीय भाव | ६५ ते ८६ |
| ४. | चतुर्थ भाव | ८७ ते १११ |
| ५. | पंचम भाव | ११२ ते १२९ |
| ६. | षष्ठम भाव | १३० ते १४७ |
| ७. | सप्तम भाव | १४८ ते १८५ |
| ८. | अष्टम भाव | १८६ ते २०३ |
| ९. | नवम भाव | २०४ ते २२२ |
| १०. | दशम भाव | २२३ ते २४७ |
| ११. | एकादश भाव | २४८ ते २६७ |
| १२. | द्वादश भाव | २६८ ते २८४ |

# मंगळ

ज्योतिषशास्त्रातील पराक्रमी मंगळाबद्दल माहिती द्यावी तेवढी थोडीच आहे. मंगळाची व्यक्ती ही पराक्रमी, धाडशी, चिकाटी असलेली, उत्तम नेतृत्व करणारी, संशोधनामध्ये आवड असणारी, साहसी, दुसऱ्यासाठी बलिदान देणारी, ऐहिक सुखाचा लाभ घेणारी अशा अनेक महत्त्वाच्या गुणांनी युक्त असते. त्याचप्रमाणे प्रत्येक वस्तू ही गुण आणि अवगुण यांनी युक्त असते त्याप्रमाणे मंगळामध्येही काही अवगुण आहेत. याचीच काही ज्योतिषी धास्ती घेतात व मंगळ हा अमंगळकारक आहे असे भासवले जाते. पण दोषापेक्षा मंगळाचे गुण हे उच्च पदावर घेऊन जाणारे आहेत. आपल्या पूर्वकर्मानुसार त्याची शुभ व अशुभ फले भोगावी लागतात. त्यासाठीच आपल्या ऋषीमुनींनी ही अशुभ फले निवारण होण्यासाठी काही उपाय पण सांगितले आहेत. त्याची सविस्तर माहिती पुढे देत आहे. पण एक साधा उपाय या ठिकाणी सांगावा असे वाटते. तो म्हणजे ज्याला मंगळाचा त्रास वाटत असतो त्याने मंगळवारी गणपतीला एक लाल फूल, दुर्वा आणि गूळ व खोबरे अर्पण करून आपल्या त्रासाबद्दल मनोभावे प्रार्थना केली तर बराचसा मंगळाचा त्रास कमी होऊन आपले काम होते. त्यामध्ये धैर्य येते. असे काही छोटे-मोठे उपाय आहेत. त्यामुळे मंगळाची भीती न बाळगता त्यावर उपाय करून उत्तम यश, कीर्तीचा लाभ होतो. म्हणून मंगळ हा मंगलच आहे.

सर्वच ग्रह सूर्याभोवती क्रांतिवृत्तामधून प्रदक्षिणा घालतात. बुध सूर्यापासून अगदी जवळून, त्यानंतर शुक्र थोडे दुरून. हे दोघे लवकर-लवकर प्रदक्षिणा घालतात. त्यानंतर पृथ्वीचा क्रम येतो. पृथ्वीच्या एका प्रदक्षिणेस ३६५ दिवस ६ तास ९ मिनिटे ९ सेकंद एवढा कालावधी लागतो. पृथ्वी व सूर्य यांच्यामध्ये शुक्र व बुध आहेत. म्हणून त्यांना अंतर्वर्ती ग्रह असे म्हणतात. मंगळ, गुरु व शनी हे पृथ्वीच्या बाहेरून सूर्य प्रदक्षिणा करतात. म्हणून ते बहिर्वर्ती ग्रह आहेत. त्याहीनंतर प्रजापती (हर्षल-युरेनस), वरुण (नेपच्यून), रुद्र (प्लूटो) सूर्याभोवतीच फिरतात.

मंगळाचे सूर्याभोवतीचे एक भ्रमण सुमारे ६८७ दिवसांत पूर्ण होते. सुमारे दोन वर्षांनी मंगळ वक्री होतो आणि तो वक्री असता त्याचे भ्रमण एकाच राशीतून सहा महिनेपर्यंत होते. वक्री असलेला मंगळ पृथ्वीच्या जवळ येतो. त्या वेळी तो नुसत्या डोळ्यांनी दिसतो. त्याचा रंग तांबडा दिसतो.

तांबडा रंग उष्णतादर्शक आहे. रक्ताचा रंगही तांबडा असतो. मनुष्य रागावला की त्याचा चेहरा लाल दिसतो. डोळे लालसर दिसतात. त्यात क्रूरतेची छटा दिसते. मंगळाच्या तांबड्या रंगावरून त्यास लोहितांग असे अन्वर्थक नाव दिले गेले आहे. मनुष्याच्या वासना भडकल्या की त्याच्या डोळ्यांत फरक दिसतो. डोळे लाल दिसतात. मंगळास अंगारक

असेही म्हणतात. अंगार म्हणजे स्फुल्लिंग निखारे. त्यांचा रंगही तांबडाच असतो. रुधिर म्हणजे रक्त. त्यावरून मंगळास 'रुधिर' असेही म्हणतात.

मंगळ हा अग्नितत्त्वाचा कारक आहे. अग्नीचे कार्य प्रकाश देणे व उष्णता देणे असे आहे. तो दाहकही आहे. त्याच्या दाहकत्वामुळे व क्रूरतेमुळे त्यास पापग्रह म्हटले आहे. रवी, मंगळ व गुरु हे तीनही अग्नितत्त्वाचे असले तरी रवी हा प्रकाश व जीवन देणारा आहे. मंगळ हा दाह करणारा पण बल देणारा व उत्पादक ग्रह आहे आणि गुरुमध्ये आकाशतत्त्वही आहे व तो प्राणदर्शक आहे. अग्नीची ही तीन रूपे.

तांबडा वर्ण क्रूरता, पाशवी बल व पाशवी वासनांचा दर्शक आहे. या त्याच्या गुणांमुळेच मंगळास क्रूर, कोपिष्ट व पापी म्हटले आहे. म्हणूनच मंगळ हा तमोगुणी ठरतो. मंगळास क्रूरदृक् (क्रूर दृष्टीचा) असेही विशेषण आहे.

धोक्याच्या जागी तांबड्या रंगाच्या खुणा असतात. मंगळ धोकादायक, अपघातदर्शक आहे. कापणे, भाजणे, पोळणे, व्रण होणे, जखमा होणे, शस्त्रक्रिया होणे अशाही गोष्टी दर्शवितो. हाडे मोडण्याच्या अपघातात मंगळाचा प्रमुख वाटा असतो.

असे असले तरी मंगळ हा पूर्णपणे अशुभ नाही. त्याच्यात शुभ फळे देण्याचेही सामर्थ्य आहे. मंगळ हे नाव अशुभदर्शक निश्चितच नाही. मंगल-मंगळ याचा अर्थ कल्याण करणारा, शुभ परिणामकारक असाच आहे. विवाहानंतर स्त्रिया मंगळसूत्र धारण करतात. मंगल करणारा मंगळ हा सर्वथैव अमंगल होईल का ?

प्रत्येक ग्रह हा शुभ व अशुभ फले देत असतो. पण शुभाशुभत्व परिस्थितीनुरूप ठरते. शनी व मंगळ हे दोन ग्रह पापग्रह अशुभ फलदायी मानले जातात. पण ते १००% अशुभ नसतात. अशुभतेचे प्रमाण जास्त असते एवढाच त्याचा अर्थ घ्यावयाचा. शनी विचारपूर्वक, धीमेपणे, चिकाटीने, दीर्घोद्योगाने काम करतो व मनुष्यास उच्च पदासही नेऊन पोचवतो. तो मनुष्यास नीतीच्या, सत्याच्या मार्गानेच नेण्याचा प्रयत्न करतो. तशीच स्थिती मंगळाचीही आहे. अन्यायाविरूद्ध झगडण्याची ताकद व जिद्द मंगळच देतो. बाहुबलावर समाजाचे व देशाचे परकीय आक्रमणापासून संरक्षण करतो. कायदा, सुव्यवस्था व शांतता राखण्याचा, टिकवण्याचा प्रयत्न करतो. मैदानी व मर्दानी खेळात सहभागी होऊन रणक्षेत्रासारखीच उत्तम कामगिरी क्रीडाक्षेत्रावर करतो. स्पर्धाक्षेत्र गाजवतो आणि स्वतःला, समाजाला व देशाला प्रतिष्ठा मिळवून देतो. रोगनिर्मूलनासाठी, जीव वाचविण्यासाठी प्रसंगी शस्त्रक्रियाही करवतो. ही कर्मे अशुभ वाटली तरी ती परिणामी शुभच आहेत. जनतेला चांगला अधिकारी, निःस्पृह व निष्पक्षपाती कडक न्यायाधीश, कडक पोलीस आयुक्त आणि रणझुंजार सेनापती आवडतो. तसेच निष्णात शल्यचिकित्सक, शस्त्रवैद्याचीही आवश्यकता प्राण वाचविण्यासाठी असते. अग्निशामक दलाचे जवान माणसांचे जीव वाचवणे, मालमत्तेची हानी टाळण्यासाठी काम करतात. हीही शुभकार्येच मंगळाची आहेत.

मुख्य म्हणजे प्रजोत्पादनास रवीइतकाच मंगळही कारक असतो आणि साहाय्यभूत होतो. वरील परिच्छेदात नमूद केलेल्या कार्याला जे बळ, धैर्य व हिंमत लागते ते आणि

प्रजोत्पादनास जे बल, शक्ती, कौशल्य व वीर्य लागते ते मानवास मंगळामुळेच मिळते. मंगळ हा 'Active Male Principle,' पौरुषत्वाचा कार्यकारी आविष्कार दर्शवितो. यावरून मंगळाचे कार्य 'सत्त्वंकुजः' अशा सूत्ररूपात सांगितले गेले आहे. सत्त्व म्हणजे बल, पराक्रम, पौरुषदर्शक मंगळ (कुज) असे म्हटले आहे.

परंतु फलज्योतिषात ग्रहांचे वर्गीकरण विशेष तत्त्वावर केले आहे. गुरु व शुक्र पूर्ण शुभ आणि शनी व मंगळ यांना पूर्ण अशुभ मानले आहे. त्रिगुणांत वर्गीकरण करताना रवी, चंद्र व गुरु हे सत्त्वगुणी, बुध व शुक्र हे रजोगुणी आणि शनी व मंगळ हे तमोगुणी मानले आहेत. रवी हाही पापग्रह मानला गेला आहे. ग्रहांचे प्रधान कार्य कोणते यावर हे वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

शुक्रापेक्षा गुरु जास्त शुभ, तसा मंगळापेक्षा शनी जास्त अशुभ आहे. दुःखं दिनेशात्मजः - शनी हा दुःख व दारिद्र्यता यांचा दर्शक आहे. शनी कडक शिस्तीचा शाळामास्तर आहे तर मंगळही तितकाच कडक शिस्तीचा शिपाई, गडी, पोलीस व सैनिक आहे.

पाश्चिमात्यांनी मंगळास 'Mars the Warlord' युद्धाची देवता म्हटले आहे. आपल्याकडे त्यास कार्तिकेय, देवांचा सेनापती म्हटले आहे.

अग्नीचे आणखी एक नाव अग्रणी आहे. तो पुढारी आहे. तो नेतृत्व करतो. मंगळाचे कार्य पुढे जाणे, आघाडीवर जाणे (अग्रः - पुढे), नेतृत्व करणे असे आहे आणि आणीबाणीच्या वेळी निधड्या छातीने पुढे होणे, आक्रमक होणे, दुर्बलांचे व देशाचे रक्षण करण्यासाठी आक्रमक होणे हे आहे. 'सद् रक्षणाय - खल निग्रहाय !'

एकूण मंगळाचे कार्य लढवय्या, संरक्षक, आक्रमक, शस्त्रक्रिया, नेतृत्व करणे, अधिकारी होऊन हुकमत गाजविणे ही शरीरबलाची, हस्तकौशल्याची कामे करून घेणे असे आहे. तो जसा बलवर्धक आहे तसा तो कामोद्दीपकही आहे. प्रजोत्पादनास साहाय्यभूत होणे हेही मंगळाचेच कार्य आहे.

राशिचक्रातील मेष व वृश्चिक या राशी मंगळाच्या अमलाखाली आहेत. जीवन व मृत्यू यांचे दर्शक अशा या दोन राशी आहेत. येथेच मंगळाचे शुभत्व-अशुभत्व दिसून येते. या राशींचा अंमल मस्तक व प्रजोत्पादन इंद्रिये यावर अनुक्रमे आहे.

मंगळाच्या अमलाखालील कर्मेंद्रिये बाहू-दंड हात आहेत. म्हणजे बाहुबल ओघानेच आले.

मंगळामुळे जातकास पौरुषत्व येते. अग्नितत्त्व व पौरुषत्व यामुळे मंगळाचा जातक पराक्रमी, साहसी असतो आणि धैर्य व धीटपणा हे गुण त्यामध्ये असतात.

अग्नितत्त्वामुळे मंगळ उष्ण प्रकृतीचा व पित्त प्रकृतीचा असल्यामुळे असा मनुष्य रागीट असतो, त्याच्यात भरपूर उत्साह असतो, महत्त्वाकांक्षा उत्पन्न होते व शरीरबलाचा उपयोग करून घेण्याची संधी मंगळप्रधान जातक पाहत असतो. उत्साहामुळे तो कार्योत्सुक असतो. जोम व शरीरबल आणि चापल्य असते.

मंगळाची व्यक्ती परिणामांचा विचार वा पर्वा करीत नाही. 'विचार करणे, थांबणे, डोके थंड ठेवणे व सावकाश' हे शब्दच अशा व्यक्तींच्या शब्दकोशात नसतात. काही वेळा परिस्थिती अशी उद्भवलेली असते की विचार करण्यात वेळ घालविल्यास कार्यनाशच होणार असतो.

मंगळप्रधान व्यक्ती या भांडखोर असतात. त्या जिद्दी असतात, धीट असतात आणि कोणत्याही कार्यात या व्यक्तीचे पाऊल पुढेच असते. अशा व्यक्ती पोलीस खाते, सैन्यदले यामध्ये जातात व पुढे येतात. तसेच मैदानी व मर्दानी खेळातही अग्रेसर असतात. कुस्त्या, मुष्टीयुद्धे, कराटे, ज्युडो आदी मार्शल आर्ट्स (लढाऊ कला) पौरुषत्वास व शरीरबलास चांगल्या कामासाठी वाट देण्यात उपयोगी पडतात. तेथे चपळता व शरीरबल, उत्साह, जिंकण्याची जिद्द व धीटपणा, साहस या 'मंगळीय' गुणांचा चांगला उपयोग होतो.

मंगळ हा भूमिपुत्र आहे. म्हणून त्यास 'भौम' असेही म्हणतात. मंगळ दक्षिण दिशेचा स्वामी आहे. त्यामुळे तो दशमात चांगलाच प्रभावी असतो. कालपुरुषाचे कुंडलीत दशमावर दक्षिण दिशेस मकर ही रास आहे. ती चर रास असून पृथ्वीतत्त्वाची आहे. त्यामुळे मंगळाची उच्च रास मकर मानली आहे. मकरेच्या २३ अंश २१ कलेपासून ३० अंशापर्यंतच्या भागावर धनिष्ठा नक्षत्र आहे आणि ते नक्षत्र मंगळाच्या आधिपत्याखाली येते. मंगळ मकरेच्या २८ अंशात परमोच्च असतो. नवांशांत मंगळाचा उच्चांश कन्या नवांशांत येतो. कन्या रास ही पृथ्वीतत्त्वांची आहेच पण षष्ठस्थानदर्शक रास आहे. षष्ठस्थानी मंगळ प्रभावी असतो, तो शत्रूंचा पाडाव करतो. षष्टस्थान दशमाचे भाग्यस्थान आणि कन्या रास ही मकरेच्या भाग्यस्थानी येते आणि दशमास पोषक ठरते. मंगळाचे उच्चत्व व उच्चांशत्व कसे ठरविले गेले असेल याचा उलगडा होतो.

मेष रास मंगळाचे स्वगृह व मूल त्रिकोण रास असून मकरेत मंगळ उच्च असतो. त्या खालोखाल वृश्चिक रास येते. कर्क आणि सिंह लग्नास मंगळ एकटाही राजयोगकारक ठरतो. राजयोग व मान, अधिकार दर्शविणारा व शुभ परिणामी असतो. रवी, चंद्र व गुरु हे मंगळाचे मित्र आहेत. मंगळ हा सिंह व धनू राशीत मित्रक्षेत्री येतो. बारा भावांपैकी लग्न, तृतीय, षष्ठ आणि दशम या स्थानात मंगळ प्रभावी असतो. तृतीयातील मंगळ पराक्रम, बाहुबल व हस्तकौशल्य दर्शविणारा असतो. षष्ठस्थानातील मंगळ शत्रुहंता असतो. शत्रू त्याच्यापुढे पराभव पावतात. दशमात मंगळ अधिकारपदे भूषवितो.

दशमात मंगळ प्रभावी असतो. महत्त्वाकांक्षा तीव्र असते. सामर्थ्यापेक्षा मोठे उद्योग हाती घेतले जातात आणि असाध्य गोष्टी दीर्घ परिश्रमाने घडवून आणल्या जातात. जातकाचा स्वभाव मानी असतो व तो हुकमत गाजविणारा असतो. ही फले मेष, सिंह, धनू या अग्निराशीत व मकर या उच्च राशीत विशेषकरून प्रत्ययास येतात.

मंगळाचा अंगभूत गुण भावनावेग व आकर्षण आहे. एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीत पटकन बदल किंवा अचानक परिवर्तन करणे असा स्वभाव असल्याने कोणत्याही कठीण प्रसंगी मंगळाची व्यक्ती न डगमगता आपली सुटका करवून घेते.

मंगळ अशुभ असता जातक आक्रमक वृत्तीचा असतो आणि तो बहुतेक वेळी टोकाची भूमिका घेतो. अति रागीटपणा असून वितुष्ट वाढविणारा, अविवेकी, क्रूर, भांडखोर, रानटी, विध्वंसक व धोकादायक स्वभाव असतो. कठोर स्वभाव, दुष्ट प्रवृत्ती, पाशवी शक्तीचा अविवेकी वापर, भडकत्या वासना, अत्याचारी, खुनशी, उधळ्या, मत्सरी स्वभावाचा असतो. जातकाचे जीवनात क्षोभ, बाधा, प्रतिकूलता व विध्वंसकता येते.

मंगळाचे कार्य तीव्र तात्कालिक व अल्पकालीन पण भयंकर असते. साधा ताप आला तरीसुद्धा लगेच २-३ पर्यंत चढतो.

मंगळ अशुभ असता अपघात किंवा भयंकर नाश, विध्वंस दर्शवितो. अंगभर लाल रंगाचे फोड येणे, देवी, गोवर, कांजिण्या, जळणे, रक्तस्राव, जळवात, मूळव्याध, चिरडणे, अस्थिभंग इत्यादी अनिष्ट परिणाम मंगळाचे आहेत.

आग लागलेली ठिकाणे, सोनारकाम, भट्ट्या लागलेली ठिकाणे, रसायनशाळा, रणक्षेत्रे, सैन्याची ठिकाणे, हत्यारांचे व दारूगोळ्यांचे कारखाने, अपघात-स्थळे, लढाऊ देश, खून व मारामाऱ्या यांच्या जागा, हॉस्पिटलमधील शस्त्रक्रिया दालन या ठिकाणी मंगळाचे वास्तव्य असते.

साधे खरचटणे, इजा होणे, कापणे, भाजणे, जखमा होणे, मोडतोड (अस्थिभंग) होणे इतक्या गोष्टी अपघात या सदरात येतात. अपघाताचा मुख्य कारक ग्रह मंगळ असून त्याचा उतावीळपणा, अविचार हा दोष व धाडस, साहस, जिद्द हे गुण यांचे एकत्रित परिणाम दर्शवितो.

मंगळाच्या अमलाखाली लोखंड हा धातू आहे. तेव्हा लोखंड व त्यापासून उत्पन्न होणारे पोलाद, तीक्ष्ण हत्यारे, धारदार उपकरणे, पोलादी शस्त्रे यांमध्ये चाकू, कात्र्या, सुरे, वस्तरे, ब्लेड्स, तलवारी, जांबिये अशी शस्त्रे तसेच शस्त्रक्रियेसाठी लागणारी खास हत्यारे ही सर्व उत्पादने येतात. यंत्रनिर्मिती हेही काम मंगळाचेच आहे. प्रजापती (हर्षल) मुळे मोठी व अवजड व गुंतागुंतीची यंत्रे करावी लागतात. त्यातही मंगळाचाच सहभाग आहे.

मंगळाचे कार्य रक्तवर्णोत्पादक आहे. रक्त केंद्राकडून बाह्य भागाकडे पोहोचविण्याचे कार्य मंगळाकडे आहे. त्यामुळे पृष्ठभाग तांबूस दिसतो. मंगळाचे कार्य वर दर्शविल्याप्रमाणे तीव्र व दुर्घटनाकारीही असते.

मंगळाची व्यक्ती निग्रही, ठाम निश्चयाची, स्पष्टवक्ती (विचार, आचार व उच्चार याही बाबतीत) असते. कृती ठाम व निग्रही असते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे मंगळाचे तत्त्व रागीटपणा, उत्साह, विस्तार, कृतिशीलता, पुरुष प्रकृती, उष्णता निर्माणाचे व दाहक आहे.

मंगळ हा भावंडांचा कारक आहे. पण धाकटे भाऊ, धाकट्या बहिणी अशी धाकटी भावंडे मंगळ दर्शवितो. परंतु मोठे भाऊ, बहिणी यांचा कारक ग्रह गुरु असून मोठ्या भावंडांचे स्थान एकादश आहे. तृतीय स्थान हे लहान भावंडांचे स्थान आहे व मंगळ त्यांचा प्रमुख कारक आहे.


## ☀ रुचक योग

खास मंगळाच्या विशिष्ट स्थितीमुळे होणारा हा योग पंचमहापुरुष योगापैकी एक आहे.

मंगळ हा केंद्रामध्ये असून तो स्वराशीस अथवा उच्च राशीस असता हा रुचक योग होतो. हा योग ज्याच्या कुंडलीत होतो त्याचे शरीर बलवान असून तो प्रसिद्ध असतो आणि तो राजा वा सर्वसत्ताधीश असतो. तो सैन्याचा प्रमुख श्रीमंत असतो.

अत्यंत शक्तिमान योग क्वचितच असतो. मंगळ हा सर्वतो बलिष्ठ असावा लागतो. मंगळाच्या बाबतीत असा योग 'हेर हिटलर' याच्या कुंडलीत झाला आहे. या योगावर जातक लढाऊ वृत्तीचा व नेता असतो. तो देशाभिमानी व आक्रमक असतो.

**कुंडली :** जन्म दि. २० एप्रिल, १८८९ रोजी सायंकाळी ५.३० वा. ४८° उत्तर व १३° पूर्व.




मंगळ सप्तमात स्वगृही. लग्नेश शुक्राचे युतीत, जवळच उच्च रवी व भाग्येश बुध आहे. म्हणजे लग्नेश, लाभेश, भाग्येश व सप्तमेश असे सर्व ग्रह सप्तमात एकवटले आहेत. शिवाय योगकारक शनीच्या दृष्टीत हे सर्व आहेत आणि त्यावर गुरुची पूर्ण दृष्टी आहे. यामुळे मंगळ अतिशय शक्तिमान झाला. त्यामुळे रुचक योग पूर्णपणे झालेला आहे. या योगावर हिटलर अत्यंत धाडशी, आक्रमक, उद्धट पण मोठा नेता व महान राज्यकर्ता व जुलमी होताच. शनी व मंगळ एकमेकांच्या केंद्रयोगात दृष्टी अधिष्ठित आहेत. गरीब स्थितीत जन्मून बलिष्ठ अशा जर्मनीचा महान राज्यकर्ता झाला. त्याच्यापुढे सर्व युरोप थरथरा कापत होता.

## ☀ मंगळाची त्रोटक माहिती

सार्वजनिक क्षेत्रातील भूकंप, वादळ, दंगल, रक्तपात, रोगराई इ. गोष्टी मंगळाच्या आधिपत्याखाली येतात. तसेच लोखंड व पोलादाचे कारखाने, लोहाराची दुकाने, युद्धभूमी ही स्थाने मंगळाची आहेत.

- मंगळाचा वर्ण - तांबडा
- जात - क्षत्रिय
- स्वभाव - पराक्रमी, क्रोध, कामुक
- तत्त्व - अग्नी
- प्रकृती - पित्तकारक
- दिशा - दक्षिण
- निवासस्थान - स्वयंपाकघर
- अवयव - सत्व
- ऋतु - ग्रीष्म
- रत्न - पोवळे
- धातू - तांबे
- ग्रहमंत्रिमंडळातील स्थान - सेनापती
- होणारे आजार - अपघात, कांजण्या, देवी, शक्तिपात.
- रस - कडू
- वय - बाल ४ वर्षेपर्यंत
- दृष्टी - उर्ध्व
- ऊदय - पृष्ठोदय
- भाग्योदय - वर्ष २८ वे
- स्थलकारकत्व - पर्वत, अरण्ये, किल्ले
- देवता - कार्तिकेय
- कर्मेंद्रिय - हात
- ज्ञानेंद्रिय - नेत्र
- दोष - पित्त, तमोगुणी
- लिंग - पुरुष
- स्वगृहे - मेष व वृश्चिक रास
- उच्च रास - मकर, उच्चांश २८°
- नीच रास - कर्क
- नीचांश - २८°
- मित्रग्रह - रवी, चंद्र, गुरु, प्लूटो
- शत्रु ग्रह - बुध, हर्षल
- समग्रह - शुक्र, शनी व नेपच्यून
- अनुकूल भाव - तृतीय, षष्ठ, दशम व एकादश ही कुंडलीतील स्थाने
- प्रतिकूल भाव - द्वितीय, अष्टम, द्वादश
- बाधास्थान - सप्तम
- अनुकूल राशी - मेष, वृषभ, सिंह, वृश्चिक, धनू, मकर व मीन
- प्रतिकूल राशी - मिथुन, कन्या, तुला, कुंभ व कर्क
- मूळ त्रिकोण रास - मेष
- मूळ त्रिकोण राश्यांश - ० ते १२ अंश.
- स्वराशीचे अंश- १३ ते ३०
- मध्यम गती - दररोज २३ कला व ३० विकला, संख्या ९
- आधिदेवता - स्कंद
- प्रत्याधिदेवता - भूमी
- एकपाद दृष्टी - ३ व १० या स्थानावर
- द्विपाद दृष्टी - ५ व ९ या स्थानावर
- पूर्ण दृष्टी - ४, ७ व ८ वे स्थान
- स्थान बल - कुंडलीतील दशमस्थान
- काळ बल - माध्यान्ह.

**नक्षत्रे :** मृग, चित्रा, धनिष्ठा यांचा स्वामी मंगळ आहे. ही तीन नक्षत्रे सहा राशींमध्ये विभागली आहेत. ती म्हणजे मृग नक्षत्राची पहिली दोन चरणे वृषभ राशीमध्ये त्यानंतर ३ व ४ ही चरणे, मिथुन राशीमध्ये तसेच चित्रा नक्षत्र पहिली दोन चरणे, कन्या राशीत व उरलेली दोन तूळ राशीमध्ये त्याचप्रमाणे धनिष्ठाची पहिली दोन मकरमध्ये व ३, ४ चरणे

कुंभ राशीमध्ये येतात. तेव्हा मंगळाबाबत फलांचा विचार करताना या नक्षत्रांचाही विचार करणे जरुरीचे आहे. नक्षत्रांपैकी आश्विनी, मघा व मूळ यातील मंगळ जातकास कुलदीपक, सर्वप्रसिद्ध व श्रेष्ठ करतो.

**आजार :** मंगळ हा उष्ण प्रकृतीचा व पित्त प्रकृतीचा असल्यामुळे प्रामुख्याने उष्णतेचे व पित्ताचे आजार मंगळामुळे होतात. साधा ताप आला तरी तो २, ३ डिग्रीपर्यंत पोहोचतो. तसेच मंगळामुळे साथीचे रोग येण्याची जास्त शक्यता असते. शस्त्रक्रियेचा कारकसुद्धा मंगळच असल्याने अनिष्ट मंगळामुळे शस्त्रक्रियेची शक्यता जास्त असते. त्याचप्रमाणे मंगळ हा प्रत्येक राशीमध्ये असताना कोणते आजार होतात त्याची सविस्तर माहिती षष्ठमस्थान भावमध्ये त्या-त्या राशीबद्दल माहिती दिलेली आहे. या आजारांपासून सावधानता बाळगावी, त्याकडे दुर्लक्ष करू नये. म्हणून माहितीसाठी त्या-त्या आजारांची नावे दिली आहेत.

**पत्रिकेतील अनिष्ट मंगळ (विवाहासाठी) :** हा ग्रह रवीइतकाच प्रजोत्पादनास कारक आहे. प्रजोत्पादनास बल, शक्ती, कौशल्य व वीर्य लागते, ते मंगळामुळेच मिळते. पत्रिकेतील सप्तम स्थान हे विवाह स्थान आहे. विवाहाबाबत या स्थानावरून विचार केला जातो. पण सप्तम स्थान मंगळाचे बाधा स्थान आहे. त्यामुळे या स्थानावर मंगळाची दृष्टी असणे हे हानिकारक आहे. म्हणून पत्रिकेतील १, ४, ७, ८ आणि १२ या स्थानी मंगळ असता तो मंगळ विवाह स्थानावर पाहतो. म्हणून त्याला मंगळाचा दोष आहे किंवा ती मंगळाची पत्रिका आहे असे म्हटले जाते. पण असे असले तरी घाबरून जाण्याचे कारण नाही. खालीलप्रमाणे ग्रहस्थिती असल्यास हे दोष मानण्याचे कारण नाही असे ज्योतिषकारांनी सांगितले आहे.

**दोष निवारण :**

१. वरील स्थानी असलेला मंगळ जर वक्री असेल किंवा अस्तंगत असेल तर दोष नाही.
२. मिथुन, कर्क व कन्या राशीच्या मंगळावर शुक्र, गुरु किंवा चंद्र या ग्रहांची पूर्ण दृष्टी असेल तर दोष नाही.
३. बलवान गुरु किंवा शुक्र लग्नी किंवा सप्तमात असतील तर दोष नाही.
४. प्रथम स्थानात मेष राशीचा मंगळ, चतुर्थात वृश्चिक राशीचा मंगळ, सप्तमात मकरेचा, अष्टमात कर्केचा व द्वादश स्थानात धनु राशीचा मंगळ असल्यास दोष नाही.
५. जर पत्रिकेमध्ये १, ४, ५, ७, ८, १०, १२ या स्थानी शनी असेल तर मंगळाचा दोष मानू नये.

वरील १ ते ५ कारणांचा अभ्यास केल्यास मंगळाचा दोष मानण्याचे कारण नाही असे ज्योतिषकारांनी सांगितले आहे.

**मंगळाचे फलादेश :** मंगळाची पत्रिकेमधील अनिष्ट स्थाने म्हणजे १, ४, ७, ८, १२ व शुभस्थाने म्हणजे ३, ६, १० व ११ ही आहेत. जेव्हा मंगळ दैनंदिन गतीने किंवा गोचर स्थितीने आपल्या राशीपासून सध्या तो कोणत्या राशीमध्ये आहे यावरून त्याचे फल पाहिले जाते. उदा., जर एखाद्याची मेष रास असेल व सध्या मंगळ मिथुन राशीत असेल तर त्या व्यक्तीला तिसरा मंगळ आहे. त्याचे फल धनलाभ आहे. हे फलाचे कोष्टक पंचांगात दिलेले आहे. त्यावरून सध्याचा फलादेश पाहावा.

**होरा फलादेश :** पंचांगामध्ये होरा कोष्टक दिलेले आहे. त्यामध्ये प्रत्येक वाराला प्रत्येक तासाला कोणत्या ग्रहाचा होरा आहे हे सांगितलेले आहे. त्यावरून मंगळाचा होरा पाहावा. त्याचे फल वादविवाद व युद्धास अनुकूल. याचाच अर्थ मंगळासंबंधीची कामे करावीत. म्हणजेच मंगळाची दाने देणे, भूमीशी संबंधित कामे करणे, न्यायालयातील वादविवादाची कामे, यंत्र संबंधीची कामे करणे इत्यादी.

**महादशा :** प्रत्येक ग्रहाला महादशा व अंतर्दशा असतात. त्याप्रमाणे मंगळाची महादशा ही ७ वर्षे असते. त्या सात वर्षांमध्ये निरनिराळ्या ग्रहांच्या पुन्हा अंतर्दशा येतात.

**मंगळाची दाने :** मंगळ अनिष्ट असता घाबरून जाण्याचे कारण नाही. जर या दानांपैकी काही दाने दिली तर त्या अनिष्टतेची तीव्रता कमी होऊन चांगली फले मिळतात. ही दाने पुढीलप्रमाणे - सोने, तांबे, प्रवाळ, मसुरा, तांबड्या रंगाचा बैल, गूळ, तांबडे वस्त्र, तांबडे फूल या दानांपैकी आपणाला जे दान देणे शक्य आहे ते दान आपणाला ज्या-ज्या वेळी त्रास वाटतो त्या-त्या वेळी संकल्प करून द्यावीत. म्हणजे बरीच पीडा कमी होते.

**भौम (मंगळ) शांती :** एखादा किंवा अनेक ग्रह शुभ असणे किंवा अनिष्ट असणे हे कोणत्याही व्यक्तीच्या हातात नसते. अनिष्ट ग्रह आहे म्हणून घाबरून जाण्याचे कोणतेही कारण नाही. या ठिकाणी मंगळ अनिष्ट असेल तर त्या ग्रहाची शांती केली असता मंगळाचा त्रास बऱ्याच प्रमाणात कमी होतो. या शांतीमुळे बऱ्याच जणांना कोर्टकामात यश आले आहे. बऱ्याच जणांची लग्ने झाली आहेत. तेव्हा शांती करून दोष कमी करून घ्यावा. शांतीसाठी वरीलप्रमाणे संकल्प करावा. या संकल्पात दानाऐवजी जपाचा उल्लेख करावा. प्रत्येक वेळी संकल्प हा वेगवेगळा होत असल्याने गुरुजींकडून त्याची माहिती घेऊन संकल्प करावा.

या शांतीमध्ये मंगळाच्या वेदोक्त किंवा पुराणोक्त मंत्रांचा १०,००० (दहा हजार फक्त) जप करून त्यानंतर १,००० (एक हजार) मंत्राचे होम करून हवन करावे लागते. याची सविस्तर माहिती शांतिकर्मामध्ये असून ती गुरुजींकडून व्यवस्थित करून घ्यावी. शांती करून घेतली तर मंगळाचा त्रास खूपच कमी होतो. म्हणून मुद्दाम येथे शांती करून घेण्याबद्दल उल्लेख केलेला आहे. बाकी माहिती सविस्तरच पाहिली पाहिजे.

**मंगळाचा वेदोक्त मंत्र :**

**ॐ अ॒ग्निर्मू॒र्धादि॒वः॒ककुत्पतिः पृ॒थि॒व्याअ॒यं ।**
**अपांरे तां सिजिन्वति ।।**

**मंगळाचा पुराणोक्त मंत्र (व्यास ऋषींचा) :**

**ॐ धरणीगर्भ संभूतम् विद्युतकांती समप्रभम् ।**
**कुमारं शक्तिहस्तं च मंगलं प्रणमाम्यहम् ।।**

वरील मंत्रापैकी वेदोक्त मंत्र हे फक्त पुरुषांनीच म्हणावेत कारण या मंत्रांच्या वैदिक शक्तीमुळे स्त्रियांना याचा त्रास होतो. म्हणून स्त्रियांनी हे मंत्र न म्हटलेले चांगले. त्याचप्रमाणे वेदोक्त मंत्र हा आपल्या गुरुकडूनच त्याची दीक्षा घेऊन म्हणावा लागतो. तसेच त्याला स्वर असल्यामुळे तो व्यवस्थित म्हणावा लागतो. चुकीच्या स्वरामुळे अनिष्ट परिणाम होतात. म्हणून तो व्यवस्थितच म्हणावा लागतो.

पुराणोक्त हा पुरुष व स्त्रिया या दोघांनाही म्हणता येतो. त्याला कोणतेही बंधन नाही. फक्त संस्कृत उच्चार व्यवस्थित पाहिजेत नाहीतर त्याचा अर्थ बदलतो.

## अंगारकस्तोत्रम्

अस्य श्रीअङ्गारकस्तोत्रस्य विरूपाङ्गिरस ऋषिः । अग्निर्देवता ।
गायत्री छन्दः । भौमप्रीत्यर्थ जपे विनियोगः ।

**अङ्गारकः शक्तिधरो लोहिताङ्गो धरासुतः ।**
**कुमारो मङ्गलो भौमो महाकायो धनप्रदः ।। १ ।।**
**ऋणहर्ता दृष्टिकर्ता रोगकृद्रोगनाशनः ।**
**विद्युत्प्रभो व्रणकरः कामदो धनहृत् कुजः ।। २ ।।**
**सामगानप्रियो रक्तवस्त्रो रक्तायतेक्षणः ।**
**लोहितो रक्तवर्णश्च सर्वकर्मावबोधकः ।। ३ ।।**
**रक्तमाल्यधरो हेमकुण्डली ग्रहनायकः ।**
**नामान्येतानि भौमस्य यः पठेत्सततं नरः ।। ४ ।।**
**ऋणं तस्य च दौर्भाग्यं दारिद्र्यं च विनश्यति ।**
**धनं प्राप्नोति विपुलं स्त्रियं चैव मनोरमाम् ।। ५ ।।**
**वंशोद्द्योतकरं पुत्रं लभते नात्र संशयः ।**
**योऽर्चयेदन्हि भौमस्य मङ्गलं बहुपुष्पकैः ।। ६ ।।**
**सर्वा नश्यंति पीडाश्च तस्य ग्रहकृता ध्रुवम् ।। ७ ।।**

इति श्रीस्कन्दपुराणं अङ्गारकस्तोत्रं संपूर्णम् ।

## ऋणमोचकमंगलस्तोत्रम् ।

मङ्गलो भूमिपुत्रश्च ऋणहर्ता धनप्रदः ।
स्थिरासनो महाकायः सर्वकर्माविरोधकः ।। १ ।।
लोहितो लोहिताक्षश्च सामगानां कृपाकरः
धरात्मजः कुजो भौमो भूतिदो भूमिनन्दनः ।। २ ।।
अङ्गारको यमश्चैव सर्वरोगापहारकः ।
वृष्टेः कर्ताऽपहर्ता च सर्वकामफलप्रदः ।। ३ ।।
एतानि कुजनामानि नित्यं यः श्रद्धया पठेत् ।
ऋणं न जायते तस्य धनं शीघ्रमवाप्नुयात् ।। ४ ।।
धरणीगर्भसंभूतं विद्युत्कान्तिसमप्रभम् ।
कुमारं शक्तिहस्तं तं मङ्गलं प्रणमाम्यहम् ।। ५ ।।
स्तोत्रमङ्गारकस्यैतत् पठनीयं सदा नृभिः ।
न तेषां भौमजा पीडा स्वल्पापि भवति क्वचित् ।। ६ ।।
अङ्गारक महाभाग भगवन् भक्तवत्सल ।
त्वां नमामि ममाशेषमृणमाशु विनाशय ।। ७ ।।
ऋणरोगादिदारिद्र्यं ये चान्ये ह्यपमृत्यवः ।
भयक्लेशमनस्तापा नश्यंतु मम सर्वदा ।। ८ ।।
अतिवक्र दुराराध्य भोगमुक्तजितात्मनः ।
तुष्टो ददासि साम्राज्यं रुष्टो हरसि तत्क्षणात् ।। ९ ।।
विरिञ्चिशक्रविष्णूनां मनुष्याणां तु का कथा ।
तेन त्वं सर्वसत्त्वेन ग्रहराजो महाबलः ।। १० ।।
पुत्रान् देहि धनं देहि त्वामस्मि शरणं गतः ।
ऋणदारिद्र्यदुःखेन शत्रूणां च भयात्ततः ।। ११ ।।
एभिर्द्वादशभिः श्लोकैर्यः स्तौति च धरासुतम् ।
महतीं श्रियमाप्नोति ह्यपरो धनदो युवा ।। १२ ।।

इति श्रीस्कन्दपुराणे भार्गवप्रोक्तं ऋणमोचक-
मङ्गलस्तोत्रं संपूर्णम् ।।

## मंगलस्तुतिः ।

**रक्तमाल्याम्बरधरो रक्तवर्णो ग्रहाग्रगः ।**
**रोगकृत् कामदो भौमो मंगलो धनहृत् कुजः ।। १ ।।**
**सामगानप्रियो हेमकुण्डली रोगनाशनः ।**
**ऋणहर्ता लोहिताङ्गो भूतिदो भूमिनन्दनः ।। २ ।।**
**रक्तामलेक्षणो देवः सर्वकर्मविरोधकः ।**
**कुजल्य नामान्येतानि यः पठेत्सततं नरः ।**
**द्विभार्यासंभवं दोषं नाशयेन्नात्र संशयः ।। ३ ।।**
**रक्तदोषादिजा रोगा नश्यन्ति पठतः सदा ।**
**धनधान्यादिविपुलो नंदते मनुजो हि सः ।। ४ ।।**

इति श्रीरुद्रयामले मंगलस्तुतिः संपूर्णा ।

## मंगलकवचम्


अस्य श्रीमंगलकवचस्तोत्रमंत्रस्य कश्यप ऋषिः । अनुष्टुप् छंदः । अंगारको देवता । भौमपीडापरिहारार्थ जपे विनियोगः ।

**रक्ताम्बरो रक्तवपुः किरीटी चतुर्भुजो मेषगमो गदाभृत् ।**
**धरासुतः शक्तिधरश्च शूली सदा मम स्याद्वरदः प्रशान्तः ।।**
**अंगारकः शिरो रक्षेन्मुखं वै धरणीसुतः ।**
**श्रवौ रक्ताम्बरः पातु नेत्रे मे रक्तलोचनः ।। २ ।।**
**नासां शक्तिधरः पातु मुखं मे रक्तलोचनः ।**
**भुजौ मे रक्तमाली च हस्तौ शक्तिधरस्तथा ।। ३ ।।**
**वक्षः पातु वराङ्मश्च हृदयं पातु लोहितः ।**
**कटिं में ग्रहराजश्च मुखं चैव धरासुतः ।। ४ ।।**
**जानुजंघे कुजः पातु पादौ भक्तप्रियः सदा ।**
**सर्वाण्यन्यानि चाङ्गानि रक्षेन्मे मेषवाहनः ।। ५ ।।**
**य इदं कवचं दिव्यं सर्वशत्रुनिवारणम् ।**
**भूतप्रेतपिशाचानां नाशनं सर्वद्धिदम् ।। ६ ।।**
**सर्वरोगहरं चैव सर्वसंपत्प्रदं शुभम् ।**
**भुक्तिमुक्तिप्रदं नृणां सर्वसौभाग्यवर्धनम् ।**
**रोगबंधविमोक्षं च सत्यमेतन्न संशयः ।। ७ ।।**

इति श्रीमार्कण्डेयपुराणे मंगलकवचम् संपूर्णम् ।।

१

# प्रथम भाव




सोबतच्या कुंडलीमध्ये ज्या ठिकाणी एक हा अंक लिहिलेला आहे त्या स्थानास पत्रिकेतील प्रथम स्थान किंवा तनुस्थान असे म्हणतात. त्याच्या फलादेशांना भाव (Result) म्हणतात.

या स्थानावरून डोळे, तब्येत, शारीरिक आरोग्य, आवड-निवड, मेंदू, बौद्धिक क्षमता, हरवलेली व्यक्ती, धाडस, आईचे वडील किंवा वडिलांची आई, भागीदारांच्या स्त्रिया, पहिल्या मुलाचे शिक्षण इत्यादी गोष्टी अभ्यास करून मिळतात.

## प्रथमस्थ मंगळाची राशीनिहाय भावफले

**(१) मेषेचा मंगळ :** प्रथम स्थानात एक हा अंक लिहिलेला असतो आणि तेथे मंगळ असेल तेव्हा तेथील मंगळाला 'मेषेचा मंगळ' असे म्हणतात. या राशीचा स्वामी मंगळ आहे. तेव्हा त्या राशीत मंगळ असता काय फल मिळते ते पाहू.

सर्वसाधारण मंगळ लग्नी असता शरीरयष्टी सडपातळ पण सशक्त व काटक असते. चेहरा तांबूस गौर वर्णाचा असून स्वभाव रागीट व कडक असतो. शरीरप्रकृती उष्ण असून पित्ताधिक्य असते. उष्णतेमुळे शरीर शुष्क दिसते. जातक मध्यम उंचीचा व रुंद हाडापेराचा असतो. तो आत्मविश्वासू असून धैर्य, उद्योगीपणा व स्वातंत्र्याची आवड असते. स्वतंत्रपणे काम करण्याची प्रवृत्ती असते आणि व्यवहारकुशल असतो. निधडेपणा व साहसीपणा असून स्वभावाने उद्धट व बेपर्वा असतो. उतावीळपणा असल्याने अविचारी कृती होते. शरीरावर जखमांच्या व भाजल्याच्या खुणा असतात. शरीरशक्तीचा दुरुपयोग केल्याने शरीरऱ्हास होतो व अपघातप्रवणता असते.

रक्त दूषित झाल्याने होणारे आजार, गुदद्वाराची व्याधी, जननेंद्रियाचे आजार अशा तऱ्हेच्या व्याधींनी जातक त्रस्त असतो. स्पष्टवक्तेपणाने व कोणाची पर्वा न करण्याच्या वृत्तीमुळे जातक शत्रू उत्पन्न करतो. कडक व रागीटपणामुळे कुटुंबीयांशी संबंध चांगले नसतात. विनाकारण भांडणे करतो. त्यामुळे संबंध दुरावतात.

येथे मंगळ स्वगृही असतो आणि ही स्थिती जातकाच्या दृष्टीने उत्तम असते. स्वगृहीच्या मंगळाबद्दल वराहमिहीर सांगतात -

**नरपतिसत्कृतोऽ टनश्चभूपति वणिक् सधनः ।**
**क्षततनुश्चौरभूरि विषयांश्चौ कुजः स्वगृहे ।।**

जातकास राजमान्यता मिळते. हल्लीच्या युगात त्यास प्रशासनात मोठे अधिकार पद मिळते. तो सेनापती अथवा व्यापारी असतो. श्रीमंत होतो, त्याच्या शरीरावर इजा, जखमा यांच्या खुणा असतात; त्यास अनेक विषयांत गोडी असते. 'चौरभूरिविषयांश्च' याचे भाषांतर चोरी करणारा अगर चोरीच्या वस्तू विकणारा व त्यांचा व्यापार करणारा असे दिलेले आढळते पण ते पटत नाही.

ही फले मेष व वृश्चिक लग्नातील स्वगृहीच्या मंगळास सारखीच लागू पडतील परंतु कल्याणवर्मा सारावलीमध्ये दोन्ही लग्नांची स्वतंत्र फले देतात. मेषेतील मंगळाबद्दल असे वर्णन आहे –

**तेजस्वी सत्ययुतः शूरः क्षितिपोऽथवा रणश्लाधी ।**
**साहसकर्माभिश्चपुरग्राम वृन्दपतिः ।।**
**राभसिको राजरतः प्रभूतगोऽजाविधान्यकरः ।**
**भौमे क्रिये प्रचण्डो बहुयुवतिरतो भवेत्पुरुषः ।।**

जातक दिसण्यात तेजस्वी व आकर्षक असतो. तो सत्यप्रिय असतो. तसेच पराक्रमी असून लढण्याची खुमखुमी असते. पण हल्लीच्या काळास अनुसरून मैदानी व मर्दानी खेळ, स्पर्धा, बाहुयुद्धे (मुष्टियुद्धे वगैरेही) त्यामुळे तो भांडणे काढतो. जातक धाडशी असून धोका पत्करण्यास तो तयार असतो. असा जातक पुढारी होण्यास योग्य असतो व नेता होतो. (सेनापती, पुढारी, टोळीचा नायक), त्याचा स्वभाव आनंदी व आशावादी असून तो सढळ हाताने खर्च करतो (उधळ्या होतो) पण तो धनधान्य यांनी युक्त असतो, स्वभावाने निष्ठुर असतो, त्याचे अनेक स्त्रियांशी वैषयिक संबंध येतात.

लग्नी अग्नी राशीचा मंगळ पित्त दोष व उष्ण प्रकृती देतो. जातक उंच बांध्याचा व तांबूस गौर वर्णाचा असतो. मुद्रा आकर्षक असून चेहरा मर्दानी दिसतो. त्यामुळे स्त्रिया त्याच्याकडे आकर्षित होतात. जातकाच्या विषयवासना साहजिकच भडकतात, विषयसुखाचा अतिरेक होतो. जातक अविचारी व उतावीळ आणि रागीट असतो, स्वतंत्र विचाराचा व स्वतंत्र बाण्याचा असतो. दुसऱ्याच्या हाताखाली काम करणे त्यास आवडत नाही. हुकमत गाजविण्याची हौस व क्षमता असते. अधिकार पदावर चढतो.

मेषेचा मंगळ लग्नी असता जातक संवेदनक्षम असतो. दृष्टी तीक्ष्ण व भेदक असते, चेहरा व मान लांब असून कपाळ रुंद असते आणि हनुवटी निमुळती असते. केस बऱ्याच वेळा कुरळे असतात, दात मजबूत असतात. जातक रूपवान, बलवान व कुलदीपक असतो. स्वपराक्रमाने उदयास येतो.

जातकास शास्त्रीय विषयांचीही आवड असते, तो महत्त्वाकांक्षी व उद्योगी असतो. कार्यकुशलता व चापल्य असते. स्वभाव आग्रही, बोलणे निर्भीड, निःस्पृह व स्पष्ट रोखठोक. स्वतंत्र विचाराचा असल्याने त्यास इतरांनी सांगितलेले तो ऐकेलच असे नाही. कित्येक वेळा तो टोकाची भूमिका घेतो, तडजोडीस तयार नसतो.

मेष लग्नास मंगळ अष्टमेशही असतो. त्यामुळे तो दूषित असता शारीरिक व्याधींनी त्रस्त होतो. मस्तकासंबंधी व मेंदूसंबंधी आजार दर्शविले जातात.

पुढील कुंडली अभ्यासण्यासारख्या आहेत - मेष लग्नास रवी, चंद्र, गुरु अनुकूल स्थानात असता अगर त्यांचे मंगळाशी शुभयोग असता जातकास मान, प्रसिद्धी, अधिकार पद मिळते.


हा मंगळ प्रथम स्थानात असेल तेव्हा त्या व्यक्तीस अंतर्दशा-महादशेमध्ये शत्रुपीडा, कोणती तरी भयावह काळजी, भ्रम होणे, परदेश गमन या गोष्टींचा त्रास सहन करावा लागतो.

## कुंडली : श्री. एस. बी. वेलणकर

जन्म - दि. २२ जून, १९१५ रोजी रत्नागिरी येथे पहाटे ३ वा.

अक्षांश - १७° उत्तर, रेखांश - ७३° २०' पूर्व.

अयनांश - २२° ४०' ४८", सांपातिक समय - २०-३५-२१




लग्नेश मंगळ लग्नी आहे व तो धनु नवांशांत आहे. रवी मिथुन राशीत पण तोही धनु नवांश व चंद्र तुळेत धनु नवांशांत आहे. धनु नवांशी चंद्र, रवी व मंगळ हे बलवत्तर ठरतात व त्यास सिंह नवांशी असलेल्या गुरुची जोड मिळाली आहे. म्हणजे जातक राजप्रशासनात मोठ्या हुद्द्यावर जाणार आहे हे स्पष्ट होते.

दशमेश शनी तृतीयात मिथुन राशीत तृतीयेश बुधाचे युतीत आहे. तृतीय स्थान व बुध यांचा संबंध पोस्ट खात्याशी येतो.

जातक पोस्ट खात्यात राजपत्रित अधिकारी म्हणून शिरले व आपल्या कर्तृत्वाने वरची श्रेणी मिळवित पोस्टमास्टर जनरल या उच्च अधिकार पदावर गेले.

चतुर्थावर गुरुची दृष्टी व राहूची दृष्टी आहे आणि शुक्राचा चतुर्थ बिंदूशी लाभयोग + लग्नेश मंगळाची चतुर्थावर व चतुर्थेश चंद्रावर पूर्ण दृष्टी आहे. जातक मिथुनेतील बुध, शनी,

रवी यांमुळे बुद्धिमान होता. त्यातच चतुर्थ या विद्यास्थानास बल मिळाले आहे. म्हणून उच्च शिक्षण द्वि-पदवीधरपर्यंत झाले व युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षेतही उत्तीर्ण झाले होते.

पोस्टमास्टर जनरल पदावरून केंद्र सरकारचे अतिरिक्त सचिव हेही पद त्यांना मिळाले होते. येथे हा 'रुचक' नावाचा पंचमहापुरुष योगांपैकी एक योग झाला आहे पण तो राजपदावर चढण्याइतका मोठा नाही.

**मंगळाबरोबर अन्य ग्रह लग्नी असता - (मेष लग्न)**

**रवी** : पंचमेश लग्न उच्च - राजयोग महत्पद - स्वतःचे कर्तबगारीवर उच्च विद्याविभूषित. धैर्यवान, धाडसी, राजकारणात पुढे. व्यवसायातही नावलौकिक. शत्रूंना धैर्याने सामोरा जाणारा, मोठ्या कुळात जन्म असलेला.

**चंद्र** : चतुर्थेश लग्नी - धनवान, स्थावराची प्राप्ती, वाहने परंतु मातृकारक म्हणून चंद्र बिघडतो व मातृसुखास बाधक ठरतो. रक्तदोष.

**बुध** : तृतीयेश - भावंडास चांगला नाही. षष्ठेश - आरोग्य बिघडते. वाहनाचे अपघात, गणिती विद्या, बोलणे कडवट, स्थापत्यशास्त्र, वास्तुशास्त्र, धातुकाम, वादविवाद.

**शुक्र** : द्वितीयेश - सप्तमेश - मारकेश. धनयोग - द्वितीयेश - लग्नी स्वतःचे हिमतीवर संपत्ती. अनैतिकता. प्रकृतीस चांगला नाही. अनावर वासना, आयुर्मर्यादा कमी.

**गुरु** : भाग्येश, व्ययेश लग्नी सत्कृत्यासाठी खर्च. राजयोगकारक. धार्मिक प्रवृत्ती, वेदाध्ययन, उच्च विद्याप्राप्ती, प्रशासनात उच्च पद. सद्‌गुणी, विद्वान, नशीबवान, मधुरभाषी, संततीच्या बाबतीत सुख नाही.

**शनी** : दशमेश - लाभेश परंतु शनी नीच राशीस येतो. दृष्टी तृतीय व दशमभावावर. शनीमुळे मंगळ बिघडतो. जातक महत्त्वाकांक्षी व भांडखोर होतो. शस्त्र, विष यापासून धोका, अनिष्टकारक व आयुर्मर्यादा कमी करतो.

**राहू** : लग्नी युती कर्तबगारीस उत्तम असते. परंतु आरोग्यास ही युती चांगली नाही. अपघातप्रवण युती आहे. स्वभाव क्रूर व बेपर्वा असतो.

शनी व प्रजापती (हर्षल), वरुण (नेपच्यून) आणि रुद्र (प्लूटो) यांचे युतीचे परिणाम 'ग्रहयोगात मंगळ' या प्रकरणात सविस्तर दिले आहेत.

**(२) वृषभेचा मंगळ** : प्रथम स्थानात जेव्हा दोन हा अंक लिहिलेला असतो तेव्हा त्या स्थानातील मंगळास 'वृषभेचा मंगळ' असे म्हणतात. प्रथम स्थानात जर मंगळ असेल तर त्याचे काय फल मिळते ते पाहू.

**युवतिजितान् सुहृत्सुविषमान परदाररतान् ।**
**कुहकसुवेष भीरुपरुषान् सितभे जनयेत् ।। बृ. जा.**

**अर्थ** : शुक्राच्या राशीस मंगळ असता तरुण स्त्रियांच्या आहारी जातो (स्त्रियांनी जिंकलेला), स्वतःच्या नातेवाइकांशी, मित्रांशी प्रामाणिक राहत नाही. परस्त्रियांची अभिलाषा धरतो. (अनैतिक संबंध). जातक छानछोकीत (उत्तम वस्त्रे) राहतो. तो भित्रा असतो. परंतु

निष्ठुर असतो. कपट विद्या, इंद्रजाल विद्या जाणतो (शब्दजाल टाकण्यात, हातचलाखी अशामध्ये तरबेज), गोड बोलून स्त्रियांना फशी पाडतो.

शुक्राच्या वृषभ व तूळ या दोन राशी आहेत. त्यांचे कारकत्व अनुक्रमे कनक व कांता आहेत; त्यामुळे या दोन राशींच्या लग्नाची स्वतंत्र अशी फले आहेत व सारावलीकारांनी त्याची स्वतंत्र फले दिली आहेत. म्हणून दोन्ही लग्नांचा विचारही स्वतंत्र केला जात आहे.

**वृषभ लग्न – वृषभेतील मंगळ :**

**साध्वीव्रतभंगकरः प्रभक्षणो मन्दधनपुत्रः ।**
**द्वेष्यो बहुभरणपरो विस्त्रंभस्थिति विहीनश्च ।।**
**प्रौद्धतवेषक्रीडो बहुदुष्टवचाः कुजे वृषभ संस्थे ।**
**संगीतरतः पापो बन्धुविरुद्धः कुलात्सादी ।।**

साध्वी (चांगल्या स्वभावाच्या व विचारांच्या) पतिव्रता नीतिमान स्त्रियांचा विनयभंग करतो. जातक खादाड, अधाशी (हव्यास खाण्याचा व अन्य कर्माचा) असतो. संपत्ती बेताची व संतती अल्प असते. जातक मत्सरी, दुसऱ्यावर विश्वास न ठेवणारा व निष्ठुर बोलतो, उद्धट असतो. संगीताची आवड असते दुराचारी, नातेवाइकांबरोबर पटत नाही आणि आपल्या वर्तनाने कुटुंबास काळिमा आणतो. उत्तम वेष धारण करतो पण धसमुसळा असतो.

मंगळ व्ययस्थानाचा अधिपती असून लग्नी येतो म्हणजे पैशाची उधळपट्टी, व्ययेश हा धनस्थानाच्या व्ययात येतो म्हणून बेताची धनप्राप्ती, पंचमाचा अष्टमेश म्हणून अल्प संतती. वृषभ रास आहार व वाक् यांची द्योतक आहे म्हणून अधाशी व वाटेल ते खाणारा, मंगळ अविचारी, निष्ठुर म्हणून उद्धट भाषा बोलणारा असतो. वृषभ ही संगीताची रास म्हणून रसिकता द्वितीय स्थानदर्शक वृषभ रास तसेच कुटुंबस्थानाचे व्ययात मंगळ येतो म्हणून कुटुंबीयांशी संबंध चांगले नसतात. वृषभ रास शुक्राची म्हणून छानछोकी कपडे घालतो. सप्तम स्थानचा मालक तसाच भोग स्थानचा अधिपती म्हणून अनिर्बंध विषयवासना व त्याच्या पूर्तीसाठी भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब होतो. म्हणून युवतिजितान् व युवती (परदारासुद्धा) रत असतो.

वृषभ लग्नात कृत्तिकेचे २, ३, ४ चरण, रोहिणीचे ४ चरण व मृगाचे २ चरण वृषभ राशीचे असू शकतात. मंगळ कृत्तिकेत असता उष्णतेचे विकार, देवी, गोवरसारखे आजार, तीव्र ताप येतात. जातक खऱ्या अर्थाने सुखी नसतो आणि द्विभार्या/वैधव्य योगही येतो.

वृषभेचा पहिला नवांश मकर नवांश, तो मंगळास बरा असतो. पुढील दोन नवांश चांगले नाहीत. रोहिणीचे पहिले चरण मेष नवांशी येते. तेथे मंगळ स्वनवांशी असतो व मिश्र फले मिळतात. दुसरे चरण वृषभ नवांश म्हणजे वर्गोत्तम नवांश म्हणून मंगळ येथे शुभ फले देईल. तिसरे चरण मिथुन नवांशी, येथे कुटुंबसौख्य बिघडते. धनप्राप्ती बेताची व खर्च वाढलेला असतो. चौथा चरण कर्क नवांशी नीच नवांश म्हणून येथे अशुभ फले मिळतात.

मृग नक्षत्र मंगळाचेच आहे. त्यात पहिले चरण सिंह नवांशी मंगळाची शुभ फले मिळतात. दुसरे चरण कन्या नवांशी शत्रू नवांशी म्हणून अशुभ फले देतो.

मकर नवांशांचा मंगळ वैद्यकशास्त्राचा अभ्यास व शस्त्रक्रिया कौशल्य देईल. वर्गोत्तम व सिंह नवांशांचा मंगळ अधिकार पद देईल; मिथुन नवांशात उत्तम वक्तृत्व असेल, कर्क नवांशात जातक अनैतिक मार्गाकडे जाईल. मेष नवांशात स्त्रीनिमित्त खर्च होईल (पत्नीचा आजार), कन्या नवांशी अपघातप्रवण असेल व विधुर/वैधव्य योग होईल.


मंगळ सप्तमेश असून लग्नी असता जातकाचा विवाह बालपणच्या मित्र/मैत्रिणीबरोबर होईल किंवा नातेसंबंधामुळे होतो अगर दोघे एकाच गावात लहानाचे मोठे झालेले असतात.

वृषभ लग्नास मंगळ व्ययेश असून लग्नी असतो. शरीरप्रकृती दुबळी असते व मनही खंबीर नसते; परंतु जातक देखणा व गोड बोलणारा असतो. शुक्र व्ययात असता जातक कृपण असतो, बुद्धिमत्ता कमी असते व लोक त्याचा तिरस्कार करतात. जातकाचा स्वभाव विलासी व खर्चीक असतो.

**कुंडली : सौ. मीना**

जन्म - बुधवार दिनांक २९ एप्रिल, १९५३ रोजी पुणे येथे सकाळी ७.४२ मि. प्र. वे.

अयनांश - २२° १२' ३८", सांपातिक समय - २१-३४-५५




लग्नी गुरु-मंगळ, तांबूस पण पूर्ण गौर वर्ण. लग्नेश लाभात उच्च. चंद्र तुळेत. व्यक्तिमत्त्व सुंदर, देखणे; चेहरा गोल, पौर्णिमेचा जन्म. मुखचंद्रही पौर्णिमेसारखा गोल, तेजस्वी व गौर. B. E. Electronics. नेहमी फर्स्ट क्लास. सध्या अमेरिकेत. पती साजेसा, चेहरा हसतमुख, बोलणे गोड. शुक्र जन्म लग्नेश तसाच चंद्र लग्नेशही आहे. रवी उच्च, शुक्र उच्च. दोन्हीकडून (लग्न व चंद्र) शनी राजयोगकारक. त्याची बुध व शुक्र यांच्यावर दृष्टी. ग्रहयोग सुंदर आहेत.

गुरु मंगळाच्या युतीत असल्याने लग्नी मंगळाची वर दिलेली अशुभ फले मिळत नाही. शिवाय लग्नेश उच्च राशीत.

(३) **मिथुनेचा मंगळ :** जेव्हा प्रथम स्थानात तीन हा अंक असतो व तेथे मंगळ असतो तेव्हा त्याला 'मिथुनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल खालीलप्रमाणे आहे.

मिथुन व कन्या या बुधाच्या राशीतील मंगळाचे वास्तव्याबद्दल वराहमिहीराचे सूत्ररूपाने सांगणे असे आहे –

**बौधेऽ सहस्तनयवान् विसुहृत्कृतज्ञो ।**
**गांधर्वयुद्धकुशलः कृपणोऽभयार्थी ।।**

बुधाच्या राशीत मंगळ असता जातक असहिष्णू असतो, त्यास पुत्रसंतती असते पण मित्रपरिवार नसतो. जातक कृतज्ञ असून संगीताची आवड असते. तो कृपण असतो, तो निर्भीड व प्रवासी असतो आणि युद्धकुशल – बाहुयुद्ध, मल्लविद्या, मुष्टियुद्ध (ज्युडो, कराटेसारख्या युद्धकला तज्ज्ञ) कोणास भीत नाही. 'अर्थी' याचा अर्थ सुब्रह्मण्यम् शास्त्री – स्वामी-मालक असा करतात. श्री. बी. सूर्यनारायण राव 'अर्थी' याचा अर्थ Mendicant भिक्षू-याचक असा करतात. सुब्रह्मण्यम् शास्त्री मात्र 'अर्थी' म्हणजे भिक्षेकरी असा होत नाही असे सांगतात.

सारावलीमध्ये मिथुन व कन्या राशीच्या मंगळाची विस्तृत व स्वतंत्र फले दिली आहेत. ते काय म्हणतात हे पाहू या.

**मिथुन लग्नी मंगळ**

**कान्तः क्लेशसहिष्णुर्बहुश्रुतः काव्य विधि निपुणः**
**नानाशिल्पकलासु व निपुणो बहुशा विदेश गमनरतः**
**धर्मपरो निपुणमतिर्हितानुकूलः सुतेषु सहृदां च**
**मिथुनस्थे क्षितिपुत्रे भवति प्रचुरक्रियासु रतः ।।**

मिथुनेत मंगळ असलेला जातक तेजस्वी, कष्ट सहन करण्यास मागे-पुढे न पाहणारा (दीर्घोद्योगी), शिकलेला, विद्वान, शहाणा असतो. काव्यादी ललित वाङ्मयात कुशल असतो. (विधिनिपुण याचा अर्थ कायद्याचे उत्तम ज्ञान असणारा असा घ्यावा असे लेखकास वाटते.) शिवाय तो अनेक तऱ्हेच्या शिल्पकला, चित्रकला, मूर्तिकला व हस्तलाघवाच्या कला (उदा., शस्त्रक्रिया, शस्त्रास्त्रांचा वापर) जाणणारा असतो. (मिथुन रास खांदे, बाहू, हात दर्शविते तर मंगळ बाहुबल-नुसते शारीरिक बलच नव्हे तर चापल्य, कुशलता दर्शवितो.) मिथुन रास तृतीय स्थानदर्शक असल्याने प्रवासी व्यवसायाकरिता (फिरते विक्रेते, औषध विक्रेते) सतत प्रवास करण्यास न कंटाळणारा उलट परदेशांत जाण्यास उत्सुक असा असतो. धार्मिक व नीतीने वागणारा असून विविध गोष्टींत रस घेणारा, कौशल्य मिळवणारा (हरहुन्नरी, अष्टपैलूत्व) असून बुद्धिमान असतो.

मिथुन रास व तृतीय स्थान यांचे कारकत्व व त्यात मंगळाचे कार्यकौशल्य यांचाच सुंदर मिलाफ आणि आविष्कार येथे दर्शविला आहे. म्हणून मिथुन लग्नाच्या व्यक्ती (मंगळ

लग्नी असता) लेखन, वाचन, हस्तकला, संगीत यांची आवड व त्यामध्ये गती असलेली असते. असा जातक कल्पक, समयसूचक, हजरजबाबी, उल्हासित वृत्तीचा व परिणामांची पर्वा न करणारा असतो. जातक ''प्रचूर क्रियासू रतः'' अनेकविध कौशल्ये, अष्टपैलूत्व असलेला असतो असा विस्तारित अर्थ आहे आणि अन्य ग्रहांच्या योगांत यातील सर्व अथवा बऱ्याच गोष्टी पाहण्यास मिळतील. क्रीडाप्रकारही मिथुनेतील मंगळ दर्शवितो.


मिथुन लग्नाच्या व्यक्ती उंच व सडसडीत असून चपळ असतात. वृत्ती आशावादी व उल्हासित, डोळे तीक्ष्ण व नाक किंचित बसके असते. त्या चलाख असून यांत्रिक कामात, यंत्रविद्येत निपुण असतात.

मंगळ शुभ ग्रहयुक्त वा शुभदृष्ट असता जातक फौजदारी, वकील, पोलीस, सैन्यदलात नोकरी करतो.

### कुंडली : श्री. ल. ब. भोपटकर

जन्म - मंगळवार दि. ११ मे, १८८० रोजी पुणे येथे सकाळी ९.३०.

अक्षांश - १८° ३०' उ., रेखांश - ७३° ५३' पूर्व.




सुप्रसिध्द कायदेपंडित M.A., L.L.B. प्राध्यापक, राजकारण, समाजकारण केले. व्यायाम व मर्दानी खेळांची आवड. महाराष्ट्र मंडळाचे संस्थापक. मंगळाचे गुणधर्म व्यायाम व खेळ यांची आवड. ते कार्य केले. विधिनिपुण, पुण्यातील प्रख्यात वकील. गांधी खून खटल्यात सावरकरांचा उत्तम बचाव केला. विधी महाविद्यालयात अध्यापक. (लेखक विधी महाविद्यालयात शिकत असताना त्यांची व्याख्याने ऐकली आहेत.) कायद्याचे सुस्पष्ट विवेचन. दशमात गुरु त्यामुळे अध्यापक. मिथुनेत मंगळ-अनेक विषयांत रस होता व कामही केले. लग्नेश बुध व भाग्येश शनी यांची मेष राशीत युती. बुध-शनी युती व त्यांचा हर्शलशी त्रिकोण हा वकिलीतील निष्णातपणा व उत्तम उलटतपासनिसाचा व युक्तिवादाचा योग. चंद्र उच्च (धनेश चंद्र) लाभयोग गुरु. ५ वी मेष राशीत. तृतीयेश रवी उच्च.

## मंगळाबरोबर अन्य ग्रह असता (मिथुन लग्न)

**रवी :** तृतीयेश रवी व लाभेश मंगळ यांचा लग्नी सहयोग होतो. विद्वान, श्रीमंत आणि स्वतःच्या कर्तृत्वावर व मेहनतीवर जातक पुढे येतो पण शत्रूही त्रास देतात. जातक धाडसी व शूर असतो. तो उत्तम डॉक्टर होतो.

**चंद्र :** द्वितीयेश चंद्र व लाभेश मंगळ यांची युती संपत्तीचे दृष्टीने चांगली असते. जातक सुंदर दिसतो. चेहरा गोल असतो. वर्ण उत्तम गौर असून भाषेत गोडवा असतो. चांगला वक्ता होतो. संपत्ती व वाहने असतात.

**बुध :** बुध लग्नेश व चतुर्थेश असतो आणि मंगळ लाभेश व षष्ठेश असतो. जातक उत्तम वक्ता, वादविवादपटू व गणितज्ञ असतो. संपत्ती, स्थावर, वाहने असतात. फिरता विक्रेता, औषधे तयार करणारा असून तो परदेशातही जातो. धातुकाम - मेटॅलर्जिस्ट तसेच स्थापत्यशास्त्राकडेही गती असते.

**शुक्र :** शुक्र पंचमेश व व्ययेश असतो. सहयोग पंचमेश व लाभेश तसेच षष्ठेश व व्ययेश यांचा होतो. विवाह नातेसंबंधात होतो. जातक नशीबवान असून त्यास संपत्ती व संतती यांचे सौख्य लाभते. पण जातक विषयासक्त असतो. जननेंद्रियाचे व घशाचे विकार होतात.

**गुरु :** गुरु सप्तमेश व दशमेश असतो. दशमेश-लाभेश यांची युती लग्नी होते. स्त्रीमुळे भाग्योदय होतो. परदेशात वास्तव्य असते. जातक विद्वान व श्रीमंत असतो. वाहनसुख असते. सद्‌गुणी, उत्साही व दानशूर असतो.

**शनी :** भाग्येश शनी व लाभेश मंगळ यांचा सहयोग - मोठ्या भावास अनिष्ट, खाणीमध्ये काम करतो. माइनिंग इंजिनियर होतो पण हा योग विवाहसुखास विघातक ठरतो.

**(४) कर्केचा मंगळ :** जेव्हा प्रथम स्थानात ४ हा अंक असतो व तेथे मंगळ असतो तेव्हा तेथील मंगळाला 'कर्केचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल खालीलप्रमाणे :

**चांद्रेऽर्थवान् सलिलयान समर्जितस्वः ।**
**प्राज्ञश्च भूमितनये विकलः खलश्च ।। अ. १८ श्लोक ६ वा**

मंगळ कर्केत नीच राशीस येतो पण कर्क लग्नापासून पाचवे (त्रिकोण) व दहावे (केंद्र) या स्थानांचा अधिपती असल्यामुळे तो एक राजयोगदर्शक असतो. त्यामुळे कर्केतील मंगळाची शुभ फले वराहमिहीरांनी वरील वचनात दिली.

त्यांच्या मते असा जातक संपत्तिवान असतो, जहाजे व नौका यांच्यामधून केलेल्या व्यापारामुळे पुष्कळ संपत्ती मिळवितो. जातक बुद्धिमान, विद्वान व शहाणा असतो परंतु तो प्रकृतीने ठणठणीत नसतो. दुर्बल वा विकल असतो.

मंगळ हा अग्नितत्त्वाचा पराक्रमी व धाडसी ग्रह आहे. परंतु तो कर्क या जलराशीत येतो. तेथे मंगळाचा अग्नी विझतो. शरीरातील उष्णता कमी होते. त्यामुळे जातक दुर्बल - विकल हातो. कर्क रास जठरदर्शक आहे व मंगळाचा - अग्नीचा तेथे प्रभाव पडत नाही.

त्यामुळे अग्निमांद्य येण्याची शक्यता असते. शरीराच्या दुर्बलतेस हेही एक कारण असू शकेल.

परंतु सारावलीमध्ये कर्कस्थ मंगळाची निराळी फले दिली आहेत –

**परगृहनिवासशीलो वैकल्यरुगर्दितः कृषिधनश्च ।**
**बाल्ये च राजभोजनवस्त्रेप्सु : परगृहान्नाशी ।।**
**सलीलाशयता धनवान् पुनः पुनर्वृद्धवेतनार्तश्च ।**
**कर्कऽगे क्षितितनये भवति मुदुः सर्वतो दीनः ।।**

जातक दुसऱ्याच्या घरात राहतो (त्याच्यावर तशी वेळ येते). तो विकलांग व रोगट प्रकृतीचा (मंगळाचे नीचत्वाची फले) असतो. त्याला शेतीवाडीपासून धनलाभ होतो. (चंद्र चतुर्थाचा कारक ग्रह, कर्कही चतुर्थस्थान दर्शक रास आणि मंगळ भूमिपुत्र म्हणून शेती असणे व त्यापासून धनप्राप्ती होते.) जातक राजयोग घेऊनच जन्माला आलेला असतो. त्यामुळे उत्तम श्रीमंती भोजन व उंची वस्त्रे त्यास मिळतात. (असे असले तरी) तो दुसऱ्याच्या घरातील सुग्रास अन्न खातो. (परक्याच्याच पण श्रीमंत नातेवाइकांच्या घरात निवास व भोजन करण्याची पाळी येते.) त्यास नौका, जहाजे, पाणी वा अन्य द्रव पदार्थांच्या माध्यमातून, व्यापारातून अगर पदार्थ तयार करून संपत्ती मिळते. त्याच्या जीवनात चढउतार होत असतात (चंद्राच्या कलाप्रमाणे) सुख-दुःखही आलटूनपालटून येते.

मातृस्थानदर्शक कर्क राशीत मंगळ नीच असतो. शिवाय तेथून चौथ्या स्थानावर मंगळाची दृष्टी येते. त्यामुळे जातक लहानपणीच मातृसुखास पारखा होतो. त्याचे पालनपोषण त्याचे आजोळी अथवा अन्य नातेवाइकांकडे होते व वास्तव्यही दुसऱ्याच्या घरात होते असा या श्लोकाचा अर्थ दिसतो. त्याच कारणाने तो बाल्यावस्थेत आजारी (अग्नितत्त्वाचा मंगळ जलराशीत) व दुर्बल असतो. पण नंतर शरीर धष्टपुष्ट होते. मध्यम बांधा, चेहरा फुगीर व लांब, नाक ठेमसे, गौरवर्णी, छाती व खांदे रुंद आणि हात लांब सडसडीत असतात.

अशा व्यक्ती चांगल्या बुद्धिमत्तेच्या, तेजस्वी व दीर्घोद्योगी आणि काटकसरी असतात. तरल कल्पनाशक्ती व उत्तम ग्रहणशक्ती असते. त्यांना अंतःस्फूर्ती असते. या व्यक्ती सुखासीन असतात. पत्नी, संतती व आपले कुटुंब यांच्यावर त्यांचे चांगलेच प्रेम असते. या व्यक्तींना बोलावयास खूप आवडते. त्या आत्मविश्वासू, प्रामाणिक आणि कोणापुढे मान न तुकविणाऱ्या असतात. भावना तीव्र असतात, वृत्ती सरळमार्गी व न्यायी असते. नवीन कल्पना स्वीकारण्याची आणि परिस्थितीनुरूप बदलण्याची तयारी असते. सावधानतेने काम करतात. त्यांचा एकच एक व्यवसाय नसतो. व्यवसाय बदलत असतात.

कर्क लग्नी मंगळ असता काय होते याचा विचार सुरुवातीसच केला गेलेला आहे. मंगळाचा नीचभंग होत असता उत्तम राजयोगकारक होतो. मंगळाच्या नीचत्वामुळे येणारे परिणाम अशुभ नसतात. कर्क राशीत गुरु उच्च असतो. त्यामुळे मंगळाबरोबर गुरुही कर्केत

असता अगर अन्य ठिकाणचा गुरु चंद्राचे केंद्रात असता मंगळाच्या नीचत्वाचा भंग होतो. त्याचे नीचत्व नाहीसे होते व तो पूर्ण शुभ फलदायी व राजयोगकारक होतो.

मंगळ कर्क लग्नी असता देवी येण्याची शक्यता जास्त असते व त्याच्या आणि अपघाताच्या अगर जखमांच्या खुणा, व्रण शरीरावर दिसतात. मंगळाचे गुणधर्म येथे पूर्णपणे दिसतात. मंगळाचे गुणधर्म येथे पूर्णपणे दिसतात.

पंचमावर वृश्चिक रास येते व त्याचा स्वामी मंगळ नीच राशीत येतो. अशा व्यक्ती देवाण-घेवाण करण्यास, तडजोड करण्यास तयार नसतात. दोषैक दृष्टी असते. त्यामुळे दुसऱ्याचे दोष पाहून त्यावर टीका करण्याची वृत्ती असते. तसेच आपल्याला पाहिजे ते झालेच पाहिजे, मिळाले पाहिजे अशी मनोवृत्ती असते. परंतु या जातकास माणसांची पारख चांगली असते. टीका निर्भीडपणे व निष्पक्षपातीपणे केली जाते. चिकाटी हा प्रधान गुण दिसतो. संततिसौख्य नसते. मंगळ नीच असल्याने दुष्ट प्रवृत्ती व क्षुद्र देवतांची उपासना करतो. नीचभंग झाला असता एखाद्या पुत्राचे सुख मिळते.

मंगळ दशमेशही असल्याने तो चंद्राबरोबर लग्नी असता अगर गुरूच्या दृष्टीत असता जातक प्रसिद्ध पुरुष होतो, सार्वजनिक संस्था काढण्यात पुढाकार घेतो. जातक मोठ्या अधिकारावर काम करतो पण मंगळाबरोबर चंद्र नसता व्यवसायात अपयश येते. मंगळाच्या दशेत मानभंग व अवनती होते.

कर्क लग्नास रवी धनेश असतो. त्याचा मंगळाबरोबरचा सहयोग उत्तम ठरतो. राज्यप्रशासनात मोठ्या अधिकारावर जातो. समाजकारण व राजकारण करतो.

कर्क लग्नास बुध व्ययेश व तृतीयेश होतो. त्याचा मंगळाशी सहयोग व दृष्टीसंबंध असता जातकाच्या बोलण्यात दोष उत्पन्न होतो. नोकरी-व्यवसायात बुधाचे दशेत, अंतर्दशेत मानहानी, नोकरीवरून मुक्त होण्याचे प्रसंग उद्‌भवतात आणि त्या निमित्ताने न्यायालयीन खटल्यासही तोंड द्यावे लागते.

शुक्र हा चतुर्थेश व लाभेश असतो आणि तो मंगळाबरोबर असता बऱ्याच अंशी शुभ फले मिळतात. जातक श्रीमंत घराण्यात जन्मास आलेला असतो. तो सुशिक्षित व विद्वान असतो आणि तो प्रमुख व प्रसिद्ध होतो. पण नीच मंगळामुळे मातृसुख बिघडते. जातक परस्त्रीकडे आकृष्ट होतो. तो सत्यप्रिय नसतो व जुगारी असतो.

मंगळाबरोबर गुरु असता मंगळाचे नीचत्व नाहीसे होते व त्याला राजयोगाचा प्रत्यय येतो. जातक प्रशासनात उच्च पदावर जातो अथवा राजकारणात शिरून मंत्रिपदे भोगतो. जातक बुद्धिमान व विद्वान असतो आणि शास्त्रज्ञ म्हणूनही जगापुढे येतो. उत्तम वक्तृत्व लाभलेले असते तसेच उत्तम न्यायाधीश म्हणून ख्यातनाम होतो.


शनी मंगळाबरोबर लग्नी असता विधुरता/वैधव्य योग होतो. जातक चोर व खोटे बोलणारा होतो. इतरांची फसवणूक करतो, कुरापती काढतो. धातुकाम, खाणकाम व अन्य हलकी कामे करतो.

## कुंडली : श्री. कुलकर्णी

जन्म - रविवार दि. ७ जुलै, १९४० रोजी सकाळी ८.४० प्र. वेळ.

अक्षांश - १८० ३६' उत्तर,

रेखांश - ७६° ३' पूर्व.




लग्नेश चंद्र, तृतीयेश/व्ययेश बुध व दशमेश/पंचमेश मंगळ, कर्केत युतीमध्ये आहेत. शिक्षण पदवीधर, बँकेत नोकरी. चढत-चढत व्यवस्थापक पदापर्यंत पण नंतर एका प्रकरणात संचालकांची गैरमर्जी झाली. तेथून हाल सुरू.

नोकरीतून बडतर्फ. त्यानंतर न्यायालयीन खटला-उच्च न्यायालयापर्यंत. त्यानंतर तडजोडीने पुन्हा व्यवस्थापक पदावर नेमणूक. दशमावर शनी नीच राशीत. त्यामुळे उच्च पदावरून अवनती. दशमस्थ नीच शनी व बुध-मंगळ युती यांचे पूर्ण परिणाम दिसून येतात. बोलण्यात दोष आहे. परक्यास बोलणे लवकर समजत नाही. जुलै २००० मध्ये निवृत्त. ऑगस्ट २००० मध्ये मृत्यू.

**(५) सिंहेचा मंगळ :** जेव्हा प्रथम स्थानात ५ हा अंक असेल व तेथे मंगळ असेल तेव्हा तेथील मंगळाला 'सिंहेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे :

या लग्नासही मंगळ राजयोगकारक असतो. तो भाग्येश व चतुर्थेश असून लग्नी अग्नितत्त्वाच्या राशीत व मित्रक्षेत्री येतो. त्यामुळे तो चांगला प्रभावी ठरतो. परंतु वराहमिहीर सिंहेतील मंगळाची चांगली फले देत नाहीत. ते म्हणतात, ''निःस्वःक्लेशसहो वनान्तचरः सिंहऽल्पदारात्मजो'' म्हणजे जातक संपत्तिहीन असतो. त्यास कष्ट, दुःखे सहन करावी लागतात आणि तो रानावनात भटकणारा असतो. त्यास पुत्र थोडेच असतात व बायकाही थोड्याच असतात.

सारावलीमध्येही याच धर्तीवर पण विस्तृत वर्णन आहे :

**असहः प्रचण्डशूरः परस्वसन्तानसंग्रहणशील : ।**
**अटवीनिवास गोकूल मांसरूचीः स्यात्मृतप्रथमदारः ।।**
**व्याल मृगोरगहन्ता न पुत्रवान् धर्मफलहीनः ।**
**भौमे हरौ सुसत्त्वः क्रियोद्यतः स्वाद्यपुष्मांच ।।**

**अर्थ** : सिंहेत मंगळ असलेला जातक अधीर स्वभावाचा, महापराक्रमी, अरण्यात राहणारा, शिकारीची आवड असलेला, सतत उद्योगी, संपत्ती मिळवणारा, अधार्मिक असून त्यास संतती नसते व त्याची प्रथम पत्नी मृत होते. तो मांसाहारी असतो. ''परस्वसन्तानसंग्रहणशीलः'' म्हणजे दुसऱ्याची संपत्ती लुबाडणारा व दुसऱ्यांची मुलेही पळविणारा असा अर्थ आहे.

परंतु हे वर्णन पटत नाही. मंगळ हा शिपाईगडी आहे व तो सिंहेत महापराक्रम करतो आणि आपल्या मित्राच्या राशीत असताना तो दुसऱ्याच्या संपत्तीचे व संतती यांचे रक्षण न करता हरण करतो हे पटत नाही आणि तसे असेल तर हे वर्णन प्लूटोस लागू पडते.

पत्नी मृत होणे व संतती नसणे हे बरोबर आहे. रानावनात भटकणे व शिकार करणे आवडते हेही ठीक आहे; म्हणजे असा माणूस सरकारच्या वनविभागात वा वनखात्यात नोकरी करेल असाही अर्थ निघू शकेल.

सिंह लग्नास मंगळ राजयोगकारक असतो हे वरील वर्णनावरून दिसत नाही. बृहज्जातक व सारावलीतील राजयोग केंद्र कोणाधिपतीच्या परस्परसंबंधावर आधारित दिसत नाही.

सिंह लग्नास एकटा मंगळही राजयोगकारक ठरतो व तो लग्नी मित्रक्षेत्री असता शुभच फळे देणार. येथे मंगळ अमंगळ नसतो.

सिंह लग्नाच्या व्यक्ती राजबिंड्या असतात. सिंह ही राजरास आहे. भरदार छाती, रुंद खांदे, मध्यम उंची, लंबगोल चेहरा, विचारी व गंभीर मुद्रा असते. अशा व्यक्ती महत्त्वाकांक्षी, उदारहृदयी असून साहित्य, संगीत व कला यांची आवड असते. सिंह ही नाट्यप्रधान रास आहे, वृत्ती प्रसन्न असते. अभिलाषा असते, इतरेजनांना अशा व्यक्तीबद्दल भीतियुक्त आदर असतो. स्वभाव मानी असतो.

मंगळ हा राजयोगकारक असल्याने मंगळाचे अशुभ परिणाम (उतावीळपणा वगैरे) कमी असतात. त्याचे शुभ परिणाम दिसतात. मंगळ चतुर्थेश व नवमेश असतो. ही दोन्ही स्थाने उच्च व उच्चतर विद्येची आहेत. जातकास उत्तम शिक्षण लाभते व पदव्युत्तर शिक्षणही मिळते. जातक श्रीमंत घराण्यात जन्म घेतलेला असतो. त्यास वडिलार्जित मालमत्ता व संपत्ती मिळते. चतुर्थेशाच्या चतुर्थावरील दृष्टीचे हे फल आहे.

नवमेश लग्नी असल्याने जातक स्वतःच्या कर्तबगारीवर पुढे येतो. त्यास नशिबाची साथ चांगली मिळते. तो स्वतःही संपत्ती, स्थावर व वाहने मिळवितो.

येथे रवीचा मंगळाबरोबर शुभयोग असून गुरुची दृष्टी असता सर्व तऱ्हेची सुखे, राजमान्यता व संपत्ती मिळते.


## कुंडली : श्री. एस.एस. ऊर्फ नंदू

जन्म - गुरुवार दि. ८ ऑगस्ट, १९७५ रोजी सकाळी ७.४० प्र.वे.

अक्षांश - १७° ४३' उत्तर, रेखांश - ७५° पूर्व ५५

मोठ्या घराण्यात जन्म. घरची मोठी शेतीवाडी व स्थावर. शिक्षण B.Com, L.L.B. वकिली व्यवसाय. त्यात लवकर जम बसला. सरकारी वकील म्हणूनही काम केले. वाहने आहेत. सुविद्य पत्नी. संतती : पहिला मुलगा व दुसरी मुलगी.

चेहरा हसतमुख (बुध), वर्ण गोरा (मंगळ) व बोलणे लाघवी (बुध-शुक्र).




षष्ठेश व सप्तमेश शनी चतुर्थात. त्याची दृष्टी लग्नावर तसेच मंगळ, बुध-शुक्रावर. मंगळाची चतुर्थावर व शनीवर दृष्टी. राहूची महादशा सन २००१ साली संपली. राहू तृतीयस्थानी चांगला असतो व त्याचे प्रत्यंतर आलेच आहे.

त्यानंतर पंचमेश गुरुची महादशा सुरू होईल. गुरु धनस्थानी आहे. त्याची दशमावर पूर्ण दृष्टी आहे. या महादशेत जातक आपले कर्तृत्व ठळकपणे दाखवेल, त्यास राजमान्यताही मिळेल आणि नावलौकिक होईल.

### मंगळाबरोबर अन्य ग्रह असता (सिंह लग्न)

**रवी :** शत्रूंचा पराभव होतो. जातकाच्या हातून महान कार्य होते. नावलौकिक होतो. जातक तेजस्वी, पराक्रमी व उत्साही असतो. राजासमान मान मिळतो, कीर्ती होते. उत्तम संपत्तीचा लाभ होतो. जातक देखणा व रुबाबदार असतो.

**चंद्र :** वद्य पक्षातील चंद्र असता रातांधळा होतो. पूर्ण चंद्र असता उत्तरायुष्यात दृष्टिदोष उत्पन्न होतो. जातक राजबिंडा व सुंदर आणि आकर्षक असतो. त्याचा आवाज सिंहासारखा गंभीर व भेदक असतो.

**बुध :** बुध द्वितीयेश व लाभेश असतो आणि त्याचा योगकारक मंगळाबरोबर सहयोग. संपत्ती, संतती, स्थावर वाहनादी सुखे देतो. भावंडांना चांगला नसतो. उत्तम वक्तृत्व असते.

**शुक्र :** शुक्र दशमेश व तृतीयेश असतो आणि मंगळाशी त्याचा सहयोग उत्तम ठरतो. जातक तेजस्वी, देखणा व स्त्रियांना आकर्षित करणारा असतो. वैवाहिक जीवन सुखी असते. बुद्धिमान असून कलांचा भोक्ता असतो. उदार असून सढळ हाताने पैसा खर्च करतो. जातक प्रसिद्ध होतो आणि नातेवाईक व ज्ञातिबांधवांचा आवडता असतो.

**गुरू :** सिंह लग्नी गुरु असणे हाच मोठा योग असतो आणि त्यात त्याचा मंगळाशी सहयोग महान ठरतो. गुरु पंचमेश लग्नी असल्याने पंचमावरील दृष्टीमुळे त्याची संतती चांगली व हुशार निपजते. जातक धष्टपुष्ट शरीराचा व पराक्रमी असतो. जातक मोठ्या घराण्यात जन्मलेला असतो व तो राजा होतो. उदा., लिंडन जॉन्सन व कै. राजीव गांधी.

**शनी :** मंगळ हा त्याचा हाडवैरी शनीबरोबर सिंह लग्नी शुभ फलदायी ठरत नाही. षष्ठेश व सप्तमेश शनी लग्नी येणे ही स्थितीच घातक ठरते. दुर्बल शरीर व कुरूप चेहरा आणि बेताची बुद्धिमत्ता हा शनी देतो. शनीचे साहचर्याने मंगळाचा राजयोग भंग पावतो. जातक भांडखोर व फसवा असतो. चौरकर्म करतो. धातुकामात कुशल असतो. तो मायावी असतो व दुःखी होतो.

**(६) कन्येचा मंगळ :** जेव्हा प्रथम स्थानात ६ हा अंक असतो तेव्हा तेथील मंगळाला 'कन्येचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे :

**पूज्यः सतामतिधनो रतिगीतधनो मृदुप्रियाभाषी ।**
**विविधव्ययोऽल्पशौर्यो विद्वान भवति प्रणित पार्श्वश्च ।।**
**अहितेभ्योऽधिकभीरुर्वेदस्मृतिधर्मवान् सुबहुशिल्पः ।**
**कन्यायां भूतनये स्नानविलेपनरतः कान्तः ।।**

**अर्थ :** सज्जन लोक जातकास मान देतात. तो चांगला श्रीमंत असतो. त्यास गाणे-बजावणेची हौस असते. हळुवार, मृदू व गोड बोलतो. पण फार पराक्रमी नसतो. अनेक तऱ्हेच्या खर्चाच्या बाबी पुढे उभ्या राहतात. जातक विद्वान असतो. वेद, स्मृती अशा शास्त्रांचा अभ्यास असतो. (हल्लीच्या युगातील शास्त्रे, पदार्थविज्ञान, रसायन वगैरे शास्त्रांचा अभ्यास). शिल्पकला वगैरे कलांचा जाणकार असतो. शरीर स्वच्छ ठेवण्याची व प्रसाधनाची आवड असते. (नीटनेटकी राहणी). शरीर कांती तेजस्वी असते. मंगळाचा तेजस्वीपणा उठून दिसतो.

मंगळ कन्या लग्नास तृतीयेश व अष्टमेश असतो. भावंडांचे सुख नसते. धन स्वकष्टाने मिळविले जाते. जातक महत्त्वाकांक्षी व भांडखोर असतो. खेळात प्रावीण्यही मिळते.

मंगळ कन्येत निर्बली असतो. त्याच्या अष्टामेत्वाची अशुभ फले भोगावी लागतात. जातक सुदैवी नसतो. त्यास आजार होत असतात. विशेषतः पोटाचे विकार होतात, शस्त्रक्रियाही होतात. तीव्र शरीरपीडा होते. गुरुचा शुभ योग असता अशुभाची तीव्रता कमी होते. लग्नेशाशी मंगळ शुभसंबंधित अगर भाग्येश शुक्राशी शुभ योग असता असे अशुभ

परिणाम तीव्रतेने होत नाहीत, तसेच ते आयुर्मर्यादेवर परिणाम करणारे ठरत नाहीत. विद्या पूर्ण होते. कन्या लग्नास गुरु चतुर्थेशही असतो. तो ठीक असल्यास शिक्षण चांगले होते. रसायनशास्त्राचा अभ्यास होतो. जातकाच्या व्यावसायिक जीवनात अडथळे येतात व बदल होतात.


मंगळ तृतीयेश असल्याने तो खेळाडू व कसरतपटू असतो पण त्यास शुभ ग्रहांची साथ पाहिजे.

कन्या राशीतला पहिला नवांश (मकर नवांश), वृषभ व मिथुन नवांश (नवमेश व दशमेशाचे व कन्या नवांश एवढीच शुभ फले देतील.

**कुंडली : सौ. क्ष.**

जन्म - गुरुवार दि. १९ जानेवारी, १९५० रोजी पुणे येथे रात्री ११.३० प्र. वेळ.

सांपातिक समय : ६-५०-५.




डिप्थेरिया, टॉन्सिलची शस्त्रक्रिया, सिजेरियन शस्त्रक्रिया.

शिक्षण बी.एस्सी., एल.एल.बी. तीन वर्षे वकिली. लग्नानंतर नोकरीचे प्रयत्न झाले पण सोडावी लागली. एक कन्या. धाकटी बहीण २ ते ३ वर्षांत वारली. पती सुस्वभावी, उत्तम नोकरी. मंगळ-केतू युती असली तरी येथे मंगळाचा दोष उपस्थित होत नाही. कारण सप्तमेश गुरु पंचमात भाग्येश शुक्र व लाभेश चंद्राचे युतीत आहे. पंचमस्थ गुरुची लग्नस्थ मंगळावर पूर्ण दृष्टी आहे; त्यामुळे मंगळ दूषित नाही.

### मंगळाबरोबर अन्य ग्रह असता (कन्या लग्न)

**रवी :** व्ययेश लग्नी येतो. शरीर दुर्बल असते. अपघातप्रवण. मंगळ तृतीयेश व रवी असा योग चांगला ठरेल. भावंडाकरिता खर्च करावा लागेल.

**चंद्र :** चंद्र लाभेश असतो. त्याचा व तृतीयेश मंगळाचा सहयोग संपत्तीच्या बाबतीत शुभ ठरतो. चेहरा आकर्षक व सुंदर असतो. जातक विद्वान असून त्यास विविध कलांचे

ज्ञान असते. चंद्र शुक्ल पक्षातील असता शुभ फले. वद्य पक्षातील व निर्बल चंद्र असता मातृसुख बिघडते. जातकास पोटाचे विकार होतात. रक्त दूषित राहते.

**बुध :** लग्नेश बुध, तृतीयेश मंगळ यांचा लग्नी सहयोग चांगला ठरतो. बुध स्वगृही अगर उच्च भागात असतो आणि त्यामुळे जातक वाङ्मय क्षेत्रात, क्रीडाक्षेत्रात पुढे येतो. तो गणिती, टीकाकार वा स्थापत्यशास्त्राकडे वळतो. जातक बहुभाषी असतो व वक्तृत्व चांगले राहते.

**शुक्र :** शुक्र भाग्येश व धनेश असल्याने शुक्र-मंगळाचा सहयोग चांगला ठरतो. भावंडे पुढे येतात. जातक पराक्रमी व त्यास खेळाची आवड असते. चेहऱ्यावर तीळ व अन्य जन्मखूण असते व त्यामुळे सौंदर्यात भर पडते.

**गुरू :** गुरू व चतुर्थेश सप्तमेश असतो. त्याचा मंगळाशी सहयोग शुभ फलदायी ठरावा. स्त्री, संपत्ती, स्थावर, वाहन यांचे सुख लाभते. संततीस मात्र ही युती प्रतिकूल ठरते.

**शनी :** पंचमेश व षष्ठेश शनी लग्नी येतो. शनी-मंगळ लग्नी युती असल्याने त्यांची सप्तमावर दृष्टी विवाहसुखास बाधक ठरते. विधुरता/वैधव्य असे योग येतात. तीव्र आजार, दीर्घ मुदतीचे आजार, मोठ्या व्याधी उद्‌भवतात. आयुर्मर्याद कमी होते तसेच ही युती भावंडे व संतती यांना अनिष्ट ठरते.

**(७) तुळेचा मंगळ :** प्रथम स्थानात जेव्हा ७ हा अंक असून तेथे मंगळ असतो तेव्हा त्याला 'तुळेचा मंगळ' म्हणतात.

**सारावली :** **अध्वनिरतः कुपण्य प्रसक्तवाक्यो विकत्थनः सुभगः ।**
**हीनांगः स्वल्पजनः संग्रामेप्सु परोपभोगी च ।।**
**योषिद् गुरुमित्राणां मनोरमो नष्ट पूर्वदारश्च ।**
**शौण्डिक वेश्या निकटे संप्राप्त धनक्षयस्तुलिनी भौमे ।।**

तूळ राशीत लग्नी मंगळ असता जातक भटक्या असतो (प्रवासाची आवड वा व्यवसायानिमित्त), तो पापकर्मे करतो. असा जातक उत्तम संभाषणपटू असतो, तो नशीबवान असतो; परंतु एखादे व्यंग असते. नातेवाईक थोडे असतात. स्पर्धा, कलह यांत भाग घेण्यास उत्सुक असतो. त्याची पत्नी अगोदर मृत्यू पावते. तो वेश्यागमनी असून धनक्षय होतो.

मंगळ या ठिकाणी जास्त विषयवासना देतो व जातक त्याच्या तृप्तीचे मागे असतो व स्वतःचा नाश करून घेतो. या लग्नास दोन व सात या मारकस्थानाचा अधिपती असतो व तो प्रधान मारकेश ठरतो.

जातक मध्यम बांध्याचा, कफ प्रकृती, गौर वर्णाचा व देखणा असतो. चेहरा रुंद, सुलोचन असून प्रमाणबद्ध शरीर असते आणि तारुण्य बराच काळ टिकवून धरतो.

या व्यक्तींना मनुष्यस्वभावाचे उत्तम ज्ञान असते. त्यांना दूरदृष्टी असते व तर्कशक्ती चांगली असल्याने त्याच्या जोरावर उत्तम युक्तिवाद करू शकतो. समयसूचक व हजरजबाबी असतो. जातक महत्त्वाकांक्षी असून शांतता, सुव्यवस्था व न्याय यांचा भोक्ता

असतो. इतर जण आपल्याविषयी काय बोलतात याबद्दल तो बेफिकीर असतो. पण विरुद्ध मताच्या लोकांवरही आपली मते लादण्यात प्रयत्नशील असतो. सत्य व प्रमाणिकपणा याकडे ओढा असतो. तो संगीतप्रिय असतो.


या लग्नास मंगळ जसा सप्तमेश असतो तसाच तो द्वितीयेशही असतो. असा जातक स्वपरिश्रमाने पैसे मिळवितो. संपत्ती उत्तम मिळवितो. भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब होतो. शुक्र-मंगळ युती हा योग विषयवासना जास्त देतो.

लग्नी असलेल्या मंगळाची चतुर्थावर, सप्तमावर व अष्टमावर दृष्टी येते. शिक्षण जेमतेम पदवीपर्यंतचे असते. शनी ठीक नसला तर शिक्षणात अडथळे येतात व मातृसुख बिघडते वा अल्प असते. विषयातिरेकामुळे व्याधी उत्पन्न होतात.

प्रथमदर्शनी लोक यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे व गोड बोलण्याने प्रभावित होतात.

**कुंडली : श्रीयुत श्रीकांत शि. मोने**

जन्म - दि. २३ ऑक्टोबर, १९४२ रोजी सकाळी ७.१० युद्ध वेळ.




लग्नी रवी-मंगळ व शुक्र युतीच आहे. अंतर ३७ कला फक्त आहे. रवीमुळे गौरवर्ण नाही; परंतु मंगळाच्या तांबूस वर्णाची झाक आहे. रवी-मंगळामुळे व्यक्तिमत्त्व थोडे उग्र वाटते. मातृसुख व पितृसुख संपले आहे. दशमांतील उच्च गुरूची धनस्थानावर दृष्टी आहे. बँकेत चढत-चढत अधिकारी पदावर पोहोचले. नोकरीनिमित्त प्रवासही झाला. चार भाऊ व दोन बहिणी. पत्नीही देखणी व नाजूक आहे. संतती दोन कन्या-पुत्र. शिक्षण पदवीपर्यंत. संसार सुखी आहे. धनेश मंगळ व लाभेश रवी यांची युती आहे.

### मंगळाबरोबर अन्य ग्रह लग्नी असता (तूळ लग्न)

**रवी :** वृषभ लग्नास रवी चतुर्थेश असल्याने दोन केंद्राधिपतींचे साहचर्य शुभ परिणामी ठरते. जातक सुशिक्षित व विद्वान असतो. त्याची नोकरी सरकारी खात्यात होते. तूळ

लग्नास रवी लाभेश व मंगळ द्वितीयेश यांची युती संपत्ती लाभाचे दृष्टीने चांगली ठरते; पण रवी लग्नी नीच राशीत येतो. त्यामुळे त्याची शुभ फले मिळत नाहीत.

**चंद्र :** वृषभ लग्नास चंद्र तृतीयेश उच्च व मंगळ केंद्राधिपती यांची युती मिश्र फले देईल. कारण येथे मंगळ व्ययेशही असतो. भावंडांकरिता पैशाचा व्यय तसेच न्यायालयीन खटल्यामुळे धनव्यय. पत्नीविरह व मातेसही अनिष्ट. तूळ लग्नास चंद्र दशमेश व मंगळ धनेश यांची युती उत्तम धनलाभ दर्शविते. चंद्र वर्धिष्णू असता जास्त संपत्तीचा ओघ येतो.

**बुध :** वृषभ लग्नास द्वितीयेश व पंचमेश बुध लग्नी मंगळाचे युतीत मिश्र फलदायी होतो. बुध धनदायी तर मंगळ धनक्षयी- मिळालेला पैसा खर्च होतो. संततीसुखही बिघडते. तूळ लग्नास नवमेश व व्ययेश होतो तर मंगळ धनेश व सप्तमेश होतो. त्यामुळे भाग्येश बुध व सप्तमेश मंगळ यांची युती राजयोगकारक ठरते. विवाहामुळे भाग्य उदयास येते. पण धनेश व व्ययेश यांचा संबंध संपत्तीचा ऱ्हास दर्शवितो. बुध-मंगळ योग उत्तम बुद्धिमत्ता व तर्कशक्ती दर्शवितो तसेच धारदार व जोदार वक्तृत्व असते.

**शुक्र :** वृषभ लग्नास लग्नेश व सप्तमेश तसाच षष्ठेश व व्ययेश (शुक्र-मंगळ) यांची युती असता जातक दीर्घायू असतो. तूळ लग्नास शुक्र अष्टमेशही असतो. येथे शुक्र-मंगळाची युती व्यवसाय, संपत्ती, स्थावर या दृष्टीने अशुभ ठरत नाही. जातक पक्का व्यवहारी असतो. संपत्ती मिळविणे, प्रवास करणे व सर्व सुखाचा उपभोग घेणे अशी वृत्ती असते.

**गुरु :** वृषभ व तूळ लग्नास गुरु शुभ फले देत नाही आणि तो लग्नी असता अशुभत्व निर्माण होते. परंतु वृषभ लग्नाखालील कुंडली काय दर्शविते पाहा.

**शनी :** दोन्ही लग्नास शनी राजयोगकारक असतो आणि त्याचे मंगळाबरोबरचे लग्नातील वास्तव्य शुभदायी ठरेल. जातक श्रीमंत, सुखी व प्रसिद्ध असतो. मित्रपरिवार, कुटुंब परिवार मोठा असतो. जातक विद्वान व प्रमुख असतो.

**(८) वृश्चिकेचा मंगळ :** प्रथम स्थानात जेव्हा ८ हा अंक असतो तेव्हा तेथील मंगळाला 'वृश्चिकेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल खालीलप्रमाणे -

वृश्चिकेतल्या मंगळाबद्दल वराहमिहीरांनी स्वतंत्र सूत्र दिले नाही पण सारावलीकारांनी त्याबद्दल पुढीलप्रमाणे सांगितले आहे -

**व्यापार श्रुतिसक्तश्चोर समूहाधिप क्रिया निपुणः ।**
**युद्धोत्सुकोऽतिपापो बह्वपराधीच वैरशठः ।।**
**द्रोहवधाहितबुद्धिः प्रसूचको भूमिपुत्रयुवतीशः ।**
**वृश्चिकगे भूपुत्रे विषाग्निशस्त्रव्रणैरततपः ।।**

वरील वर्णन खरोखरच पाहता मंगळाच्या तिप्पट शक्तीचा नवीन ग्रह रुद्र म्हणजे प्लूटो यांस लागू पडते, कसे ते पाहा -

व्यापाराचे ज्ञान तसेच श्रुतीचे ज्ञान (हल्लीच्या संदर्भात विज्ञानाची विशेषतः रसायनशास्त्राची आवड व ज्ञान) असलेला परंतु चोरांच्या, दरोडेखोरांच्या (भूमिगत

गुंडांच्या) टोळ्यांचा नायक, अनेक गुन्हे करणारा, युद्धखोर, तसेच विश्वासघात, दगाबाजी, फंदफितुरी करणारा, दुसऱ्याचा जीव घेण्यास मागेपुढे न पाहणारा, कोणास मदत न करणारा, अफवा, खोट्या बातम्या पसरविणे वगैरे तऱ्हेच्या पापकृत्यांत निपुण असतो. स्त्री संपत्ती, संतती, स्थावर यांचे सुख असणारा जातक असतो. विषप्रयोग, आगी, शस्त्रांच्या जखमा यांचे भय असते. सध्या गाजत असलेल्या गुंडांच्या, तस्करांच्या टोळ्यांच्या नायकास बरोबर लागू पडते. टोळीयुद्धे चालूच आहेत. नशिली पदार्थांचा व चोरून आणलेल्या पदार्थांचा व्यापार करतो. अशा व्यक्ती हुशार, धोरणी व धाडसी असतात.

वृश्चिक लग्नाच्या व्यक्ती देखण्या असतात. विशाल, भेदक डोळे, उंच व रुंद कपाळ, कुरळे केस, उठावदार भुवया असून ग्रहणशक्ती उत्तम असते. बोलणे उपरोधिक, वृत्ती आवेगशील पण गूढशास्त्राकडेही ओढा असतो. वृश्चिक लग्नाच्या स्त्रिया सुंदर असतात पण पुरुषी थाटाच्या दिसतात.

जातक उदार स्वभावाचा असला तरी चंचल असतो, त्यास मन उत्तेजित करणाऱ्या पदार्थांची व गोष्टीची आवड असते. विषयसुखाची लालसा असते पण बाह्यतः तत्त्वज्ञानाच्या गोष्टी करतात आणि वासनांवर नियंत्रण ठेवण्याचा उपदेश करतात.

स्वभाव निष्ठुर असून स्पर्धा, वादविवाद यांची आवड असते. जातक उद्योगी असून आपल्या कामात वाकबगार असतो. काटकसरी वाटला तरी विलासी असतो. स्व-मताग्रही असतो. स्वतःच्या बुद्धिमत्तेवर जास्त विश्वास असतो. स्मरणशक्ती उत्तम असते. जातक उत्तम संभाषणपटू असतो व उत्तम लेखनही करतो. शरीरप्रकृती उष्ण असते. आरोग्य व प्रकृती चांगली ठेवली तरी मधूनमधून आजार येतातच. मूळव्याध, दूषित रक्तामुळे उत्पन्न होणारे आजार, विषबाधा, गुप्तरोगाची बाधा होण्याची शक्यता असते. मंगळ हा षष्ठेशही असतो व तो लग्नी असता आजार उद्‌भवतात. मस्तकास जखम, व्रण स्पष्ट दिसतात. द्विभार्या योगाची शक्यता असते. या लग्नाच्या लोकांनी साथीच्या रोगापासून सावध राहावे.


या लग्नी मंगळ शुभसंबंधित असता शुभ फले मिळतात. जातक रसायनशास्त्राचा पदवीधर वा वैद्यकशास्त्राचा पदवीधर व शस्त्रक्रियापटू होऊ शकतो. अगर स्थापत्यशास्त्राकडेही ओढा असू शकतो. वृश्चिक लग्नाच्या वा मंगळाच्या व्यक्ती पोलीस खात्यात, अग्निशामक दलात, शस्त्रास्त्रांच्या व्यापारी व कारखानदार, केमिस्ट, ड्रगिस्ट वा शल्यचिकित्सा अशा व्यवसायात जातात व तेथे चमकतात. मंगळ अशुभसंबंधित असता वरील श्लोकांत वर्णन केलेली अशुभ फळे मिळण्याची शक्यता असते. वृश्चिकेतील मंगळ वैवाहिक सुखास बाधक ठरत नाही.

**कुंडली : श्री. प्रद्युम्न श्रीकांत साठे**

जन्म - रविवार ५ जानेवारी, १९७५ रोजी पहाटे ५.२७ प्र. वे.

अयनांश - २३° ३०'४५", अक्षांश - १८°- ५९' उ.

रेखांश - ७३°-१८' पू., सांपातिक समय - ११-३८-४८




मंगळ-नेपच्यून सहयोग लग्नबिंदूवर, चंद्र लाभ-योग नेपच्यून, मंगळ केंद्रयोग गुरू रवी प्रतियोग शनी - २० व्या वर्षी पित्याचे निधन. मास्टर ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी. खेळताना पाय मोडला होता. अपघातप्रवण, अघळपघळ बोलणे, सॉफ्टवेअर कंपनीत नोकरी, पगार चांगला. गुरु-शनी त्रिकोणयोग बौद्धिक राशीतून.

मंगळाचे व लग्नाचे अष्टमात शनी पण भाग्येश चंद्र व लग्नेश मंगळ यांचा लाभयोग - नोकरीत उच्च दर्जा प्राप्त होईल. दशमेश बुध त्रिकोण दशम बिंदू व शुक्राचे युतीत. लग्न, रवी व चंद्र या तिघांचाही दशमेश बुध वर्गोत्तम आहे. बुध-शनी अन्योन्य क्षेत्रयोग; हा संगणक क्षेत्रासाठी एक प्रमुख योग आहे.

### मंगळाबरोबर अन्य ग्रह लग्नी असता (वृश्चिक लग्न)

**रवी :** दशमेश लग्न - राजयोग. महत्पद - स्वतःचे कर्तबगारीवर, उच्च विद्याविभूषित. धैर्य, धाडस. राजकारणात पुढे. व्यवसायातही नावलौकिक, शत्रूंना धैर्याने सामोरा जाणारा.

**चंद्र :** भाग्येश लग्नी पण नीच राशीस. नीचभंग लक्ष्मीदायक योग. मातृकारक चंद्र नीच राशीत. रक्तदोष. मनगटाचे जोरावर अचाट कर्म. लक्ष्मीला खेचून आणतो.

**बुध :** लाभेश - मित्र चांगले भेटतात. अष्टमेश - नेहमी अडचणी येतात. अपघातप्रवण, गणिती विद्या, बोलणे कडवट, खनिजशास्त्रज्ञ, औषधी तयार करणे, वादविवाद.

**शुक्र :** सप्तमेश व व्ययेश, व्ययेश लग्नी स्त्रियांमुळे धननाश, उधळेपणा, अनैतिकता. मंगळ षष्ठेश असतो त्यामुळे आरोग्य चांगले राहत नाही. अनावर वासना, आयुर्मर्यादा कमी.

**गुरु :** पंचमेश लग्नी - राजयोगकारक. धनेश लग्नी-धनप्राप्ती. मंत्रिपद वा अन्य उच्च पद, उच्च विद्याप्राप्ती, सद्गुणी, मधुर भाषी, विद्वान, नशीबवान, स्त्री संतती, संपत्ती परंतु संतती सुख कमी.

**शनी** : चतुर्थेश – तृतीयेश. त्याची दृष्टी तृतीय व दशमभावावर येते. शनीमुळे मंगळ बिघडतो व अवनती होते. जातक महत्त्वाकांक्षी व भांडखोर असतो. शस्त्रे, विष यापासून धोका. अनिष्टकारक व आयुर्मर्यादा कमी करतो.

**(९) धनुचा मंगळ** : प्रथम स्थानात जेव्हा ९ हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'धनुचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल

**बहुभिः क्षतैः कृशांगो निष्ठुरवाक्यो शठः पराधीनः ।**
**रथगजपदातियोधी रथेन शारधारकोऽथ परसैन्ये ।।**
**विपुलश्रमैश्चसुखितः परस्परक्रोध नष्टसुखवितः ।**
**कार्मुकसंस्थे वक्रे गुरूष्वसक्तः पूमान् भवति ।।**

धनु राशीतील मंगळ असलेला जातक महान योद्धा असतो. रथ, हत्ती, पायदळ यांच्यासह चतुरंग सेनेसह शत्रू सैन्यावर मोठे हल्ले चढवतो आणि रणांगणावर गाजविलेल्या पराक्रमाच्या खुणा शरीरावर असतात.

शरीरयष्टी योद्ध्यास लागणारी अशी सडसडीत व चपळ असते. कडक भाषेत (सैनिकी थाटात) बोलणारा असतो. तो शठ म्हणजे धूर्त असतो. (शत्रूचे सर्व कावे जाणणारा). त्यास पुष्कळ परिश्रम करावे लागले तरी तो सुखी व आनंदी असतो. अति रागीटपणामुळे सुख हरवतो व धननाश होतो. असा जातक गुरूंचा व मोठ्या माणसांचा मान व आदर राखत नाही.

धनु ही लढवय्यांची रास आहे. मग तो लढवय्या स्वामी विवेकानंद असो अगर स्वातंत्र्यवीर सावरकर असो अथवा ईश्वरचंद्र विद्यासागर किंवा लालबहादूर शास्त्री वा डॉ. बाबू राजेंद्रप्रसाद असो. हे सर्व धनु लग्नातील मान्यवर लोकाग्रणी आहेत.

जॅक हॉब्जसारखा क्रीडांगणावर पराक्रम करणारा क्रिकेटरसुद्धा धनु लग्नाचा आहे. हे लोक ज्या क्षेत्रात जातील तेथे लढे देतील (हिंसक वा अहिंसक) व नावारूपास येतील.

सारावलीतील वर्णन वाचले की पहिल्या बाजीराव पेशव्यांची आठवण येते तसेच रोमेलसारख्या धुरंधर सेनानीचीही आठवण येते. बाजीराव पेशवे अपराजित, रणधुरंधर सेनानी व मुत्सद्दी होते.

धनु लग्नास मंगळ व्ययस्थानचा अधिपती असतो व तो लग्नात येत असल्यामुळे स्वतःच्याच दोषयुक्त वागण्याने धननाश करून घेतो व दुःखी होतो.

पंचमेश लग्नी येत असल्याने संतती थोडी असते. जातक बुद्धिमान असतो. तो मोठा अधिकारी होतो. जातक आपल्या कर्तबगारीमुळे प्रसिद्धीस येतो. तो कोणाचीही भीड मुर्वत ठेवीत नाही. त्यामुळे त्यास शत्रूही असतात. व्ययस्थान हे गुप्त शत्रूचेही स्थान आहे. त्यामुळेही त्यास शत्रू उत्पन्न होतात.

धनु लग्नाचा जातक सर्वसाधारणपणे स्थूलत्वाकडे झुकतो पण तेथील मंगळाचे वास्तव्य तसे होऊ देत नाही. त्याचे डोळे तेजस्वी व धारदार असतात. त्या व्यक्तीची छाप ताबडतोब पडते. स्मितहास्य असते व दात सुंदर असतात.

सर्वसाधारणपणे धनु लग्नाची व्यक्ती तत्त्वज्ञानाची भोक्ती असते आणि गूढ विद्येकडे कल असतो. व्ययेश मंगळ लग्नी असल्याने गूढ विद्येकडे ओढा असतो. पंचमेश मंगळ गणपतीची उपासना दर्शवितो.

जातक चपळ, हुशार व उद्योगी असतो. त्याची मते परंपरेला धरून असतात. तो कोणतेही काम तत्परतेने करतो, त्यास दूरदृष्टी असते. मूलतः जातक प्रेमळ असतो परंतु मंगळामुळे देखावा निराळाच दिसतो. जातक उत्साही, कठोर, पापभीरू, प्रामाणिक व विनम्र स्वभावाचा असतो. ढोंगाचा तिटकारा असतो. संयमित व शिस्तबद्ध जीवन व्यतीत होते.

धनु रास द्विस्वभावी असल्याने स्वभावतः आणि वागण्यात बऱ्याच वेळा परस्परविरोधी व विसंगती दिसते.

### मंगळाबरोबर अन्य ग्रह असता (धनु लग्न)

**रवी :** रवी हा भाग्येश असल्याने दोन त्रिकोणाधिपतींची लग्नी युती हा मोठा राजयोग व अधिकार योग देतो. रवी-मंगळ यांचा केंद्रातील योग महान कर्तृत्वदर्शक व लढाऊबाणा दर्शवितो आणि हुकूमशाहीकडे कल होतो.

**चंद्र :** अष्टमेश लग्नी येत असल्याने अपघातप्रवणता व दुर्बल प्रकृती असते.

**बुध :** सप्तमेश व दशमेश असतो. दशमेश-पंचमेश एकत्र हा योग शिक्षण, बुद्धिमत्ता, वक्तृत्व या दृष्टीने चांगला असतो पण सप्तमाच्या दृष्टीने हा योग ठीक दिसत नाही. शुक्र ठीक नसता द्विभार्या योग संभवतो.

**शुक्र :** षष्ठेश व लाभेश असल्याने त्याचा मंगळाशी संबंध स्त्री-सुखाच्या दृष्टीने चांगला नसतो.

**गुरु :** लग्नेश व चतुर्थेश गुरुचा मंगळाशी योग सर्वच दृष्टीने चांगला ठरतो. उत्तम विद्वता, उच्च शिक्षण आणि महान कर्तृत्व दर्शविले जाते.

**शनी :** तृतीयेश व षष्ठेश शनी मंगळाच्या राजयोगाचा भंग करणारा ठरतो. नातेवाईक व शत्रू यांचा त्रास सहन करावा लागतो. प्रकृती नीट राहत नाही. मोठ्या व्याधी होतात.


धनु रास ही मैदानी व मर्दानी खेळात रास आहे. ज्या खेळात चापल्य, बाहुत-मनगटात जोर लागतो, अशा खेळात मंगळास प्राधान्य येते.

### कुंडली : सर जॅक हॉब्ज

जन्म - शनिवार दि. १६ डिसेंबर, १८८२ रोजी केंब्रिज येथे सकाळी ८.२०.

अक्षांश - ५२° १३' उत्तर,

रेखांश - ०° ०८' पूर्व.




महान इंग्रज क्रिकेटपटू. सावध, निर्दोष, तंत्रशुद्ध व भरवशाचा आघाडीचा फलंदाज. निष्कलंक व अत्यंत लोकप्रिय. शांत सोग्य, विनयी व निरहंकारी. १९०५-१९३० क्रिकेट कारकीर्द. ६१ कसोटीत पाच हजारांवर धावा.

मंगळ-बुध या युतीने मैदानी खेळाचे काम बरोबर बजाविले. बुध हा या कुंडलीचा भाग्येश आहे. शिवाय रवीच्या साहचर्याने राजमान्यता मिळाली. 'सर' हा किताब मिळाला. लग्नेश गुरुची बुध-मंगळ-रवी या त्रिकुटावर पूर्ण दृष्टी आहे हेही महत्त्वाचे आहे.

**(१०) मकरेचा मंगळ :** प्रथम स्थानात जेव्हा १० हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'मकरेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ हा शनीचा शत्रू आहे. कारण त्या दोघांचे गुणधर्म परस्परविरोधी आहेत. मंगळ हा उष्ण प्रकृती तर शनी थंड. मंगळ उतावळा तर शनी संथ. एक अविचारी तर दुसरा पूर्ण विचार करणारा. एक उत्साही व आशावादी तर दुसरा आळशी, धीमा व निराशावादी. ही यादी आणखीही वाढविता येईल पण याचा विशेष उल्लेख करण्याचे कारण म्हणजे तात्त्विकदृष्ट्या मंगळ शनीच्या मकर व कुंभ लग्नास अशुभ फलदायी ठरतो. त्यापैकी मकर ही पृथ्वीतत्त्वाची राशी आहे आणि मंगळ ही भूमिपुत्र आहे. म्हणून त्यास 'भौम' असे नाव पडले आहे. मकर ही अर्थत्रिकोणाची प्रधान केंद्र रास आहे. उद्योगाची, कर्माची रास आहे. म्हणून मंगळास मकर राशीत उच्चत्व मिळाले आहे. मंगळाचा उच्चांश २८° म्हणजे धनिष्ठा नक्षत्र २ रे चरण कन्या नवांशी येतो तेव्हा या राशीत मंगळ शुभ फलेच देणारा असतो.

वराहमिहीर मकरेतील मंगळाबद्दल ''भौमे भूरिधनात्मजो मृगगते भूपोऽथवा तत्समः '' असे सांगतात. मकरेतील मंगळ उत्तम संपत्ती, संतती देतो व जातक राजा अथवा राजासमान होतो. हल्लीच्या काळानुसार मंत्री, अध्यक्ष वा बडा अधिकारी होतो.

सारावलीकार त्याचा विस्तार करतात -

**धन्योवित्ताहर्ता सुखभोग समन्वितो भवति सुस्थः ।**
**श्रेष्ठमतिः प्रख्यातः सेनानायो नरेंद्रो वा ।।**
**सद्युवती रणविजयी स्वबंधुविषयस्थितः स्वतंत्रश्च ।**
**आरक्षकः सुशिलः कुजे स्वतुंगे बहुपचाररतः ।।**

मकर या उच्च राशीत मंगळ असलेला जातक चांगलाच नशीबवान असतो. अंगच्या उत्तम गुणांनी प्रसिद्धीस येतो. सेनापती अगर राजा होतो. त्यास सुशील व गुणवान पत्नी लाभते. तो युद्धात विजयी होतो. स्वतंत्र बाण्याचा, दुर्बलांचा रक्षणकर्ता, नातेवाइकांची काळजी घेणारा व सुशील स्वभावाचा असतो.

मकर लग्नात उच्च असलेला मंगळ धाडशी, पराक्रमी, शत्रूवर विजय मिळविणारा असतो. सैन्यदलात महान कामगिरी करणारा असतो. तो रणझुंजार असतो. तसाच रसायनशास्त्रज्ञ, केमिकल इंजिनिअरिंगकडेही कल असू शकतो.

मकर लग्नास मंगळ चतुर्थेश व लाभेश असून आपल्या उच्चात असल्याने स्थावराची प्राप्ती, मोठी मालमत्ता, उत्तम वाहने यांचा लाभ होतो. राहणी खानदानी वा उच्च दर्जाची असते. चतुर्थेश मंगळ नुसता उच्च असतो असे नाही तर त्याची दृष्टी चतुर्थावर पूर्ण येते. त्यामुळे चतुर्थासंबंधीची पूर्ण फले जातकास मिळतात. त्यास उच्च विद्या प्राप्त होते, तो विद्वान असतो तसेच तो श्रीमंत व खानदानी घराण्यात जन्माला आलेला असतो.

मंगळ लाभेशही असतो आणि तो उच्च असल्याने जातकास उद्योगापासून संपत्तीचा लाभ होतो. मित्रमंडळ मोठे असून मित्र चांगले भेटतात.

सारावलीमध्ये मकरेतील मंगळावार गुरुची दृष्टी असता फारच सुंदर व लोभस फले दिली आहेत. परंतु गुरुच्या ५ व्या व ९ व्या दृष्टीची मात्र शुभ फले मिळतील. ७ व्या दृष्टीचे मात्र तसे नाही. कारण त्या वेळी गुरु कर्केत आपल्या उच्चात येतो. त्या वेळी तो व्ययेश व तृतीयेश असून सप्तमात येतो व हा उच्चभंग होतो. असे Dr. B. V. Raman आपल्या Catechism of Astrology, Vol II मध्ये पृष्ठ ३५ वर क्र. ५३ च्या प्रश्नाचे उत्तरात म्हणतात व पुढे सांगतात की असा जातक दिवाळे काढतो.

परंतु उत्तरकालामृतामध्ये ''देवाधीश पुरोहितस्या सहजांत्याधिशता संततं - तथा चाष्टम स्थितीरपि स्यात् योगकृत् देहिनाम । या दोन्ही परस्परविरोधी विधानांचा अर्थ-अन्वयार्थ लावणे कठीण जाते. एवढेच म्हणता येईल की, गुरु सप्तमाखेरीज अन्य ठिकाणी असता ही शुभ फले मिळतील. पण मकर-मंगळ प्रतियोग कर्क-गुरु यात अशुभच मिळतील.''

जातक पारिजात या ग्रंथात ''कुम्भेच नीच भवनेपीबली सुरेज्यः '' असे म्हटले आहे म्हणजे मकरेतील व कुंभेतील गुरुही बलवान असतो असे दिसते. मग गुरुच्या नीचत्वाचा अर्थच नाही असे म्हणावे लागेल.


मकर लग्नाचे कुंडलीत गुरु लग्नी, शुक्र सप्तमांत व बुध अष्टमात असता जातकास दीर्घायुष्य लाभते पण तो दरिद्री राहतो. मकर लग्नी बुध-शुक्र लग्नी, चंद्र पंचमांत गुरुने दृष्ट असता महाराज योग होतो असे वराहमिहीर सांगतात.

मकर लग्नी गुरु लग्नात असून शुक्र-मंगळ लाभात असता गुरुचे महादशेत भावंडाकडून धनप्राप्ती होते.

## कुंडली : श्री. चार्ल्स द. गॉल

जन्म - शनिवार दि. २२ नोव्हेंबर, १८९० रोजी लिल्ल येथे दुपारी ११.५४.

अक्षांश - ५३° ३८' उ., रेखांश - ३.० पूर्व.




दुसऱ्या महायुद्धात गॉल फ्रेंच सेनेत कर्नल होता. फ्रान्सच्या पराभवानंतर तेथून बाहेर पडून सेनापती होऊन अल्जिरियातून हिटलरशी लढा दिला. फ्रेंचांना एकत्र करून पराभवातून फ्रान्सला वर काढले व ५ वे प्रजासत्ताक स्थापन केले. १९५८ ते १९६९ या काळात फ्रेंच प्रजासत्ताकाचा अध्यक्ष होता. लग्नी गुरु-मंगळ. दशमेश मंगळ लग्नी उच्च. मंगळ षडाष्टक शनी. पराभवाचे अडचणीत लढा उभा केला. रवी-बुध दशमभाव बिंदूवर लाभयोग गुरु त्रिकोण चंद्र. राशीदृष्ट्या बुध भाग्येश दशमावर भावदृष्ट्या भाग्येश, शुक्र लाभ भावात. शुक्र केंद्रयोग शनी. लग्नेश व भाग्येश केंद्रयोग. प्रचंड संघर्ष. चंद्र लाभयोग गुरु-मंगळ. फ्रान्सचा अध्यक्ष म्हणजे राजाच झाला.

**(११) कुंभेचा मंगळ :** प्रथम स्थानात जेव्हा ११ हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'कुंभेचा मंगळ' असे म्हणतात.

शनीच्या मकर राशीत मंगळ उच्च म्हणून शुभ फले देतो पण कुंभ राशीत मात्र तो शत्रुक्षेत्री येतो. तेथे मंगळाची शुभ फले मिळत नाहीत. म्हणूनच वराहमिहीर ''दुःखार्तो बिधनोऽटनोऽनृतरतस्तीक्ष्णश्च कुंभस्थिते'' अशी मंगळाची संभावना करतात. कुंभेतील मंगळ असलेला जातक दुःखाने त्रस्त, दरिद्री, सदा प्रवासी, खोटे बोलणारा पण तीक्ष्ण बुद्धीचा

असतो असा अर्थ व अभिप्राय आहे. कुंभ लग्नास मंगळ दशमेश व तृतीयेश असतो. त्यामुळे व्यवसायानिमित्त प्रवास, पैशासाठी भटकंती करावी लागते आणि पैशाच्याच चिंतेमुळे व उदरनिर्वाहासाठीच्या कष्टामुळे जातक पीडलेला व त्रस्त असतो.

सारावलीचा विचार घेता असे दिसते की,

**प्रश्रयशौचविहिनो वृद्धाकारः सुदुर्गति मरणे ।**
**मात्सर्यासूयानृतवाग्दो वैरपहृतार्थश्च ।।**
**रोमशगात्रेविकृतो धूताधाव्हृतधनं कुवेषधरः ।**
**दुःखसमाहृतवृतीः पानरुचिर्दुर्मगः कुजे कुम्भे ।।**

मंगळाचे हे वर्णन अमंगल आहे. तो काळाकुट्ट रंगविला आहे.

**अर्थ :** जातकाची राहणी गलिच्छ. स्नान करून शुद्ध झालेला नसतो. कपडे चांगले स्वच्छ नसतात. अकाली प्रौढ असलेला दिसतो. कोणाबद्दल प्रेम नसते. मत्सरी, असूया व खोटे बोलणारा व दुसऱ्याचे शत्रुत्व ओढवून घेतो. असा जातक दिसावयासही चांगला नसतो. सर्व शरीरावर राठ केस असतात. कुरूप असून जुगारात सर्व धन घालवून बसलेला असतो. जातक दुर्दैवी व दुःखाने पीडित असतो. दारुसारखी व्यसने जडतात.

पण मगंळ खरोखरच इतका काळाकुट्ट असतो का ?

कुंभ लग्नास मंगळ दशमेश व तृतीयेश असतो. त्याचा विचार केला असता वरील वर्णनात बराच फरक करावा लागेल. कुंभ ही वायुतत्त्वाची व बौद्धिक रास आहे. ती मानव रास आहे. ही तत्त्वज्ञान व विज्ञानाची रास आहे. पूर्वी एकट्या शनीकडेच या राशीचे आधिपत्य होते पण आता विज्ञानयुगात व यंत्रयुगात शनीस मागे सारून, लहरी, विक्षिप्त पण संशोधक अशा युरेनसने (प्रजापतीने) याचे स्वामित्व घेतले आहे. हर्षल-युरेनस बुद्धिमान आहे तेव्हा बुद्धिमत्तेचे तेज तरी चेहऱ्यावर दिसायला हवे. कुंभ लग्न एवढे अशुभ नाही.

कुंभ लग्नाचा जातक सडपातळ व उंच असतो. तो देखणा व आकर्षक असतो. चेहरा व ओठ जाड, कानशिले व नितंब उंच असतात. स्वभावाने चांगला असतो.

कुंभ लग्न जर दूषित नसेल तर अशा व्यक्ती महान शिक्षक, लेखक, व्याख्याते असतात. सर्वसाधारणपणे अशा व्यक्ती उदारहृदयी असून सहानुभूतिपूर्वक वागणे व इतरांना मदत करण्याची नेहमीच तयारी असते. उत्तम स्मरणशक्ती असून बुद्धिमत्ता व व्यवहारीपणा असतो. या व्यक्ती मैत्री चटकन जमवतात. राग लवकर येतो पण तो टिकत नाही. संभाषण मनोरंजक असते. स्वभाव प्रसिद्धी पराङ्‌मुख असतो.

मंगळ तृतीयेश व दशमेश असतो तेव्हा ज्या व्यवसायात दळणवळण, प्रवास अथवा हस्तकौशल्य यांचे संबंध येतात असे व्यवसाय जातक करतो. लेखक, फिरते विक्रेते, विमा प्रतिनिधी, औषधे तयार करणे व विक्रेते, सर्जन, दंतवैद्य, इंजिनिअर्स, सुतारकाम, धातुकाम, लोखंडी सामानाचे कारखानदार व व्यापारी, वाहन दुरुस्ती, गॅरेजेस चालविणारे वगैरे.

बुध पंचमेश व अष्टमेश असतो. त्याचा मंगळाबरोबर सहयोग असता जातक खोडकर व निष्ठुर बोलणारा असतो. गणिती, धातुकाम, खाणकाम (Engineering) याकडे उत्तम गती असते. जातक दीर्घोद्योगी असतो. शुक्र भाग्येश व चतुर्थेश असतो. तो लग्नी असता भाग्येश व दशमेश यांचा सहयोग उत्तम राजयोग ठरतो. विद्यायोगही उत्तम असतो.

गुरु धनेश व लाभेश असतो. त्याचा मंगळाशी सहयोग उत्तम संपत्ती लाभ देईल. उद्योग-व्यवसायाची वृद्धी होते.


शनी मंगळाबरोबर असता लग्नेश-लाभेश युती शुभ परिणामी ठरते तर तृतीयेश-व्ययेश युती भावंडांकरिता खर्च करावा लागतो. भावंडे अल्पायुषी असतात पण जातक पराक्रमी असतो.

### कुंडली : श्री. कोनराड आडेनावर

जन्म - बुधवार दि. ५ जानेवारी, १८७६ रोजी कोलोन येथे सकाळी १०.३०.

अक्षांश - ५०°-५९' उ., रेखांश - ६°-५३' पूर्व.

अयनांश - २२°-७'-३२", सांपातिक समय- १७-२७-२५




पश्चिम जर्मनीचा चॅन्सेलर. कायदा-शिक्षण वकिली. उपमहापौर व महापौर १९४९-६३ दरम्यान चॅन्सेलर. बिस्मार्कनंतरचा मुत्सद्दी.

पंचमेश बुध लाभयोग मंगळ - वकिली व्यवसाय. गुरु-शनी केंद्रयोग. दशमेश गुरु.

सप्तमेश रवी युती बुध लाभयोग मंगळ, यामुळे चॅन्सेलर - सत्ताधीश - भाग्येश मंगळ लग्नी त्रिकोण गुरु (दशमेश). गुरु-मंगळ यांचा ११७° अंतरात होणारा त्रिकोण योग हा महत्त्वाचा योग असतो.

**(१२) मीनेचा मंगळ :** प्रथम स्थानात जेव्हा १२ हा अंक असतो तेव्हा तेथील मंगळाला 'मीनेचा मंगळ' असे म्हणतात.

मीनेतल्या मंगळाबद्दल सारावलीकार म्हणतात -

**रोगार्तो मन्दसुतः प्रवासशीलः स्वबन्धू परिभूतः ।**
**मायावंचनदोषैर्हतसर्वस्वो विषादी च ।।**
**जिह्वोऽति तीक्ष्णशोको गुरूद्विजावज्ञको दयाहीनः ।**
**ईप्सितवेत्ता ज्ञाता स्तुतिप्रियाऽन्ते कुजे ख्यातः ।।**

जातक व्याधीमुळे त्रस्त, संततीपासून सुख नाही असा दुर्दैवी असून त्याचे नातेवाईकही त्याचा अपमान करतात. (कदाचित त्यामुळेच) सतत प्रवास करणारा (परदेशात राहणारा) असतो. कपटीपणा व खोटेपणा यामुळे स्वतःचे धन हरवून बसलेला व निराश झालेला असतो. विद्वान व गुरुजनांचा मान राखत नाही व त्यास कोणाबद्दल वाईट (दयाहीन) वाटत नाही. परंतु जातक स्तुतिप्रिय असतो व आपला हेतू पुरा करून घेतो.

मीन लग्नी मंगळ असणे म्हणजे अग्नी जलांत विझणे. त्यामुळे जातक भित्रा व भिडस्त असतो, त्याचे मनोधैर्य कमी असते. मंगळाची दशा लहानपणी आल्यास जातक अल्पायुषी होतो. (द्वितीयेश मंगळ लग्नी व त्याची अष्टमावर दृष्टी) पण हीच दशा मोठेपणी आली असता भाग्येश लग्नी असल्याने राजयोग होतो. तरीसुद्धा जातकाचे आरोग्य चांगले राहत नाही.

मीन लग्नास मंगळ भाग्येश व धनेश असतो आणि त्याचे वास्तव्य लग्नी असता शुभ फले मिळावयास पाहिजेत. द्वितीयेश लग्नी यामुळे स्वतःच्या परिश्रमाने संपत्ती मिळते. तसेच मंगळ भाग्येशही असल्याने त्याचा फायदा कुटुंबस्थान व धनस्थान (दोन्ही द्वितीय भावाचेच दर्शक) यांना मिळावयास पाहिजे. म्हणून जातकास जरी परिश्रम करावे लागले तरी त्यास दैवी साहाय्यही मिळेल. तसेच कुटुंबातील घटकांचेही साहाय्य मिळेल आणि संपत्तीचे प्रमाणही उत्तम राहील.

मंगळ भाग्येश असल्याने जातक पूर्वपुण्य घेऊनच जन्माला आलेला असतो. त्यातच तो मित्रक्षेत्री असल्याने स्वकर्तृत्वानेच पुढे येतो. येथे जर जातकास गुरुचे सहकार्य मिळाले तर दशमेश भाग्येश संबंधाने उत्तम राजयोग उत्पन्न होतो. जातक संपत्तीच्या दृष्टीने नशीबवान ठरतो व तो सर्व सुखे प्राप्त करून घेतो.


परंतु अग्नितत्त्वाचा ग्रह जलराशीत (जरी मित्रक्षेत्री असला तरी) येण्याने मंगळाच्या कर्तृत्वास मर्यादा पडते. मीन राशीतला मंगळ प्रथम पूर्वाभाद्रपदा या गुरुच्याच नक्षत्रात कर्क नवांशी येतो. येथे मंगळ नीच नवांशी असतो. त्यानंतरचे उत्तरा भाद्रपदाचे चारही चरण शनीच्या नक्षत्रातील त्यातील वृश्चिक नवांशी तेवढा मंगळ स्वनवांशी येतो आणि रेवती नक्षत्रातील धनु, मकर, मीन नवांश तेवढे चांगले ठरतात. बुध चतुर्थेश आणि सप्तमेश असतो तेव्हा त्याचे नक्षत्रातील वरील तिन्ही नवांशी मंगळ शुभ फले देईल. धनु नवांश दशमस्थानदर्शक, मीन नवांश वर्गोत्तम आणि मकर नवांश उच्च नवांश म्हणून हे नवांश बऱ्याच अंशी शुभ ठरावेत. शनीच्या नक्षत्री मिश्र फले मिळतील. बुध ठीक नसता जन्मकाळची परिस्थिती अनुकूल राहत नाही. स्पर्धा व उघड शत्रू यांना तोंड द्यावे लागते.

गुरुचे नक्षत्री मंगळ चांगला पण तो कर्क या नीच नवांशी येत असल्याने संततीपासून सुख लाभत नाही. एकूण वृश्चिक, धनु, मकर व मीन नवांशीच मंगळाची शुभ फले मिळतील. या विवेचनाचा निष्कर्ष असा की मीन लग्न मंगळाचे कर्तृत्वास पोषक ठरत नाही. हे लग्न मंगळास फार पुढे येऊ देत नाही असे दिसते.

मंगळाची चतुर्थावर व सप्तमावर दृष्टी येते आणि मंगळ मारकेशही असल्याने मातृसुख व पत्नीसुख बिघडते. द्विभार्या योग येण्याची शक्यता असते. बुधाच्या मंगळाशी असलेल्या शुभाशुभ योगावर व संबंधित कारक ग्रहांचे बलाबलावर मातृसुख, स्थावर व पत्नीसुख अवलंबून राहते. मीन लग्नास रवी लग्नी येणे आरोग्याचे दृष्टीने ठीक नसते. शुक्र लग्नी येणे म्हणजे अष्टमेश लग्नी येणे हे आयुर्मर्यादेच्या दृष्टीने ठीक नाही. परंतु पत्निकारक ग्रह उच्च राशीत येतो. ही जमेची बाजू ठरेल. बुध लग्नी नीच राशीस येत असल्याने पत्नीसुखात व्यत्यय येतो. शनी मीन लग्नास अशुभ फलदायी असल्याने शनी-मंगळ सहयोग अशुभ ठरतो.

## कुंडली : श्री. मडेप्पा बंडप्पा काडादी

जन्म - बुधवार दि. १५ सप्टेंबर, १९०९ रोजी सोलापूर येथे सायंकाळी ६.५४ प्र वेळ.





पिढीजात श्रीमंत घराण्यात जन्म. मोठी स्थावर. बंधूंच्यात वाटण्या होऊनसुद्धा मोठा बंगला, शेती, चाळी शिवाय व्यापार. जातक स्वतः कर्तबगार खासदार झाले. साखर कारखाना काढला 'संचार' हे दैनिक काढले. शैक्षणिक कार्यास मदत. संतती : पुत्र व कन्या. परंतु एक जावई व दोन सुपुत्र यांचे हयातीत मृत्यू झाले.

लग्नेश गुरुची लग्नावर व लग्नस्थ मंगळावर पूर्ण दृष्टी. पंचमेश चंद्र कन्येत. भाग्येश मंगळ, मीनेत परस्परदृष्टियोग. चतुर्थेश बुध व लाभेश शनी केंद्रातून परस्पर दृष्टिसंबंध. दशमस्थ हर्षलने कारखानदारी. हर्षल त्रिकोण रवी तृतीयात राहू पराक्रम स्थानात त्याचीही शुभ फले मिळाली.

२

# द्वितीय भाव




सोबतच्या कुंडलीमध्ये ज्या ठिकाणी २ हा अंक लिहिलेला आहे तेथील स्थानाला कुंडलीतील किंवा पत्रिकेमधील द्वितीय स्थान किंवा धनस्थान असे म्हणतात.

द्वितीय स्थानावरून बोलणे, कुटुंब, धनसंचय यांचा विचार होतो. म्हणजेच मधुर, रसाळ, खोचक बोलणे.

कुटुंबाबाबत म्हटले तर नवीन व्यक्तीचे आगमन याविषयी विचार होतो. नवीन व्यक्ती म्हणजे मूलबाळ, सून, जावई इत्यादींचे आगमन होय. धनसंचयात नोकरी लागणे किंवा धंदा सुरू करणे, कर्ज मिळणे, वडिलोपार्जित इस्टेटीचा लाभ मिळणे इत्यादी. एकंदरीत आर्थिक बाबीसंबंधीच्या गोष्टी त्याचप्रमाणे शरीर अवयवांपैकी वदन, चेहरा, मुख, ओठ, जीभ, स्वरयंत्र, उजवा डोळा यांचा विचार होतो. तसेच महत्त्वाचे म्हणजे सप्तम स्थान हे पती किंवा पत्नीचे असते. त्या सप्तम स्थानाचे आठवे स्थान म्हणजे पत्रिकेतील द्वितीय स्थान असल्यामुळे या स्थानावरून आपल्या जोडीदाराचा मृत्यू पाहता येतो.

'धनगे कदन्नो' एवढेच सूत्ररूपात वराहमिहीर सांगून जातात. म्हणजे सुग्रास अन्न मिळत नाही, शरीरास पोषक असणारे, चविष्ट, मधुर तसेच ताजे अन्न, गरम भोजन मिळत नाही. धनाबद्दल तर वराहमिहीर मुग्धच आहेत. पर्यायाने धनप्राप्तीस मंगळ प्रतिकूल असतो असेच सुचवावयाचे असेल. धनसंचय होत नाही, खर्च फार होतो किंवा मंगळ पैसा उधळून टाकतो असेही सुचवावयाचे असेल व म्हणूनच शिळेपाके अन्न खावे लागते असेही म्हणणे असेल.

सारावलीकारांचे मते -

**अधनः कदशनतुष्टो पुरुषो विकृताननो धनस्थाने ।**
**कुजनाश्रयश्च रुधिरे भवति नरो विद्ययारहितः ।।**

**अर्थ :** धनसंचय नसतो. कदन्नावर राहावे लागते, तोंड वाकडे असते, (आलंकारिक अर्थानेही घ्यावे) कटू बोलणे, हीन रुचीचे बोलणे असते असाही अर्थ निघू शकेल. जातकास संगत चांगली मिळत नाही, विद्येत प्रगती नसते - सामान्य दर्जा - काठावर उत्तीर्ण होणे.

म्हणजे जन्म गरिबीत होतो. त्यामुळे उत्तम पोषक आहार मिळत नाही. कुटुंबात चांगले संस्कार होत नाहीत. विद्या-शिक्षण नीट होत नाही. द्वितीयस्थ मंगळाची पंचमावर-

विद्यास्थानावर दृष्टी येते. पंचम स्थान हे बुद्धिमत्तादर्शक स्थान आहे. त्यावरील मंगळाची दृष्टी शुभ ठरत नाही. बुद्धिमत्ता बेताची असते. त्यामुळेही शिक्षणात अडथळे येतात व शिक्षण मागे पडते. अशा वेळी सर्वसाधारणतः घरची गरिबी असते. घरचा कर्ता पुरुष लवकर निवर्ततो आणि मग त्याच्या मागे कुटुंबाची स्थिती ओढग्रस्त होते. साहजिकच अन्न पोषक मिळेलच असे नसते. सुग्रास अन्न वेळेवर मिळत नाही.

ज्यास अन्न व्यवस्थित मिळू शकते, घरची परिस्थिती आर्थिकदृष्ट्या चांगली असताही जातकच नीट जेवत नाही. घरचे वळण त्यास जबाबदार असते.

शिक्षणाच्या बाबतीत मात्र गरीब-श्रीमंत असा भेद नसतो. शिक्षण मिळते पण जातकासच शिक्षणात गम्य नसते. तो जेमतेम काठावर उत्तीर्ण होत जातो. पण उत्तरायुष्यात परिस्थिती सुधारते व मिळालेल्या शिक्षणावरच पैसे मिळविले जातात असे अनुभवास आले आहे.

मंगळ हा गणित विद्येचा कारक आहे तसेच द्वितीयस्थ मंगळ तर्कशास्त्रविशारद असतो. रवी-मंगळ उत्तम हे तर्कविद्या देतात.

वाचा-बोलणे-संभाषण हे द्वितीय स्थानावर अवलंबून असते. पण कारक बुध असतो. मंगळाचा स्वभाव हातचे राखून ठेवण्याचा नसतो. जे काही मनात येते ते बोलून दाखविण्याकडे द्वितीयस्थ मंगळाचा कल असतो. त्यामुळे द्वितीयातील मंगळ पुष्कळ बडबड करावयास लावतो. शिक्षकाचा वा वकिलीचा पेशा असता जातकास खूपच बोलावे लागते. पण त्यातही द्वितीयातील राशीवर व द्वितीयेशावर बरेच अवलंबून राहते. मंगळ स्वगृही, मित्रगृही वा उच्च असल्यास वक्तृत्व चांगले असते. जातक गप्पीदासही होतो. वृश्चिक ही द्वाडरास आहे तेथील मंगळ हीन दर्जाचे वा अमंगल बोलावयास लावतो.

द्वितीय वा द्वादश स्थानातील मंगळ असता डोळे खोबणीचे बाहेर आल्यासारखे दिसतात. बटबटीत असतात. डोळे रागीट व क्रूर दिसतात. मीन व तुळ या लग्नास हा अनुभव विशेष दिसून येईल.

द्वितीयस्थ मंगळ असलेल्या जातकास उष्णतेमुळे डोळ्याचे विकार होतात. डोळे व चेहरा यांना इजा होते. सप्तमाचे अष्टमात द्वितीयस्थ मंगळ येत असल्याने पत्नी-सुखात बिघाड होतो. तिच्या आजारपणामुळे अनेक समस्या उभ्या राहतात. संततीपासून सुख लाभत नाही.

द्वितीय स्थान हे अष्टमासमोरचे स्थान व प्रधान मारक स्थान असल्याने द्वितीयातील मंगळाचे शनी, राहू, हर्षल, नेपच्यून, प्लूटो यांच्याशी असलेले युती, प्रतियोग अपघातदर्शक वा मोठे आजारदर्शक असतात. हा अपमृत्यू योग असू शकतो.

द्वितीयात मंगळाबरोबर शनी, रवी असे तीनही ग्रह असता संपत्तीचा ऱ्हास होतो. त्यातच क्षीण चंद्राचा अशुभ योग असता विशेषकरून नाश होतो. या तीन पापग्रहांमुळे सर्वच कारकत्व बिघडते, कुटुंबसौख्य नसते. सप्तमाचे अष्टमांत हे तीन ग्रह असल्याने

विवाह सुखाचे तीनतेरा होतात. मंगळाची पंचमावर तर शनीची लाभस्थानावर आणि तीनही ग्रहांची अष्टमस्थानावर दृष्टी येत असल्याने २, ५, ८, ११ ही सर्वच संपत्तिदायक स्थाने बिघडतात. तसेच शनीमुळे चतुर्थ स्थान मंगळामुळे नवम स्थानही बिघडते.

फक्त रवी आणि मंगळ द्वितीयस्थानी असताही दरिद्रता येतेच पण कातडीचे रोग, विकार होतात. एक्झिमासारखे विकार होतात.

प्रत्येक लग्नराशीनुसार द्वितीयस्थ मंगळाची काय फले मिळू शकतील याचा विचार पुढे मांडत आहे.

अंतर्दशा, महादशामध्ये-उष्णतेचा व डोळ्यांचा त्रास होतो तसेच आर्थिक चणचण येते.

## द्वितीयस्थ मंगळाची राशीनिहाय भावफले

**(१) मेषेचा मंगळ :** द्वितीय स्थानात जर एक हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मेषेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ द्वितीयेश व भाग्येश असून तो द्वितीय स्थानात मेषेत स्वगृही येतो. जातक भांडखोर असतो पण संपत्ती चांगली मिळवतो. जातक संभाषणचतुर असतो पण तिखट बोलतो. या मंगळावर दशमातून गुरुची पूर्ण दृष्टी असता उत्तम राजयोग होतो. न्यायाधीश वा तत्सम उच्च पदाला जातो. द्वितीयातच मंगळाबरोबर गुरु असता संपत्तीचा उत्तम लाभ होतो. व्यवसायात उत्तम यश मिळते.

पंचमेश चंद्र असतो. त्याचा मंगळाशी सहयोग वा त्रिकोण योग असताही राजयोग होतो. चंद्र मंगळावर बुधाची दृष्टी असता अथवा त्रिकोण योग असता जातक उत्तम गणिती होतो. बुध चतुर्थेश असतो व त्याचा मंगळाशी सहयोग उत्तम वक्तृत्व असून तो उत्तम वकील व प्राध्यापक होतो. जातकाचे शिक्षण उत्तम होते व तो शैक्षणिक क्षेत्रातही पुढे येतो.

लग्नेश गुरु पंचमात कर्क राशीत उच्च राशीत येतो आणि त्या वेळी भाग्येश मंगळाची गुरुवर दृष्टी येते. त्या योगावर जातक विद्वान, बहुश्रुत असतो व उत्तम संतती लाभते.

मंगळाबरोबर शुक्र असता अनायसे धन मिळते. संपत्ती चांगली मिळते पण नुकसानही होते. जातकाचा आवाज काही निराळाच पण वैशिष्ट्यपूर्ण असतो.


येथे शनी नीच राशीत येतो. तो जसा लाभेश तसा व्ययेशही असतो. त्यामुळे शनी मंगळाचा सहयोग अशुभत्व निर्माण करतो. कुटुंबसौख्य बिघडते. मित्रच शत्रू होतात व त्यांच्यामुळे जातक नुकसानीत येतो. जातकाच्या बोलण्यात दोष असतो. तो चाचरत बोलतो. धनस्थानी राहू असणे चांगले नाही. त्यातून तो मंगळासमवेत असता कौटुंबिक कलह व दुर्घटना दर्शवितो. जातकाचे बोलण्यातही दोष असतो.

### कुंडली : प्रा. ना. सी. फडके

जन्म - शनिवार दि. ४ ऑगस्ट, १८९४ रोजी कर्जत (जि. अहमदनगर) येथे रात्रौ ९.३८.

अक्षांश : १८° उ. ३३', रेखांश ७५° पूर्व ०'

अयनांश : २२° २२' ५६", सांपातिक समय १७ ता. ५५ मि. ३८ से.



महाराष्ट्रातील लोकप्रिय कादंबरीकार. कथा व लघुकथा लेखक, निबंधकार. व्यवसायाने प्राध्यापक. दशमेश गुरुची दशमावर पूर्ण दृष्टी. ७४ कादंबऱ्या. टीका ग्रंथ, प्रतिभासाधन हा ग्रंथ. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

१९४२ साली पहिल्या पत्नीस सोडून विद्यार्थिनीबरोबर प्रेमविवाह केला शुक्राचे पंचमात हर्षल, तसेच पंचमेश सप्तमांत व सप्तमेश पंचमांत यामुळे प्रेमविवाह. तृतीयेश शुक्रावर शनीची दृष्टी आहे.

चंद्राचे दशमात गुरु व गुरुची लग्नाचे दशमावर पूर्ण दृष्टी - चतुर्थातून यामुळे प्राध्यापक एम. ए. १९१६-१९४९ साली निवृत्त.

द्वितीयस्थ मंगळ व त्याची बुधावर दृष्टी यामुळे उत्तम वक्तृत्व व भाषाप्रभुत्व होते.

तृतीयेश शुक्र चतुर्थात, चतुर्थेश बुध पंचमांत आणि पंचमेश सप्तमात कन्या राशीत. लेखन, कादंबऱ्या, कथा, लघुनिबंध यांवर उत्तम पैसा जमविला. त्यांच्या कादंबऱ्या फार लोकप्रिय झाल्या. प्रेमकथा सुंदर रंगविल्या होत्या.

रत्नाकर मासिक १९२५, झंकार साप्ताहिक १९४०, १९४० साली रत्नागिरीच्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. १९६२ साली पद्मभूषण. मृत्यू : २२/१०/१९७८.

**(२) वृषभेचा मंगळ :** द्वितीय स्थानात जर दोन हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'वृषभेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे आहे.

मंगळ लग्नेश व अष्टमेश असून द्वितीयात वृषभ राशीत येतो. लग्नेश द्वितीयात येत असल्याने स्वप्रयत्नाने संपत्तीचा लाभ व विशेष लाभ होतो. पूर्ण विचार करून, दूरदृष्टीने जातक व्यवहार करतो. कुटुंबासंबंधीची आपली कर्तव्ये व्यवस्थितपणे पार पाडतो. जातक महत्त्वाकांक्षी व सुस्वभावी असतो. उदार हृदयी असल्याने त्यास समाजात मान मिळतो. डोळे विशाल व भेदक असतात. बुबुळे उठावदार, फुगीर व पुढे आलेली दिसतात. येथील मंगळ एकटा असला तरी तर्कशास्त्र जाणणारा असतो.

सप्तमाचे अष्टमात मंगळ येत असल्याने विवाहसौख्यात उणेपणा येतो. पंचमावर सिंह रास असल्याने एका संततीचे सौख्य लाभते.

मंगळाबरोबर रवी असता लग्नेश व पंचमेश एकत्र येत असल्याने बुद्धिमत्ता चांगली असते. तो सुशिक्षित असतो. हा उत्तम धनयोगही होतो.

मंगळाबरोबर चंद्र असता लग्नेश-चतुर्थेश एकत्र येतात. त्यातच चतुर्थेश उच्च राशीस येतो आणि चंद्र-मंगळ युतियोग लक्ष्मीदायक ठरतो. जातक तर्कशास्त्रवेत्ता व पंडित होतो आणि खूप बोलका असतो, भाषा कठोर नसते.

बुध मंगळाबरोबर असता जातक गणिती होतो. परंतु त्याच्या बोलण्याने व टीकेमुळे शत्रू निर्माण होतात. जातकास नेत्रविकार होतात.


शुक्र धनेशच असल्याने तो मंगळाबरोबर असता उत्तम संपत्ती लाभ होतो. द्वितीयात शुक्र-मंगळ असता मंगळ मारक असतो असे भावार्थ रत्नाकरमध्ये सांगितले आहे.

## कुंडली : नेताजी सुभाषचंद्र बोस

जन्म - शनिवार दि. २३ जानेवारी, १८९७ रोजी दुपारी १२.०० वाजता.

अक्षांश - २०° उत्तर २६', रेखांश : ८५° पूर्व ५९'. कटक येथे.

अयनांश - २२° २५' ९", सांपातिक समय २० ता. २६ मि. ४ सेकंद.




उच्च दर्जाची बुद्धिमत्ता. आय. सी. एस. बंगाल कायदेमंडळाचे लोकपक्षीय नेते. कलकत्त्याचे महापौर, कॉंग्रेसचे अध्यक्ष. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर नेताजी नजरकैदेत होते. तेथून ते निसटून काबूलमार्गे जर्मनीत. जहाल देशभक्त. भारताच्या स्वातंत्र्यासाठी आझाद हिंद फौजेची स्थापना. भारत स्वातंत्र्याची घोषणा.

भाग्येश गुरु पंचमात त्याची लग्नावर पूर्ण दृष्टी आहे. पंचमेश रवी-बुधासह दशम बिंदूवर आहे. लग्नेश मंगळ प्लूटोचे पूर्ण युतीत द्वितीयात आहे. त्याचा दशमाशी व रवीशी त्रिकोण योग आहे. दशमेश शनीची रवी-बुधावर, गुरूवर लग्नेशावर पूर्ण दृष्टी आहे. शनी-

हर्षल युती क्रांतिकारकदर्शक आहे. चंद्राचे तृतीयात शनी हा मोठा योग आहे. यावर उच्च विद्या (आय. सी. एस. होते). धार्मिकता (हिमालयात गेले होते), जनतेकडून मान व आदर, अधिकारप्राप्ती, आझाद हिंद फौजेची स्थापना व त्याचे प्रमुख. चंद्र-बुध त्रिकोण. चंद्र-रवी त्रिकोण व चंद्र त्रिकोण दशम असे उत्तम योग झाले आहेत.

रुद्र (प्लूटो) हा एकमेवाद्वितीयम असतो. तो नाट्यपूर्ण घटना दर्शवितो. लग्नेश मंगळाशी त्याची युती, नेताजींचे बाबतीत नाट्यपूर्ण घटना दर्शविणारी आहे. कलकत्त्याहून पलायन, काबूल मार्गे जर्मनीत, जर्मनी व जपानच्या सत्ताधीशांशी संपर्क, आझाद हिंद सेनेची स्थापना. मंगळ रुद्र (प्लूटो) युती अष्टमासमोर द्वितीय या मारक स्थानात आहे. जवळच वरुण (नेपच्यून) ग्रह आहे. मंगळ व प्लूटो दोघेही अष्टमेश आहेत. त्यांची मारक स्थानातील युती स्फोटकामुळे विमान अपघात व मृत्यू दर्शवितो. वरुणाचे साहचर्याने त्यात गूढता आली.

त्यांच्या बाबतीत नाट्यपूर्ण घटना म्हणजे त्यांचा जर्मनीत ४५ वर्षांनंतर झालेला विवाह ही आहे. यापासून कन्या संतती झाली.

त्यांचे वक्तृत्व उत्तम होते, जहाल होते. विचार क्रांतिकारी होते. नुसते विचार व उच्चारावर थांबले नाहीत तर ते आचारणातही आणले. हिंदुस्थानच्या इतिहासात त्यांचे नाव अजरामर झाले आहे.

**(३) मिथुनेचा मंगळ** : द्वितीय स्थानात जर तीन हा अंक येत असेल तर तेथील मंगळाला 'मिथुनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल खालीलप्रमाणे आहे.

द्वितीयावर मिथुन रास येते. मंगळ सप्तमेश व व्ययेश असून तो द्वितीयात शत्रुक्षेत्री येतो. मंगळाकडे अशुभ भावेशत्व आहे व त्यास राशीबलही नसते. येथील मंगळाची शुभ फले मिळणे कठीण असते. जातकास भावंडांकरिता विशेषतः धाकट्या बहिणीकरिता बराच पैसा खर्च करावा लागतो. येथील मंगळ जातकास पैसे मिळविण्यासाठी मदत करण्याऐवजी खर्चाच्या निरनिराळ्या वाटा शोधत असतो. त्यास प्रसंगी कर्जही काढावे लागते. त्यास वेळेवर व चांगले भोजन मिळत नाही.

जातकास कुटुंबसौख्य असे मिळत नाही. सप्तमेश मंगळ सप्तमाचे अष्टमात त्यातून तो द्विस्वभाव राशीत येत असल्याने द्विभार्या योगाची शक्यता असते. पत्नी दुर्बल, अशक्त व आजारी असते. त्यानिमित्तही पैसा खर्च होतो. त्यातच द्वितीयेश बुध व्ययात असेल तर जातकास दारिद्र्याशी झगडावे लागते. पैशाची नेहमीच अडचण भासते.

बुध द्वितीयात मंगळाबरोबर असता गणित, तर्कशास्त्र व भाषाशास्त्र यात गती असते. येथे पंचमेश व सप्तमेश यांचा योग होतो. बुद्धिमत्ता असते व जातकाचा व्यवसाय अध्यापनाचा अगर व्यापार वा दलालीचा असतो.

लग्नेश शुक्राचा सहयोग असता कलाद्वारा पैसे मिळण्याचा योग असतो. पण जातक स्त्रैण असतो. त्यास कंठ व घसा यांचे विकार होतात व शस्त्रक्रियाही होतात.

रवी चतुर्थेश असतो. तो द्वितीयेत मंगळाबरोबर असता स्थापत्यशास्त्र, अभियांत्रिकीचे व्यवसाय अगर सरकारी नोकरी करतो.

शनी हा लग्नाचा योगकारक असला तरी जातकास नोकरीत अगर व्यवसायात खोट बसते, मानहानी होते, पदावनती होते आणि द्वितीयस्थ शनी-मंगळामुळे पत्नीसौख्य बिघडते. पत्नीस आजार वा अपघात होण्याची शक्यता असते.

परंतु शनी मंगळाची युती मिथुनेच्या १० अंश ते १३ अंश २० कलापर्यंत होत असल्यास ती शुभ परिणामी ठरते. हा मकर नवांश असतो. मंगळ उच्च नवांशी व शनी स्वनवांशी येतो. यंत्रे, इंजिनिअरिंग वा तत्सम अगर तत्संबंधी व्यवसायापासून धनलाभ होतो. तरीसुद्धा अपघातासारखी अशुभ फले मिळण्याची शक्यता असते.


शनी-मंगळ कुंभ नवांशात असतानाही शुभ फले मिळतील. बुद्धिमत्ता व स्मरणशक्ती या नवांशातील शनी देतो. जातक मुत्सद्दी व कर्तृत्ववान ठरतो. कायद्याच्या अभ्यासासही कुंभ नवांशातील शनी-मंगळ योग उत्तम ठरतो. फौजदारी कामात विशेष यश प्राप्त होते. शिवाय कुंभ नवांश खगोलशास्त्र, केमिकल इंजिनिअरिंग वा सिव्हिल इंजिनिअरिंगचे अभ्यासास उत्तम असतो. पण या युतीचे भावंडांसंबंधीचे फल अशुभ ठरते.

### कुंडली : श्री. जनार्दन केशव केळकर

जन्म - बुधवार दि. २१ सप्टेंबर, १८९८ रोजी गावखडी (रत्नागिरी) येथे रात्रौ १०.०० वाजता स्थानिक वेळ.

अक्षांश - १६° ४५' उत्तर; रेखांश - ७३° २०' पूर्व.

अयनांश - २२° २६' २९", सांपातिक समय - २२ ता. २ मि.




जुन्या काळातील मुंबईमधील अनेक हॉटेल्सचे संस्थापक व मालक. शहरातील तत्कालीन मोठ्या हॉटेल्समध्ये नामांकित व विविध खाद्यपदार्थांसाठी प्रसिद्ध.

हॉटेल्स व रेस्टॉरंट हे व्यवसाय चंद्र व शुक्र, कर्क रास, वृषभ रास यांच्यावर अवलंबून असतात. या कुंडलीत दशमेश शनी हा चंद्राचे युतीत आहे. लग्नेश शुक्राचे लाभांत द्वितीयेश बुध आहे. द्वितीयावरून भोजन खाद्यपदार्थ यांचाही बोध होत असतो.

केटरिंगचाही व्यवसाय याच चंद्र-शुक्र, वृषभ, कर्क यांच्याशी संबंधित आहे.

**(४) कर्केचा मंगळ :** द्वितीय स्थानात जर चार हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कर्केचा मंगळ' म्हणतात.

द्वितीयेवर कर्क रास येते. मंगळ लाभेश व षष्ठेश असून तो द्वितीयेत कर्क या नीच राशीत येतो. या मंगळाकडे कोणत्याही शुभ स्थानाचे स्वामित्व नसते. याचे परिणाम कौटुंबिक सुखावर होतात. शत्रूमुळे धननाश होतो. जातक गरिबीत वाढला जातो. त्यास मित्रही चांगले भेटत नाहीत. जातकाचे दात किडके व वेडेवाकडे असतात. शिवाय नेत्रविकारही होतात. बोलणे अडखळत होते. जातक तोतरा बोलतो. मंगळाचे दशेत वा अंतर्दशेत पत्नीचा मृत्यू होतो.

यातच चंद्र येऊन मिळाला तर कौटुंबिक सुखाची हानी आणि नातेवाईक व मित्र शत्रू बनतात. त्यांच्याबरोबर भांडणे, कटकटी, खटले यांमुळे धननाश होतो. जातकास भोजन वेळेवर मिळत नाही. शुभ ग्रह येथे असता सुख व दुःख आलटून-पालटून भोगावे लागते.

लाभेश मंगळ द्वितीयेत नीच राशीत असला तरी मोठा भाऊ अगर मोठी बहीण यांची मदत मिळते. मंगळाच्या नीचत्वाचा भंग झाला तर मात्र परिस्थिती सुधारते.

शुक्र, चंद्र, शनी यांचे मंगळाशी संबंध असता काय फले मिळतील ते भावार्थ रत्नाकरमध्ये दिले आहे. ते पुढीलप्रमाणे -

**भृगु भौमेन्दवः खेटा धनस्थाने स्थिता**
**यदि शुक्रदाये धनप्राप्ती युग्मजातरस्समश्नुते**
**मिथुने जायमानस्य धरासुनूर्धने स्थितः**
**शनिचंद्रावष्टमस्थौ शनेर्दाये समागमे**
**शनिस्तुमिश्रफलदः कुजदाये समागमे**
**धनयोगो भवत्येव जातकस्य न संशयः**

शुक्र, चंद्र मंगळाबरोबर असता शुक्राचे दशेत धनप्राप्ती होते. कारण ५, २, ११ च्या अधिपतींची युती मिथुन लग्न, द्वितीयेत मंगळ असून शनी व चंद्र अष्टमात असता शनीचे दशेत मिश्र फळ तर मंगळाचे दशेत धनप्राप्ती निश्चित होते.

**मिथुने जायमानस्य कुजामन्दौ द्वितीयगौ**
**अष्टमस्थो भवेदिन्दु शनिभौम दशागमे**
**तत्काले धनहीनस्यात् पूर्वभाग्यं विनश्यति**
**किंचित धनयुतो जातौ भवेदेव न संशयः**

द्वितीयेत शनी मंगळ असून चंद्र अष्टमात असता शनी व मंगळाचे दशेत धननाश होतो, स्थावरही जाते तरीसुद्धा थोडेबहुत द्रव्य गाठी राहते.

गुरु द्वितीयेत उच्च राशीला येतो व त्यामुळे मंगळाचे नीचत्व राहत नाही व सप्तमेश व लाभेश तसेच षष्ठेश व दशमेश यांची युती द्वितीयेत होते. त्यामुळे विवाह सुखकर होतो आणि नोकरीमध्ये भाग्योदय होतो. जातक अधिकार व मान मिळवितो.


## कुंडली : श्री. शंकरराव विद्वांस

जन्म - मंगळवार दि. २८ एप्रिल, १९१६ रोजी सकाळी १०.३० प्र. वेळ.

अक्षांश - १८° उत्तर, रेखांश ७५° पूर्व.

अयनांश - २२° ४१' ३१", सांपातिक समय - २३ ता. ४३ मि. ५६ सेकंद.

ब्रह्मचारी राहून अध्यात्मात प्रगती करण्याचा विचार करून लोणावळा येथील कैवल्यधाम आश्रमात राहण्यास गेले होते. तेथे बरीच वर्षे योगाभ्यासही केला. पण आश्रमात राहून मन ताब्यात ठेवण्याचे जमले नाही व लग्नाचे विचार मनात घोळू लागले. शेवटी वयाचे ४१/४२ वे वर्षी विवाह केला आणि चरितार्थासाठी शिक्षकाची नोकरी पत्करली.




धनस्थानी मंगळ नीच राशीत पण कर्केत गुरु उच्च असतो. तेव्हा गुरु दशम केंद्रात असल्याने मंगळाचा नीचभंग झाला. मंगळ गुरु त्रिकोण योग आहे. मंगळाजवळ मोक्ष मार्गदर्शक केतू आहे. कर्क मीनेतून केतू मंगळाचा गुरुशी त्रिकोण असल्याने हठयोगाचा मार्ग पत्करला. मोक्ष त्रिकोण पूर्ण झाला नाही. गुरु-मंगळ त्रिकोण ३९ वे वर्ष दर्शवितो. तेथपर्यंत योगाभ्यास झाला. धनेश चंद्र पंचमात तुला राशीत व शुक्र व्ययात वृषभेत आहे. शुक्र हर्षल त्रिकोण आहे. व्ययातील शुक्र विवाहबंधन घ्यावयास लावतो. सप्तमावर व सप्तमेशावर शनीची दृष्टी त्यामुळे विवाहास विलंब होतोच. त्याचप्रमाणे अत्यंत उशिरा विवाह झाला.

दशमातील गुरुने शिक्षकाचा पेशा दिला. षष्ठेश मंगळ त्रिकोण गुरु शिक्षकाची नोकरी घेतली. दुसऱ्या एकाच्या कुंडलीत मिथुन लग्न, पंचमात तुळेचा चंद्र, व्ययांत व्ययेश शुक्र, लाभांत रवी-बुध असतात. विवाह ३९ व्या वर्षी झाला. तेथे सप्तमेश गुरु षष्ठात प्रतियोग शुक्र असा योग होता.

**(५) सिंहेचा मंगळ :** द्वितीय स्थानात जर पाच हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'सिंहेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

या लग्नास मंगळ दशमेश व पंचमेश असा एकटा राजयोगकारक असतो. द्वितीयेत सिंह रास येते व मंगळ त्या ठिकाणी मित्रक्षेत्री असतो. दशमेश धनस्थानात हा योग उत्तम धन देणारा असतो. व्यावसायिक जीवन उत्तम व भरभराटीचे जाते. अधिकार व मानमान्यता मिळते अगर जातक वाडवडिलांच्या व्यवसायात शिरतो व त्याची वाढ करतो.

मंगळ पंचमेशही असतो आणि त्याची धनस्थानातून पंचमावर चौथी दृष्टी येते. ती शुभ ठरते. पुत्रसंतती असते व तीही नावलौकिक मिळविते. जातकास सुंदर व सुशील पत्नी लाभते. संतती सद्‌गुणी असते.

मंगळ व रवी यांचा सहयोग चांगलाच संपत्तिदायक ठरतो. वडिलार्जित मालमत्ता व संपत्तीचा लाभ होतो. रवी दशमात असता तो उच्च राशीस येतो आणि दशमेश व धनेश यांचा अन्योन्य क्षेत्रयोग व त्रिकोण योग होतो. जातक राजकारणात शिरतो व तेथेही नावलौकिक मिळवितो. त्यास समाजात मोठा मान मिळतो. मंगळाचा गुरु व चंद्राशी सहयोग व दृष्टियोग असताही धनलाभ व मान प्राप्त होतो.

शुक्र चतुर्थेश व लाभेश असतो आणि त्याचे द्वितीयेतील वास्तव्य शुभ फलदायी ठरते. अशा योगावर जातकास श्री. स्त्री, संतती, मोठा प्रासाद व वाहने यांची प्राप्ती होते.


बुधाचा अगर शनीचा मंगळाशी सहयोग वा दृष्टियोग चांगला ठरत नाही. अशुभताच अशा योगामुळे निर्माण होते. पण बुधाचा सहयोग, कुंडलीतील अन्य ग्रहांच्या संदर्भात निराळा ठरू शकतो.

## कुंडली : श्री. अरविंद नरोत्तम

जन्म - गुरुवार ४ एप्रिल, १९१८ रोजी अहमदाबाद येथे दु. १ वा. ४५ मि. प्र. वेळ.

अक्षांश - २३° २' उ., रेखांश - ७२° ४६' पूर्व.

अयनांश - २२° ४३' १३", सांपातिक समय - १ ता. ५३ मि. २० सेकंद.



भारतातील अग्रगण्य उद्योगपती, मिल-मालक, अशोक मिल्सचे अध्यक्ष. इतर उद्योगांशीही संबंध.

लग्नेश चंद्र षष्ठात आहे. दशमेश मंगळ द्वितीयेत आहे व द्वितीयेश रवी भाग्यात मीनेत आहे. त्याचा अधिपती गुरु लाभस्थानात आहे.

तृतीयेश बुध दशमात आहे व त्याचा चतुर्थेश लाभेश शुक्राशी लाभयोग आहे. गुरु-शनी यांचा लाभयोग अंशात्मक आहे. मंगळ राजयोगकारक असून तो धनस्थानी चंद्राचे नवमात येतो. हे सर्व योग अवजड यंत्रसामग्री व कापड उद्योगाशी उत्तम संबंध दर्शविते. मुख्य योग दशमेश धनात व धनेश भाग्यात हा मोठा योग. यावर जातक अनेक उद्योगांशी संबंधित तर आलाच पण प्रमुखपदी आरूढ झालेला दिसतो.

**(६) कन्येचा मंगळ :** द्वितीय स्थानात जर सहा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कन्येचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

या लग्नास मंगळ चतुर्थेश व भाग्येश असून द्वितीय स्थानात कन्या राशीस येतो. ही शत्रूरास आहे व मंगळ येथे निर्बली ठरतो. जातक गर्भश्रीमंत कुटुंबात जन्मलेला असतो. त्यास वडिलोपार्जित स्थावर-जंगम मालमत्ता मिळालेली असते. जातक स्थावर, वाहने व पैसा यांनी युक्त असतो व सुखी असतो.

येथे बुध हा धनेश व लाभेश असतो आणि तो कन्या राशीत उच्च वा मूलत्रिकोणी (त्याच्या अंशावर अवलंबून) असतो. भाग्येश व लाभेश यांचा सहयोग धनस्थानी होत असता उत्तम संपत्ती लाभ होतात. जातकास विद्याही उत्तम मिळालेली असते. मंगळ चतुर्थेश असून विद्याकारक उच्चस्थ बुधाने युक्त असतो व तो विद्येनिमित्त परदेशीही जातो. जातकास वक्तृत्वही चांगले असते. तो उत्तम कोटिबाज असतो, विद्वान व हरहुन्नरी असतो.

शुक्र द्वितीयेत नीच राशीत येतो. पण नीचभंग झाला असता भाग्येश व दशमेश यांचा सहयोग उत्तम राजयोग करतो. शुक्र तृतीयेत तुळेत स्वगृही असतो व तेथे तो शुभ फलदायी होतो. पण तो दशमात असला तर अशुभ ठरतो व तो काही योग करीत नाही असे भावार्थ रत्नाकरमध्ये सिंह लग्न विचार या प्रकरणातील पाचव्या श्लोकात म्हटले आहे.

शनी षष्ठेश व सप्तमेश असतो व त्याचा मंगळाशी सहयोग चांगला नसतो. दोन पापग्रहांची व शत्रुग्रहांची मारक स्थानी युती अपघाती व अपमृत्युदायक अगर गंभीर आजाराची दर्शक आहे. एका सिंह लग्नाचे कुंडलीत रवी मिथुनेत व शनी-मंगळ यांची युती कन्येत आहे त्यास स्पायनल मेनिंजायटिस होऊन तो अत्यवस्थ झाला होता. तसेच असा योग आयुर्मर्यादा कमी करणारा आहे. गंभीर आजार होतात व लवकर योग्य निदान झाले व उपचार झाले तर ठीक असते. अन्यथा आयुर्मर्यादा कमी होते.

मंगळाबरोबर प्रजापती (हर्षल) वा वरुण (नेपच्यून) असता अपघाती वा घातपाताने मृत्यू होतो. स्वर्गीय राजीव गांधी यांचे सिंह लग्न-लग्नी रवी, गुरु, शुक्र, चंद्र व बुध असून मंगळ व वरुण (नेपच्यून) यांची युती द्वितीयेत आहे. त्यांचा मृत्यू घातपाताने झाला.

मंगळाबरोबर राहू असताही तो घातक ठरतो, विषप्रयोगाने मृत्यू होतो.

येथे मंगळाबरोबर गुरु असणेही फारसे हितावह नसते. गुरुची दृष्टी असावी, सहयोग नसावा. तसे असल्यास विद्या पूर्ण होत नाही. त्यात अडथळे येतात. संततिसुख बिघडते. संतती मोठी होऊन जाते, पुत्रशोक होतो. मंगळाची दृष्टी पंचमावर व अष्टमावर येते आणि या दोन्ही स्थानांचा अधिपती गुरु मंगळाच्या सहयोगाने मारक ठरतो. परंतु जातक विद्वान असतो व शिक्षणक्षेत्रात चमकतो. जातक सामान्य जीवन जगतो.


मंगळ मारकस्थानी असल्याने त्याचा कोणत्याच ग्रहाशी सहयोग शुभ फलदायी नसतो. अन्य ग्रहांचे मंगळाशी लाभयोग वा त्रिकोणयोग असावेत म्हणजे जातकाचे जीवन सफल व उज्ज्वल होईल.

## कुंडली : श्री. ब्रिजलाल सारडा

जन्म - २०/२१ नोव्हेंबर, १९५३ शुक्रवार/शनिवारी मध्यरात्री अहमदनगर येथे १२ वा ३१ मि. प्र. वेळ.

अक्षांश - १९° उ. ८', रेखांश - ७४° पूर्व ४०'

अयनांश - २३° १३' २", सांपातिक समय - ३ वा. ५७ मि. ९ से.




मोठ्या व्यापारी घराण्यात जन्म. कापडाचा मोठा व्यवसाय. जातक त्याही उद्योगात आहे. पण त्याला मारुतीची डीलरशीप मिळाली. शिवाय मित्रांच्या मदतीने सहकारी संस्था, बँक काढण्याचा प्रयत्न आहे. सामाजिक कार्यातही रस आहे. पत्नी सोलापूर येथील मोठ्या व नामांकित घराण्यातून आलेली व सुशिक्षित आहे. दोन मुलगे. पहिला मुलगा सासऱ्यास दत्तक दिला आहे. सुखी कुटुंब. श्री, स्त्री, संतती यांनी युक्त आहे.

दशमात चंद्र उच्चांशी आहे. योगकारक मंगळ द्वितीयेत कन्येमध्ये आहे. शुक्र दशमेश आहे पण तो दशमात नाही पण तृतीय स्थानी तुळेमध्ये आहे. सप्तमेश शनी तुळेतच आहे. तेथे शनी, शुक्र, बुध एके ठिकाणी आहेत व त्यावर गुरुची पूर्ण दृष्टी आहे. शिवाय बुधाचा लाभस्थ हर्षलशी त्रिकाण योग आहे.

द्वितीयस्थ मंगळ कन्येत आहे व तो लग्नेश रवीचे लाभात आहे. पंचमेश गुरुची पंचमावर दृष्टी आहे. दोन पुत्र संतती आहे.

सप्तमेश शनी उच्च राशीत शुक्रासह आहे. म्हणून पत्नीही मोठ्या घराण्यातून आलेली व सुस्वरूप आहे.

(७) **तुळेचा मंगळ :** द्वितीय स्थानात जर सात अंक असेल तर तेथील मंगळाला 'तुळेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –

मंगळ अष्टमेश व तृतीयेश असतो. द्वितीयात तूळ राशीत येतो. ही स्थिती कौटुंबिक अवस्थेस व सांपत्तिकदृष्ट्या अशुभ असते. जातक तत्त्वशून्य वागतो व बोलतो. तुळेतील मंगळ कामवासना जास्त देतो. तसेच त्याची दुसऱ्याच्या संपत्तीवर नजर असते आणि स्त्रियांचे मागे लागतो. हीन कृत्याकडे ओढा असतो. असमाधान व भांडणे यांनी कौटुंबिक जीवन भरलेले असते. जातकाची पत्नी दुरावते. मंगळ पूर्ण अशुभ आहे या समजुतीवर ही फले आहेत. पण सप्तमेश गुरू असल्याने त्याच्या दृष्टीमुळे वरील फलात फरक पडतो. तसेच हाशुक्राशी शुभसंबंध असल्यास कौटुंबिक सौख्य चांगले राहते व संपत्तीही उत्तम मिळते. कारण शुक्र हा कन्या लग्नास भाग्येश असतो. लाभेश चंद्राचे शुभयोग या चंद्र धनस्थानी मंगळाबरोबर असता पैसे चांगले मिळतात.

**कुंडली : श्री. म. दा. गाडगीळ**


जन्म – बुधवार दि. २८ ऑगस्ट, १९१८ रोजी अक्कलकोट येथे सकाळी ८.५५ प्र. वेळ

अक्षांश – १७° ३१' उत्तर, रेखांश – ७६° १२' पूर्व.

अयनांश – २२° ४३' ३०",

सांपातिक समय – ६ ता. ५२ मि. ११ सेकंद.

बुध जन्मकाळी वक्री होता पण तो १२/९/१९१८ रोजी मार्गी झाला आहे.



लग्नेश बुध सिंह राशीत व रवीही तेथेच आहे. चंद्र वृषभेत उच्चांशी आहे. जातक उंच गोरापान असून हसतमुख होता. हसत-हसत बोलावयाची सवय होती. प्रसन्न व्यक्तिमत्त्व व स्वभावाने दिलदार. सरदार घराण्यात जन्म. मंगळ द्वितीयेत तुळेत आहे व त्याच्यावर दशमातून गुरुची पूर्ण दृष्टी आहे. बोलणे स्पष्ट असले तरी कोणाला दुखावण्याचे बोलणे नसते. गुरु-मंगळ द्वितीय व दशमातून त्रिकोण योग. प्रथम वकिली नंतर न्यायखात्यात नोकरी १४/१/१९५१ रोजी कनिष्ठ स्तराचे न्यायाधीश म्हणून नंतर असिस्टंट जज्ज. तेथून कामगार न्यायालयात काम केले. भावंडांत मोठा. ४ धाकटे भाऊ व १ बहीण. विवाह २०/२/१९४२. संतती : २ मुली व एक मुलगा. सर्व हुशार. द्वितीयेश शुक्र लाभात कर्केत त्याचा अधिपती चंद्र वृषभेत उच्चांशी, चंद्राचे द्वितीयेत गुरू हा मोठा योग. कौटुंबिक सौख्य उत्तम. वर लिहिलेली अशुभ फले नाहीत. कारण चंद्र उच्च, गुरुची द्वितीयावर दृष्टी. ह्रदयाची झडप फेल झाल्याने मृत्यू फेब्रुवारी १९८५ मध्ये. शनी महादशा-मंगळ अंतर्दशा. दोघांचीही अष्टमावर दृष्टी आहे. ६७ वे वर्ष शुक्र द्वितीयेश व नेपच्यून सप्तमेश. म्हणून ६७ व्या वर्षी निधन.

**(८) वृश्चिकेचा मंगळ :** द्वितीय स्थानात जर आठ हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'वृश्चिकेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ सप्तमेश व द्वितीयेश असून द्वितीयेत स्वगृही येतो. सप्तमेश सप्तमाचे अष्टमात असणे हे वैवाहिक सुखाच्या दृष्टीने साधारणतः विघातक ठरते. पण येथे मंगळ स्वगृही असल्याने पती/पत्नी सौख्यावर विपरीत परिणाम होत नाही.

परंतु मंगळ द्वितीय व सप्तम या दोन्ही स्थानांचा अधिपती असल्याने तो एकटाही मारक ठरतो आणि अशा मंगळाची द्वितीय स्थानातून अष्टम (मृत्यू) स्थानावरील दृष्टी आयुर्मर्यादा कमी करणारी ठरते. या संदर्भात भावार्थ रत्नाकर या ग्रंथात तुला विचार या प्रकरणातील दुसरा श्लोक पुढीलप्रमाणे आहे -

**तुला लग्ने तु जायमानस्य धनसप्तम नायकः ।**
**न करोति कुजः पापः निधनं न तु संशयः ।।**

तुला लग्नास मंगळ द्वितीयेश व सप्तमेश असूनही तो मारक ठरत नाही असे ग्रंथकार ठामपणे प्रतिपादन करतात.

ग्रंथकारांच्या या मताशी कै. डॉ. बी. व्ही. रामन हे सहमत नाहीत. त्यांच्या स्वतःच्या प्रदीर्घ अनुभवावरून ते म्हणतात की असा मंगळ मारक ठरतो. या दोन्हींचा समन्वय असा होऊ शकेल की, द्वितीयस्थ मंगळाची अष्टमावर दृष्टी असली तरी ती अपमृत्युकारक होत नाही व आयुर्मर्यादा कमी होत नाही. परंतु मंगळ स्वगृहाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी असून त्याची दृष्टी अष्टमावर लग्नातून वा पंचमातून होत असताना तो मारक ठरतो व आयुर्मर्यादा कमी करताना दिसतो.

मंगळाचा शुक्राशी संबंध असणे चांगले असते आणि शुक्र लग्नी असता विधुरावस्था वा वैधव्य येत नाही. भावार्थ रत्नाकरमध्ये १३ वा श्लोक असा आहे -

**तुलायां जायमानस्य मारको लग्नभार्गवः ।**
**द्वितीये सप्तमेशोऽपि न भौमो मारको भवेत् ।।**

उत्तरार्धाचा अन्वयार्थ असा भौमो सप्तमेशोऽपि (यदि) द्वितीये स्थितौ मारकः न भवेत् असा केला तर मंगळ सप्तमेश असूनही द्वितीयात असता (स्वगृही असल्याने) मारक होत नाही असा सरळ अर्थ होतो.

तूळ लग्नास गुरु शुभ नसतो (तो तृतीयेश व षष्ठेश असतो) तेव्हा गुरु-मंगळ सहयोग किंवा दृष्टियोग पोषक ठरत नाही. त्यामुळे विशाखातील वृश्चिकेच्या पहिल्या नवांशांत मंगळ कर्क नवांशी (नीच नवांशी) येतो. त्यामुळे गुरु-मंगळ द्वितीयेत शुभ ठरत नाहीत. परंतु भाग्येश बुध, लाभेश रवी, चतुर्थेश पंचमेश शनी आणि दशमेश चंद्र यांचा मंगळाशी सहयोग कसा काय असतो व ठरतो हे भावार्थ रत्नाकरमध्ये उत्तम सूचित केले आहे -

**श्लोक**

**तुला लग्ने तु जातस्य रविस्सौरेबुधस्य च ।**
**कुजस्य यदि संबंधो बहुभाग्यप्रदो भवेत् ।। ६ ।।**

**श्लोक**

**तुला लग्ने तु जातस्य रविस्सौरेबुधस्य च ।**
**कुजस्यवेन्दुसंबंधो राजयोग उदीरितः ।। ७ ।।**

तूळ लग्नाच्या बाबतीत बुध, शनी, रवी यांचा मंगळाशी संबंध (युती, दृष्टी वा अन्योन्य क्षेत्र) असता जातक मोठा भाग्यवान ठरतो. तसेच बुध, शनी, रवी तसेच मंगळ यांचा चंद्राशी संबंध राजयोगकारक असतो.

ते कसे ते पाहा : बुध भाग्येश, मंगळ सप्तमेश तसाच धनेश हे संपत्तिदायक, शनी चतुर्थेश व पंचमेश आणि रवी लाभेश व मंगळ धनेश संपत्तिदायक यांची युती मंगळाबरोबर धनस्थानात होते. म्हणून संपत्तीचा लाभ तसेच या तिघांचा दशमेश चंद्राशी योगसंबंध-अधिकार योग-राजयोग, चंद्र मंगळाची युती धनस्थानी, चंद्र-मंगळ एकमेकांचे राशीत वा त्यांचा परस्पर दृष्टियोग (चंद्र अष्टमातून पण उच्च राशीतून) करतो - तसेच दशमेश दशमात त्रिकोण (नवपंचम योग) धनस्थ स्वगृहीचा मंगळ. तसेच चंद्र दशमेश असल्याने भाग्येश बुधाशी संबंध म्हणजे नवमेश-दशमेश यांचे संबंध, रवी लाभेश त्याची चंद्राशी युती राजयोग आणि शनी चतुर्थेश पंचमेश यांचा दशमेश चंद्राशी संबंध हे सर्व राजयोगदर्शकच आहेत.

बुध मंगळ योग गणित, तर्कशास्त्र, स्थापत्यशास्त्र वा वैद्यकशास्त्र या क्षेत्रांत उत्तम कामगिरी व धनलाभ तसेच तडफदार व धारदार वक्तृत्व, हजरजबाबीपणा दर्शवितो. तसेच सप्तमेश व भाग्येश यांचा संबंध कायद्याचा अभ्यास व वकिली पेशा दर्शवितो. शनी कायद्याचा कारक आहे आणि मंगळ सप्तमाचा अधिपती (न्यायालयीन खटले-कामकाजदर्शक) त्यामुळे शनी-मंगळ संबंध फौजदारी कामास उपयुक्त ठरतो तसेच स्थापत्य व वैद्यकीशीही.

मंगळ अनुराधा नक्षत्रात व ज्येष्ठा नक्षत्रात असता अनुक्रमे शनी व बुध यांच्याशी संबंध योगप्रद ठरतील.


### कुंडली : श्री. कृष्ण हरी केळकर

जन्म - दि. २२ ऑक्टोबर, १९१६ रोजी सोलापूर येथे सकाळी ६ वा. २५ मि. प्र. वेळ.

अक्षांश - १७° ४२' उत्तर, रेखांश - ७५° ५४' पूर्व.

अयनांश - २२° ४१' ५", सांपातिक समय - ८ ता. ० मि. २४ सेकंद.

सोलापुरातील नामांकित फौजदारी वकील. उत्तम उलट तपासणी करीत. स्वतःची स्थावर व वाहन. चेहरा उग्र, डोळे भेदक, वर्ण लालसर गोरा. स्पष्टवक्ते, निर्भीड.




मंगळ-शनी अंशात्मक त्रिकोण. योग-फौजदारी खटल्यात कौशल्य. बुध (भाग्येश) उच्च असून त्याचा हर्षलशी त्रिकोणयोग. उलट तपासणी अप्रतिम. ऐनवेळी प्रश्न सुचत असत.

टेनिस खेळाची आवड, बॅडमिंटनही चांगले खेळत.

लग्नेश लाभेश अन्योन्य क्षेत्र योग, सप्तमातून गुरुची रवी व शुक्र यांच्यावर व दशमेश चंद्रावर पूर्ण दृष्टी. मृत्यू दि. ५ नोव्हेंबर, १९९५.

**(९) धनुचा मंगळ :** द्वितीय स्थानात जर नऊ हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'धनुचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

द्वितीयेवर धनु रास येते. लग्नेश मंगळ द्वितीयेत मित्रक्षेत्री येतो. जातकावर लक्ष्मीची कृपा असते व ती अखंडित असते. त्याचे दात मोठे व पुढे आलेले असतात. तो तारुण्य बरेच वर्षे टिकवून धरतो. जणू काही तो चिरतरुण असतो. मंगळ षष्ठेशही असल्याने नेत्रविकार व दंतविकार होतात. जातक संभाषणचतुर असतो व त्यास वाक्‌युद्ध खेळणे आवडते. वादविवादात हरला जात नाही.

गुरु द्वितीयेत मंगळाबरोबर असता राजयोगच होतो. गुरु पंचमेश व धनेश असल्याने उत्तम संपत्ती योग होतो. जातक मोठ्या उद्योग-व्यवसायात असतो व अनेकांचा पोशिंदा असतो. उद्योग-व्यवसायातून आणि/अथवा सट्टा लॉटरी अगर तेजी-मंदी व्यवहार यातून मोठा संपत्ती लाभ होतो. गुरु लाभात वा दशमात असताही उच्च धनलाभ होतो. मान-सन्मान मिळतो. जातक अधिकार पदावर जातो. गुरु अष्टमात असता त्याची दृष्टी मंगळावर येते. वारसारूपाने संपत्ती लाभ होतो. गुरु षष्ठात असता दलालीचे व्यवहारातून फायदा होतो. पण गुरु व्ययात असता अगर व्ययेश शुक्र द्वितीयेत असता जातकास दंड म्हणून मोठी रक्कम भरावी लागते.

रवी मंगळाबरोबर द्वितीयेत असता सरकारी नोकरीमुळे अथवा सरकारची कंत्राटी कामे वगैरेपासून उत्तम संपत्ती मिळते. चंद्र वृश्चिक लग्नाचा भाग्येश असतो व तो मंगळाबरोबर द्वितीयेत असता लक्ष्मीयोग होतो. बुध लाभेश व अष्टमेश असतो व तो मंगळाबरोबर असता संपत्तीचा लाभ होतो. जातक उत्तम विक्रेता व मिठ्ठास बोलणारा असतो.


शनी तृतीयेश व चतुर्थेश असल्याने त्याचा मंगळाशी सहयोग शुभ फलदायी ठरत नाही. भावंडांपासून त्रास होतो व कौटुंबिक सुखही बिघडते.

शुक्र व्ययेश असल्याने त्याचा सहयोग संपत्तिदायक ठरत नाही.

## कुंडली : पुरुष जातक

जन्म - शुक्रवार दि. ३० ऑगस्ट, १९०७ रोजी सकाळी ११.३०.

अक्षांश - १२° उत्तर, अयनांश - २२° ३३° ४८"




प्राचार्य म्हणून नावलौकिक मिळविला. निवृत्त झाल्यावर व प्राचार्य पदावर असताना जवळजवळ ४० वर्षे होमिओपॅथिकचे उपचार सेवाभावाने करीत असत. धनेश पंचमेश गुरु भाग्यात उच्च, दशमात बुध-शुक्र-रवी. त्यांचा लग्नेश मंगळाशी त्रिकोणयोग.

भाग्यस्थ उच्च गुरुमुळे व दशमस्थ रवी यामुळे शैक्षणिक क्षेत्रात नाव कमावले. लग्नेश धनु राशीत त्रिकोण रवी यामुळे वैद्यकीय उपचार. होमिओपॅथिकचे उपचारास गुरुस बल

असावे लागते. येथे गुरु भाग्यात असून उच्च आहे. भाग्येश चंद्रही उच्च आहे. तसेच बुध-शुक्र-रवी हे कर्क, सिंह वा कन्येत असावे लागतात. येथे ते सिंहेत आहेत. रवी हा औषधी विद्येचा कारक आहे. गुरुची शनीवर दृष्टी असता जातक धार्मिक प्रवृत्तीचा असून साधी राहणी व उच्च विचारसरणी असते अगर तो सामाजिक कार्य करतो.

**(१०) मकरेचा मंगळ :** द्वितीय स्थानात जर दहा हा अंक येत असेल तर तेथील मंगळाला 'मकरेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

या लग्नास मंगळ पंचमेश असतो व व्ययेशही असतो. द्वितीयेवर मकर रास असते. तेथे मंगळ उच्च राशीत येतो. पण तो व्ययेश असल्याने त्याचे धनस्थानातील वास्तव्य काही वेळा धनाचा अपव्यय दर्शविते. पण तो अशुभ दृष्टी असता. मंगळाशी अशुभ योग नसता धननाश होत नाही. मंगळ पंचमेश असतो व त्याचे कुटुंबस्थानातील वास्तव्य उच्च राशीत असल्याने संतती बरीच होते पण ती कन्या संततीच असते.

जातक स्वतः विद्वान असतो, संपत्ती मिळवितो पण खर्चाची तोंडे बरीच राहतात.

मकर राशीत उत्तराषाढा १० अंश, श्रवण १३ अंश २० कला व धनिष्ठा ६° ४०' अशी नक्षत्रे अनुक्रमे रवी, चंद्र व मंगळाची असतात. रवी कुंडलीचा भाग्येश असल्याने त्याचे नक्षत्रातील मंगळाचे वास्तव्य चांगले ठरते. मकरेच्या प्रथम चरणात मंगळ वर्गोत्तम असतो व या ठिकाणी मंगळास उत्तम संधी मिळतात व उत्तम संपत्ती लाभ होतो. तिसरा नवांश मीनेचा असतो. तेथील मंगळ बुद्धिमत्ता दर्शवितो पण त्याचे मित्रांशी पटत नाही. जातकाची फसवणूक होते व एखादे आर्थिक गंडांतर येते. कुंभ नवांशांत हट्टीपणा व फटकळपणा दिसतो. शिक्षण व अर्थार्जन यांचा संबंध येत नाही. मकर, मीन, कुंभ नवांशातील मंगळाची श्रेणी उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशी आहेत.

श्रवण नक्षत्र चंद्राचे आहे. चंद्र धनु लग्नाचा अष्टमेश आहे. त्यामुळे या नक्षत्रातील मंगळाची फले मिश्र असतात. मेष नवांश ठीक राहतो. वृषभ नवांशात नेत्रविकार होतात. मिथुन नवांशी मंगळ असून तो बुधाच्या शुभयोगात असल्यास उद्योग-व्यवसाय चांगला चालतो. पण बुध मंगळाबरोबर असता द्विभार्या योग येईल. कर्क नवांशात मंगळ नीच नवांशी येतो. त्याची फले शुभ नाहीत. अपघातप्रवणता असते व आयुर्मर्यादा कमी होते.

धनिष्ठा नक्षत्रातील मंगळ चांगली फले देईल. शेवटच्या नवांशांत मंगळ परमोच्च असतो. त्या वेळी बुध, रवी वा गुरु दशमात येऊन मंगळाशी त्रिकोण करीत असता जातक बुध, मंगळ, रवी व गुरु यांच्या अंतर्दशात आयुष्यातील उच्च स्थितीस पोहचेल, मान-सन्मान मिळतील आणि श्री, स्त्री, संतती अधिकार या दृष्टीने सुखी होईल.


मंगळ शनीचे राशीत असल्याने शनीचा सहयोग वा शुभ दृष्टियोग उत्तम ठरतो व जातक नावलौकिक मिळवितो. शुक्र लाभेश व षष्ठेश असल्याने त्याचाही सहयोग चांगला ठरेल.

## कुंडली : श्री. हरी नारायण आपटे

जन्म - सोमवार दि. ८ मार्च, १८६४ रोजी पारोळे (जळगाव) येथे रात्रौ १ वा. ४४ मि.

अक्षांश - २०° उत्तर ५३' व रेखांश - ७५° पूर्व.

अयनांश - २१° ५७' ३७", सांपातिक समय - १२ ता. ४८ मि. १५ सेकंद.




सुप्रसिद्ध कादंबरीकार दहा ऐतिहासिक कादंबऱ्या व दहा सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. नाटकेही लिहिली आहेत. तसेच वयाच्या १८ व्या वर्षी आगरकरांच्या पुस्तकावर व लेखावर टीकात्मक लेख लिहिले. त्याबद्दल आगरकरांनी या विद्यार्थ्याची सर्व विद्यार्थ्यांसमोर प्रशंसा केली. शिक्षण फक्त मॅट्रिक पास. मराठी भाषेतील प्रभुत्वामुळे त्यांना युनिव्हर्सिटी पदवीची उणीव भासली नाही. इतकेच नव्हे तर युनिव्हर्सिटीने त्यांना मराठीचे परीक्षक नेमले होते. तसेच फायलॉजिकल लेक्चररशिपची जागाही त्यांना मिळाली. सरकारने त्यांना कैसर-इ-हिंदचा मान दिला. लोकल-बोर्डाचे ते कित्येक वर्षे व्हाईस प्रेसिडेंट होते. तीन वर्षे पुणे म्युनिसिपालटीचे अध्यक्ष होते. अनेक संस्थांशी संबंध होता.

स्पष्टवक्ते व निर्भीड होते. त्यांनी आपल्या निर्भीडपणाने युरोपियन अंमलदार व कौन्सिलर यांनाही नमविले.

मंगळ द्वितीयेत मकरेत आहे व त्याचे लाभात गुरु असून त्याच्या तृतीयेत नेपच्यून आहे. गुरु व नेपच्यून त्रिकोण योग आहे. हा योग कल्पनाशक्ती व अंतःस्फूर्ती देणारा योग आहे. द्वितीयस्थ मंगळ हा स्पष्टवक्ता व निर्भीडपणा दाखवतो व त्याचे प्रत्यंतराचे उदाहरण वर नमूद आहे. धनेश शनी दशमात असून त्याचा लाभेश शुक्राशी व षष्ठस्थ हर्षलशी त्रिकोण आहे. शुक्र शनी त्रिकोणामुळे त्यांचा अनेक संस्थांशी संबंध आला. शुक्र हर्षल त्रिकोणामुळे स्वतंत्र बाणा, स्वतंत्र कल्पना व बौद्धिक विषयात सहजगती, भाषा व भाषेतील मर्मज्ञ ही फले दिसतात.

पंचमेश मंगळ द्वितीयेत उच्च आहे. त्यामुळे पदवी परीक्षा दिली नसताही युनिव्हर्सिटीने त्यांना जो मान दिला त्याचे द्योतक आहे. कैसर-इ-हिंदचा चाँद सरकारने दिला. भाग्येश रवीच्या नक्षत्रात मंगळ आहे, त्याचे लाभात लग्नेश गुरू. यावर त्यांना मान-सन्मान प्राप्त झाले.

**(११) कुंभेचा मंगळ** : द्वितीय स्थानात जेव्हा अकरा हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'कुंभेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे आहे.

द्वितीयेवर कुंभ रास असते. मंगळ चतुर्थेश व लाभेश असून तो द्वितीयेत शत्रुक्षेत्री येतो. मातृसुख बिघडते. लाभेश धनस्थानी असल्याने व्यवसायातून प्राप्ती चांगली होते. पण आर्थिक नुकसानही होते. शिल्लक राहत नाही. जातक मोठ्या भावाबरोबर असतो. त्यामुळे त्यास पैशाचा लाभही होतो. जातक व्यापारउदीम करतो अगर स्थावर खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतो. मंगळ दूषित असता मित्रामुळे अडचणीत येतो व धननाश होतो. पण शनीचे त्रिकोणयोगात असता मित्रामुळे उत्तम लाभ होतो.

शनीच्या राशीत मंगळ असल्याने शनीची द्वितीयस्थ मंगळावर दृष्टी आल्यास अथवा शनी द्वितीयेत आल्यास जातक धनवान असतो. पण शनीची व्ययस्थानातून दृष्टी चांगली ठरत नाही.

शनी दशमात उच्च राशीस असतो व त्याच वेळी मंगळ शनीचा उत्तम त्रिकोण योग एकाच तत्त्वाचे राशीतून होतो. हा योग व्यवसायापासून उत्तम संपत्ती लाभ, मानसन्मान मिळण्यास कारणीभूत होतो. जातकास स्थावर व वाहने यांचा उत्तम लाभ होतो. शनी हा कायद्याचा कारक, त्याचा मंगळाशी त्रिकोण योग बौद्धिक राशीतून होतो. या योगावर जातक उत्तम वकील वा निःस्पृह न्यायाधीश होतो.जातकास उच्च विद्या प्राप्त होते.

शुक्र हा मकर लग्नास योगकारक, त्याचा मंगळाशी सहयोग अगर त्रिकोण योग झाल्यास चतुर्थ, पंचम, दशम व एकादश या स्थानांना एकत्रित आणतो आणि या सर्वच स्थानांची शुभ फले मिळतात. जातक श्री, स्त्री, संतती, स्थावर वाहने अशी सर्व सुखे उपभोगतो, सुखी होतो व त्यास मानमान्यता मिळते.

व्ययेश गुरुची मंगळावरील दृष्टी वा युती संपत्तीच्या दृष्टीने तसेच कौटुंबिक सौख्याच्या दृष्टीने चांगली ठरत नाही. उलट भावंडाचे शत्रुत्व पत्करावे लागते.


चंद्राचा सहयोग पत्नीसौख्यास विघातक ठरतो तर बुध भाग्येश म्हणून त्याचा सहयोग चांगला असतो. पण बुध षष्ठेशही असल्याने दूषित रक्तामुळे ओढवणारे त्वचाविकार तसेच फुफ्फुसांचे विकार व दमा, खोकला दर्शवितो पण वक्तृत्व कला असते तसेच धनयोगही चांगला होतो.

## कुंडली : श्री. रणजित देसाई

जन्म - शनिवार/रविवार ७/८ एप्रिल, १९२८ रोजी कोल्हापूर रात्री १.४० प्र. वेळ

अक्षांश - १६° उत्तर ४२', रेखांश - ७४° पूर्व १६.

अयनांश - २२° ५१' ३", सांपतिक समय - १४ ता. १० मि. ५१ से.




मराठी साहित्यिक : १७ पुस्तके, कादंबऱ्या, लघुकथासंग्रह. विक्रमी स्वामी कादंबरीवर दूरदर्शन निर्मिती.

१९७३ पद्मश्री, १९६३ राज्य पारितोषिक, १९६४ साहित्य अकादमी ॲवॉर्ड.

दशमेश शुक्र तृतीयेत मीन राशीत भाग्येश बुधासह आहे. त्याचे जवळच हर्षलही आहे. त्यामुळे साहित्यनिर्मिती क्षेत्र. लग्नेश शनी त्रिकोण गुरु व रवी. यामुळे मानसन्मान व लोकप्रियता. लग्नेश शनी लाभात व लाभेश मंगळ द्वितीयेत आहे. शनी धनेशही आहे. शनी-मंगळ अन्योन्य क्षेत्र योग व शनी-मंगळ यांच्यामध्ये ७२° चा शुभयोग आहे.

मकर लग्नास गुरु व्ययेश व तृतीयेश असला तरी तो अशुभ फल देत नाही. तो शुभच असतो. तसेच तो अष्टमात असला व अष्टमेश असला तरीही तो शुभ असतो. इति उत्तर कालामृत अ. ४ श्लोक ९.

**(१२) मीनेचा मंगळ** : द्वितीय स्थानात जेव्हा बारा हा अंक असतो तेव्हा तेथील मंगळाला 'मीनेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

द्वितीयेत मीन रास येते. मंगळ तृतीयेश व दशमेश असतो व द्वितीयेत मित्रक्षेत्री येतो. जातक चांगला नशीबवान असतो. स्वतःचे परिश्रमाने, उद्योगाने चांगली संपत्ती मिळवितो. त्याचे कुटुंबीय प्रत्येक गोष्टीसाठी जातकावर अवलंबून राहतात. कारण जातकाच्या मतांना चांगलीच किंमत असते व महत्त्वही असते. जातक सरकारशी संबंधित येतो. तो सरकारी नोकरीत असतो अगर राजकारणात पुढे येतो.

जातकावर अनेक लोक अवलंबून असतात. तो अनेकांचा पोशिंदा असतो व मदत करण्यास तयार असतो. भाग्येश शुक्राशी शुभयोग असता राजयोग होतो.

गुरुचा धनस्थ मंगळाशी सहयोग, दृष्टियोग असता जातकाचा अधिकार व शक्ती मोठी असते.


मंगळ-बुधाने युक्त असता अगर शनी/राहूने युक्त असता जातकास नेत्रविकार होतात. (बुध अष्टमेश असतो व तो द्वितीयेत नीच राशीत येतो तर शनी व्ययेश असतो.) पैसे अनाठायी खर्च होतात आणि कुटुंबात गैरसमज होतात आणि जातकासमोर अनेक समस्या उभ्या राहतात आणि त्याच्या संपत्तीचा ऱ्हास होतो.

## कुंडली : श्री. ब्रह्मानंद रेड्डी

जन्म - बुधवार दि. २८ जुलै १९०९ रोजी चिरुमामेला, गुंटूर येथे रात्री ८.३० वाजता.

अक्षांश - १६° उत्तर १८' उत्तर; रेखांश - ८०° पूर्व २३' पूर्व.

अयनांश - २२° ३५' २४", सांपातिक समय - १६ ता. ४४ मि.





आंध्र प्रदेश ख्यातनाम राजकारणी. प्रथम वकिली, राजकारणात शिरले. आमदार होऊन आंध्रचे अर्थमंत्री १९५८ ते १९६४; मुख्यमंत्री १९६४ ते १९७७. नंतर केंद्रीय मंत्री, काँग्रेसचे अध्यक्ष, वित्त आयोगाचे अध्यक्ष. महाराष्ट्राचे राज्यपाल.

दशमांत चंद्र असून त्याचा रवीशी त्रिकोण योग व मंगळाशीही त्रिकोण योग. सप्तमांत गुरु त्रिकोण हर्षल व लाभयोग नेपच्यून मंगळ त्रिकोण, बुध (मंगळ दशमेश) वकिली. गुरु धनेश व लाभेश अर्थमंत्री व वित्त आयोगाचे अध्यक्ष. तसेच मुख्यमंत्री. चंद्राचे दशमात गुरु. सिंहेत व नवमांत रवी. चंद्र दशमेश भाग्यात. चंद्र द्वितीयेश दशमात. केंद्रीय मंत्रिपद. काँग्रेस अध्यक्ष व महाराष्ट्राचे राज्यपाल ही पदे. शिवाय शुक्र-शनी त्रिकोण लग्नेश व भाग्येश !!

# ३

# तृतीय भाव

सोबतच्या कुंडलीमध्ये ज्या ठिकाणी ३ हा अंक लिहिलेला आहे त्या स्थानाला कुंडलीतील किंवा पत्रिकेमधील 'तृतीय स्थान' असे म्हणतात.




या तृतीय स्थानावरून व्यक्तीचे धाकटे भाऊ-बहिणी, शेजारी, लहानसहान खुष्कीचे प्रवास, मनाची शक्ती व क्षमता यांचा विचार होतो. या स्थानास पराक्रम स्थान असेही म्हणतात. शरीरावयवांपैकी दंड-बाहू यांचा विचार होतो. बाहुबलाचा उपयोग, पराक्रमासाठी तसेच मैदानी व मर्दानी क्षेत्रासाठी आणि हस्तकौशल्य, पत्रव्यवहार, कागदपत्रे, करारमदार यांचाही विचार होतो. शरीरावयवांपैकी खांदे, हात, मान, कान यांचा प्रामुख्याने विचार होतो. अंतर्रेद्रिये यांपैकी फुफ्फुसांचा विचार होतो. संपत्तीचे व मालमत्तेचे विभाजन यांचाही बोध होतो. सहजपैकी अनुज म्हणजे धाकटे भाऊ व धाकट्या बहिणी यांचा विचार करण्यासाठी तृतीयस्थान, तृतीयेश व कारक ग्रह मंगळ हे पाहावे लागतात. मोठे भाऊ, मोठ्या बहिणी यांचा विचार एकादश स्थान, एकादशेश व कारक ग्रह गुरु हे पाहावे लागतील. तृतीय स्थानाचा कारक ग्रह मंगळ आहे.

धाकटी भावंडे, धैर्य, मनोबल, पराक्रम यांचा कारक ग्रह मंगळ आहे. दळणवळणाची साधने, पत्रव्यवहार, करारमदार, मालकी हक्काचे दस्तऐवज व लहान प्रवास, लेखन, वाङ्मय यासाठी बुध कारक आहे. नोकरीतील बदली, तसेच घर बदलणे इ. बाबी या स्थानावरून पाहतात.

सर्व प्रकारचे खेळ, बैठे खेळ, बुद्धिबळ, कॅरम, पत्ते वगैरे, मैदानी व मर्दानी खेळ - क्रिकेट, टेनिस, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कुस्त्या, मुष्टियुद्धे, कराटे वगैरे मार्शल आर्ट्स यासाठी मंगळ व बुध या दोघांचाही विचार करावा लागेल.

लेखनकला, चित्रकला, शिल्पकला, नृत्य, हस्तकला वगैरेंसाठी कारक ग्रह बुध आहे.

हस्ताक्षराचा विचार तृतीयस्थ ग्रह व तृतीयेश यावरून केला जावा.

तृतीय स्थान हे उपचय स्थानांपैकी एक आहे. तेथे पापग्रह फले देण्यात अग्रेसर असतात. मंगळ, राहू, प्रजापती (हर्षल) चांगली फले देतात.

तृतीयस्थ मंगळ रवीप्रमाणे फले देतो असे वराहमिहीर सांगतात आणि रवीबद्दल मतिविक्रमवान्स्तृतीयके सूर्ये। लोके मतोऽभिरामः प्राज्ञो जितदुष्टपक्षश्च ।।

सारावलीकार याचाच अनुवाद मंगळाकरिता असा करतात -

**शूरो भवत्यधृष्णो भातृवियुक्तो मुदान्वितः पुरुष ः ।**
**भूपुत्रे सहजस्थे समस्तगुणभाजनं ख्यातः ।।**

**अर्थ :** सहज भावांत (तृतीय) मंगळ असलेला जातक, धैर्यवान, शूर, सदाविजयी, आशावादी, भावंडे जवळ नसलेला, सर्वगुणसंपन्न व प्रसिद्ध होतो. (रवीच्या गुणांपैकी प्राज्ञ-शहाणा विद्वान याचा येथे अभाव आहे. कारण शिपाईगडी व विद्वत्ता एके ठिकाणी असतातच असे नाही.)

जातक निरोगी प्रकृतीचा, दुष्टांचा पराभव करणारा असून त्यास समाज व सरकार यांजकडून मानसन्मान प्राप्त होतात. जातक धार्मिक प्रवृत्तीचा, श्रीमंत, तेजस्वी, हिकमती असतो. पण बंधुवर्ग नसतो तरी अगर लवकर नाश पावतात अगर जातकापासून दुरावलेले असतात. जातक बलवान व धाडसी असतो. आनंदी, उत्साही व आशावादी असतो पण विषयलोलुप असतो. अग्नितत्त्वाचा मंगळ अपघातांचा कारक आहे. भाजणे, हाडे मोडणे, कर्णविकार, उष्णतेचे विकार या व्याधी दर्शवितो. शरीरावर जखमा होतात.

तृतीयस्थ मंगळ असलेली स्त्री-जातक नशीबवान, सद्गुणी, नातेवाइकांची आवडती, निरोगी प्रकृतीची आणि सज्जनांचा सहवास लाभलेली असते.

तृतीयेतील मंगळ धाकट्या भावंडांच्या दृष्टीने अशुभ ठरतो. जातकास प्रवासात धोके असतात, अपघात होतात. जातक शूर व पराक्रमी असतो आणि कौटुंबिक गैरसमजाने त्रस्त होतो. जातक वाहन चालविणारा असेल तर बेफाम अतिवेगाने चालवतो. त्यास सत्यासत्याची पर्वा नसते. परंतु चांगल्या कामांचा प्रवर्तक असतो. जातकास कर्णविकार, कानाच्या पडद्यास भोक पडणे, उष्णतेने कान फुटणे असे कानासंबंधी विकार होतात. पण बहिरेपणा शनीवार अवलंबून असतो.

तृतीयेत मेष, वृश्चिक, सिंह, धनु आणि मकर राशीत मंगळ असता अशुभ फले बऱ्याच अंशी कमी मिळतात.

भावार्थ रत्नाकरमधील मेष लग्न विचारमधील १० व्या श्लोकात मंगळ तृतीयेत गुरु किंवा शुक्र यांनी युक्त असता कुंडलीत राजयोग व शुभयोग होत नाहीत.

मंगळ ३ व ६ या भावांचा कारक आहे. तेथे व १० व ११ या भावात अनुकूल फले देतो.

मूलतः मनोरंजन, करमणूक आणि सर्व तऱ्हेच्या क्रीडा या गोष्टी शुक्राच्या अमलाखाली येतात. पण एकटा शुक्र विविध खेळ दर्शवित नाही. कोणत्याही क्रीडाप्रकारात किमान दोन व्यक्तींचा सहभाग असावा लागतो. ज्या खेळांना शारीरिक बलाची, मैदानाची आवश्यकता असते, जेथे मंगळ आणि बुद्धीची गरज असते तेथे बुध या ग्रहाची जोड शुक्रास असावी लागते. पाण्याशी संबंधित खेळास चंद्र व वरुण (नेपच्यून) हे ग्रहही विचारात घ्यावे लागतात. यशासाठी अर्थात गुरुची जोड असावी लागते. शनीचे खेळाशी सख्य नसले तरी एकाग्रता, चिकाटी या गुणांसाठी आणि बर्फावरील खेळासाठी शनी महत्त्वाचा ठरतो. बुधाचे

प्रजापती (हर्षल) वा शनीशी शुभयोग बुद्धिबळास उत्तम असतात. बुध-मंगळाचे संबंध सर्व प्रकारच्या खेळास पोषक असतात व ठरतात.

राशिचक्रातील मिथुन व धनु या राशींचा सर्व प्रकारच्या खेळांशी फार जवळचा संबंध आहे. खेळ बौद्धिक असो, मर्दानी असो तृतीय स्थानची राशी महत्त्वाची ठरते. जलतरणास जलराशी व त्यामध्ये वृश्चिक ही मंगळाची रास प्रमुख असते.

द्वादश स्थानांपैकी खेळासाठी पंचम स्थान व वैयक्तिक पराक्रमासाठी तृतीय स्थान महत्त्वाचे ठरते. लग्न वा दशमाचे संबंध या दोन स्थानांशी असतात. स्पर्धक व प्रतिस्पर्धी हे सप्तम स्थानावरून पाहावे. धनस्थानाचा संबंध धंदेवाईक खेळाडू निर्माण करतो. लग्न व दशमाचा संबंध कर्केशी असता कीर्ती व लोकप्रियता दर्शवितात. पंचमेश धनात वा लाभात किंवा धनेश पंचमेश संबंध असता खेळापासून धनप्राप्ती होते.

तृतीय स्थान व मंगळ यांचा संबंध कुस्ती, मुष्टियुद्धे, ज्युडो, कराटे वगैरेंसारखे खेळ, सर्व प्रकारचे कसरतीचे खेळ आणि टेनिस व बॅडमिंटन यासारखे ताकदीचे व हस्तचापल्याचे खेळ यांना मंगळाबरोबर बुधाची तसेच हस्तकौशल्य व पदलालित्य व चपलतेसाठीही जोड असावी लागते. अश्वारोहण, क्रीडा व शर्यती, पोलो, फुटबॉल, नेमबाजी यासाठी धनु राशीचा संबंध असतो.

## तृतीयस्थ मंगळाची राशीनिहाय भावफले

**(१) मेषेचा मंगळ** : तृतीय स्थानामध्ये जर एक हा अंक असेल व तेथे मंगळ असेल तर त्याला 'मेषेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ दशमेश व तृतीयेश असतो व सर्वसाधारणपणे तृतीयेत मेष रासच येते आणि मंगळ तेथेच स्वगृही येतो. जातक निधड्या छातीचा असतो. पण भावंडांच्या बाबतीत सुखी नसतो. भावंडे अल्पायुषी ठरतात अगर जातक भावंडांची मालमत्ता लुबाडतो.

जातकाचा व्यवसाय रसायने, स्थापत्यशास्त्र वा तत्सम असतो आणि त्या व्यवसायानिमित्त त्यास नित्य प्रवास करावा लागतो. तो व्यवस्थापकीय जागा भूषवितो.

गुरूशी शुभयोग असता संपत्ती लाभ उत्तम घडतो. शुक्राशी सहयोग वा शुभयोग म्हणजे भाग्येश दशमेश यांचे परस्परांशी संबंध व तो जातकास सर्व तऱ्हेची सुखे म्हणजे श्री, स्त्री, संतती, स्थावर यांचा लाभ घडवितो. तो उच्चविद्याविभूषित असतो.

शनी मंगळाबरोबर तृतीय स्थानी असणे चांगले नसते. शनी व्ययेश असून नीच राशीस येतो. भावंडांकरिता संपत्तीचा व्यय होतो.

रवी-मंगळ शुभयोगात पत्नी सुस्वभावी व खानदानी घराण्यातील मिळते आणि ती स्वतः कर्तबगार असते.

२० अक्षांशाच्या उत्तरेकडील प्रदेशात बऱ्याच वेळी लग्नाचे राशीपासूनची तिसरी रासच तृतीय भावावर येते असे होत नाही. बिल टिल्डन याच्या कुंडलींबाबत हे अनुभवास आलेच आहे.

म्हणून ही गोष्ट लक्षात ठेवून भावेशत्वाचा व भावस्थ राशीतील मंगळाचा विचार करावा. पुढे देत असलेली व्हॉन पापेन याची कुंडली कुंभ लग्नाची आहे. तेथेही या गोष्टीची दखल घ्यावीच लागेल.


१९ अक्षांशाच्या एका कुंडलीत कुंभ लग्न २४ अंशावर उदित आहे पण अष्टम भाव तुळेच्या १ अंशात आहे आणि तेथेच मंगळ-शनी यांची युती आहे. जातकाच्या धाकट्या भावाचा मृत्यू विमान अपघातात झाला. तो वैमानिकच होता. स्वतः जातक न्यायखात्यात उच्च पदावर जाऊन निवृत्त झालेला  आहे.

## कुंडली : श्री. फ्रान्स व्हॉन पापेन

जन्म - बुधवार दि. २९ ऑक्टोबर, १८७९ रोजी वेर्ल वेस्टफालिया येथे दुपारी ३ वाजता.

अक्षांश - ५१° उत्तर ३३', रेखांश - ७° पूर्व ५३'

अयनांश - २२° १०' ४९", सांपातिक समय - १७ ता. ३० मि. ३० सेकंद.




जर्मन मुत्सद्दी, राजदूत व सेनानी, चॅन्सेलर होण्यासाठी याने हिटलरला मदत केली.

जन्म : जमीनदार घराण्यात. १९२१-२२ जर्मन संसदेत डेप्युटी. १९३२ चॅन्सेलर, १९३३ व्हाइस चॅन्सेलर (हिटलर चॅन्सेलर झाल्यावर) १९३४-४४ हिटलरचा राजदूत म्हणून काम केले.

दशमेश गुरु त्रिकोण योग रवी. हा मोठा योग. गुरु प्रतियोग हर्षल. येथे भाग्येश मंगळ आहे व तो तृतीय भावमध्यावर प्लूटोसह आहे. मंगळ व शुक्र यांचा पूर्ण त्रिकोण योग आहे. मंगळाची नवमावर, दशमावर पूर्ण दृष्टी आहे. तृतीयेश शुक्र कन्येत पण बुध तुळेत आहे. हा अन्योन्य योग आहे. त्यामुळे तृतीयेशही बलवान ठरतो.

मंगळ येथे मकर नवांशी आहे. नवांश लग्न मेष आहे व मंगळ नवांशात मकरेत आहे. म्हणजे लग्नेश दशमात उच्च. त्यामुळे या जातकाने उच्च पदावर काम केले आहे.

(२) **वृषभेचा मंगळ** : तृतीय स्थानामध्ये जर दोन हा अंक असेल व तेथे मंगळ असेल तर त्याला 'वृषभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे आहे -

मंगळ नवमेश व धनेश असतो आणि तृतीयेत वृषभ राशीत येतो. वृषभ ही संपत्तिदर्शक रास आहे. तेथे मंगळ व शुक्र असता आर्थिक स्थिती उत्तम असते. वारसारूपाने संपत्तीचा लाभ होतो. बहिणीपासून फायदा होतो व आर्थिक साहाय्यही मिळते. अन्यथा आर्थिक स्थिती साधारण असते. शिवणकला वा तत्सम हस्तकौशल्याची कामे, वॉल हँगिंग वगैरे हातमागावरील कलाकुसर, कशिदा, प्रिंटिंग वगैरे कामापासून अर्थप्राप्ती होते.

पंचमेश चंद्र व दशमेश गुरु यांचा मंगळाशी शुभयोग असता आयुष्य उत्तम जाते. संपत्ती लाभ व संतती लाभ चांगला होतो. पण त्यांचे अशुभ योग असता आयुष्य कष्टी होते.

शनी लाभेश असतो पण तो व्ययेशही असतो. पण त्याचे साहचर्य शुभ ठरत नाही. त्रिकोण योग असले तरच ठीक असते. शनी-मंगळ तृतीयेत एकत्र असता भावंडांना अशुभ ठरतो, चतुर्थाचे व्ययात ही युती असता मातृसुखावर परिणाम होतो. आर्थिक स्थिती बेताची राहते. ओढगस्त होते.

कृतिकेचे तीन चरण, रोहिणी पूर्ण व मृग पहिले दोन चरण एवढी व्याप्ती वृषभेची आहे. कृत्तिका नक्षत्रच चांगले नाही. ते घातकी आहे. अपघात, शस्त्रक्रिया, जखमा, मोठे आजार दर्शविले जातात. जातक धाडसी व पराक्रमी असतो. सैन्यदल वा सर्जन यांना या नक्षत्रातील मंगळ चांगला ठरेल. विशेषतः मकर नवांशांत मंगळ असता. रोहिणी नक्षत्रांतील मेष व वृषभ नवांशी मंगळाची बरी फले मिळतील. तिसरे चरण मिथुन नवांश व चौथे कर्क नवांश ही दोन्ही चरणे मंगळास अनुकूल नाहीत. मृग नक्षत्र मंगळाचेच आहे. तेथील सिंह नवांशातील मंगळ चांगला ठरेल.

शनीमुळे दैव प्रतिकूल ठरते. जातक रागीट व तुसडा होतो. गुरु-बुधाशी मंगळ शुभ असता जातकाचे वैवाहिक जीवन सुखाचे जाते व संतती चांगली होते.

भाग्येश मंगळाची षष्ठावर दृष्टी येते. त्यामुळे जातकास काही काळ नोकरी करावी लागते. दशमावर धनु ही द्विस्वभाव रास असल्याने व्यवसायात बदल होत राहतात.

येथील मंगळ हस्ताक्षर चांगले देत नाही तसेच आवाज मोठा असतो. जातक भांडखोर व रागीट असतो.

## कुंडली : श्री. ल. वा. मोहोळकर


जन्म - मंगळवार दि. १२ ऑगस्ट, १९१३ रोजी सोलापूर येथे रात्री ९ वा. ३० मि. प्र. वेळ.

अक्षांश - १७° उत्तर ४०',

रेखांश - ७५° पूर्व ५४'

अयनांश - २२° ३९' ५",

सांपातिक समय - १८ ता. २५ मि. ४५ से.




शिक्षण : B. Sc., L.L. B. Advocate. वडीलही वकील होते. एक मोठा भाऊ. आई त्यांच्या वयाच्या ५/६ व्या वर्षी वारली. सापत्न माता व सापत्न भाऊ २, बहिणी २. विवाह १९३७. संतती तीन पुत्र.

१९३९, १९४२, १९४५. तिघेही हुशार. पहिला डिप्लोमा इंजिनियर, दुसरा डॉक्टर, तिसरा चार्टर्ड अकौंटंट.

जातकाने प्रथम वालचंदनगरच्या साखर कारखान्यात नोकरी १९४४ पर्यंत पुढे वकिली. १९४७ साली थोरल्या भावाचा अकस्मात मृत्यू. १९६४ साली विधी महाविद्यालयात अर्धवेळ प्राध्यापक. १९६६ साली प्राचार्य. १९७९ साली प्राचार्य पदावरून निवृत्त.

आवाज फार मोठा होता. भांडखोर वाटावयाचे, पण तसे नव्हते. मंगळ-शनी युती. त्यामुळे थोरला भाऊ लवकर मृत. शनी एकादशेश म्हणून व मंगळाची कारक गुरुवर दृष्टी. यामुळे थोरला भाऊ अल्पायुषी.

मंगळ-शनी चतुर्थाच्या व्ययात, चंद्र मूळ नक्षत्रात मंगळाच्या दृष्टीत, चतुर्थेश बुध प्रतियोग हर्षल व शनीच्या दृष्टीत. यामुळे मातृसुख अल्प व सापत्न माता, सापत्न भाऊ-बहिणी.

चतुर्थात शुक्र गुरुचे दृष्टीत, चतुर्थेश पंचमात. यामुळे विद्या B. Sc., L.L. B., Advocate मंगळ-शनी-बुध.

सप्तमेश पंचमात, चंद्राचे सप्तमात शुक्र गुरु दृष्ट. अनुरूप पत्नी.

मंगळाची व गुरुची षष्ठावर दृष्टी. शिवाय चंद्राचे षष्ठांत शनी-मंगळ यामुळे सुरुवातीस व नंतरही नोकरी. दशमात गुरु व पंचमेश चंद्र यामुळे अध्यापन क्षेत्र. दशमेश दशमात भाग्येश मंगळाच्या दृष्टीत. यामुळे उशिरा का होईना प्राचार्य पद मिळाले. प्राचार्य कारकीर्द कडक शिस्तीची होती व ती गाजली.

पूजनीय गुळवणी महाराजांचा सहवास. त्यांच्याबरोबर यात्रा-प्रवास. धार्मिक वृत्ती-गुरु दशमात पंचमेश चंद्र (पंचमावर उपासना पाहिली जाते.) यांची युती. नियमित साधना होत असे.

बरेच ग्रह क्षितिजाखाली. त्यामुळे भाग्योदय उशिरा.

सन १९८७ मार्चमध्ये जठराचा कॅन्सर झाल्याचे निदर्शनास आले. एप्रिलमध्ये शस्त्रक्रिया झाली. पण १९८८ जूनमध्ये निधन.

पत्नीचे निधन मार्च १९८८ मध्ये कॅन्सरने. त्या साध्वीने कॅन्सर व मृत्यू ओढवून घेतला. पतीच्या आधी मृत्यू हा तिच्या मनाने हट्ट घेतला व तो पुरा झाला.

**(३) मिथुनेचा मंगळ :** तृतीय स्थानात जर तीन हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मिथुनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तृतीयेवर मिथुन रास येते. मंगळ शत्रुक्षेत्री येतो हे जरी खरे असले तरी तो तृतीय भावाचा कारक असतो आणि लग्नेश तृतीयेत असता जातक धाडसी, बुद्धिमान, नशीबवान असतो. तो आदरणीय असतो व सुखीही असतो. या मंगळावर शुभ ग्रहांची दृष्टी असता जातकाच्या उन्नतीस भावंडांचा हातभार लागतो. जातकास गणित विषयात गती असते. हस्ताक्षर मोठे व फराटे असलेले असते. खेळ, कसरती, व्यायाम यांचा शौक असतो. सॅन्डो याने व्यायाम करून शरीर कमावले, स्वतःची व्यायामपद्धती रूढ केली. लग्नेश तृतीयेत वर्गोत्तम त्याचा लाभयोग विक्रमवीर रुद्र (प्लूटो) शी आहे. तो लग्नबिंदूजवळ आहे तसेच रवी-वरुण (नेपच्यून) युती, गुरु-शुक्र युती लाभात आहे. लग्नेश मिथुनेत असल्याने लेखक व शिक्षक. कुंडली पुढे दिली आहे.

मंगळ लग्नेश तसा अष्टमेशही असतो. त्यामुळे तृतीय स्थानदर्शक शरीरावयवासंबंधी विकार-कर्णविकार, बुधही दूषित असता भावंडांबरोबर कलह यामुळे जातक दुःखी होतो.

मिथुनेतील मंगळामुळे जातक तेजस्वी, धाडसी असतो. त्याची सहनशक्ती चांगली असते. तो बुद्धिमान असतो. ललितकला, काव्य यामध्ये गती असते. जातक पराक्रमी व सद्‌गुणी असतो. अनेक कामगिऱ्या यशस्वी तऱ्हेने पार पाडतो. बुध तेथे असता या गोष्टी घडतात. असा जातक वक्तृत्वावर व लेखनावर पैसे मिळवितो आणि व्यवसायासाठी त्यास प्रवास करावे लागतात. मंगळाची षष्ठावर दृष्टी येते व शत्रूंचे जातकासमोर काही चालत नाही. सर्व प्रकारच्या स्पर्धांत त्यास यश मिळते. मिथुन नवांशांत मंगळ वर्गोत्तम असतो.

शनी तृतीयेत असता व शनी-मंगळ युतीत असता भावंडे विशेषतः मोठा भाऊ लवकर मृत्यू पावतो. शनी लाभेश असतो म्हणून मोठ्या भावाचा मृत्यू. शिवाय मोठ्या भावाचा कारक ग्रह गुरुही बिघडावा लागतो. हा शनी पित्यासही अनिष्ट असतो.

गुरूची मंगळावर दृष्टी असता जातकाच्या कर्तबगारीस दैवाचीही साथ मिळते. मंगळ धनु वा मेष नवांशात असता याचा उत्तम फायदा मिळतो.

तूळ नवांशांतील मंगळाचा शुक्राशी शुभयोग असता वैवाहिक जीवनात जातक सुखी होतो.


रवी मंगळाबरोबर असता सरकारी खात्यात अधिकारावर येतो. लग्नेश पंचमेश योग पराक्रम स्थानात उत्तम ठरतो. चंद्राचा सहयोग मातृसुखास चांगला नाही. परंतु गुरु व शुक्र मंगळाबरोबर असता राजयोग होत नाही वा अन्य शुभयोगही होत नाहीत. इति 'भावार्थ रत्नाकर' मेष लग्न विचार. मंगळाबरोबर राहू असता जातक महापराक्रमी असतो.

### कुंडली : युजेन सॅन्डो

जन्म - मंगळवार दि. २ एप्रिल, १८६७ रोजी कोनिग्जबर्ग येथे सकाळी ७ वा.

अक्षांश - ५०° उत्तर ४' व रेखांश - १०° पूर्व ३३'.

अयनांश - २२° ०' ११", सांपातिक समय - १९ ता. ४० मि. २३ से.




जर्मन व्यायामपटू, कुस्तीगीर व वजन उचलणे या सर्व ताकदीच्या गोष्टीत प्रवीण. प्रचंड ताकद. अनेक कुस्तीस्पर्धा जिंकल्या व वजन उचलण्यात जगज्जेता. व्यायाम शिक्षक. ताकद व ती कशी मिळवावी या नावाचे पुस्तक लिहिले.

मृत्यू : १४ ऑक्टोबर, १९२५.

सॅन्डो याने पद्धतशीर व्यायाम करून शरीर कमावले. स्वतःची व्यायामपद्धती रूढ केली.

लग्नेश तृतीयेत पण तृतीयेश बुध व्ययात मीन राशीत नीच असा वक्री आहे. बुध-प्रजापती (हर्षल) यांच्यात केंद्रयोग आहे. भावंडाकरिता पैशाचा व्यय होतो. भावंडांशी कलह व त्रास होतो. चंद्र-प्रजापती त्रिकोण योग आहे. तसेच शुक्र-प्रजापती त्रिकोण योग आहे. गुरुची हर्षलवर दृष्टी आहे. गुरु मंगळामध्ये १४४ अंशाचा शुभयोग आहे. मंगळाची षष्ठस्थानावर दृष्टी आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या स्पर्धांत त्यास यश मिळाले आहे. मंगळ या ठिकाणी मिथुन नवांशात म्हणजे वर्गोत्तम आहे. जगज्जेते पद मिळविले होते.

भाग्येश गुरु व सप्तमेश शुक्र यांची युती आहे. त्याचे वैवाहिक जीवन सुखी होते. सॅन्डो मध्यायू ठरला. ५९ वे वर्ष (मिथुन-५-मंगळ ९=५९) रवी युती वरुण (नेपच्यून) असून दोघेही मंगळाशी केंद्रयोगात आहेत.

**(४) कर्केचा मंगळ :** तृतीय स्थानात जर चार हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कर्केचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तृतीयात कर्क रास येते. मंगळ व्ययेश व सप्तमेश असतो आणि तृतीय कर्केत नीच राशीत येतो. त्यामुळे सप्तमस्थान पूर्णपणे बिघडते. पत्नी आजारी असते. विवाहसुख फारसे मिळत नाही. जातकाचे मनोधैर्य ढासळते. भाऊ मृत्युमुखी पडतात पण बहिणी असतात. स्थावरसंबंधी कटकटी, खटले यांना तोंड द्यावे लागते. घशाचे व थायरॉईड ग्रंथींचे विकार होतात.

मंगळाचा बुध-शुक्राशी संबंध असता जातकाची पत्नी स्वभावाने चांगली असते. वैवाहिक सुख खंडित होत नाही. चंद्र मंगळाबरोबर असता अगर चंद्र लग्नी (वृषभेत) असता अशुभ परिणाम दिसणार नाहीत. वृषभ लग्नास एकटा शनीसुद्धा राजयोगकारक असल्याने पुष्य नक्षत्रातील मंगळ शनीच्या शुभयोगात असता विवाह सुखी व स्थिर असतो. तसेच जातक आपल्या क्षेत्रात प्रसिद्ध होतो.

गुरु अष्टमेश असल्याने वृषभ लग्नास शुभ नसतो. पण गुरु मंगळाबरोबर तृतीयेत असता गुरु उच्च राशीस असतो आणि मंगळाचे नीचत्व नाहीसे होते व मंगळ अशुभ फले देत नाही. बुधाच्या आश्लेषा नक्षत्रातील मंगळ संतती व संपत्तीस विघातक ठरत नाही पण मकर (२०° ते २३° २०') नवांशातील मंगळ जास्त शुभदायी ठरतो.


तृतीयेतील कर्केचा मंगळ प्रवासात त्रासदायक ठरतो. त्याचा प्रवास सुखकर होत नाही. तसेच जातक चुकीच्या शब्दयोजनामुळे आणि पत्रव्यवहार याने अडचणीत येतो.

**कुंडली : श्रीमती**

जन्म - शुक्रवार २ ऑक्टोबर, १९६४ रोजी रात्रौ ९.३०

अक्षांश -१८° उ. ३०, रेखांश - ७३° ५४'

अयनांश - २३° २१' ३६", सांपातिक समय - २१ ता. ४५ मि. १६ सेकंद.



सप्तमेश मंगळ तृतीयेत कर्केत नीच राशीत. त्याचे व्ययात राहू, मंगळ ४५° राहू.

सप्तमावर शनीची दृष्टी आणि शुक्र प्रतियोग शनी.

पतिकारक रवीचे पुढे नेपच्यून व व्ययात हर्षल, पापमध्यस्थ.

लग्नेश शुक्र चतुर्थात योगकारक शनीच्या दृष्टीत. पंचमेश बुध त्रिकोण गुरु यामुळे उत्तम शिक्षण व चांगली बुद्धिमत्ता.

तृतीयस्थ मंगळ नीच राशीत आहे. त्याच्याशी शुभयोगापेक्षा अशुभ योग अधिक आहेत. मंगळ राहू ४५° चा अर्ध केंद्रयोग, मंगळ-नेपच्यून केंद्रयोग. मंगळ सप्तमेश-असल्याने नेपच्यून व राहूच्या अशुभ योगामुळे विचित्र प्रकारच्या लैंगिक कल्पना. हा नेपच्यूनचा गुणधर्म. त्यातच चंद्र-शनी प्रतियोग. यामुळे मानसिक असंतुलन निर्माण झाले. विकृत कल्पनेने पछाडले जाते. त्यामुळे मनोरुग्ण होऊन काही काळ हॉस्पिटलमध्ये उपचार. मंगळ व्ययेशही आहे.

**(५) सिंहेचा मंगळ :** तृतीय स्थानात जर पाच हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'सिंहेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ लाभेश व षष्ठेश असतो आणि तो तृतीयेत सिंह राशीत मित्रक्षेत्री येतो. असा जातक धाडसी, कार्यक्षम आणि महत्त्वाकांक्षी असतो. तो स्वभावाने उग्र, तापट व हट्टी असतो. जीवनात यशप्राप्तीसाठी व ध्येयसिद्धीसाठी सदैव धडपड, परिश्रम करीत ईप्सिताचा पाठपुरावा करीत असतो व ध्येय गाठतो.

मघा नक्षत्रातील मंगळ मोठा अंमलदार, लढाऊ, निर्दयी असून अमल करडा, मोठा मानी, राजा किंवा राजासारखा राहणारा अशी फले नवांश देतात. त्याचा प्रकर्ष पहिल्या म्हणजे मेष नवांशांत दिसतो. येथील मंगळाची नवमावर, दशमावर व षष्ठावर पूर्णपणे दृष्टी येते आणि म्हणूनच नोकरी, व्यवसायावर तृतीयस्थ मंगळाचा प्रभाव पडत असतो. असा जातक शासकीय व व्यवस्थापन क्षेत्रात काम करतो. तसेच क्रीडाक्षेत्रातही चमकतो. दशमासंबंधीचे शुभाशुभ फल मंगळ देऊ शकतो.

तमिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री जयललिता यांची कुंडली याची पुरेपूर साक्ष देते.

## कुंडली : श्रीमती जयललिता


जन्म - मंगळवार दि. २४ फेब्रुवारी, १९४८ रोजी मद्रास येथे दुपारी २ वा. ३४ मि. प्र. वे.

अक्षांश - १३° उत्तर ५,

रेखांश - ८०° पूर्व १८.

अयनांश - २३° ७' ४६",

सांपातिक समय - ० ता. ३७ मि. ५० से.




एकेकाळची नामवंत सिनेतारका. मद्रासचे मुख्यमंत्री एम. जी. आर. यांच्या मृत्यूनंतर तमिळनाडूच्या मुख्यमंत्री सन १९९१ मध्ये. पण १९९६ च्या निवडणुकीत पराभूत. आपल्या कारकिर्दीत अमाप संपत्ती गोळा केली व जनतेचे पैसे उधळले. १९९८ साली भारतीय जनता पक्षाच्या मदतीने बऱ्याच लोकसभेच्या जागा जिंकल्या. त्याचा फायदा घेऊन वाजपेयींवर त्याच्यावरचे खटले काढून घेण्याबद्दल दबाव तंत्र अवलंबिले आणि शेवटी वाजपेयी सरकार काँग्रेसच्या मदतीने पाडले. पण १९९९ च्या निवडणुकीत त्यांना म्हणावे तसे यश प्राप्त झाले नाही. दशमात शुक्र मीनेत उच्चांशाचे निकट त्याचा शनीशी (शनी भाग्येश) त्रिकोण योग. तसेच शुक्र-नेपच्यून प्रतियोग. यामुळे अभिनय कला व सिनेमामध्ये यश मिळविले. लग्नेश बुध भाग्यात तृतीयेश रवीबरोबर व गुरुच्या लाभयोगात आहे.

चंद्र व मंगळ तृतीयेत मघा नक्षत्रात, रवी-बुधाचे दृष्टीत आहे. मंगळाची दशमावर, लग्नेशावर व राजकारणी रवीवर पूर्ण दृष्टी. त्यामुळे राजकारणात प्रवेश व मुख्यमंत्री पद मिळाले व त्यामध्ये हुकूमशाही गाजवली. राणीसारखी सत्ता, मान उपभोगला व सत्तेच्या जोरावर जनतेचा पैसा मिळविला व उधळला.

चंद्र धनेश, मंगळ लाभेश यांच्या युतीमुळे लक्ष्मीयोग झाला आहे. परंतु वाममार्गाने जमविलेला पैसा त्यामुळे अनेक खटल्यांना तोंड द्यावे लागत आहे.

चंद्र-मंगळ मघा नक्षत्रात असून मंगळ मेष नवांशी आहे व त्याची प्रथम दिलेली फले जयललितांच्या कुंडलीत अनुभवास आली आहेत. मघा नक्षत्रातील स्व-नवांशीचा मंगळ किती जबरदस्त काम करतो.

सिंहेच्या कर्क नवांशात मंगळाचे शुभ फल मिळत नाही. सिंह नवांशात मंगळ वर्गोत्तम असतो. हा मंगळ पोलीस खाते, सैन्यदले, शासकीय या व्यवस्थापकीय खात्यांत अधिकार पदावर नेतो. कन्या नवांशी मंगळ उद्धट, अहंमान्य व टीकाखोर असतो. तूळ नवांशीचा मंगळ कलाभिरुचीसंपन्न पण व्यसनाधीन असतो. करमणुकीतच विशेष रस दर्शवितो. मंगळ

लाभेश व षष्ठेश असल्याने अशा व्यक्ती मित्रमंडळ जमवून क्लब, पार्ट्या, नाटक, सिनेमा यातच जास्त रममाण होतात. वृश्चिक नवांशातील मंगळ औषधी विद्या, औषधे तयार करणे, फार्म्यास्युटिकल कंपन्या या व्यवसायात जातो.

**(६) कन्येचा मंगळ :** तृतीय स्थानामध्ये जेव्हा सहा हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'कन्येचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ पंचमेश व दशमेश असून तो तृतीयेत कन्या या शत्रुराशीत येतो. कन्या राशीत उत्तराचे तीन चरण, हस्ताचे चार चरण व चित्राचे दोन चरण येतात. दशमेश तृतीयेत असता जातकास उद्योग-व्यवसायानिमित्त प्रवास करावे लागतात. व्यापार-उद्योगात मोठे यश संपादन होते. तेथे मंगळाचा बुधाशी सहयोग. शुभयोग होत असता जातक उत्तम लेखक, समीक्षक, टीकाकार होतो. जातकाचे भाऊ सुयश संपादन करतात. जातक व भाऊ यांच्या सहकार्याने जातक जनतेसमोर येतो व मान्यता पावतो. परंतु बुध जर दूषित असेल अगर त्याचा मंगळाशी कुयोग होत असता जातकाची उन्नती फार हळूहळू होते आणि त्या वाटचालीत त्यास अनेक अडथळे पार करावे लागतात. शिवाय भावंडाशी शत्रुत्व होते आणि जातकाची अवनती होण्याची शक्यता असते.

मंगळ पंचमेशही असतो व पंचमाचे लाभात येत असल्याने संततीसुख चांगले मिळते. मंगळ पापग्रहाने युक्त वा दृष्ट असता भावंडांचे संबंध गैरसमजाने बिघडतात. संतती अल्पायुषी ठरते. स्त्रियांच्या कुंडलीत पंचमेश मंगळ शनीने बिघडलेला असता पहिल्या संततीच्या बाबतीत गर्भपात अगर अकाली प्रसूती व मूल लगेच जाणे असे प्रकार घडतात. पण द्वितीय संततीच्या बाबतीत हा दोष येत नाही.

सर्वसाधारणपणे जातक आपल्या व्यवसायात भरीव यश संपादन करतो. विशेषतः व्यापार व कारखाने यात प्रगती होते.

बऱ्याच क्रीडापटूंच्या कुंडल्यांत कर्क लग्न असता मंगळ उत्तम कामगिरी बजावतो.

मंगळ कन्येचा मकर व कुंभ नवांशी असता जातक रजोगुणी, अहंकारी, आत्मकेंद्रित व लोभी असतो. मीन नवांशी अहंमान्य, दांभिक, टीकाखोर व तुसडा असतो. हस्तनक्षत्राच्या प्रथम चरणात मंगळ असता जातक बुद्धिमान, कलाप्रेमी असतो. गणित, स्थापत्यशास्त्र अगर यंत्रशास्त्राच्या अभ्यासाकडे वळतो. दुसऱ्या चरणात कामी, विलासी, स्वार्थी पण कलानिपुण असतो आणि गणित, संख्याशास्त्र, भाषाशास्त्र यात उत्तम असतो. मिथुन नवांशी कुशाग्र बुद्धिमत्ता, विश्लेषणात्मक विचारधारा आणि अध्यापनाची हातोटी असते. संशोधक व चिकित्सक प्रवृत्ती, बौद्धिक खेळाची आवड असते. मंगळ दूषित असता गुप्त शत्रुत्व, मानसिक ताणतणाव व आजार उद्‌भवतात. कर्क नवांशी कलहप्रिय, शीघ्रकोपी व आडमुठा असतो. जातकाच्या स्वतःच्या वागण्याने शत्रुत्व निर्माण होते. भाऊबंदकी, मनोविकार व जलभय असते. सिंह नवांशात मंगळ, शनी, रवी वा प्रजापती (हर्षल) यांच्या कुयोगात असता संधिवात, हृदयरोग उद्‌भवतात. नोकरीत विरोधामुळे नुकसान व शत्रुपीडा असते.

कन्या नवांशात मंगळ वर्गोत्तम असतो. आक्रमक व्यक्तिमत्त्व, वाक्पटुत्व, सडेतोड भाषा, अतिचिकित्सक व संशयी असतो. वकिली व्यवसायात फौजदारी क्षेत्राशी संबंध येतो. शुभग्रहाच्या उत्तम योगात असता साहित्य, काव्य कला इत्यादींच्या अभ्यासास उत्तम असतो. द्वादश स्थानांपैकी खेळासाठी पंचम स्थान व वैयक्तिक पराक्रमासाठी तृतीय स्थान महत्त्वाचे असते. तेव्हा पंचम व तृतीय स्थानांचे संबंध लग्न व दशमाशी येतात.

कर्क रास व चंद्र हे लोकप्रियतेसाठी उत्तम असतात. कीर्तीचे वलय असते. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे कर्क लग्न, लग्नी चंद्र तसेच लोकमान्य टिळक यांचेही कर्क लग्न व लग्नेश भाग्यात गुरुबरोबर आहेत. हे दोन्ही नेते लोकप्रिय होतेच. पण त्यांच्याभोवती कीर्तीचे वलयसुद्धा होते. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे कुंडलीत मंगळ कन्येत आहे. तो लग्नराशीपासून तृतीय राशीत आहे. पण भावचलितात तो तृतीय भाव मध्याजवळ नाही.


पुढील कुंडली एका क्रीडापटूची आहे.

### कुंडली : श्री. प्रेमजीत लाल

जन्म - शनिवार दि. १९/२० ऑक्टोबर, १९४० रोजी कलकत्ता येथे रात्रौ १२ वा. २५ मि. स्था. वेळ.

अक्षांश - २२° उ. ३३', रेखांश - ८८° पू. २४'

अयनांश - २३° १' ५६", सांपातिक समय - २ ता. १७ मि. २० सेकंद.




गुरु, शनी दोघे वक्री आहेत. सुप्रसिद्ध भारतीय टेनिसपटू डेव्हिस कप स्पर्धेत जयदीप मुखर्जीबरोबर फायनलपर्यंत पोहोचले. शैलीदार खेळ. ॲवॉर्ड विजेता.

लग्नेश चंद्र उच्च राशीत असून त्याचे त्रिकोण योगात मंगळ वृषभ नवांशात आहे. मंगळ दशमेश तसा पंचमेशही आहे. शिवाय मंगळाबरोबर राहूही आहे. तृतीयेत मंगळ-राहू हे पराक्रमदर्शक आहेत. भाग्येश गुरु दशमात आहे. त्याची शनीशी युती व शुक्राशी त्रिकोण योग आहे.

चंद्र लग्नाचा अधिपती शुक्र, ॲवॉर्ड, बक्षिसे मिळवून देणारा आहे.

(७) **तुळेचा मंगळ** : तृतीय स्थानात सात अंक असेल तर तेथील मंगळाला 'तुळेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ याही लग्नाचा राजयोगकारक असून तो तृतीयेत तूळ या कला-व्यापारदर्शक राशीत येतो. येथे चित्रा नक्षत्राचे ३ रे व ४ थे चरण, स्वाती (राहू) चे ४ थे चरण आणि विशाखाचे १, २, ३ चरण येतात. या नक्षत्रांच्या माध्यमातून मंगळाच्या कर्तृत्वाचा विचार करावा लागेल.

मंगळ भाग्येश असून तृतीयेतून त्याची भाग्यस्थानावर दृष्टी जाते. तसेच दशम स्थानावरही जाते.

जातक भटकणारा असतो. त्यास सतत प्रवास करावा लागतो. तो गोड बोलतो व नशीबवान ठरतो. त्यास नातेवाईक फारसे नसतात. त्यास वाद घालणे, भांडणे करणे आवडते. तो कामी व विषयी असतो.

तृतीय स्थानावरून भावंडांचा विचार होतो. येथे मंगळ शत्रुराशीत असल्याने भावंडांचे सुख लाभत नाही. भावंडे अल्पायू ठरतात अगर त्यांच्याशी पटत नाही. त्यांच्याबरोबर कोर्टकचेऱ्या होतात व ती दुखावतात.

तृतीय स्थानावरून लेखन व प्रवासाचाही विचार होतो. नवमेश तृतीयात असता लेखनामुळे व वक्तृत्वामुळे आणि व्याख्यानाद्वारे जातक प्रसिद्धीस येतो. क्रीडा समीक्षक, कालसमीक्षक होतो. जातक उच्चशिक्षित व विद्वान असून अध्यापनातही रस घेतो. मंगळ पीडित असता अवास्तवी, वात्रट व अश्लील लेखनामुळे अडचणीत येतो. लेखन व भावंडे यामुळे वितुष्ट येते. वडिलार्जित मालमत्ता विकण्याची पाळी येते.

पहिल्या नवांशात वर्गोत्तम, दुसऱ्या व सातव्या नवांशात स्वक्षेत्री आणि चौथ्या नवांशात उच्च नवांशी असतो. यांची शुभ फले मिळतात.

मंगळाबरोबर शुक्र असता, भाग्येश दशमेश यांचा योग होतो. जातकाचे बंधू समृद्ध होतात. जातकाचा कल धार्मिक व तत्त्वज्ञानविषयक लेखनाकडे होतो. तसेच ललितकला, संगीत, वाद्यवादन यात रस घेतो. त्यांचे माध्यमातूनही संपत्तीचा लाभ होतो. त्यानिमित्त परदेश प्रवास होतो.

जातक कापड गिरण्या, कापड व्यापार, तयार कपडे विकणे यांचा अगर शिवणकामाचा व्यवसाय करतो. त्यात नाव कमावतो.

रवी, गुरु यांचे शुभयोग असता राजकारणाकडे वळतो.


## कुंडली : श्री. लिओनिद ब्रेझनेव्ह

जन्म - बुधवार दि. १९ डिसेंबर, १९०६ रोजी सेप्रोदझेरसिन्स्क येथे रात्रौ ९. १८ मि.

अक्षांश - $४८^{\circ}$ उत्तर ३२', रेखांश - $३४^{\circ}$ पूर्व ३०.

अयनांश - $२२^{\circ}$ ३३' १५",

सांपातिक समय - ३ ता. ७ मि. ५० सेकंद.



रशियन राजकारणी. दशमेश मंगळ तृतीयेत तुळेमध्ये त्याचा लग्नेश रवी व हर्षल यांच्याशी लाभयोग. मेटॅलर्जिकल इंजिनियर.

लग्नेश पंचमात हर्षलासह आहे. त्यावर गुरुची दृष्टी आहे. सप्तमात शनी लाभयोग हर्षल व त्रिकोण मंगळ, गुरु यावर मोठा राजकारणी झाला. गुरु पंचमेश तसा भाग्येशही असून लाभस्थानात आहे. १९६४ साली फर्स्ट सेक्रेटरी. १९३५ पासून सार्वजनिक जीवन. १९६६ साली पक्षाचा जनरल सेक्रेटरी. १९७७ पासून राष्ट्राध्यक्ष. त्या वेळी चलित रवी त्रिकोण गुरु चालू होता. तो दोन वर्षे टिकला. मग चलित रवी शनीचे युतीत १९७९ साली आला. त्या वेळी त्याचा मृत्यू झाला. सिंह लग्नास शनी मारकेश आहे. रवी द्वितीयेश आणि शनी सप्तमेश, अष्टमेश यांची युती मारक ठरली.

**(८) वृश्चिकेचा मंगळ :** तृतीय स्थानात आठ हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'वृश्चिकेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ तृतीयेश व अष्टमेश असून तृतीयेत तो वृश्चिकेत स्वगृही येतो. जातक धीट व शूर असतो. त्यास मित्र व नातेवाईक बरेच असतात. तो श्रीमंत, सुखी व समाधानी असतो. मंगळ शुभयुक्त व शुभदृष्ट असता धाकटी भावंडे असतात. परंतु मंगळ अष्टमेश म्हणजे तृतीयेपासून षष्ठेश असल्याने धाकटी भावंडे अल्पायुषी असतात. येथे शनीही भावंडांचा नाशच दर्शवितो.

जातक श्रीमंत व शिक्षित असतो. तो वैद्यकीय वा अभियांत्रिकी पेशाकडे वळतो. तो उत्तम सर्जन होतो.

कर्क नवांशी मंगळ दूषित असता मातृसुखाची हानी करतो. कारण मंगळ अशुभ असून तो चतुर्थाचे व्ययात येतो. भाऊ वा बहिणीपैकी कोणास अपघात व शस्त्रक्रियेचे भय अगर कोणाचा संसार उद्‌ध्वस्त होतो. पण शुभयोगात असता स्थापत्य, गणित वा अन्य भौतिकशास्त्राच्या अभ्यासास शुभ ठरतो अगर तंत्रतज्ज्ञ वा तांत्रिक तज्ज्ञ होतो.

सिंह नवांशी विशेष चिकाटी शरीरबल व मनोधैर्य असते. शुभयोगात यंत्र वा शस्त्रक्रिया विशारद होतो.

कन्या नवांशात अनीतिमान असतो व गुन्हेगारी प्रवृत्ती असते. अशुभ योगात आकस्मिक मृत्यू वा अपघातदर्शक असतो. शुभयोगात उत्तम खेळाडू, कार्यरत असतो व वैद्यकशास्त्र तज्ज्ञ असतो. तूळ नवांशात स्त्रीलोलुप, विलासी होतो. वृश्चिक नवांशी तो वर्गोत्तम असतो आणि वैद्यकशास्त्रज्ञ होतो.


ज्येष्ठा नक्षत्रात तो १६° ४०' ते ३०° पर्यंत म्हणजे धनु, मकर, कुंभ, मीन या नवांशी येतो. त्यास तो मकर नवांशी उत्तम ठरतो. इतरत्र जातक धाडसी, खुनशी व दुष्ट प्रवृत्तीचा आणि शारीरिक व्याधी यांनी पीडलेला असतो. अपघाती मृत्यू येतो.

### कुंडली : श्री. संजीव श्रीधर जहागीरदार

जन्म - गुरुवार दि. १८ फेब्रुवारी, १९७१ रोजी गुलबर्गा येथे रात्रौ ९. २४ मि.

अक्षांश - १७° उत्तर १५', रेखांश - ७६° पूर्व ४५'

अयनांश - २३° २७' २५", सांपातिक समय - ६ ता. ५५ मि.




जातक उच्चशिक्षित पदवीधर. १९९२ B.E. Instrumentation.

नोकऱ्या, १९९३ साली इन्टेल कॉर्पोरेशनमध्ये बंगलोरला ६ महिने. नंतर पुण्यास टाटा हनीवेलमध्ये.

१६ ऑगस्ट, १९९४ M.S., Computer साठी प्रयाण केले.

चतुर्थेश गुरु, तृतीयेत नेपच्यून व चंद्रासह आहे व चतुर्थात शुक्र (भाग्येश व धनेश आहे.) गुरु व शुक्र यांच्यात समक्रांती योग आहे. मंगळ तृतीयेत बुधाच्या लाभयोगात आहे व तो मकर नवांशी आहे.

भाग्येश शुक्र गुरुच्या राशीत, गुरु वृश्चिकेतून नवमावर दृष्टी तसेच मंगळाचीही दृष्टी. यामुळे उच्च शिक्षणासाठी परदेशगमन.

(९) **धनुचा मंगळ :** तृतीय स्थानात नऊ अंक असेल तर तेथील मंगळाला 'धनुचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तृतीयेवर धनु रास येते. मंगळ सप्तमेश व द्वितीयेश असतो व तो धनु राशीत मित्रक्षेत्री येतो. गुरु तृतीयेश व षष्ठेश असतो. धनु राशीत मूळ, पूर्वाषाढा व उत्तराषाढा पहिला चरण असे येतात. पैकी मूळ या घातकी नक्षत्रातील मंगळाचा जातक निधड्या छातीचा असतो. त्यास प्रवासात अपघात, आजार संभवतात. सप्तमेश मंगळ सप्तमाचे त्रिकोणात येतो. जातकास दीर्घायुष्य लाभते. (भावार्थ रत्नाकर - तुला विचार, श्लोक २ रा.) येथे मंगळ अशुभ योगात नसता व बलवान असता जातकाच्या बहिणींना फायदेशीर ठरतो. जातक पराक्रमी, शूर, बुद्धिमान व सुस्वभावी असतो. येथे गुरुची मंगळावर दृष्टी वा सहयोग असता गुरुचे दशेत उत्तम संपत्तीचा लाभ होतो. तसेच गुरुच्या या योगामुळे सप्तम स्थानाला बल मिळते व ते स्थान शुभ होते. भाग्य व संपत्तिदायक स्थानांचे शुभयोग घडतात.

मैदानी खेळापासून धनलाभ होतात व बक्षिसे मिळतात. जातकास त्याच्या मेहुण्यापासून फायदा होतो. मूळ नक्षत्राचा चौथा चरण शुभदायक होत नाही. तो कर्क नवांश असतो.

पूर्वाषाढा या शुक्राच्या नक्षत्रातील मंगळ पती/पत्नी सौख्यास उत्तम असतो. सिंह व वृश्चिक नवांशी मंगळ चांगलाच शुभ फले देणारा ठरतो.

चंद्र दशमेश असतो. त्याचा मंगळाशी शुभयोग, लाभ व त्रिकोण योग प्रतियोग असता उद्योगानिमित्त वा खेळानिमित्त सतत प्रवास करावे लागतात आणि जातक आपल्या कामात यशस्वी होतो व त्यास धनप्राप्तीही होते. जातकाचे व्यवसाय सतत बदलत राहतात. दशमावर मंगळाची आठवी दृष्टी येते.

उत्तराषाढा नक्षत्रात (धनु राशीतील) मंगळ वर्गोत्तमही असतो आणि त्यास उत्तम लाभ व मानसन्मान मिळतात.

राजयोगकारक शनीशी शुभ संबंध असता जातकास स्थावर प्राप्ती, संतती सुख, वैवाहिक सुख आणि अन्य सुखेही मिळतात.

शुक्राचा मंगळाशी शुभयोग असता विवाहसुख चांगले मिळते आणि कुटुंबात सुख व शांतता नांदते. जातकाची पत्नी तापट असते.


## कुंडली : डॉ. प्रमोद लक्ष्मीकांत मोहोळकर

जन्म - गुरुवार दि. १८ फेब्रुवारी, १९४३ रोजी वालचंदनगर येथे रात्रौ ११.४५.

अक्षांश - १८° उत्तर १२'

रेखांश - ७४° ३९' पूर्व

अयनांश - २३° ३' ३६" सां. स. ९ ता. १० मि.




मनोरुग्णांचा वैद्य (Psychiatrist) तृतीयात मंगळ लाभयोग लग्नेश शुक्र व प्रतियोग तृतीयेश गुरु. मंगळ वृश्चिक नवांशी आहे. रवीही वृश्चिक नवांशीच आहे. मंगळ या ठिकाणी कोणत्याही तऱ्हेने अशुभ फलदायी नाही. पत्नी साजेशी, कष्टाळू, प्रेमळ व खेळाची आवड असलेली आहे. जातकाचा वैद्यकीय व्यवसाय आहे. दशमेश चंद्र दशमातच आहे चंद्र हा मनाचा कारक आहे. धनेश मंगळाची दशमावर व दशमेश चंद्रावर दृष्टी आहे. नावलौकिक चांगला मिळविला आहे. आपल्या व्यवसायात तज्ज्ञ असून धनप्राप्ती चांगली आहे. एक मुलगा व एक मुलगी आहे. मुलगाही एम.बी.बी.एस. झाला आहे. जातक शांत स्वभावाचा, मनमिळाऊ व हसतमुख आहे.

**(१०) मकरेचा मंगळ :** तृतीय स्थानात दहा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मकरेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –

मंगळ लग्नेश व षष्ठेश असतो आणि तृतीयेत मकर या त्याच्या उच्च राशीत येतो. जातक निरोगी असतो. त्याचे काम पद्धतशीर होते. तो लवकर थकत नाही. असा मंगळ प्रभावी असतो. जातक आपल्या कर्तबगारीवर उत्तम नावलौकिक मिळवितो. यश व संपत्ती मिळवितो. जातकाजवळ मंगळाचे सारे गुणधर्म प्रकर्षाने असतात. साहस, मनोधैर्य आणि बौद्धिक क्षमता उत्तम असते. तो शत्रूवर विजय मिळवितो. लष्करी पेशाला अगर वैद्यकीय व्यवसायास व विशेषतः सर्जन याला चांगलाच अनुकूल असतो. जातकाचे अक्षर वळणदार असते. भावंडे असतात पण येथेही शनी मंगळाबरोबर असता भावंडे मर्यादित असतात आणि भावंडांपैकी एकाचा मृत्यू लवकर होतो.

येथे मंगळाबरोबर गुरु असता जातक उदार असतो. गुरु धनेश व पंचमेश असल्याने त्याचा लग्नेशाशी सहयोग भाग्यवर्धक ठरतो. गुरु येथे नीच राशीत येत असला तरी मंगळाच्या साहचर्याने नीचभंग होतो. गुरुची सप्तमावर, लाभस्थानावर व नवमावर दृष्टी येते. जातकास श्री, स्त्री, संतती, नावलौकिक, मानसन्मान असे सर्व तऱ्हेचे सौख्य मिळते. जातक देखणा असून त्यास उत्तम व्यक्तिमत्त्व लाभते आणि त्याचा जन्म खानदानी

घराण्यात होतो. नातेवाईक बरेच असतात व त्यांच्याशी संबंध चांगले असतात. संतती गुणवान होते. जातकास दीर्घायुष्य लाभते.

रवी दशमेश असतो. त्याचा मंगळाशी लाभयोग, त्रिकोण योग वा मंगळावरील दृष्टियोग (रवी दशमेश हा भाग्यात येतो) असता जातक आपल्या व्यवसायात उच्च पदास पोहोचतो. तो राजकारणही करतो. शुक्र सप्तमेश असतो. तो सप्तमात असता मंगळाशी त्रिकोण योग होतो. नवमात असता शुक्र-मंगळ परस्पर दृष्टियोग उत्तम ठरतो. विवाहसौख्य चांगले मिळते. व्ययातील शुक्र स्वगृही असतो आणि मंगळाशी त्याचा केंद्रयोगही शुभच ठरतो.

भाग्येश चंद्राची दृष्टी वा त्रिकोण योग, लाभयोग भाग्यवर्धक ठरतो. मातृसुख भरपूर मिळते. लांबचे प्रवास व जलप्रवास होतात आणि जातकास त्यापासून फायदा होतो.

वृश्चिक लग्नास बुध अष्टमेश असतो. त्याचा मंगळाशी दृष्टिसंबंध वा युती चांगली नाही. क्रिकेटसारखे खेळ ज्यामध्ये चिवटपणाची जरूर असते तेथे मंगळ, मकर रास व बुध यांचा संबंध येतो. मोटारीच्या शर्यतीसाठी बुध, मंगळ, प्रजापती (हर्षल) यांचा संबंध येतो.

शनीचा मंगळाबरोबरचा युतियोग चांगला ठरतो. पण हा योग मातृसौख्यास विघातक ठरतो.


### कुंडली : इम्रान खान

जन्म - मंगळवार दि. २५ नोव्हेंबर, १९५२ रोजी लाहोर येथे सकाळी ६ वा. ४५ मि.

अक्षांश - ३१° उत्तर ३७', रेखांश - ७४° पूर्व २६'.

अयनांश - २३° १२' ९", सांपातिक समय - १० वा. ४७ मि. २० से.

पाकिस्तानचा क्रिकेटपटू, अष्टपैलू खेळाडू व कुशल कर्णधार




दशमेश रवी लग्नी त्याचा लग्नेश मंगळाशी लाभयोग. गुरु त्रिकोण दशम व शुक्र-मंगळ व राहू तृतीयात असणे महापराक्रमाचा योग. द्रुतगती गोलंदाज. ३०० हून अधिक बळी घेण्याचा विक्रम केला. आता राजकारणात शिरला आहे. गुरुचा दशमाशी त्रिकोण योग

असल्याने गुरुची व मंगळाची दशमावरील दृष्टी तसेच भाग्येश चंद्राची दशमावर पूर्ण दृष्टी यामुळे त्यास क्रिकेट क्षेत्रात भरघोस यश प्राप्त झाले. तो देखणा असून उत्तम व्यक्तिमत्त्व आहे. पाकिस्तानात तो लोकप्रिय आहे. त्याने स्वतःचा पक्ष स्थापन केला.

जन्मकाली राहू महादशा ३ वर्षे ८ महिने १७ दिवस होती. सध्या बुधाचे महादशेत चंद्राची अंतर्दशा आहे. ती जानेवारी २००० अखेर संपून व मंगळाची अंतर्दशा सुरू झाली. मंगळ, राहू व गुरु यांच्या अंतर्दशा उत्तम जातील. दिनवर्ष पद्धतीनुसार चलित दशमाचा मंगळाशी केंद्रयोग होईल तेव्हा यास संघर्ष करावा लागेल व त्यातून तो यशस्वी होईल.

**(११) कुंभेचा मंगळ :** तृतीय स्थानात अकरा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कुंभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ पंचमेश व व्ययेश असून तृतीयेत कुंभ राशीत शत्रुक्षेत्री येतो. जातक धूर्त असतो व कृपण असतो आणि आपल्या भावंडांची संपत्ती लुबाडण्याचा प्रयत्न करतो. मंगळ पंचमेश होऊन तृतीयेत येतो तरी त्यास राशीबल नसते. शनीचा शुभ संबंध असता भावंडे व संपत्तीचा लाभ होतो पण अशुभ संबंध असता संततीचा नाश होतो भावंडांबरोबरचे संबंध बिघडतात.

कुंभ राशीत धनिष्ठाचे ३ रे व ४ थे चरण, शततारकाचे चारही चरण व पूर्वाभाद्रपदाचे पहिले तीन चरण येतात. घनिष्ठा हे मंगळाचेच नक्षत्र आहे. त्यामध्ये तूळ व वृश्चिक नवांश येतात. शततारका नक्षत्रात धनु, मकर, कुंभ, मीन हे नवांश येतात व पूर्वाभाद्रपद या गुरुचे नक्षत्रांत मेष, वृषभ व मिथुन हे नवांश येतात. त्यांपैकी वृश्चिक, मकर व मेष हे नवांश चांगले फल देतील. त्याखालोखाल धनु व कुंभ नवांशाची फले मिळतील. थोडक्यात, शततारका या राहूच्या नक्षत्रात मंगळ चांगला पराक्रम गाजवितो.

रवी भाग्येश असतो व तो मंगळाबरोबर तृतीयेत असता भाग्येश व पंचमेश (दोन्ही त्रिकोण स्थाने) असा उत्तम योग होतो. या दोन्ही ग्रहांची भाग्यस्थानावर पूर्ण दृष्टी येते. जातकाचा जन्म मोठ्या घराण्यात होतो व मोठ्या घराण्याशी मैत्रीसंबंध येतात आणि विवाहसंबंधही घडतात. स्त्री-जातकाचे कुंडलीत तृतीयेत रवी-मंगळ योग पुत्रसंततीस चांगला ठरतो. पण त्याचेबरोबर शनी असता संततीस मर्यादा पडते. वृश्चिक नवांशातील मंगळाबरोबर शनी, रवी असता प्रथम गर्भाच्या बाबतीत गर्भपात, अपुऱ्या दिवसाची प्रसूती असे योग येतात. पण हे ग्रह सप्तमाचे त्रिकोणात असल्याने दुसऱ्या गर्भधारणेनंतर असे घडत नाही. पुत्र- संतती होते.

पूर्वाभाद्रपदा या गुरुच्या नक्षत्रात मंगळ शुभ फले देईल. खिलाडू वृत्ती, खेळाची आवड आणि उत्तम बुद्धिमत्ता व मानसिक क्षमता असते. शिक्षणही चांगले होते. जीवन सुखावह ऐषारामी होते. शुक्राचा त्रिकोण योग व बुधाची दृष्टी व त्रिकोण योग उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने चांगली फले देणारे ठरतात.

गुरुशी शुभयोग वा दृष्टियोग विद्या, उच्च शिक्षण या दृष्टीने चांगले असतात. पण चंद्र अष्टमेश असल्याने त्याचे योग फलदायी होत नाहीत.


मकर नवांशी तृतीयस्थ मंगळ पराक्रम व नावलौकिक दर्शवितो. पुढील कुंडली याचे प्रत्यंतर देईल.

## कुंडली : सर फ्रँक वॉरेल

जन्म - शुक्रवार दि. १ ऑगस्ट, १९२४ रोजी ब्रजटाऊन येथे दुपारी ३ वा. ३० मि. प्र. वे.

अक्षांश - १३° उ १४' व रेखांश - ५९° पश्चिम ३८'

अयनांश - २२° ४८' ३", सांपातिक समय - १२ ता. १२ मि. ० सेकंद.




वेस्ट इंडीजचा महान क्रिकेटपटू, वेस्ट इंडीजच्या तीन डब्ल्यू, वॉरेल व वॉलकॉट. त्यापैकी वॉरेल हा प्रसिद्ध साहसी, अष्टपैलू खेळाडू. आकर्षक व्यक्तिमत्त्व, शैलीदार फलंदाज. प्रभावी गोलंदाज व चपळ क्षेत्ररक्षक. १९४३ ते १९६२ ही त्याची क्रिकेटची कारकीर्द चांगलीच गाजली. अलौकिक कर्णधार. त्यामुळे त्यास 'सर' हा किताब मिळाला आहे.

पंचमेश मंगळ तृतीयेत शततारका नक्षत्रातील मकर नवांशी आहे. त्याच्यावर बुधाची पूर्ण दृष्टी आहे. शुक्र-मंगळ त्रिकोण आणि तृतीयेश शनी लाभस्थानात उच्च. बुध-मंगळाच्या परस्पर दृष्टियोगावर मकर नवांशातील मंगळ बहरला. उत्तम पराक्रम गाजविला. जगामध्ये नाव कमावले. दशमेश भाग्यात. दशमेश व लाभेश यांचा मंगळाशी शुभयोग. शुक्राची लग्नावर पूर्ण दृष्टी. त्यामुळे 'सर' हा किताब मिळाला.

**(१२) मीनेचा मंगळ** : तृतीय स्थानात बारा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मीनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ चतुर्थेश व लाभेश होऊन तृतीयेत मीन राशीत मित्रक्षेत्री येतो. गुरू तृतीय व व्ययस्थानाचा अधिपती असतो. चतुर्थेश चतुर्थाचे व्ययात असता जातक आई-बापापासून दूर राहतो. पण आई दीर्घायुषी असते. जातकास शिक्षणासाठी अन्य ठिकाणी राहावे लागत असावे अगर तत्सम कारणे असू शकतील. आईचे धाकट्या भावंडावर प्रेम अधिक असते. जातक पराक्रमी असतो व पैसा चांगला कमावतो व त्यास फायदाही होतो. जातकाच्या माध्यमिक शिक्षणात खंड पडतो.

येथे मंगळ गुरुबरोबर असता जातकास स्थावर, वाहने यांचा लाभ होतो. त्यास संततिसुख लाभते.

शुक्र मकर लग्नास राजयोगकारक-दशमेश व पंचमेश असल्याने त्याचा मंगळाशी सहयोग व शुभयोग. अधिकार पद मात्र देणारा असतो. उत्तराभाद्रपदा नक्षत्रात मंगळाचा संबंध लग्नेश व धनेश शनीशी येतो आणि रेवती नक्षत्रात भाग्येश बुधाशी संबंध येतो. त्यातच मंगळाची भाग्यस्थानावर दृष्टी येते. मीन राशीतील या नक्षत्रातील फले मंगळासाठी अशुभ ठरत नाहीत. ते संबंध योगकारकच ठरतील.


मकर लग्नास मंगळ तृतीयेत मीनेतच येईल असे नाही तो मेषेतसुद्धा येतो. अशी स्थिती जास्त उत्तर अक्षांशावर येते. बिल टिल्डन या अजोड टेनिसपटूची कुंडली याची साक्ष देते. भावचलित कुंडली मांडल्याशिवाय याचे खरे स्वरूप लक्षात येत नाही.

## कुंडली : श्री. बिल टिल्डन

जन्म : शुक्रवार दि. १० फेब्रुवारी, १८९३ रोजी जर्मन टाऊन (पेनि) येथे पहाटे

५ वा. ४५ मि. स्था. वेळ. अक्षांश : ४०° उत्तर ०' व रेखांश ७५° पश्चिम १०'

अयनांश : २०° २१' ५१" सां. स. १५ तास ३७ मिनिटे ५० सेकंद.





बिल टिल्डन - महान अमेरिकन टेनिसपटू. बऱ्याच जणांच्या मते सर्वश्रेष्ठ. १९२० ते १९३० या काळामध्ये त्याचे टेनिसवर वर्चस्व होते. अकरा डेव्हिस कप स्पर्धांमध्ये भाग घेतला. २८ पैकी २१ वेळा चषक विजेता. तुफान खेळ. चित्त्याची चपळाई.

टेनिसवर अनेक पुस्तके लिहिली. तृतीय भाव मध्यावरच मंगळ व राहू ही जोडी मेषेत आहे. मंगळ स्वगृही व मूलत्रिकोणी असल्याने जास्त बलवान आहे व त्याच्या धडाडीला, पराक्रमाला, चपळाईला तृतीय हे योग्य स्थान आहे. पराक्रमात भर घालणारा राहूही मंगळाच्या युतीत आहे. लग्नेश शनी व बुध अन्योन्यक्षेत्री आहेत. नवमावर तूळ रास असल्याने शुक्र भाग्येश आहे व तो लग्नीच आहे. तसेच तो चतुर्थेश व पंचमेशही आहे.

# ४

# चतुर्थ भाव

सोबतच्या कुंडलीमध्ये ज्या ठिकाणी चार हा अंक लिहिलेला आहे. त्या स्थानाला कुंडलीतील किंवा पत्रिकेमधील 'चतुर्थ स्थान' असे म्हणतात.




हे स्थान केंद्रयोगातील पण एक स्थान आहे. १, ४, ७, १० ही केंद्रयोगातील स्थाने असल्याने केंद्रयोग भावामध्ये याचा विचार करावा लागतो. या स्थानावरून मातृ-सुख-गृह व विद्या यांचा विचार होतो म्हणजेच मातेसंबंधीचे सुख त्याचप्रमाणे दैनंदिन कामातून मिळणारे सुख किती आहे. काहींना कितीही काबाडकष्ट केले तरी सुखाचा लवलेशही नसतो. स्वतःचे घर होणार की नाही ? स्थावर इस्टेटीबाबत लाभ आहे की नाही ? त्याचप्रमाणे वाहन सौख्याबाबत घर, घराची जागा, घरातील सुख-सोई त्याचप्रमाणे सासरा, पणजोबा या व्यक्तींबद्दल या स्थानावरून विचार होतो. कृष्णमूर्ती पद्धतीमध्ये शिक्षणाच्या बाबतीत या स्थानाचा विचार करून परीक्षेतील यश, उच्च शिक्षण, परदेशातील शिक्षण, शिष्यवृत्ती इत्यादींचा विचार होतो. तसेच स्त्रियांच्या कुंडलीत नवऱ्याची नोकरी किंवा व्यवसाय याबाबत पाहिले जाते.

या स्थानावरून प्रामुख्याने जननी, गृह व विद्या, बांधव व जातकास मिळणारे सुख यांचा विचार होतो. या स्थानास वेश्म, हिबुक, अंबूजल, पातळ याही नावाने संस्कृत ग्रंथकारांनी संबोधले आहे. चतुर्थ, अष्टम व द्वादश या स्थानांचा मोक्ष त्रिकोण होतो. चतुर्थ स्थान मोक्ष त्रिकोणाचे केंद्र आहे. जन्मकाळची परिस्थिती व अंतःकाळची स्थिती यांचाही संबंध या स्थानाशी आहे. विशेषतः उत्तरायुष्याशी संबंध येतो.

शरीरशास्त्रदृष्ट्या बाह्य शरीरातील छातीचा पिंजरा या स्थानातून विचारणीय असतो. या पिंजऱ्यातील फुप्फुसांचा संबंध मिथुन राशीशी येतो व बुध ग्रहांचे कारकत्व फुप्फुसावर आहे. तसेच हृदय सिंह रास व रवी यांच्याशी संबंधित आहे. अंतर्गत अवयवांपैकी जठर हे प्रामुख्याने चतुर्थ स्थान, कर्क रास व चंद्र यांच्याशी संबंधित आहे.

अपघात व आजार याने सुख बिघडते त्या दृष्टीने हे सुखस्थान आहे.

वराहमिहीरांनी मंगळाची भावफले फक्त लग्न, द्वितीय व नवम स्थानासंबंधी स्वतंत्रपणे सांगितली आहेत. इतर भावासंबंधीची फले रवीप्रमाणे घ्यावी असे त्यांनी सुचविले आहे. रवी व मंगळ दोन्ही अग्नितत्त्वाचे व पित्त प्रकृती ग्रह आहेत. म्हणून सामान्यतः त्यांची भावफले सारखीच मानली असावीत. आता रवी चतुर्थ भावात असता काय फले देतो ते पाहू – 'विसुख पीडितमानस चतुर्थे' असे सूत्ररूपाने वराहमिहीरांनी सांगितले आहे. म्हणजे मंगळ (रवी) चतुर्थात असता जातक सुखी नसतो, त्यास अनेक दुःखांना तोंड द्यावे लागते आणि त्याचे मन सदा संत्रस्त असते. त्यास अनेक चिंता लागलेल्या असतात.

रवी अगर मंगळाची चतुर्थ भावासंबंधीची फले सर्वसाधारणपणे सारखीच आहेत. चतुर्थातील रवी वडिलार्जित स्थावर व संपत्तीचा नाश दर्शवितो तर मंगळ दुसऱ्याच्या घरात राहणारा जातक दर्शवितो. रवी वडिलार्जित स्थावर मिळवून देतो पण त्याचा फायदा जातकास मिळत नाही. स्थावर मालमत्ता नाश पावते व त्यास दुसऱ्याच्या घरात राहावे लागते.

थोडक्यात, चतुर्थात रवी काय अगर मंगळ काय दोन्ही निर्बली असतात. स्वतःचे घर नसते, वाहनसुख नसते, नातेवाइकांशी पटत नाही. फटकून वागतो. त्यामुळे जातकास नातेवाइकांची मदत मिळत नाही. त्यास शारीरिक व मानसिक दुःखे भोगावी लागतात, जातक सतत चिंताग्रत व त्रस्त असतो.

निसर्ग कुंडलीत चतुर्थ स्थान कर्क राशीचे असते व चतुर्थात चंद्र व शुक्र हे स्त्री-ग्रह व जल-ग्रह बलवान असतात. त्याचप्रमाणे रवी व मंगळ हे दशमात बलवान असतात. म्हणजेच ते चतुर्थात निर्बली ठरतात. हे दोघे उष्ण प्रकृतीचे ग्रह दिवसा पूर्णबली दशमात असतात व ते चतुर्थात पूर्ण निर्बली ठरतात. दशमातील रवी व मंगळ एकेकटे जातकास मोठा करू शकतात, व्यवसायाची वृद्धी व उन्नती करतात, मानसन्मान मिळवून देतात, राजकीय सेवेत, प्रशासकीय सेवेत, राजकारणात उच्च पद गाठू शकतात. चतुर्थात ते दोघे तेजोहीन असतात. चतुर्थ स्थान मध्यरात्रदर्शक आहे.

तृतीय स्थान मंगळाच्या कार्यकर्तृत्वास पोषक ठरते पण चतुर्थात मंगळाच्या पराक्रमाचा अग्नी विझून जातो. नुसते निखारे व धग उरते.

सारावलीत चतुर्थस्थ मंगळाबद्दल सविस्तर उल्लेख आहे.

जातकास नातेवाईक फारसे नसतात, वाहने नसतात. इतर सुखाची साधनेही उपलब्ध होत नाहीत आणि जातक दुःखी होतो. अतित्रासामुळे तो त्रासिक बनतो, तो दुसऱ्याच्या घरात राहतो व सदा त्रस्त असतो.

काही आचार्यांच्या मते चतुर्थात मंगळ असून अन्य ग्रह चतुर्थात असता त्यांचा प्रभाव पडत नाही. जातकास मित्रापासूनही सुख मिळत नाही. सुखाची वानवाच असते.

स्त्री जातकाच्या बाबतीत ती चोरटी असते. सुखसंपत्तीविहीन असते. दुष्ट स्वभावाची असते आणि कुटुंबीयांपासून अलग होते.

हे असे काळेकुट्ट चित्र चतुर्थस्थ मंगळाबद्दल रंगविले गेले आहे. इतकी परिस्थिती येत नाही. या सर्वांचा अर्थ एवढाच घ्यावयाचा की योगभंग होतो म्हणजे शुभ फले अल्प प्रमाणात मिळतात.

कुंडलीतील समग्र ग्रहांचा पूर्ण विचार करून निर्णय घ्यावा लागतो. चतुर्थातील मंगळ अपघातप्रवण असतो व तेथील पीडित मंगळ म्हातारपण कष्टदायक करतो. जातक शेवटी दुःखीकष्टी होतो व प्राण सोडतो पण पूर्वायुष्यात तसे घडेल असे नाही.

चतुर्थातील मंगळाची सप्तमावर दृष्टी येते. पत्नीस व्याधी असतात, पत्नीसौख्य कमी असते पण जातकास कामेच्छा जबर असते. चतुर्थात मंगळ असून सप्तमात रवी वा राहू असता जातक पशुगामी असतो असे जातकतत्त्वात सांगितले आहे. जातक अनैसर्गिक मैथुनाकडे वळतो अथवा पशुतुल्य मैथुन करतो. चतुर्थात मंगळ, सप्तमात राहू व दशमात शनी असताही असाच योग होतो. आधीच सप्तमात राहूसारखा छायाग्रह अनिष्ट असतो. त्यात शनी व मंगळासारख्या पापग्रहांची दृष्टी पडल्यावर असा योग विचित्र मैथुन दर्शविणारा निश्चितच ठरेल.

चतुर्थात मंगळास स्थानबल मुळीच नसते पण राशिबल, योगबल असता अशुभ फलांची तीव्रता कमी होते व शुभ फलांचाही अनुभव येतो.

लग्नी असलेल्या राशीनुसार चतुर्थस्थ मंगळाची भावफले निरनिराळी होत असतात तसेच मंगळावर असलेल्या अन्य ग्रहांचे दृष्टीनुसार फलात शुभाशुभता होते. हा सर्वसाधारण विचार नजरेसमोर ठेवून निरनिराळ्या लग्नराशीनुसार चतुर्थस्थ मंगळाचा विचार करावा.

चतुर्थातील मंगळाच्या दृष्टीचाही विचार करावा लागेल. मंगळाची सप्तमावर चौथी दृष्टी असते तसेच दशमावर सातवी दृष्टी येते व एकादश स्थानावर आठवी दृष्टी येते.

दशमावरील दृष्टीमुळे व्यवसायात फरक पडतो, व्यवसायात अधिकार पद वा मानहानी, अवनती, भांडणे, वरिष्ठांशी न पटणे वगैरेही गोष्टी घडतात. तेव्हा त्याचा विचार करावाच लागेल. दशमस्थ ग्रहावरील दृष्टियोगाने व्यवसायात बदल काय होतात हेही विचारात घ्यावे लागेल.

एकादश स्थानावरील दृष्टीचा संबंध व्यवसायापासून लाभ, कंपन्या, मंडळे, सोसायट्या यांच्याशी संबंध तसेच मित्रमंडळींकडून सहकार्य वा फसवणूक हाही विचार उद्‌भवतो. मंगळाचे लाभेशाशी कसे संबंध आहेत यावर या गोष्टी अवलंबून असतात.

म्हणून चतुर्थस्थ मंगळाचा विचार इतक्या दृष्टिकोनातून व्हावा लागतो. हाही विचार ठेवून चतुर्थस्थ मंगळाची फले निश्चित करावी.

पुढील राशीनिहाय विवेचन हे फक्त मार्गदर्शक आहे.

## चतुर्थस्थ मंगळाची राशीनिहाय भावफले

**(१) मेषेचा मंगळ :** चतुर्थ स्थानात एक हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'मेषेचा मंगळ' असे म्हणतात त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ चतुर्थेश व लाभेश असून चतुर्थात मेषेत स्वगृही येतो. जातकास उद्योग-व्यवसायातून पैसा मिळतो, स्थावरही असते आणि वाहनसुखही मिळते. जातकाची आई सुविद्य, सुसंस्कृत असून दीर्घायुषी असते पण जातक आईजवळ राहत नाही. आईपासून लांब राहतो.

चतुर्थेश चतुर्थात असल्याने जातकास विद्या चांगली लाभते आणि त्यास अनेक शास्त्रे अवगत होतात. जातकास स्थावरापासून लाभ म्हणजे स्थावर खरेदी-विक्रीपासून खूप फायदा होतो. तो सुखी असतो.

मकर लग्नास बुध भाग्येश व शुक्र दशमेश-पंचमेश असे असतात. हे दोन्ही ग्रह जेव्हा दशमात एकेकटे अगर एकत्र येतात तेव्हा त्यांची मंगळावर दृष्टी येते व मंगळाचीही दृष्टी त्यांच्यावर पडते. दोन केंद्राधिपती अगर केंद्र कोनाधिपती यांचे परस्परसंबंध साधले जातात. त्यामुळे जातकाचे नशीब चांगले फळफळते. उद्योग-व्यवसायात धडाडी व कौशल्य प्राप्त होते आणि जातक जगापुढे येतो. लग्नेश शनीच्या स्थानबल व राशिबल यावर बरेच अवलंबून असते.

दशमात शनी उच्च राशीला येतो आणि शनी-मंगळाचा प्रतियोग साधला जातो. या योगावर जातक पोलीस खात्यात मोठ्या पदावर जातो. शनी द्वितीयेत असता त्याची दृष्टी मंगळावर व लाभस्थानावर येते. संपत्तीच्या दृष्टीने हा योग चांगला ठरतो. शनी सप्तमात असता सप्तम स्थान शनी-मंगळ केंद्रयोगाने बिघडते पण चंद्राचे योगावर बरेच अवलंबून राहते. या योगात मंगळ स्वगृही असल्याने पूर्वायुष्य सुखात जाते. पण वयाचे ५०/५५ नंतर शनीच्या दृष्टीचा प्रभाव जाणवावयास लागतो. उत्तरायुष्यात मानसिक त्रास, शरीरकष्ट, अपघात, हाडे मोडणे अशा घटना घडतात. दुःखच वाट्यास येते.


गुरु मकर लग्नास फारसा शुभ नसतो पण त्याचे व्यय व तृतीय स्थानचे आधिपत्य शुभ ठरते असे उत्तरकालामृतात सांगितले आहे. गुरुची व्ययस्थानातून पण स्वगृहातून चतुर्थावर व चतुर्थस्थ मंगळावर पाचवी दृष्टी येते. ती विद्याप्राप्तीस जशी चांगली तशीच मातृसुख, कौटुंबिक सुख, स्थावर, वाहन या बाबतीत शुभ ठरते.

दशमातून येणारी गुरुची दृष्टी मंगळाच्या अतिरेकीपणास आळा घालणारी व सुख-समृद्धीची ठरते.

### कुंडली : अभिनेत्री शारदा

जन्म - मंगळवार दि. १२ जून, १९४५ रोजी थेनाळी (गुंटूर) येथे रात्री ९.०० वा.

अक्षांश - $१६^{\circ}$ १४' उत्तर, रेखांश - $८०^{\circ}$ ४२' पूर्व.




दाक्षिणात्य लोकप्रिय शारदा नटी. अभिनयप्रवीण. योगकारक शुक्र चतुर्थात मंगळाबरोबर. लग्नेश शनी लाभयोग शुक्र, बुध-हर्षल युती. दशमेश शुक्राची दशमावर पूर्ण दृष्टी.

**(२) वृषभेचा मंगळ :** चतुर्थ स्थानात दोन हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'वृषभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ दशमेश व तृतीयेश असतो व चतुर्थात वृषभेत येतो. दशमेश मंगळाची दशमावर दृष्टी असणे हा उद्योग-व्यवसायातील प्रगतीस शुभ ठरतो. वैद्यकी, शस्त्रचिकित्सक, रसायनशास्त्र, मेटलर्जी-धातुशास्त्र, स्थापत्यशास्त्रातील विविध अंगे यांच्या अभ्यासाला व उद्योगास उत्तम असतो.

जातक सुखी असतो, तो विद्वान व उच्च विद्याविभूषित असतो आणि संपत्ती चांगली मिळवितो. विद्वत्तेमुळे जातक प्रसिद्धीस येतो. स्थावराचा उत्तम लाभ होतो पण मातृसुखास अनिष्ट असतो. मातेशी फटकून वागतो. पटत नाही. या ठिकाणी शुक्राचा सहयोग लाभल्यास जातक पुढारी होईल. राजकारणात पुढे येऊन मोठ्या पदावर जाईल. मंत्रिपद भूषवेल व सैन्यदलात मोठा अधिकारी होईल. त्यास अनेक मानसन्मान प्राप्त होतील.

लग्नेश शनीचा सहयोग मिळाल्यास लग्नेश व दशमेश यांचे उत्तम संबंध प्रस्थापित होतात. अशा योगावर जातक सुखी, प्रसिद्ध व धनवान होतो. त्याचे मित्रमंडळ व परिवार मोठा असतो. जातक गाव, शहर यात मुख्य होतो.

गुरु धनेश व लाभेश असल्याने त्याच्या सहयोगाने वा दृष्टीने संपत्ती लाभ, वाहन सुख व कौटुंबिक सुख लाभते व जातकाची समाजातील प्रतिमा उंचावते. जातक आपल्या कामात निपुण असतो.


बुधाचा सहयोग असता बुद्धिमत्ता कुशाग्र असते व उच्च शिक्षण प्राप्त होते. पण जातकास अल्प संतती असते.

## कुंडली : अशोककुमार

जन्म - शुक्रवार दि. १३ ऑक्टोबर, १९११ रोजी भागलपूर येथे दु. २.५५ प्र. वेळ.

अक्षांश - २५° १५' उत्तर, रेखांश - ८६° ५८' पूर्व.

हिंदी चित्रपटातील अर्धशतकाहून अधिक गाजलेला सव्यसाची नट. चरित्र अभिनेता. हस्तसामुद्रिक, होमिओपॅथी, चित्रकला यांचा अभ्यास.




दशमेश मंगळ चतुर्थ भावमध्यावर तंतोतंत असून त्याचा बुधाशी अंशपूर्ण त्रिकोण योग आहे. भाग्येश व चतुर्थेश शुक्र सप्तमात सिंह या नाट्यकलादर्शक राशीत. लग्नेश शनी व योगकारक शुक्र यांचा त्रिकोण आणि धनेश व लाभेश गुरु भाग्यात. लाभयोग शुक्र व प्रतियोग शनी.

दशमेश मंगळ व बुध मिथुन नवांशी, नवांश कुंडलीत सप्तमात आहेत व शुक्र तुळा नवांशी. मंगळ बुधाचे त्रिकोणात यामुळे हरहुन्नरी, अनेक कला अवगत.

**(३) मिथुनेचा मंगळ** : जेव्हा चतुर्थ स्थानामध्ये तीन हा अंक असतो तेव्हा तेथील मंगळाला 'मिथुनेचा मंगळ' असे म्हणतात त्याचे फल पुढीलप्रमाणे -

चतुर्थावर मिथुन रास येते. मंगळ धनेश व भाग्येश होऊन चतुर्थात बुधाच्या राशीत येतो. येथे मंगळ शुभदायक ठरतो. जातक बुद्धिमान, विद्वान, अष्टपैलू व उच्च विद्याविभूषित असतो. तो पुढील शिक्षणासाठी परदेशातही जातो. त्यास पैसा चांगला मिळतो व नावलौकिकही मिळतो. स्थावर व वाहनसुखही चांगले असते. स्थावर मालमत्ता बरीच मोठी व विविध असते. स्वतःचे बंगले असतात. जातकाची आई श्रीमंत घराण्यातून आलेली असते. तिही बुद्धिमान आणि नशीबवान असते. येथे मंगळ, शुक्र, बुध व गुरु यांच्याशी शुभ संबंधित असता मोटारकार डीलर, इस्टेट एजंट अगर मोठा कमिशन एजंट असतो. आजोळकडील नातेवाइकांपासून फायदा होतो. त्यांची मदत होते.

चंद्राशी शुभसंबंध असता संततिसुख उत्तम लाभते. जातकास मातृसुखही चांगले मिळते. तो सुखी असून श्रीमंत व तेजस्वी असतो.

बुध चतुर्थेश व सप्तमेश असतो. त्याची मंगळावार दशमातून दृष्टी चांगली ठरते. जातक लेखक, प्रकाशक, संपादक, कवी वा गणितज्ञ असतो. तो गोड बोलतो, उच्च विद्याविभूषित असतो. वकील अगर परराष्ट्र वकिलातीत कामे करतो. त्याची पत्नीही त्यास साजेशी व बहुश्रुत असते.


गुरूची दृष्टी हा लग्नेश, दशमेश याचा भाग्येशाशी संबंध दर्शवितो. हा राजयोग आहे. वाक्स्थानाधिप मंगळ व वाक्पति-वाचस्पति गुरु यांचा राजयोग होतो. जातकाचे वक्तृत्व अस्खलित, मुद्देसूद व विचारपूर्ण असते. तो पूर्वपक्ष व उत्तरपक्ष दोन्ही बाजू उत्तम मांडू शकतो. अशी विद्वता त्याजपाशी असते. जातकास राजसन्मान प्राप्त होतात. तो मोठा अधिकारी असतो.

चतुर्थातील मंगळ शारीरिक कष्ट करावयास लागतो. जातक कष्टाळू, दीर्घोद्योगी असतो.

## कुंडली : रुडॉल्फ व्हॅंटिनो

जन्म - रविवार दि. ५/६ मे, १८९५ रोजी कॅस्तेलानेता (इटली) येथे रात्री ३.१५ स्था. वेळ.

अक्षांश - ४०° ३८' उत्तर, रेखांश - १६° ५७' पूर्व.




रूपेरी पडद्यावरील लोकप्रिय रोमॅंटिक नायक १९१८ ते १९२६. एकतिसाव्या वर्षी अचानक मृत्यू. चरित्र भूमिकाही केल्या. लग्नेश व दशमेश गुरू चतुर्थ बिंदूवर. भाग्येश व धनेश मंगळाच्या युतीत आहे. भाग्येश, दशमेश युती चतुर्थात व या दोघांची दशमावर पूर्ण दृष्टी. हीच दुक्कल चंद्राचे दशमात येते. दशमेश गुरू मिथुन या कलादर्शक राशीत मंगळासह आहे. गुरु त्रिकोण शनी (उच्च). शुक्र-नेपच्यून योग अभिनय कलेकडे नेतो. मुळात

अष्टमस्थ हर्षल अचानक मृत्यू दर्शवतो. रवी व बुध यांचा हर्षलशी प्रतियोग आहे व ते चंद्राचे अष्टमात आहेत. ३१ वे वर्षी चलित रवी युती नेपच्यून चलित दशम केंद्र शनी.

**(४) कर्केचा मंगळ :** चतुर्थ स्थानात चार हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कर्केचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

चतुर्थावर कर्क रास येते व लग्नेश मंगळ चतुर्थात नीच राशीत येतो. त्यात स्थानबल व राशिबल नसते. मंगळ नीच राशीत असल्याने सर्व काही बिघडते. मंगळ दुहेरी दोषास्पद असतो. पहिला नीचत्वामुळे आणि दुसरा त्याच्या अष्टमत्वामुळे. या दोन्ही गोष्टी आयुर्मर्यादा कमी करणाऱ्या आहेत. अपघात वा अपमृत्यूचे भय असते.


मंगळाची सप्तमावर दृष्टी असल्याने त्यास न्यायालयीन खटल्यास तोंड द्यावे लागते. पत्नीसुखही बिघडते. द्विभार्या योगाची शक्यता असते. पण नीचत्वाचा भंग झाल्यास म्हणजे शनी लग्नाचे अगर चंद्राचे केंद्रात असता मंगळाचा नवांशाधिपती चर राशीत असेल अगर असा नवांशाधिपती चंद्राचे केंद्रात वा त्रिकोणात असून चर राशीस असता अगर गुरु-मंगळाबरोबर असता अशुभत्व नाहीसे होते व शुभफलेही मिळतात. नीचभंग राजयोग होतो.

मंगळावर शनीची दृष्टी असता जातक जलासंबंधीच्या उद्योगातून पैसा मिळवितो. तो तेजस्वी व खिलाडू वृत्तीचा असतो व मोठा अधिकारी होतो. जातक नौकानयनासंबंधीच्या व्यवसायात कप्तान, चालक असतो व त्यापासून चांगला पैसा मिळवितो. ही शनीची दृष्टी दशमातून (मकरेत शनी) व सप्तमातून (तुळेत उच्च शनी) यातून आलेली असता शुभदायक व लाभदायक ठरते.

## कुंडली : पुरुष जातक

जन्म - सोम/मंगळवार दि. ८/९ मे, १९६१ रोजी पहाटे ४.३० वा.

अयनांश - २३° १८' ५४', सांपातिक समय - १९-३६-१२.



वाडवडिलार्जित मोठी स्थावर, वडील कर्तबगार. जुन्या श्रीमंत घराण्यात जन्म. रवी लग्नी उच्च, शुक्र व्ययात उच्च. शनी स्वगृही, मंगळ व गुरू नीच राशीत पण नीचभंग झाला आहे. पत्नी मोठ्या कुलातील पण सप्तमात नेपच्यून असून तो शनी व मंगळाच्या दृष्टीत आहे. त्यामुळे पती-पत्नीत दुरावा आहे. बुध हर्षल केंद्रयोग ४° अंतरात. जातक अहंकारी व टीकाखोर. हट्टी व उणे उकरून काढणारा.

मंगळ कर्केत नीच असल्याने तो अशुभ फले देतो. हे एका अर्थाने बरोबर ठरते. त्याचा नीचभंग झाला नसेल तर तो अशुभच फले देईल. वरील उदाहरणात मंगळाचा नीचभंग झाला असल्याने बरीचशी शुभ फले मिळाली आहेत.

येथे चंद्र-मंगळाबरोबर असता लग्नेश चतुर्थेश यांची युती चतुर्थातच होत असल्याने तो लक्ष्मीदायक योग ठरतो. त्यात चंद्र शुक्ल पक्षातील वर्धिष्णू असता उत्तमच फले मिळतात परंतु मातृसुख बिघडते.

रवी स्वतःच चतुर्थात सुखदायी नसतो; त्यातच तो मंगळाबरोबर असता अशुभ फलाची तीव्रता वाढते. रवी चतुर्थात येणे मध्यरात्रच असते व रवीला काहीच बल नसते. गुरू भाग्येश असतो व चतुर्थात उच्च राशीत येतो व मंगळाचा नीचभंग होतो. लग्नेश-भाग्येश यांची युती सुखस्थानात होत असता ती विद्या, स्थावर व व्यवसाय या दृष्टीने शुभ फलदायी ठरते.

शनी या ठिकाणी वाईटच ठरतो. शनी-मंगळ युती मातेचा अपघाती वा अघोरी मृत्यू दर्शवतो.

बुध षष्ठेश असल्याने त्याच्या साहचर्याने मंगळ आणखी दूषित होतो व व्याधिग्रस्त होतो. शुक्रही येथे शुभ नाही. बुधाची दृष्टी कौटुंबिक सुख बिघडून टाकणारी ठरते.

चतुर्थस्थ मंगळ अपघातप्रवण असतो.

**(५) सिंहेचा मंगळ :** ज्या वेळी चतुर्थ स्थानात पाच हा अंक असतो तेव्हा तेथील मंगळाला 'सिंहेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ सप्तमेश तसाच व्ययेशही असतो. व्ययेश चतुर्थात असल्याने मातृसुख लवकर हरपते. मन चिंताग्रस्त असते. नातेवाईक शत्रुवत वागतात. जातक जन्मस्थानापासून दूरस्थळी जातो, त्यास उच्च शिक्षण मिळते.

पण मंगळ सप्तमेशही असतो व त्याची सप्तमावर, स्वगृहावर दृष्टी असते. त्यामुळे वैवाहिक जीवन सुखाचे जाते. मंगळ चतुर्थात मित्रक्षेत्री असल्याने असा अनुभव येतो पण मंगळ पापग्रहयुक्त वा पापग्रहदृष्ट असता निराळाही अनुभव येईल व वैवाहिक जीवन त्रासदायक व कटकटीचे ठरते.

या ठिकाणी मंगळाबरोबर बुध-शुक्र असता अथवा त्यांचे शुभयोग असता विवाहबंधन स्थिर राहते. पती व पत्नी आपापल्या व्यवसायात स्थिर व यशस्वी होतात, नाव कमावतात. संततीही चांगली असते.

वृषभ लग्नास एकटा शनी राजयोगकारक असतो. त्यामुळे त्याचा मंगळाशी शुभयोग असता विवाहात स्थैर्य लाभते. उत्तम संपत्ती लाभते व जातक सुखी होतो.

मंगळाबरोबर गुरू असता संतती चांगली सद्‌गुणी व हुशार असते. जोडीदार निरोगी व सुखी लाभतो.

मंगळाबरोबर एकटा शुक्रच असता अगर मंगळावर शुक्राची दृष्टी केंद्र वा प्रतियोग असता विवाहबाह्य संबंध दर्शविले जातात. जातक आपले तारूण्य चांगले टिकवतो.

चतुर्थस्थ मंगळावर (सिंहेतील) रवीची दृष्टी वा शुभयोग असता जातक नम्र स्वभावाचा, मित्रांना मदत करणारा असून मित्रमंडळ चांगले असते. येथे चंद्राची युती वा दृष्टियोग असता मातृसुखात व्यत्यय येतो.

बुधाची मंगळावर दृष्टी असता जातक कलानिपुण असतो पण तो कृपण असतो. बुध-मंगळ प्रतियोग दुष्टबुद्धी देतो.

गुरुची दृष्टी असता विद्वत्ता असतो. स्वभाव मोकळा व स्वच्छ असतो. राजशासनात मोठा अधिकारी असतो.

सप्तमेश मंगळ चतुर्थात राहूने युक्त असता सप्तमेश व सुखस्थान बिघडते. घटस्फोट, निराळे राहणे अथवा जोडीदार अल्पायू ठरणे असे प्रसंग येतात. तसेच अपघाताचाही योग येतो.

रवी व्ययस्थानात मेषेत उच्च राशीस येतो व रवी-मंगळ अन्योन्य क्षेत्र संबंध येतो. हा योग मातेच्या आयुर्मर्यादेच्या दृष्टीने शुभ ठरतो. माता मोठ्या व खानदानी घराण्यातून आलेली असते व ती सर्वांच्या आदरास प्राप्त होते. जातक उच्च विद्याविभूषित असतो व त्याचा अध्यात्माकडे ओढा असतो.

वृषभ लग्नास बुध व गुरु युती वा दृष्टियोग असता धनयोग होतो. परंतु त्याचा मंगळाशी संबंध येत असता युती वा दृष्टियोग यामुळे धनयोग नाहीसा होतो; एवढेच नव्हे तर बुध दशेत जातक कर्जबाजारी होतो. याप्रमाणे भावार्थ रत्नाकरमध्ये मत प्रदर्शित आहे. बुध-गुरु धनेश लाभेश म्हणून उत्तम धनयोग होतो पण व्ययेश मंगळाचा संबंध येताच धनयोग होत नाही.


## कुंडली : स्त्री जातक

जन्म - गुरुवार दि. २२ जून, १९६१ रोजी पहाटे ४ वाजता प्र. वेळ.

अक्षांश - २३° १०' उत्तर, रेखांश - ७९° ५९' पूर्व

अयनांश - २३° १९',

सांपातिक समय - २१-४९-३५.



वडील नामांकित प्राध्यापक व संशोधक. जातक पदवीधर, विवाह २१ मार्च, १९८६. संतती कन्या. सासूचा जाच; त्यामुळे सासर सोडावे लागले. घटस्फोटाचा दावा दाखल केला व १९९२ साली घटस्फोट.

शुक्र व्ययात प्रतियोग नेपच्यून व केंद्रयोग हर्षल (८° फरक), त्रिकोण योग शनी. बुध त्रिकोण नेपच्यून. चंद्र त्रिकोण गुरू. चतुर्थात मंगळ-राहू पूर्ण युती. त्याची शुभग्रहाची दृष्टी वा शुभयोग नाहीत. अंशदृष्ट्या हर्षल युती चतुर्थ भावबिंदू (२° फरक) व हर्षल मंगळ युती ३° फरक. मंगळ हा मागे हर्षल व पुढे राहू असा कर्तरी योगात आहे.

**(६) कन्येचा मंगळ :** चतुर्थ स्थानात सहा हा अंक असतो तेव्हा तेथील मंगळाला 'कन्येचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

चतुर्थावर कन्या रास असल्याने मंगळ तेथे कन्या राशीत येतो. मिथुन लग्नाचा षष्ठेश व लाभेश मंगळ असतो पण तसाच चतुर्थाचा तो तृतीयेश व अष्टमेश असतो. चतुर्थ भावावर माता, स्थावर, वाहन, विद्या यांचा विचार होतो व मंगळ वर लिहिल्याप्रमाणे लग्नाचा व चतुर्थाचा अशुभ स्थानाधिपती असल्याने सर्व कारके बिघडतात.

मंगळामुळे मुख्यतः मातृसुख बिघडते. भूमिकारक मंगळामुळे स्थावर मिळते. पण अशुभ भावाधिपत्यामुळे स्थावराबद्दल तंटे-बखेडे, भांडणे, कोर्टकचेऱ्या वा अन्य तऱ्हेच्या कटकटी उत्पन्न होतात व नुकसानी होते. शिक्षणात अडथळे येतात व ते पूर्ण होत नाहीत.

एकटा मंगळ असता वरील तऱ्हेची अशुभ फले मिळतील पण मंगळाचा बुध, गुरु, शुक्राशी शुभयोग होत असता परिस्थिति सुधारते.

बुध बलवान असून मंगळाशी शुभयोग होत असता शिक्षण चांगले होते. गुरुच्या शुभयोगातही शिक्षण होते आणि वैवाहिक जोडीदार चांगला लाभतो. शुक्राचा शुभयोग असता माध्यमिक शिक्षण सुरळीत पार पडते.

बुध चतुर्थात स्वगृही, मूलत्रिकोणी वा उच्च असतो व त्यामुळे उच्च शिक्षण लाभते. बुध-मंगळ युती फलदायी होते. बुध-मंगळ युती वा प्रतियोग असता जातक उत्कृष्ट समीक्षक, टीकाकार, लेखक, गणितज्ञ होतो. प्रतियोगात बुध नीच राशीत येतो. त्यामुळे त्याचा नीचभंग झाला असल्यास अगर गुरु-शुक्राची मदत मिळाल्यास शिक्षण व व्यवसाय यांच्या दृष्टीने शुभ फले मिळतील. बुधाचे व्यवसाय वा गुरुचे व्यवसाय जसे अध्यापन कार्य, वर्तमानपत्रकार, लेखक वगैरेंपासून लाभ होतात.

गुरुची दृष्टी अष्टम, व्यय व दशम या स्थानातून येते. त्यापैकी गुरु दशमात येऊन मंगळाच्या परस्पर दृष्टीत आल्यास परदेशी वकिलातीत महत्त्वाच्या जागा भूषविल्या जातात. जातकास पत्नी चांगली मिळते. ती सुंदर, हुशार, सद्‌गुणी व सुलक्षणी असते.

शुक्र पंचमेश व व्ययेश असून दशमात उच्च राशीस येतो आणि त्याची मंगळावरील दृष्टी शुभ फलदायी ठरते. शुक्राने दर्शित कलांमध्ये प्रावीण्य मिळते. तसेच स्त्री-सुख व संतती सुखही मिळते.

चंद्राची मंगळावर दृष्टी असता जातक साध्या पहारेकऱ्यापासून सिक्युरिटी ऑफिसर अशी कामे करत राहील.

रवीची दृष्टी वा सहयोग असता कायदा, राज्यशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकी, पोलीस वा सैनिक अशांकडे जातक वळतो.

मिथुन लग्नास शनी अष्टमेश व भाग्येश असतो आणि त्याची कर्केतून तिसरी, सप्तमातून दहावी तर दशमातून सातवी दृष्टी मंगळावर येते. जातक शेतीव्यवसाय वा खाणीसंबंधी नोकरी वा उद्योग-व्यवसाय करतो. पण सप्तमातून येणारी दहावी दृष्टी पत्नीसुखास व मातृसुखास घातक ठरते. शत्रूंचा ससेमिरा लागतो आणि अनेक तऱ्हेच्या दुर्दैवी घटना घडतात. पोटाचे विकार, शस्त्रक्रिया होतील. उत्तरायुष्य दुःखीकष्टी राहते. चतुर्थ-सप्तमातून होणारा मंगळ-शनी यांचा दृष्टी अधिष्ठित केंद्रयोग चांगलाच अशुभ परिणामी ठरतो. वाहनांचे मोठे अपघात होतील. तसेच मंगळ व शनी यांचा चतुर्थ दशमातून होणारा प्रतियोगही घातकी ठरू शकतो. उंचावरून पडून हाडे मोडण्याचे प्रकार घडण्याची शक्यता असते.


मंगळाची हर्षलशी होणारी युती, केंद्र व प्रतियोग अपघातप्रवणता, मोठे पक्षाघातासारखे आजार दर्शवितात.

पुढे दोन कुंडल्या दोन स्वतंत्र व्यावसायिकांच्या देत आहे. त्यातील साम्य व भेद स्पष्ट केला जाईल.

**कुंडली : पुरुष जातक Medical Practitioner, M. B. B. S.**

जन्म - दि. १५ ऑक्टोबर, १९२५ रोजी रात्री ११.३०.

अक्षांश - १८° १५' उत्तर, रेखांश - ७५° पूर्व.




लग्नबिंदूवर प्लूटो. सप्तम बिंदूवर गुरु, शनी त्रिकोण प्लूटो. शनी लाभ-गुरु षष्ठेश मंगळ चतुर्थ बिंदूवर कन्येत. दशमेश गुरु सप्तमात धनु राशीत. द्वितीयेश चंद्र कन्येत लाभयोग व्ययेश शुक्र. द्वि-स्वभाव राशीतून केंद्रात ५ ग्रह. दवाखाना, शेती, ज्योतिष विद्या-शास्त्री परीक्षा उत्तीर्ण. हरहुन्नरी. १९९७ साली पक्षाघाताचा ॲटॅक. हृदयविकार. Angioplasty झाली. ॲलोपथी, निसर्गोपचार, ॲक्युप्रेशर, रेकी वगैरेंचा अभ्यास. शेत जमीन व स्थावर आहे. दशमावर मीन ही दवाखानादर्शक रास. मंगळ षष्ठेश असून रोग व रोग बरे करण्याच्या व्यवसायाचा संबंध असलेल्या कन्या राशीत आहे. कन्या, वृश्चिक, मीन या राशींचा संबंध षष्ठेश मंगळामुळे प्रस्थापित झाला. षष्ठेश मंगळाची दशमेश गुरुवर दृष्टी. धनेश चंद्र कन्या राशीत. व्ययेश शुक्र षष्ठात वृश्चिकेत आहे. हे योग वैद्यकीय व्यवसाय दर्शवितात.

**(७) तुळेचा मंगळ :** चतुर्थ स्थानात सात हा अंक येत असेल तर तेथील मंगळाला 'तुळेचा मंगळ' असे म्हणतात. त्यांचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ दशमेश व पंचमेश असून तो योगकारक आहे. चतुर्थावर तूळ रास असून मंगळ चतुर्थात तुळेत येतो. मंगळ कर्क लग्नास शुभफलदायी असतो आणि त्याची चतुर्थातील उपस्थिती शुभफलेच देईल. मंगळाची दशमावर व लाभस्थानावर पूर्ण दृष्टी येते. उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने दशमभाव बलवान होतो आणि मंगळाची सप्तम-भावावरील दृष्टीही अशुभ परिणाम करत नाही.

जातक मोठ्या अधिकारापर्यंत चढत जातो. तो उच्च शिक्षित व विद्वान असतो. शुक्राशी मंगळाचे संबंध चांगले असता मातृसुख, स्त्रीसुख, संततिसुख उत्तम मिळते. स्थावर व वाहने यांची प्राप्ती होते. कन्या संतती होते. जातकास मान, हुद्दा, संपत्ती यांचा लाभ होतो. तो अर्थातच कर्तबगार असतो. आईकडून कलेचा वारस मिळालेला असतो. सैन्यदलात जातक चांगला चमकतो.

जातक नशीबवान व कर्तबगार असतो. विद्वान व बहुश्रुत तर असतोच व त्यास सन्मान, राजमान्यता, लोकमान्यता मिळते. तो आपल्या विद्वत्तेमुळे, ज्ञानामुळे व उदार स्वभावामुळे प्रसिद्ध होतो. येथे गुरु वा रवीचा दृष्टियोग होत असता जातक राजकारणात जातो व मंत्रिपदावर आरूढ होतो.

लोकमान्य टिळक यांची कुंडली सर्वज्ञात आहे. कर्क लग्न, लग्नी रवी-शुक्र युती, चतुर्थात तुळेचा मंगळ, नवमात चंद्र-गुरू अंशात्मक युती आहे. व्ययात बुध-शनी युती असून बुध-नुपच्यून त्रिकोण योग हाही महत्त्वाचा आहे. योगकारक मंगळाची दशमावर पूर्ण दृष्टी आहे. लग्नातील रवीचे त्रिकोणात चंद्र-गुरु-राहू आहेत. गाढे संस्कृत विद्वान, गणित विषयात तज्ज्ञ, कायदातज्ज्ञ (बुध-शनी एकत्र), राजकारण, समाजकारण, विद्वत्तापूर्ण ग्रंथनिर्मिती. अफाट लोकप्रियता, अलोट कीर्ती, विद्वत्तेसाठी जगप्रसिद्ध. साहसी नीतिमान, निर्भीड असून ब्रिटिश सरकारशी लढा व काँग्रेसचे, जनतेचे व देशाचे नेतृत्व केले.

मंगळावर रवीची दृष्टी दशमातून येते व तेथे रवी उच्च असतो. धनेश दशमात उच्च असणे व दशमेशाची दशमस्थ रवीवर दृष्टी असणे हा महान व अपूर्व योग आहे. जातक चांगला भाग्यवान, कर्तबगार,, तेजस्वी व राजदरबारी सर्वोच्च मान मिळविणारा होतो. तो प्रसिद्ध व कीर्तिमान होतो. शरीरप्रकृती सुदृढ व डौलदार असते. लष्करात सेनापती होण्याच्या योग्यतेचा पराक्रमी होतो. संपत्ती उत्तम मिळते. राजकारणात अग्रणी असतो.

चतुर्थात मंगळाबरोबर रवी असणे ठीक नसते. तेथे रवी नीच राशीत येतो. जन्म मध्यरात्रीचा असल्याने रवीचे तेज पडत नाही.

कर्क लग्नास बुध व्यय व तृतीय या अशुभ स्थानाचा अधिपती असतो आणि दशमात मेषेत त्याचे तेज पडत नाही. तो नुसता बडबड्या असतो व आपल्या वक्रोक्तीने भांडणे उकरून काढतो. व्यवसायात चमकत नाही. पण त्यास अनेक शास्त्रांचे ज्ञान असते व तो नित्य प्रवासी असतो. व्यवसाय बदलले जातात.

गुरू भाग्येश असतो. त्याची मंगळावर दृष्टी भाग्यवर्धक ठरते. गुरूचा मंगळाशी नवपंचम योग बौद्धिक राशीतून होतो आणि हा दृष्टियोग शैक्षणिक यशास तसेच कलागुणांच्या वाढीस उपयुक्त ठरतो.

शनी कर्क लग्नास शुभ नसतो. चतुर्थस्थ मंगळावर त्याची दृष्टी द्वितीयेतून सिंह राशीतून येते व ती शुभ ठरत नाही. सप्तमेश द्वितीयात असणे हेच बाधक ठरते. सप्तमातून शनीची दहावी दृष्टी येते. ही दृष्टी अधिष्ठित केंद्रयोग बाधक व मारक ठरते. मातृसुख व विवाहसुख बिघडते. द्वितीयस्थ शनी संपत्ती चांगली पण पत्नीचा अकाली मृत्यू होऊन विधुरावस्था प्राप्त होते.

उदाहरणार्थ, पंडित जवाहरलाल नेहरू.

दशमात शनी मेष राशीत येतो, तेथे तो नीच राशीत असतो. शनी-मंगळ प्रतियोग दुर्दैवी ठरतो. अपकीर्ती, अवनती व ऱ्हास दर्शवतो. विवाहास अतिविलंब लागतो. वैवाहिक जीवन दुःखमय ठरते. प्रतियोग राजयोग भंग करणारा ठरतो.

चतुर्थात शनी उच्च राशीस येतो. तेथे शनी-मंगळ योग चांगला ठरतो. जातक वैद्यकीय क्षेत्राकडे जातो.


येथे शुक्र-मंगळ योगसुद्धा चांगला ठरतो. स्थावर व वाहनसुख लाभते. उद्योग-व्यवसायापासून लाभ होतो. मित्रमंडळ चांगले असते.

## कुंडली : श्री. विठ्ठल रामजी शिंदे

जन्म - बुधवार दि. २३ एप्रिल, १८७३ रोजी जमखिंडी येथे सकाळी ११ वा. ३० मि.

अक्षांश - १६° उत्तर ३०', रेखांश - ७५° पूर्व २२'

अयनांश - २२° ५' १५", सांपातिक समय - १ ता. ३५ मि. ३० सेकंद.




लग्नी प्रजापती (हर्षल) सारखा नवविचाराचा नवमतवादी व सुधारणावादी कर्क रास व चंद्र समाजाशी संबंध दर्शवितो. लग्नेश चंद्र कुंभेत आहे.

जातक प्रसिद्ध समाजसुधारक, अस्पृश्योद्धाराचा प्रचार केला. प्रजापती संशोधक असल्याने इतिहास व संशोधन केले.

तुतीयेश बुध नवमात व नवमेश गुरु लग्नी व त्याची नवमावर दृष्टी. प्रवास खूप, परदेशगमनही झाले. बुध-गुरु त्रिकोण योग बुद्धिमत्ता चांगली होती. प्रार्थना समाजाचे अनुयायी.

मंगळ (राजयोगकारक) त्याचा चंद्राशी त्रिकोण योग बौद्धिक राशीतून आहे. शनी प्रतियोग प्रजापती (हर्षल). रवीचा शनीशी केंद्रयोग व मंगळाशी प्रतियोग आहे. शनी-

प्रजापती प्रतियोगामुळे जातकाला विरोधही पुष्कळ झाला. गुरु उच्च राशीत व स्वनवांशी बुधाच्या नक्षत्रात आहे.

**(८) वृश्चिकेचा मंगळ :** ज्या वेळी चतुर्थ स्थानात आठ हा अंक असतो त्या वेळी तेथील मंगळाला 'वृश्चिकेचा मंगळ' म्हणतात.

मंगळ भाग्येश व चतुर्थेश असून चतुर्थात स्वगृहीचा येतो. भूमिकारक मंगळ स्वगृही म्हणजे मोठी मालमत्ता असते. उच्च शिक्षण व पदव्युत्तर शिक्षण मिळते. परदेश प्रवास, वाहनसुख, मातृसुख लाभते. येथे उत्तम राजयोग होऊन सर्व सुखे हात जोडून उभी राहतात.

मंगळ चतुर्थात म्हणजे मोठी शेतजमीन, बंगले व वाहने असतात. जातक इस्टेट ब्रोकरचाही व्यवसाय करून पैसा कमावतो. जातकाची आई मोठ्या घराण्यातून आलेली असते. ती नशीबवान व श्रीमंत असते. जातकास वडिलार्जित मोठी मालमत्ता मिळते.

रवीचा सहयोग वा दृष्टी असता संपत्तीचा लाभ सरकार दरबारी व जनतेकडून मानसन्मान प्राप्त होतात. राजकारणातही जातक पुढे येतो.

चंद्र-मंगळ प्रतियोग उत्तम लाभदायक ठरतो. कारण चंद्र दशमात उच्च राशीस येतो. उत्तम व प्रगतिशील शेतकरी अगर भांडवलदार, बँकर, सावकार असतो. स्त्रियांना लागणाऱ्या प्रसाधने, दागिने यांचा व्यापार करतो.

बुध द्वितीयेश व लाभेश असतो. त्याचा मंगळाबरोबरचा सहयोग वा प्रतियोग संपत्ती, वाहन, विद्या व वक्तृत्व या दृष्टीने चांगला असतो. जातक उत्तम पत्रकार, संपादक होतो. जोरदार भाषणे देतो.

शुक्र-मंगळाच्या सहयोगापेक्षा प्रतियोग जास्त चांगला ठरतो. स्थावर व वाहनुसख लाभते. उद्योग-व्यवसायातून उत्तम लाभ होतो. मित्रमंडळ चांगले असते. दशमस्थ शुक्र प्रतियोग मंगळ गावातील पहिल्या प्रतीचा शिंपीही होऊ शकतो. शिंपी कामाचा अगर तयार कपड्यांचा व्यवसाय उत्तम चालतो व मोठ्या प्रमाणावर होतो.

गुरु पंचमेश व अष्टमेश असतो. गुरु-मंगळ शुभयोग जातकास हुशार, विद्वान व उच्च शिक्षित बनवतो. जातक श्री, स्त्री, संपत्ती यांनी युक्त व सुखी असतो.

शनी याही लग्नास शुभ फलदायी नाही. दशमस्थ शनी जातकास पोलीस खात्याकडे नेईल. शनीचे द्वितीय सप्तमातून होणारे दृष्टियोग अशुभ आहेत.


कर्क लग्नाच्या बाबतीत जे वर्णन केले आहे तेच येथे लागू पडते. पण वैद्यकीय व्यवसायास शनी-मंगळाचा सहयोग चांगला ठरेल.

### कुंडली : 'क्ष'

जन्म - दि. १३ मे, १९२२ रोजी दुपारी १ वा. ३८ मि. प्र. वेळ.

अक्षांश - १७° ४२' उत्तर, रेखांश - ७५° ५४' पूर्व.

अयनांश - २२° ४६' २६"




येथे मंगळ योगकारक असला तरी तो वृश्चिकेत नाही. तो धनु राशीच्या २° २०' व वक्री आहे. मंगळ चतुर्थ व पंचम यांचे भावसंधीवर आहे. येथे तीन संधी आहेत. राशी संधी, नक्षत्र संधी व भाव संधी. चंद्र चतुर्थात पूर्णपणे आहे. मंगळ मात्र कुंपणावर आहे. दशमात शुक्र-बुध युती आहे व त्यांचा गुरुबरोबर त्रिकोण योग आहे. जातक पत्रकार व नंतर संपादक झाला. वक्तृत्व चांगले होते.

वडिलार्जित शेती व स्थावर मोठा वाडा होता. पण डोक्यावर कर्ज होते. ते फिटले नाही. लग्नेश रवी उच्च पण मंगळ मूळ नक्षत्री व मंगळ शनी केंद्रयोग. पितृसुख अल्प पण मातृसुख दीर्घकाळ. संततीपासून सुख नाही. स्वरयंत्राचा कर्करोग झाला. शस्त्रक्रियेने स्वरयंत्र काढले. त्यामुळे वाचा बंद. चंद्र व्ययेश नीच राशीत त्यामुळे कर्ज झालेले.

**(९) धनुचा मंगळ :** जेव्हा चतुर्थ स्थानात नऊ हा अंक असतो तेव्हा तेथील मंगळाला 'धनुचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ तृतीयेश व अष्टमेश असून चतुर्थात धनु राशीत मित्रक्षेत्री येतो. भावंडांच्या दृष्टीने ही स्थिती हितकारी ठरते. जातक स्वतः धीट व पराक्रमी असतो.

तृतीय स्थान मानसिक क्षमतेचे तसेच बौद्धिक क्षमतेचे असल्याने तृतीयेश चतुर्थात विद्यास्थानी उच्च विद्येच्या दृष्टीने शुभ फलदायी असतो. जातकाचा ओढा स्थापत्यशास्त्र वा वैद्यकशास्त्र याकडे असतो. वैद्यकक्षेत्रात तो उत्तम शल्यचिकित्सक असतो. मंगळाची दशमावर दृष्टी असल्याने त्याचे भावेशत्व अधिक स्थानबल. याचा सुपरिणाम दशमावर होतो.

बुध दशमात राशिबली असतो. त्याची मंगळावर दृष्टी येते. जातक विद्वान व हुशार असतो व त्यास काही ललित कला अवगत असतात पण स्वभाव तापट, तिरसट व

अहंमन्य असतो. बुध-मंगळ एके ठिकाणी असता जातक जास्त तर्कटी असतो. बोलणे टीकात्मक असते पण गणिताच्या अभ्यासास चांगला असतो. मित्रमंडळ चांगले असते पण नातेवाईक कमी असतात, जातकास संपत्तीचा व वाहनाचा लाभ मिळतो.

मंगळाबरोबर शुक्र असता धनेश व भाग्येश शुक्र चतुर्थात आल्याने शुक्र-मंगळ योग शुभ ठरतो. जातकास विवाहापासून व नंतरही लाभ होतो. तो संपत्तिमान होतो. त्यास स्थावर व वाहनाची प्राप्ती होते. जातक सुखी असतो पण शुक्र-मंगळ साहचर्य विषयलोलुपता वाढवते.

शुक्राची दृष्टी मंगळावर असता जातकाकडे स्त्रिया आकर्षित होतात. जातक नशीबवान असून उदार व दानशूर असतो. शुक्राच्या व्यवसायापासून नाट्य-संगीत-अभिनय कला यांपासून धनलाभ व मानसन्मान मिळतो.

गुरु-मंगळ एकत्र असता बंधुवर्ग व नातेवाईक बरेच असतात. तो सुखी होतो व प्रशासनात अधिकार पदावर जातो. वडिलांचा मान राखतो. तो देवभक्त असतो. त्यास संपत्ती चांगली मिळते. स्थावर व वाहने असतात.

गुरुची दृष्टी मंगळावर असताही जातक श्रीमंत असतो. त्यास पत्नी चांगली मिळते. शत्रूंचे जातकासमोर चालत नाही. ते नामोहरम होतात. त्यास खेळाची आवड असते व तो योगमार्गाकडेही ओढला जातो. मातृसुख चांगले असते. मंगळाची दशमावर दृष्टी यामुळे पोलीसदल व सैनिकपेशा याकडे जातक वळतो.

शनी-मंगळ चतुर्थात एकत्र असता अशुभ फले मिळतात. मातृसुखास पारखा होतो. शनी षष्ठेशही असल्याने पायात व्यंग असते वा उत्पन्न होते. जातक कुटुंबीयांपासून दुरावतो. तो दुष्ट बुद्धीचा होतो. संतती सुखास पारखा होतो.

शनीच्या दृष्टीचा विचार निरनिराळ्या स्थानांतून करावा लागतो. द्वितीयेत शनी उच्च असतो व त्याची मंगळावर तिसरी दृष्टी येते. ती शुभदर्शक ठरते. जातकास संपत्ती व संतती दोहोंचाही लाभ होतो.

सप्तमातून मीन राशीतून शनीची चतुर्थावर दहावी दृष्टी येते आणि मंगळ व शनी यांचा दृष्टिअधिष्ठित केंद्रयोग होतो. तो अशुभ परिणामी ठरतो.

शनी षष्ठेश व मंगळ अष्टमेश यांची परस्परांवरील दृष्टी सुखस्थान व जायास्थान यातून येते. ही दोन्ही स्थाने बिघडतात. शरीर व्याधी व अपघात यामुळे जातक त्रस्त होतो. पत्नीसुख नसते, द्विभार्या योग होतो. केंद्रयोगाइतकाच किंवा त्याहून जास्त दोषास्पद प्रतियोग ठरतो.

दशमात पीडित शनी उद्योग-व्यवसायात अपमान, अवनती व ऱ्हास होतो. त्यातच चंद्र किंवा रवी सप्तमात असल्यास शस्त्रामुळे, आगीमुळे अगर न्यायालयाच्या शिक्षेमुळे भयानक अंत होतो.

चतुर्थात मंगळ राहूने युक्त असता आत्महत्येकडे प्रवृत्ती होते. मंगळ अष्टमेश असून चतुर्थात राहूने युक्त होतो तेव्हा अनेक कौटुंबिक ताणतणाव, त्रास उद्‌भवतात.

तसेच स्थावराबद्दलही कटकटी निर्माण होतात. त्या सर्वांमुळे जातक त्रस्त होतो व आत्महत्येचा विचार डोकावतो. जातकास मारहाणही होते शिवाय शारीरिक व्याधीही असतात.


कन्या रास लग्नी असता पापग्रहांच्या केंद्रयोगामुळे अपघात होतात.

## कुंडली : श्री. भोसले

जन्म - दि. ८ ऑक्टोबर, १९२२ रोजी कोल्हापूर येथे सकाळी ६.२४ प्र. वेळ.

अक्षांश - १६° ४२' उत्तर, रेखांश - ७४° १९' पूर्व.

अयनांश - २२° ४६' ३९", सांपातिक समय - ६-५६-०




पोलीस दलात. शनीचा लग्नबिंदूजवळ उदय. रवी युती लग्नबिंदू. चतुर्थात मंगळ. शनीची दहावी व मंगळाची सातवी पूर्ण दृष्टी दशमावर.

मंगळ तृतीयेश व शनी षष्ठेश यामुळे पराक्रमाला पुष्कळ वाव. लग्नस्थ रवीने सरकारी नोकरी. पोलीस, सब-इन्स्पेक्टर व तद्‌नंतर बढत्या मिळत गेल्या. प्लूटो दशम बिंदूजवळ त्यानेही साहस व धडाडी दिली.

**(१०) मकरेचा मंगळ :** चतुर्थ स्थानात दहा हा अंक येत असेल तर तेथील मंगळाला 'मकरेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ सप्तमेश व द्वितीयेश असतो आणि तो चतुर्थात मकर या उच्च राशीत येतो. असा जातक मोठा अधिकारी होतो. तो विद्वान व उच्च विद्याविभूषित असतो आणि उत्तम संपत्ती मिळवितो.

संततीसुख चांगले लाभते. पत्नीही नशीबवान असते. स्थावर मालमत्ता वडिलार्जितही लाभते व स्वतःही कमावतो.

मंगळ दोन व सात या मारकस्थानांचा अधिपती असतो. परंतु तो मारक होत नाही असे भावार्थ रत्नाकरमध्ये ''न करोति कुजः पान निघत्रं तु न संशय'' व ''द्वितीयेःसप्तमेशोऽपि न भौमो मारको भवेत्'' असे स्पष्ट प्रतिपादन आहे व हे तूळ लग्नाच्या बाबतीतच सांगितले आहे.

सप्तमेश चतुर्थात असता काय फले मिळतात हे वृषभ लग्नाच्या बाबतीत दिग्दर्शित केले आहे. पण त्याहीपेक्षा तूळ लग्नाच्या बाबतीत जास्त शुभत्व प्राप्त होते. द्वितीयेश चतुर्थात उच्च राशीला असल्याने सांपत्तिकदृष्ट्या चांगलाच नशीबवान असतो. आपल्या स्वतःच्या व कुटुंबीयांच्या ऐषआरामासाठी आणि चैनीसाठी पैसा खर्च होतो.

जातक उत्तम धन मिळवतो. तो मोटारी विकण्याचा व्यवसाय करतो. आईकडील नातेवाइकांकडून त्यास बराच फायदा होतो. आईकडील नातेवाइकांकडून उत्तम वारसा प्राप्त होतो.

रवी लाभेश असतो. त्याचा मंगळाशी शुभयोग म्हणजे द्वितीयेश-लाभेश आणि लाभेश-सप्तमेश यांचे शुभ संबंध प्रस्थापित झालेले असतात. श्वशुर गृह मोठे व खानदानी असते. जातक कुशाग्र बुद्धीचा असून श्री. स्त्री व संतती यांनी युक्त व सुखी असतो. राजकीय व सामाजिक क्षेत्रात जातक पुढे येतो.

चंद्र-मंगळ संबंध असता जातक उदार व दानशूर असतो. प्रतियोग असता व्यवसायात बदल, अस्थिरता असते. स्थावरही अस्थिर होते.

बुध भाग्येश व व्ययेश असतो, त्याचे मंगळाशी शुभयोग भाग्यवर्धक ठरतात. परंतु प्रतियोग व्यवसायाच्या दृष्टीने चांगले नाहीत. त्यात नुकसानी व बदल होतात.

गुरू तृतीयेश व षष्ठेश असतो. त्याची मंगळावर दृष्टी चांगली ठरते. तूळ लग्नास गुरू तृतीयेश व षष्ठेश असूनही तो योगकारक ठरतो असे भावार्थ रत्नाकरमध्ये 'तूळ विचार' या प्रकरणात म्हटले आहे.

पण गुरु दशमातून मंगळवार दृष्टी करीत असता मात्र तो शुभ ठरत नाही. हा उच्चभंग होतो.

शनीची द्वितीय, सप्तम व दशमातून मंगळावर दृष्टी येऊ शकते. शनी तूळ लग्नाचा योगकारक ग्रह आहे व त्याची दृष्टी शुभच ठरावी. शनी द्वितीयेत असता शनी-मंगळ अन्योन्य क्षेत्र संबंध येतो.

तसेच शनी सप्तमात असताही अन्योन्य क्षेत्र संबंध येतो. सप्तमातील शनी मेषेत नीच राशीत असला तरी उच्चस्थ मंगळामुळे नीचत्वाचा भंग होतो. असा शनी राजयोगकारक

होतो. जातकास संपत्ती व संतती चांगली लाभते. तो विद्वान असतो आणि मोठा अधिकारी. सुरुवातीस वर्णन केलेली सर्व शुभ फले प्रकर्षाने मिळतात.

हर्षलची मंगळाशी युती, केंद्र वा प्रतियोग विवाहसुख खंडित करणारा ठरतो. घटस्फोटाचा प्रसंग येतो. अपघात योगही येतो.

चतुर्थात मंगळ व राहू सर्वसाधारणपणे शुभ ठरत नाहीत. मंगळ स्वतःच चतुर्थात अशुभ असतो. त्यातच तो राहूयुक्त असता आणखी बिघडतो.

अर्थात, यालाही अपवाद आहेत. उच्च राशीचा चतुर्थस्थ मंगळ अशुभ फले देत नाही हे वर दिलेल्या वर्णनावरून वाचकांच्या लक्षात येईल.

राहू-शनी हे मित्र आहेत. म्हणून मित्रक्षेत्री राहू अशुभ फले देणार नाही. शिवाय कुंडलीतील ग्रहस्थिती पाहून चतुर्थस्थ मंगळ-राहूचा विचार करावा लागेल.


## कुंडली : पुरुष जातक

जन्म - बुधवार दि. २८ जुलै, १९७१ रोजी १२.५० वाजता.

अक्षांश - १८° ३१' उत्तर,

रेखांश - ७३° ५५' पूर्व.

सांपातिक समय - ८-३७-००.




जातक उच्च विद्याविभूषित B. E. (Elect.) असून Software चा Post Graduate Diploma आहे. अमेरिकेत एका कंपनीत नोकरी.

आई-वडील सुशिक्षित व स्वतः उत्तम व्यवसाय करतात. वडील बँकेत मॅनेजर आहेत.

मंगळ-राहू यांचा हर्षल व चंद्राचा त्रिकोण योग. लग्नेश शुक्र दशम बिंदूच्या मागे. त्याचा गुरु-नेपच्यूनशी त्रिकोण योग व शनीच्या दृष्टीत. लाभेश रवी दशम बिंदूचे जवळ व शनीच्या लाभयोगात. गुरु-शुक्र शुभयोगामुळे मंगळ-राहूचे अशुभ परिणाम नाहीत.

**(११) कुंभेचा मंगळ :** चतुर्थ स्थानात अकरा हा अंक असेल तर येथील मंगळाला 'कुंभेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


मंगळ चतुर्थात कुंभेत शत्रुक्षेत्री येतो. तो षष्ठेशही असल्याने षष्ठेश चतुर्थात याचीही अशुभ फले प्राप्त होतात. जातक अकाली प्रौढ दिसतो. त्याची राहणी स्वच्छतेची नसते. येथे चंद्र वा गुरुचे मंगळाशी शुभयोग, सहयोग असल्यास उलट परिस्थिती दिसते. जातकास स्थावराचा व वाहनाचा लाभ होतो. पैसाही चांगला मिळतो. उच्च विद्येचा लाभ होतो.

पुढील दोन कुंडल्यांचा अभ्यास केल्यास यातील विरोधाभास लक्षात येईल. एकाच योगावरून शुभ व अशुभ परिणाम घेणे चुकीचे ठरते हे लक्षात येईल.

**कुंडली : मॅडम एम. बशकरत्शेफ**

जन्म - दि ११ नोव्हेंबर, १८६० रोजी सकाळी ६.३० वा. स्थानिक वेळ.

अक्षांश - ४९° ३५' उत्तर, रेखांश - ३४° ३५' पूर्व.




मध्यम बांधा, प्रमाणशीर सुडौल शरीरयष्टी, सोनेरी केस आणि तेजस्वी तांबूस वर्ण अशी अत्यंत देखणी स्त्री, महत्त्वाकांक्षी आणि अहंमन्य, संपत्ती, अधिकार व उच्च राहणी यांची अनिवार अभिलाषा, संगीत, चित्रकला, उत्तम गोड आवाज व बहुभाषी. रसायनशास्त्राची आवड व त्याबद्दल एक जर्नलही प्रसिद्ध करीत असे. अल्पायुषी, २४ वे वर्षी क्षयाने मृत्यू.

येथे वृश्चिक लग्न नाही पण मंगळ चतुर्थात कुंभेत आहे व तो षष्ठेशही आहे. लग्नी रवी, चंद्र तुळेत त्रिकोण योग मंगळ यामुळे सौंदर्याची देणगी, रवी नीच राशीत त्यामुळे अधिकारलालसा व अहंमन्यता.


शनी केंद्र बुध, लग्नेश शुक्र हर्षलचे त्रिकोण योगात व बुधाचे लाभ योगात यामुळे संगीत चित्रकलादी कलांमध्ये गती होती. षष्ठेश चतुर्थात प्रतियोग गुरु व बुध प्रतियोग हर्षल यामुळे क्षय व अल्पायू.

## कुंडली : पुरुष जातक

जन्म - शनिवार दि. २७ नोव्हेंबर, १९७१ रोजी विजापूर येथे सकाळी ७.२२ प्र. वेळ.

शैक्षणिक कारकीर्द उत्तम. प्रथम श्रेणीत वैद्यकीय क्षेत्रात पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण. M. D. पेडिॲट्रिक्स.

लग्नी रवी (दशमेश) व गुरु (पंचमेश). भाग्येश चंद्र व लग्नेश मंगळ चतुर्थात कुंभेत. मातृ-पितृ सुखात कमतरता नाही. अभ्यासात हुशार. मित्रमेळावा असतो. स्वभाव मनमिळाऊ. बुध-शुक्र हे द्वितीय भावबिंदूच्या मागे १५/१७ अंश आहेत ते लग्न केंद्रात मानले तर आठ ग्रह केंद्रात येतात. कुंडली बलवान आहे. जातक कर्तृत्ववान व स्वतःच्या हिमतीवर उत्तम संपत्ती, स्थावर, वाहन व मान कमावणार आहे. लग्नेश व चतुर्थेश यांची परस्परावर दृष्टी आहे.




मंगळाबरोबर बुध चतुर्थात असता मिश्र फले मिळतात. बुध हा अष्टमेश व लाभेश असतो. लाभेशत्वामुळे मित्रपरिवार मोठा असतो. संपत्तीलाभ व वाहनसुख असते पण त्यामुळेच बंधुजनांचा रोष जातक ओढून घेतो.

मंगळाबरोबर शुक्र असणे म्हणजे लग्नेश सप्तमेश यांची चतुर्थात युती मिश्र फलदायी आहे.

गुरु धनेश व पंचमेश असतो आणि गुरु-मंगळ योग विद्या, संपत्ती व संतती या दृष्टीने चांगलाच ठरतो. जातक अध्यात्माकडे ओढला जातो.

येथे शनी स्वगृही येतो पण तो अशुभ फलदायी ठरतो. मातृसुख बिघडते. भावंडे दुरावतात व सुख लाभत नाही.

गुरु कुंभेत उच्च असल्यासारखा शुभ फले देतो. रवी-मंगळ योग व्यवसायाच्या दृष्टीने उत्तम. सरकारी नोकरी मिळते.

**(१२) मीनेचा मंगळ :** जर चतुर्थ स्थानात बारा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मीनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ पंचमेश व व्ययेश असतो आणि चतुर्थात तो मीनेत येतो. जातक विद्यावंत व विद्वान असतो. गुरु वा रवीशी शुभ संबंध असता जातकास मानमान्यता मिळते.

पंचमेश पंचमाच्या व्ययात मीनेत येतो व तो बहुप्रसव राशीत येतो पण पुत्रसंतती न होता कन्या संतती होते. मातृसुख चांगले मिळते. जातक सल्लागार वा वरिष्ठ पदावर येतो.

चतुर्थात मंगळ अशुभ योगात असता मातृसुख बिघडते व संततिसुखही बिघडते. जातक सतत त्रस्त असतो. त्यास समाधान लाभत नाही. त्याचे स्वतःचे घर नसते व घरमालकाशीही पटत नाही.

शुक्र चांगला असता व तो चतुर्थात असता वाहनसुख व स्थावरसुख मिळते. पत्नीसौख्यही चांगले मिळते.

रवी कुंडलीचा भाग्येश असतो. तो दशमात असता पंचमेश व भाग्येश यांचा संबंध येतो. जातक विद्वान असून उच्चशिक्षित असतो व त्यास नावलौकिक मिळतो.

चंद्राच्या दृष्टीत मंगळ असता जातकास व्यंग असते व तो भांडखोर असतो.

बुध दशमात कन्या राशीत मूलत्रिकोणी, उच्च व स्वगृही असतो. पंचमेश मंगळाशी त्याचा दृष्टियोग चांगला ठरतो. जातक विद्वान असून कलावंतही असतो. त्यास उच्च शिक्षण मिळते जातकाची पत्नीही उच्चशिक्षित व कर्तबगार असते.

जातक अध्यापन क्षेत्रातही चमकतो. रवीबरोबर असल्यास भाग्येश दशमेश योग पंचमेशाच्या दृष्टीत. असा योग जातकास राजकारणात नेईल अथवा सरकारी नोकरीत चमकेल. परदेश वकिलातीत काम करेल. उच्च पदस्थ होईल.

शनी धनेश असतो. त्याची मंगळावर द्वितीय स्थानातून दृष्टी येत असता जातक संपत्ती बाळगून असतो. शनीची लाभस्थानावरही दृष्टी येते व मंगळाचीही लाभस्थानावर दृष्टी येते. संपत्ती योग चांगला असतो. शेअर्स वगैरेमध्ये पैसे गुंतवून उत्पन्न वाढवित असतो.

शनीची सप्तमातून येणारी दृष्टी चांगली नाही. हा दृष्टी अधिष्ठित केंद्रयोग होतो. त्यामुळे कुटुंबसौख्य व पत्नीसौख्य बिघडते. द्विभार्या योग संभवतो. उत्तरायुष्य हालात जाते.

दशमातून शनीचा मंगळाशी दृष्टियोग होत असता जातकाची अवनती होते. याच वेळी चंद्र सप्तमात असता पाण्यात बुडून मृत्यू होतो.

बऱ्याच धनु लग्नाच्या कुंडल्यांत लग्न २२/३ अंशात असता वा त्याचे पुढे असता दशमावर तूळ रास येते आणि चतुर्थावर मेष रास येते. तेथे मंगळ पीडित असता शारीरिक त्रास व हाल होतात. याचे उत्तम उदाहरण स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे आहे.


त्यांचे लग्न धनु २४° आहे पण दशम तुळेत ५° ५३'त आहे. म्हणजे चतुर्थ बिंदू मेषेचा ५° ५३' येतो आणि मंगळ तेथेच मेषेत ६° ३८' असून जवळच केतू आहे. षष्ठेश शुक्रही मंगळाबरोबर आहे. मंगळ व्ययेशही आहे व तो केतूच्या नक्षत्रात व केतूच्या युतीत आहे. त्यामुळे सावरकरांना बरीच वर्षे तुरुंगात राहावे लागले आणि अंदमानात त्यांचे हाल झाले. तीव्र शारीरिक कष्ट सोसावे लागले.

मंगळ चतुर्थात मेषेत असता व शनीच्या दृष्टीत असताही शारीरिक व मानसिक हाल होतात. उत्तरायुष्यात शारीरिक हाल व मानसिक तणाव होतात. सुख संपलेले असते.

**कुंडली : के. डी. सिंह 'बाबू'**

जन्म - शुक्रवार दि. २ फेब्रुवारी, १९२३ पहाटे ४ वा. प्र. वेळ.

बाराबंकी अ - २६° ५६' उत्तर, रेखांश - ८१° १३' पूर्व.





भारताचा महान हॉकीपटू. ध्यानचंदचे खालोखाल गुणवत्ता असलेला खेळाडू. अफाट लोकप्रियता. २७/३/१९७८ रोजी आत्महत्या. चतुर्थस्थ मंगळ अपघातप्रवण असतो. चतुर्थात मंगळ केंद्रयोग प्लूटो व प्रतियोग शनी. मंगळ-शनी प्रतियोग व चंद्र युती, नेपच्यून अष्टमात जलराशीत हा आत्महत्येचा योग.

५

# पंचम भाव

सोबतच्या कुंडलीमध्ये ज्या ठिकाणी पाच हा अंक लिहिलेला आहे. त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीमधील 'पंचम स्थान' असे म्हणतात.




या स्थानावरून संतती, शिक्षण प्रणय भावना इत्यादींचा फलादेश पाहिला जातो. त्याचप्रमाणे गर्भ, संतती, विवेकशक्ती, उपासना, मंत्र, बुद्धिमत्ता, विद्या-विद्येतील यशापयश, सट्टा लॉटरी, शर्यती कंपन्यांचे समभाग वगैरेंमध्ये गुंतवणूक व त्यापासून प्राप्त होणारे आकस्मिक धन, प्रेमळ, प्रणय भावना, क्रीडा, करमणूक, मनोवृत्ती लग्नापूर्वीचे संबंध ज्येष्ठ बंधूचे वैवाहिक जीवन, बलात्कार, नैतिक आचरण यांचा विचार होतो.

विद्येच्या बाबतीत एकूण दोन, पाच व चार या स्थानांचा विचार करावा लागतो. दुसऱ्या स्थानावरून प्राथमिक शिक्षण, पंचम स्थानावरून माध्यमिक शिक्षण व चतुर्थ स्थानावरून महाविद्यालयीन शिक्षण-पदवीपर्यंतचे यांचा विचार होतो त्यासाठी बुध व गुरु हे कारक आहेत. पदवीनंतरचे वा अतिउच्च शिक्षण, प्रबंध लेखन, संशोधन या विद्यापीठीय शिक्षणासाठी नवम स्थान यांचा विचार होतो आणि चतुर्विंशांश कुंडली त्यासाठी मांडावी लागेल. पूर्वीच्या काळी वेदविद्या, तत्त्वज्ञान यातील प्रावीण्यासाठी नवम स्थानचा विचार केला जात असे. आता नवीन शास्त्रे, त्यांतील उच्च शिक्षण, संशोधन यासाठी नवम स्थान, गुरु व प्रजापती (हर्षल) यांचा विचार करावा लागेल.

बुद्धी व बुद्धिमत्ता यांचा संबंध वायुराशी व बुध आणि विद्वत्ता, शहाणपणा यासाठी गुरुचा विचार करणे योग्य ठरेल.

बुद्धिमत्ता हा विषय खास बुधाच्या कारकत्वाखाली येतो. पण चंद्राचाही विचार पूर्वाचार्यांनी केला आहे. त्याचप्रमाणे विशिष्ट राशीतील विशिष्ट ग्रहही बुद्धिमत्तेचे निरनिराळे पैलू दर्शवितात. निरनिराळे ग्रहयोग हेही काही गोष्टी दर्शवितात.

पंचम स्थान हे बुद्धिमत्तेचे स्थान व प्रमुख आहे. त्याचे बलाबलावर बुद्धिमत्तेचा दर्जा ठरत असतो. हे बल पुढील निकषावर जोखले पाहिजे : (१) पंचमात शुभ ग्रहाची राशी (२) पंचमावर शुभ ग्रहाची दृष्टी, (३) पंचमात शुभ ग्रह, (४) पंचमेश उच्च राशीत

(५) पंचमेश शुभ ग्रहाने युक्त वा दृष्ट (६) पंचमेश शुभ ग्रहांमध्ये (७) बुध वा गुरु पंचमात (८) पंचमेश बलवान असून केंद्रात.

कुंभेत मंगळ असता बुद्धी तीक्ष्ण असते. बुध-मंगळ प्रथम दर्जाचे योग तीक्ष्ण बुद्धी असते. तर्कशक्ती चांगली असते. ही युती मेष, वृश्चिक, मिथुन, कन्या यांमध्येही शुभ फल देणारी असते.

मनोवृत्ती भावना पंचम भावमध्यावर जी राशी असते त्याचे स्वरूप आणि त्या बिंदूजवळ असणारा ग्रह अगर त्याच्याशी दृष्टियोग करणारे ग्रह यांच्या एकत्रित परिणामानुसार जातकाच्या मनोवृत्तीचा अंदाज घ्यावा लागेल व त्यानुसार मनोवृत्तीचा विकास होऊ शकेल. तसेच चंद्र हा मनाचा कारक असल्याने त्याचाही विचार करावा लागेल.

प्रेम प्रणयादी भावना, क्रीडा व करमणुकीसाठी पंचम स्थान, तृतीय स्थान व शुक्र यांचा संबंध येतो. मनोवृत्ती व प्रगल्भ मन यासाठी चंद्र, वरुण (नेपच्यून) यांचा विचार करावा लागेल.

संतती विचार पंचम स्थानावरून करावयाचा असतो. त्यासाठी गुरु हा कारक ग्रह आहे.

बुध, शुक्र व गुरु हे ज्यांचे प्रमुख कारक आहेत त्या विषयांचा विद्या, प्रेम, कला आणि संतती यांचा विचार त्या-त्या ग्रहावरील ग्रंथात करावा लागेल.

प्रस्तुत पुस्तकात मंगळ व संतती हाच विचार प्रामुख्याने केला जाणार आहे. विद्या, बुद्धिमत्ता, मनोवृत्ती यांचा विचार अनुषंगाने केला जाणार आहे.

संततीसाठी गुरुस प्राधान्य देऊन त्याचे मंगळाशी व पंचमस्थ अन्य ग्रह वा पंचमेश यांच्याशी जसा शुभाशुभ संबंध असेल त्यानुसार विचार होईल. संततीसाठी स्त्री कुंडीलीस प्राधान्य द्यावे लागेल. गर्भधारणा, गर्भवाढ व प्रसूती हे विषय स्त्री कुंडलीवरूनच निश्चित होऊ शकतात. मंगळाचा विचार नकारात्मक ठरण्याची शक्यता असते.

पंचमातील रवी संतती अजिबात देत नाही हे वास्तवात पटत नाही. धनु लग्नाच्या एका स्त्रीच्या कुंडलीत पंचम मध्यावर वृषभेचा ३ अंश असून रवी तेथेच असता त्या स्त्रीस एक पुत्र झाला आहे. अर्थात त्यानंतर त्या स्त्रीस आणखी संतती कन्या वा पुत्र झाला नाही. एकच पुत्र असणाऱ्या स्त्रीस काकवंध्या म्हटले आहे. याचा अर्थ आपण एवढाच घेऊ शकू की एकच पुत्र होतो. जास्त संतती नाही.

संतती विचारात प्रजनन क्षमता हा विचार प्राधान्याने करावा लागतो आणि त्यासाठी दोन सहमांचा विचार करावा लागतो. पुरुषासाठी बीजसहम-त्यामध्ये रवी, शुक्र व गुरु यांच्या राश्यंशांची बेरीज करून येणारी राशी अंश कला व त्याचे नवांश आणि स्त्रीसाठी चंद्र, मंगळ व गुरु यांच्या राश्यंशांच्या बेरजेवरून निघणारी राशी अंश आणि त्याचे नवांश यास क्षेत्रसहम म्हटले जाते. यावरून पती-पत्नीची प्रजनन क्षमता ठरवली जाते.

पंचमस्थ मंगळाबद्दल सारावलीकर असे म्हणतात -

**सौख्यार्थपुत्ररहितश्चलमतिरपि पंचमे कुजे भवति ।**

**पिशुनोऽनर्थप्रायः खलश्च विकलो नरो नीचः ।।**

**अर्थ :** जातकास सुख लाभत नाही, संपत्ती नसते व संतती नसते; तो चंचल बुद्धीचा असतो. दुष्ट बुद्धी व दुर्बल शरीराचा असा नीच असतो.

**भौमः पंचमभवनं जातं जातं विनाशयति पुत्रम् ।**

**दृष्टे गुरुणा प्रथमं सितेन न च संदृष्टः ।।**

एकटा मंगळ पंचमात असता झालेले पुत्र जगत नाहीत. (संतती अल्पायू ठरते अगर गर्भपात होतो) पण गुरुची दृष्टी असता अगर शुक्राची दृष्टी असता फक्त प्रथम संतती टिकत नाही. नंतरची संतती जगते. कारण प्रथम संततीचा पंचम स्थानावरून आणि पुढील संततीचा विचार सप्तम, नवम, एकादश वगैरे स्थानावरून केला जातो. पण पंचमस्थ मंगळवार सर्वच ग्रहांची दृष्टी असता प्रथम संततीसुद्धा जगते. ती जात नाही.

पंचम स्थानातील मंगळ जबर कामेच्छा देतो. प्रेमात उतावीळपणा असतो. पटकन प्रेम बसते, ते अविचाराने हे नंतर लक्षात येते व पश्चात्ताप होतो.

पंचमात मंगळ असलेला जातक खादाड असतो, त्याचा आहार मोठा असतो व पचनशक्ती जास्त असते.

पंचमातील मंगळ विद्येच्या बाबतीत अडथळे आणतो, विद्या पूर्ण होत नाही. अनेक अडचणी येतात. बुद्धिमत्ता असली तरी वरची श्रेणी मिळत नाही. येथील मंगळ पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, शस्त्रक्रिया यांचा अभ्यास दर्शवितो. तूळ, वृश्चिक, धनु, सिंह राशीतील मंगळ औषधी, वनस्पतिशास्त्र व शल्य-चिकित्सा याकडे कल दर्शवितो. मंगळाचे बुध, गुरु, रवी वा चंद्र यांचे शुभयोग असता विद्येत उत्तम यश प्राप्त होते.

स्त्रियांच्या कुंडलीत पंचम स्थानी मंगळ असता गर्भपात, शस्त्रक्रियेने प्रसूती वगैरे अनुभवास येईल. संतती झाली तरी ती बेजबाबदार व उधळी होते आणि त्यांच्यापासून सुख लाभत नाही.

परंतु मंगळासह गुरु, बुध वा शुक्र असता वरील अशुभ फले मिळत नाहीत. त्या स्त्रीस भरपूर सुख व संपत्तीही लाभते. मंगळावर गुरु, बुध, शुक्र यांचे शुभ दृष्टियोग असता ही फले मिळतात.

## पंचमस्थ मंगळाची राशीनिहाय भावफले

**(१) मेषेचा मंगळ :** पंचम स्थानात जेव्हा एक हा अंक असतो तेव्हा तेथील मंगळाला 'मेषेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ पंचमेश व व्ययेश असतो आणि पंचमात मेषेत स्वगृही येतो. तेथे तो काही अंशात मूलत्रिकोणी असून बाकीच्या अंशात स्वगृही असतो. जातकाची उत्तम भरभराट होते. स्थावर असते. संतती होते पण व्ययेशत्वामुळे संततीबद्दल चिंता असते. गुरुच्या शुभ योगावर चिंतामुक्ती होऊ शकते. पण मंगळ राहूने युक्त असता गर्भपात वा संततीचा अपघाती मृत्यू होतो.

मंगळ पंचमातून अष्टमावर कर्केवर, एकादश स्थानावर तूळ राशीवर दृष्टी टाकतो. त्याचे परिणाम दिसतात.

## कुंडली : श्रीमती मीरा


जन्म - गुरुवार दि. १२ जुलै, १९४५ रोजी बडोदा येथे सायंकाळी ७ वा. ४५ मि. (युद्धवेळ).

अक्षांश - २२° उत्तर १९', रेखांश - ७३° पूर्व १४'

अयनांश - २३° ५' ३४", सांपातिक समय - १३ ता. २८ मि. १५ सेकंद.

उच्च विद्याविभूषित. बहिणीचे लग्न झाल्याशिवाय स्वतःचे लग्न करण्यास नकार दिला.

अध्यापनाचा व्यवसाय. महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरी. बहिणीचे लग्न झाले तरी तिचे लग्न झाले नाही.




पतिकारक रवीची शनीशी युती सप्तमात आहे. सप्तमेश बुधावर मंगळाची दृष्टी. विवाहकारक शुक्र हर्षलसह आहे. या योगामुळे विवाह नाही.

मंगळ चतुर्थेश व पंचमेश आहे व त्याचा लग्नेश गुरू (भाग्यस्थ) बरोबर त्रिकोण योग आहे. या योगावर उत्तम उच्च शिक्षण झाले.

अनिष्टाध्यायात वराहमिहीर सांगतात की पंचम अगर सप्तम भावात शुभ ग्रह असतील तरच जातकास समृद्धी, विवाह, संतती प्राप्त होते. तसे नसेल तर त्यास पत्नी/पती व

संतती नसते. येथे पंचमात मंगळ व सप्तमात रवी, शनी, राहू त्यामुळे विवाह नाही व संततीही नाही.

**(२) वृषभेचा मंगळ :** पंचम स्थानात जेव्हा दोन हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'वृषभेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

पंचमात वृषभ रास येते. मंगळ चतुर्थेश व लाभेश असतो आणि पंचमात वृषभेत समक्षेत्री येतो. जातक श्रीमंत असतो. त्यास सर्व प्रकारचे लाभ होतात. पण संततीसंबंधी चिंता असते. जातकास घशाचे व पोटाचे विकार होतात.

**कुंडली : सौ. मनीषा**


जन्म - शुक्रवार दि. २२ मे, १९७० रोजी दौंड येथे पहाटे ०-१०-० वाजता झाला.

अयनांश - २३° २६' ४४", सांपातिक समय - १५ तास ३४ मिनिटे २१ सेकंद.

शनी महादशा भोग्य वर्षे २ महिने ६ दिवस ६.

शिक्षण B. Com. उत्तीर्ण १९९०. विवाह - मे १९९५.

कर्वे स्त्री-शिक्षणसंस्थापैकी 'College of Architecture' मध्ये प्रशासनात नोकरी जुलै १९९८ पासून.




पंचमावर वृषभेचे २९° १' असून त्याच भावमध्याचे निकट मंगळ ८° ५५' वर आहे. पंचम भाव मध्य मृग नक्षत्रात (मंगळाचेच नक्षत्रात) असून तेथेच मंगळ आहे. यामुळे पहिल्याच संततीच्या बाबतीत गर्भपात होतो. त्याचप्रमाणे तो झाला आहे.

पंचमेश शुक्र व संततीकारक गुरु यांचा त्रिकोण योग आहे. तसेच पंचम भाव बिंदू योगकारक व भावेश शुक्राच्या युतीत असून त्यावर गुरुचीही दृष्टी आहे. पुढील संतती चांगली निपजेल.

**(३) मिथुनेचा मंगळ :** पंचम स्थानात जेव्हा तीन हा अंक येतो. तेव्हा तेथील मंगळाला 'मिथुनेचा मंगळ' असे म्हणतात. याचे फल पुढीलप्रमाणे -


मंगळ तृतीयेश व दशमेश असून पंचमात मिथुनेत येतो. जातकास संतती होते. जुळीही होते पण त्यातील एक अल्पायू ठरते.

### कुंडली : सौ. जयश्री

जन्म - दि. २ सप्टेंबर, १९४५ रोजी बंगलोर येथे सायं. ७ वा. ५० मि. (युद्धवेळ). सायं. ६ वा. ५० मि. खरी प्र. वेळ.

अक्षांश - १२° उत्तर ५८', रेखांश - ७७° पूर्व ३८.

अयनांश - २३° ५' ३७", सांपातिक समय - १७ ता. १५ मि. २० सेकंद.




लग्नेश शनी पंचमात मिथुन राशीत आहे व चंद्रही तेथेच आहे. दोघेही मिथुन या द्विस्वभाव राशीत युतीत आहेत. मिथुन राशीत मंगळ, राहू, शनी व चंद्र असे चार ग्रह असून संततीचा कारक ग्रह गुरुही द्विस्वभाव राशीत आहे. पंचमेश बुध कर्केत व त्याचा अधिपती चंद्र मिथुनेत असा परिवर्तन योग आहे. द्विस्वभाव राशीत महत्त्वाचे ग्रह आहेत. त्यामुळे जुळी संतती दि. ६/१/१९६६ रोजी. त्या वेळी चलित गुरु व चलित नेपच्यून यांची युती होती.

**(४) कर्केचा मंगळ :** पंचम स्थानात जेव्हा चार हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'कर्केचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


मंगळ भाग्येश व धनेश असून पंचमात कर्केत येतो. कर्क ही बहुप्रसव रास आहे व तेथे मंगळ नीचक्षेत्री येतो. मंगळाचा नीचभंग झाला असला तरच ठीक असते. अन्यथा संततीच्या बाबतीत सुखी नसतो. स्त्री-जातका बाबतीत नीचगत मंगळ गर्भपात करवतो व त्यामुळे व्याधीही उत्पन्न होतात. शस्त्रक्रियाही कराव्या लागतात.

## कुंडली : स्त्री जातक

जन्म - सोमवार दि. ८ एप्रिल, १९६३ रोजी पुणे येथे सकाळी ५.३० प्र. वेळ.

अयनांश - २३° २०' २२", सांपातिक समय - १७ ता. ५८ मि. ०० सेकंद.

चंद्र महादशा भोग्य वर्षे ७ महिने ११ दिवस १३.




विवाह एप्रिल १९८५. पती लष्करातील. संतती एक मुलगी. भ्रमिष्ट झाली होती. चौथ्या मजल्याच्या गच्चीवरून मुलीसह उडी टाकून आत्महत्या केली. जन्म पौर्णिमेचा आहे. चंद्र कन्या राशीत आहे. त्याचा अधिपती बुध मेषेत आहे आणि मेषेचा अधिपती मंगळ कर्क राशीत आहे. त्याशिवाय बुधाचा राहू-केतूशी अंशात्मक केंद्रयोग आहे.

लग्नेशाच्या अष्टमात नेपच्यून असून त्याच्यावर मंगळ व शनी या दोघांची दृष्टी आहे. मानसिक शक्ती तृतीयेवर असते. शुक्र तृतीयेश असून व्ययात आहे. त्याचे व्ययात शनी आहे आणि शुक्रावर व शनीवर मंगळाची पूर्ण दृष्टी आहे. चंद्र स्वतः पापकर्तरीत आहे. एका बाजूस हर्षल, प्लूटो व दुसऱ्या बाजूस नेपच्यून आहे. शिवाय चंद्र शनीमध्ये १३५° चा अशुभ योग आहे. मनाचा कारक चंद्र अशा रीतीने बिघडला असून बुद्धीचा कारक बुध मेषेत राहू-केतूचे केंद्रात शिवाय शुक्रही बिघडला आहे. त्यामुळे मानसिक विकृती निर्माण झाली व त्या भरात आत्महत्या. दि. ४ जानेवारी, १९८८. मृत्युकाली राहू महादशा बुध भुक्ती गुरु अंतर.

**(५) सिंहेचा मंगळ :** पंचम स्थानात जेव्हा पाच हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'सिंहेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

पंचमावर सिंह ही वंध्या रास येते व लग्नेश पंचमात मित्रक्षेत्री असतो. सत्ता व संपत्ती मिळते. परंतु संततिसुख मिळण्याची शक्यता कमीच असते. मंगळाबरोबर रवी असता अगर गुरुची दृष्टी असता एखादा पुत्र होईल व त्याच्यापासून सुख लाभेल.

मेष, सिंह, धनु या अग्नितत्त्वाच्या राशी पंचम भाव मध्यावर असता जातक सरळ व खुल्या स्वभावाचा असतो. तो गैरमार्गाकडे जात नाही. भ्रष्ट होत नाही. त्याच्या स्वतःबद्दलच्या विशिष्ट कल्पना असतात (मोठेपणाच्या). स्वतंत्र वृत्तीचा असतो. दूषित नसता आयुष्यातील सुख-दुःखांना धैर्याने तोंड देतो. पण त्याच्या मनात खळबळ चालू असते. जातकाच्या स्वतःच्या अशा ठाम भावना असतात. भावना व वृत्ती तीव्र असतात. उत्साह असतो. महत्त्वाकांक्षी, ओजस्वी व स्फूर्तिदायक आणि कार्यरत असतो.

स्वतंत्रता हे अग्नितत्त्वाचे प्रमुख अंग आहे. त्याचा अतिरेक इतरांच्या दृष्टीने तापदायक ठरतो. तो निर्भीड असतो. कोणाची पर्वा करीत नाही. भावमध्य अग्नितत्त्वाच्या राशीत असता अथवा मंगळ पंचम भाव मध्यावर त्याचा प्रत्यय होतो. असा जातक जीवनाला धैर्याने तोंड देतो.


सिंह रास पंचम भाव मध्यावर असता जातकास दैवी दूरदृष्टी लाभलेली असते. प्रखर अग्नितत्त्व व्यक्तीस अंतःस्फूर्ती आणि बल देऊन कार्यप्रवृत्त करते.

## कुंडली : श्री. श्यामाप्रसाद मुखर्जी

जन्म - शनिवार दि. ७ जुलै, १९०१ रोजी कलकत्ता येथे रात्री १ वा. ४५ मि.

अक्षांश - २२° उत्तर ३३', रेखांश - ८८° पूर्व २४'

अयनांश - २२° २९' ११", सांपातिक समय - २० तास ४१ मि. २२ सेकंद.




तल्लख बुद्धिमत्ता. प्रथम क्रमांकाने M.A. उत्तीर्ण. बॅरिस्टर व LL.D. कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलगुरू, हंगामी सरकारमध्ये उद्योग व पुरवठामंत्री. अनुभवी प्रशासक, संसदपटू. जनसंघाचे संस्थापक.

दोन व आठ स्थानांत प्लूटो व हर्षल हे घातकी ग्रह प्रतियोगात व चंद्राचे केंद्रयोगात हे मृत्यूच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

येथे पंचम भावमध्य सिंहेच्या १९° ३७' वर आहे. अग्नितत्त्वाचा प्रकर्ष येथे आहे व त्यावर गुरुची पूर्ण दृष्टी नवमातून आहे. भाग्येश गुरु भाग्यात आहे व त्याच्याशी दशमेश शनीची युती आहे. हा मोठा राजयोग आहे व ती युती पंचमेश रवीच्या दृष्टीत आहे. रवि मेष नवांशांत आहे.

चतुर्थेश चंद्र लाभभावात कुंभेच्या २१° ३०' वर आहे. रवी-चंद्र अंशसाम्याने त्रिकोण-योग असून चंद्राच्या लाभात गुरु, शनी आहेत. हेच योग प्रखर व तल्लख बुद्धिमत्ता देणारे आहेत. गुरु-शनी युतीमुळे कायद्याचा अभ्यास. बॅरिस्टर व कायदा विषयात डॉक्टरेट मिळाली.

पंचमेश रवी-गुरुचे दृष्टियोगात व चंद्राच्या त्रिकोणयोगात म्हणून शिक्षणक्षेत्राशी संबंध येऊन कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलगुरु पद लाभले.

रवी व गुरु व शनी यामुळे ते राजकारणात उतरले व मंत्री झाले. गुरु-शनी नवमात जनसंघाची स्थापना केली. नवीन संस्था काढणे हे कार्य नवमस्थ गुरुचे आहे.

शेख अब्दुल्लांना विरोध करण्यासाठी, त्यांचे मनसुबे पाडण्यासाठी ते काश्मीरमध्ये गेले. श्यामाप्रसाद मुखर्जींना पकडून कैदेत ठेवले. तेथे त्यांचे हाल झाले व त्यांचा गूढ रीतीने मृत्यू झाला. दि. २३ जून, १९५३ रोजी मृत्यू झाला. अष्टमेश मंगळ पंचमात शनीच्या दृष्टीत आहे. शिवाय मंगळ-नेपच्यून केंद्रयोग आहे त्याशिवाय महत्त्वाची कारणे : द्वितीयेत प्लूटो, पंचमात मंगळ, नवमांश शनी आणि व्ययेश गुरु नवमात शनीच्या युतीत. यामुळे कारावास. शनी दशमेश त्यामुळे राजकीय कारणासाठी तुरुंगवास. अष्टमात हर्षल, त्यावर प्लूटोची व पंचमातून अष्टमेशाची अष्टमावर दृष्टी हे सर्व मृत्यूस कारण आहेत. चतुर्थेश चंद्र केंद्रयोग हर्षल व प्लूटो यामुळे घातपाताची शक्यता.

**(६) कन्येचा मंगळ :** पंचम स्थानावर सहा हा अंक येतो. तेव्हा तेथील मंगळाला 'कन्येचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

पंचमावर कन्या रास असते, मंगळ व्ययेश व सप्तमेश असून तो कन्या राशीत शत्रुक्षेत्री येतो. जातकास संतती होईल पण ती अल्पायुषी ठरते. कारण मंगळ जन्मकुंडलीचा व्ययेश व पंचमापासून अष्टमेश असतो. स्त्री-पुत्राबरोबर संबंध चांगले नसतात. कारण सप्तमेश मंगळ शत्रुराशीत येतो. भांडणे ओढवून घेतो. वैवाहिक सुख समाधानकारक राहत नाही.

जातकास पोटाचे विकार होतात. अपेंडिसायटिसची शस्त्रक्रिया होण्याची शक्यता असते. अल्सरसारखा विकारही होतो.


स्त्री जातकाच्या बाबतीत गर्भपात वा शस्त्रक्रियेने प्रसूती असे त्रास होतील. गुरुचा शुभयोग असल्यास हे टळू शकते.

## कुंडली : श्री. पुरुष जातक

जन्म - बुधवार दि. ९ ऑगस्ट, १९३३ रोजी पुणे येथे रात्री १.४० प्र. वेळ.

अक्षांश - १८° उत्तर ३०', रेखांश - ७३° पूर्व ५८'.

अयनांश - २२° ५५' ५६", सांपातिक समय - २२ ता. १३ मि. २९ सेकंद.




मंगळ सप्तमेश असून तो पंचमात शत्रुक्षेत्री आहे. पत्नी कारक चंद्र हर्षलचे युतीत व चंद्राचा सप्तमेश बुध (वक्री) याचे केंद्रयोगात आहे. त्यात भर विवाहसुखाचा कारक ग्रह शुक्र-नेपच्यूनच्या युतीत चतुर्थात आहे. यामुळे प्रथम पत्नी लवकर वारली. दि. १८/८/६४ रोजी. दुसरा विवाह पण तोही असमाधानी. शुक्र नेपच्यून युती विवाहाच्या दृष्टीने चांगली नसते.

(७) **तुळेचा मंगळ** : पंचम स्थानावर सात हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'तुळेचा मंगळ' असे म्हणतात.

पंचमावर तूळ रास असते. मंगळ षष्ठेश व लाभेश असतो. संतती लवकर होत नाही. पहिली संतती लवकर जाते. अल्पायुषी असते. औषधोपचार करावे लागतात. स्त्री-जातकास मासिक पाळीचे त्रास होतात. मंगळाची अष्टमावर, एकादशावर व द्वादशावर दृष्टी येते. शुक्राशी युती वा अन्य अशुभ योग असता विभक्त राहणे, घटस्फोट असे प्रकार होतात. मंगळाच्या अष्टमावरील दृष्टीमुळे शस्त्रक्रिया होतात.

## कुंडली : श्रीमती विजया

जन्म - गुरुवार दि. २१ नोव्हेंबर, १९४० रोजी जुन्नर येथे रात्री ९.३० प्र. वेळ.

अक्षांश - १९° उत्तर १२', रेखांश - ७३° पूर्व ५८.


अयनांश - २३° २' ३", सांपातिक समय - ० ता. ५८ मि. १ से.

विवाह - २४/१२/१९५८.

१ कन्या - २१/१२/१९६२; २ कन्या - १३/१०/१९६३.

विभक्त १९६४-६५. घटस्फोट.

पहिली कन्या मृत ४/१२/१९६९. विभक्त झाल्यावर नर्सिंगचे शिक्षण. नंतर नर्स म्हणून सिव्हिल हॉस्पिटल व रेल्वे हॉस्पिटल.




लग्नेश बुध पंचमात तुळेत : दोन कन्या संतती झाली.

जवळच मंगळ-पंचमेश शुक्राच्या युतीत पहिली मुलगी मृत १९६९.

दुसरी मुलगी - तिचा विवाह १/१/१९८६ तिलाही संतती आहे.

पंचमावर व पंचमेशावर मंगळाचा प्रभाव म्हणून पहिली कन्या अल्पायू. पतिकारक रवीचा नेपच्यूनशी केंद्रयोग व हर्षलशी प्रतियोग आहे. शिवाय सप्तमेश गुरु-शनीचे युतीत. शनी अष्टमेश आहे आणि शुक्र-मंगळ युती. यामुळे मतभेद विकोपास गेले. जातकाचे हाल झाले. तिला सासरी बंधनात राहावे लागे. नवरा घरास कुलूप लावून जात असे. पुढे घटस्फोट.

दशम बिंदूशी चंद्राचा त्रिकोण आहे. दशमावर मीन रास व जवळ केतू. इस्पितळाशी संबंध. धनेश चंद्र शुश्रूषेचा व्यवसाय व त्यातून धनलाभ दर्शवितो. म्हणून नर्सची नोकरी.

**(८) वृश्चिकेचा मंगळ :** पंचम स्थानावर आठ हा अंक येत असेल तेव्हा तेथील मंगळाला 'वृश्चिकेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

पंचमावर वृश्चिक रास येते. मंगळ पंचमेश व दशमेश असून पंचमात स्वगृही येतो. मंगळ हा राजयोगकारक असल्याने जातकास जमीनजुमला व स्थावरच्या खरेदी-विक्रीस चांगला ठरतो. पण संततीच्या बाबतीत सुदैवी नसतो. स्वभावाने तापट व उग्र असतो.

कामवासना जास्त असते. विवाहबाह्य संबंध असतात. संतती होते. कन्या व पुत्र दोन्ही होतात. पण पत्नी व संततीशी बेबनाव असतो. दारूचे व्यसन असते.


## कुंडली : श्री. वल्लभ चांडक

जन्म - शुक्रवार दि २८ मे, १९३७ रोजी सोलापूर येथे सकाळी ९.२३ प्र. वेळ.

१७° उत्तर ४०' ७५° ५४' पूर्व.

अयनांश - २२° ५९' १६", सांपातिक समय - १ तास १७ मि. ६ सेकंद.

जन्मकाळी शुक्र महादशा भोग्य वर्षे १८ म. ३ दि. ९.




प्रसिद्ध व श्रीमंत घराण्यात जन्म. स्वतःचा यंत्रमागाचा कारखाना. स्वतःची स्थावर. एक पुत्र. तो यशस्वी बिल्डर. कन्या संततीही आहे. पत्नीही मोठ्या घराण्यातून आलेली.

राजस्थानात कामानिमित्त गेला असता हृदयक्रिया बंद पडून मृत्यू.

पंचमावर वृश्चिक रास. तेथे मंगळ, त्याचा गुरुशी लाभयोग व शनीशी त्रिकोण योग असून मंगळाची अष्टमावर दृष्टी, लाभस्थ रवीवर दृष्टी आहे. रवी वृषभेत १३° २४' केंद्रयोग नेपच्यून-सिंहेत २३° १२' आणि प्रतियोग मंगळ वृश्चिक २° २५' आणि राहू वृश्चिक २२° ४५. अष्टमेश शनीची रवीवर दृष्टी व चंद्रावर दृष्टी. यामुळे हृदयविकार. मृत्यूच्या वेळी राहूच्या महादशेत शनीची अंतर्दशा चालू होती. लग्नेश चंद्र षष्ठात त्याचे व्ययात राहू व चंद्र शनीच्या दृष्टीत.

**(९) धनुचा मंगळ** : पंचम स्थानावर नऊ हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'धनुचा मंगळ' असे म्हणतात. त्यांचे फल पुढीलप्रमाणे -


पंचमात धनु रास येते. मंगळ चतुर्थेश व भाग्येश असा राजयोगकारक असून पंचमात धनु राशीस मित्रक्षेत्री येतो. जातकास उत्तम व पराक्रमी आणि आज्ञाधारक पुत्र होतात. जातक आपल्या कर्तबगारीवर नावलौकिक मिळवितो. कीर्तिवंत होतो.

## कुंडली : श्री. बंडप्पा बाबुराव फुंडीपल्ले

जन्म - गुरुवार दि. २ डिसेंबर, १९४८ रोजी अष्टा कासार, ता. उमरगा येथे रात्री ११.४५ प्र. वेळ.

अक्षांश - १८° उत्तर, रेखांश - ७५° ५३' पूर्व.

अयनांश - २३° ८' २९", सांपातिक समय - ४ तास ६ मि. ५९ सेकंद.




जातक B. Com असून LL. B. चे पहिले वर्ष करून पुढील शिक्षणाचा नाद सोडून दिला. जातक बुद्धिमान आहे. त्यास वाचनाची आवड आहे. त्याचे स्वतःचे मोठे ग्रंथालय आहे. वडिलार्जित शेती असून स्वतःही शेतजमीन घेतली आहे. M. I. D. C. मध्ये जागा घेऊन तेथे कारखाना व स्वतःचे घर बांधले आहे. जातकाने सुरुवातीस बँकेत नोकरी केली. ती सोडून यंत्रमागाच्या व्यवसायात प्रवेश केला. M. I. D. C. त जागा घेतल्यावर तेथे कारखाना हलविला. स्वयंचलित यंत्रमाग बसविले असून टर्किश टॉवेल्सचे उत्पादन करून त्यांची निर्यात ऑस्ट्रेलियास व अन्य देशात केली जाते.

जातकास समाजकार्याची आवड आहे. रोटरी क्लबचे सदस्य असून त्यातील पदाधिकारी पद भूषविले आहे. परदेश प्रवासही केला आहे. धार्मिक असून पंढरीची वारी कधी चुकवित नाही. तत्त्वज्ञानाचा अभ्यास आहे. त्याविषयीचे उत्तम ग्रंथ संग्रहात आहेत.

आपल्या भावंडांनाही त्याने मदत केली आहे. पत्नी स्वभावाने चांगली असून पुत्रसंतती आहे. मुलेही स्वभावाने चांगली व शिक्षणातही पुढे आहेत. त्यांना उत्तम वळण लावले आहे. जातक सोलापुरात मान्यवर आहे. स्थावर आहे तशी मोटारकारही आहे.

बोलणे गोड, आर्जवी व लाघवी आहे. वक्तृत्व आहे.

सप्तमेश शनीची सप्तमावर दृष्टी आहे. तशीच शुक्रावर व दशमावरही दृष्टी आहे. शुक्र कुंडलीचा दशमेश असून तृतीयेत तूळ राशीत स्वगृही आहे. त्याचा शनीशी लाभयोग आहे तसाच पंचमातील चंद्र-मंगळ-गुरुशीही लाभयोग आहे.

दशमेश शुक्रामुळे कापडाचा व्यवसाय आहे. शनी-मंगळ त्रिकोण योगामुळे यंत्रमागाचा कारखाना काढला आहे.

चंद्र-मंगळ युती लक्ष्मीदायक आहे. तीही लाभली आहे. पंचमात पंचमेश गुरु, भाग्येश व चतुर्थेश मंगळ चंद्रासह असणे हा मोठा योग आहे.

बुध धनेश व लाभेश आहे. तो लग्नेशासह चतुर्थात आहे. लग्नेश रवी चतुर्थात उभयचरी योगात आहे. चतुर्थातील लग्नेश रवी-धनेश-लाभेश बुधासह आहे. त्यामुळे स्थावर व वाहन यांचा लाभ आहे.

''सिंह लग्नेतु जातस्य तृतीयस्थो भृगुश्शुभः'' हे भावार्थ रत्नाकरमधील विधान येथे पूर्णपणे लागू पडते. तृतीयेत स्वराशीचा शुक्र शुभ फलदायी असतो.

पंचमेश गुरु पंचमात योगकारक मंगळाच्या व चंद्राच्या युतीत आहे. त्यामुळे पंचमस्थ मंगळाची संततीबद्दलची अशुभ फले मिळत नाहीत व मिळाली नाहीत. कारको भावनाशकः हे पंचमस्थ गुरुचेही फल अनुभवास आले नाही.

वयाच्या ३२ वर्षांनंतर त्यांचे रूप पालटले. त्याअगोदर केलेल्या कष्टांची फले मिळावयास लागली व ३९ व्या वर्षांच्या सुमारास जातकाचे बस्तान नीट बसले.

शनी शुक्र-मंगळ यांच्यामधील शुभयोगामुळे यंत्रमागाचा व स्वयंचलित यंत्रमागाचा कारखाना उभा राहिला.

क्षितिजाखाली बहुसंख्य ग्रह असल्याने आयुष्यात पूर्वार्ध कष्टाचा जातो पण उत्तरार्ध यशस्वी होतो.

**(१०) मकरेचा मंगळ :** पंचम स्थानावर दहा हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'मकरेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


पंचमावर मकर रास येते. मंगळ तृतीयेश व अष्टमेश असून पंचमात मकरेत उच्च क्षेत्री येतो. भावंडे व मित्र यापासून फायदा होतो. जातक दीर्घायू होतो. पण मंगळाच्या अष्टमेशत्वामुळे संतती अल्पायू ठरते.

### कुंडली : श्री. हेमंत श्रीधर साठे

जन्म - गुरुवार दि. ३ मार्च, १९६० रोजी सोलापूर येथे रात्री ८.१५ मि. प्र. वेळ.

अक्षांश - १७° उत्तर ४२', रेखांश - ७५° पूर्व ५४.

अयनांश - २३° १८' १", सांपातिक समय - ६ ता. ३१ मि. ५७ सेकंद.




वर्ण गोरा, उंचीने बुटका आहे. शैक्षणिक प्रगती उल्लेखनीय होती. पहिला क्रमांक कधी सोडला नाही. एम. डी. सुद्धा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण, बालरोगतज्ज्ञ. पत्नीही बालरोगतज्ज्ञ. सुखी वैवाहिक जीवन. संतती दोन. मोठी मुलगी, धाकटा मुलगा. स्वतःचे हॉस्पिटल चालवितो. जातकास २ लहान भावंडे : एक बहीण, एक भाऊ. पंचमात मंगळ उच्च. भाग्येश शुक्रासह आहे. चतुर्थेश चतुर्थात. पंचमेश शनीसह आहे. यामुळे शिक्षणाचा कालावधी व शैक्षणिक कारकीर्द वाखाणण्यासारखी झाली. लग्नेश बुध मीनेत आहे.

रवीचा दशमाशी त्रिकोण असून गुरुची पूर्ण दृष्टी, शनीचीही दृष्टी असून नेपच्यूनचाही दशमाशी व रवीशी त्रिकोण आहे. व्यवसायात यश आहे. त्याची वृद्धी व समृद्धी आहे.

तृतीयेश उच्च आहे. भावंडेही चांगली आहेत.

पंचमात शुक्र (भाग्येश) व मंगळ यामुळे कन्या व पुत्र चांगले व हुशार आहेत.

**(११) कुंभेचा मंगळ :** पंचम स्थानावर अकरा हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'कुंभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

पंचमात कुंभ रास असते. तेथे मंगळ शत्रुराशीत येतो. जातकाचा विवाह लवकर होत नाही. प्रेमात फसगत होते. त्यामुळे नैराश्य येते. संतती होते पण पत्नी वा संततीपासून विभक्त राहण्याची पाळी येते.

स्त्री-जातकीचे बाबतीत मासिक पाळी विलंबाने सुरू होते. वैवाहिक भागीदार थंड प्रकृतीचा असतो.


मिथुन, तूळ व कुंभ या वायुतत्त्वाच्या राशींची मनोवृत्ती अगदी निराळी असते. या तत्त्वात हेतूपेक्षा वर्तन, विचार व भावनापेक्षा कृती याशी संबंध जास्त असतो. अशा जातकाचे वैशिष्ट्य म्हणजे जीवनातील साध्यासुध्या (प्रसंगी क्षुल्लकसुद्धा) गोष्टीची आवड,

विनम्र स्वभाव आणि गरीब स्वभाव असतो. तूळ पूर्णपणे व्यवहारी, कुंभ नेहमीच्या गोष्टीकडे दुर्लक्ष (उच्चतेकडे ओढा), मिथुन या दोन्ही टोकाचा सुवर्णमध्य साधणारी आहे. धूर्त व दूरदृष्टी असून बहुधा तत्त्वज्ञ असतात. अनेक प्रसंगांत थंड व शांत राहण्याचे कसब असते. परंपरा पाळणारे, प्रचलित कायदे, तत्त्वज्ञान व धर्मतत्त्वे यांना चिकटून असतात. संयम व शिस्त हा मोठा गुण या व्यक्तीजवळ असतो. कुंभ व्यक्ती आयुष्याकडे जास्त गांभीर्याने पाहत असते. वस्तुस्थितीचा विचार सुटत नाही.

### कुंडली : श्रीमती

जन्म - शुक्रवार दि. २४ जानेवारी, १९१९ रोजी रात्री ११. ३५ स्था. वेळ.

अयनांश - २२° ४३' ५३", सांपातिक समय - ७ ता. ४७ मि. ५६ सेकंद.




श्रीमंत व खानदानी घराण्यात विवाह सामाजिक कार्याची आवड. संगीतप्रेमी. उत्तम गाणे गाते. भजनी मंडळाचे कार्यक्रम होत राहतात. बालसुधारगृहावर काम केले आहे. भली मोठी मालमत्ता व थिएटर होते. पती दुर्बल शरीराचा होता. निपुत्रिक. संतती झालीच नाही. पंचमात मंगळ-हर्षल युती प्रतियोग शनी. चंद्र शुक्र केंद्रयोग. चंद्र त्रिकोण गुरु. संगीत कला अवगत.

**(१२) मीनेचा मंगळ :** पंचम स्थानावर बारा हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'मीनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

पंचमात मीन रास येते. मंगळ षष्ठेशही असतो व तो पंचमात. मीनेत मित्रक्षेत्री येतो. येथे मंगळ असला तरी संतती होते. संततीसाठी मीन रास बहुप्रसव असते आणि ही रास बरीच संतती देते. संततीपैकी एखादी अल्पायुषी ठरते.

कर्क, वृश्चिक, मीन या जलतत्त्वाच्या राशींमध्ये समतोल सांभाळणे ही मुख्य वृत्ती असते. जातक सहनशील, निष्पक्षपाती, तारतम्य व सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न करतो. मनोवृत्ती शांत व चिकाटीचे प्रयत्न करणारी असते. मीन रास पंचमात असणारी व्यक्ती अस्थिर व चंचल असली तरी कल्पनाशक्ती चांगली असते. स्वभाव Resourceful असतो तसेच गर्विष्ठ व मानी असतो.

### कुंडली : श्री. पुरुष जातक


जन्म - मंगळवार दि. ८ मार्च, १९२१ रोजी पुणे येथे रात्री १२ वा. ३ मि.

अक्षांश - १८° ३०' उत्तर, रेखांश - ७३° पूर्व ५८'.

अयनांश - २२° ४४' ४६", सांपातिक समय - १० ता. २८ मि. ४५ सेकंद ENT.

क्रांत्या

| चंद्र | रवी | बुध | शुक्र | मंगळ | गुरु | शनी | हर्षल | नेप. | राहू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ५ | ५ | १५ | ६ | ७ | ५ | ९ | १७ | ११ |
| ६ | १६ | ५२ | ४२ | २७ | ४९ | २७ | ५३ | २३ | २४ |




वैशिष्ट्य - ६ ग्रह चतुर्थ व दशम केंद्रात असून ते सर्व महत्त्वाचे आहेत. रवी-बुध समक्रांती, चंद्र-हर्षल समक्रांती, रवी-शनी विरुद्ध क्रांती. शनी भावसंधित आहे. बुध-हर्षल चतुर्थ भावबिंदूवर आहेत.

चतुर्थात ४ ग्रह व त्याच्या अष्टम व व्यय भावातील ग्रहांचा त्रिकोण योग आहे. विद्येसाठी उत्तम ग्रहयोग आहेत. जातक उच्च विद्याविभूषित आहे.

लग्नेश मंगळ पंचमात मीन राशीत असून त्याचा नेपच्यूनशी त्रिकोण योग आहे. मंगळाची दृष्टी अष्टमस्थान, लाभस्थान व व्ययस्थानावर आहे. मीन रास ही दवाखाने, इस्पितळे यांचीही द्योतक आहे.

भाग्यात नेपच्यून कर्क राशीत आहे. व्ययेश शुक्र षष्ठात केतूयुक्त आहे व त्याची व्ययस्थानावर दृष्टी आहे. शुक्र-केतू यांचा दशमाशी त्रिकोण योग आहे. बुध अष्टमेश व लाभेश आहे. लाभस्थानची कन्या रास ही रोग बरे करणाऱ्यांचीही रास आहे. दशम बिंदू केतूच्या नक्षत्रात आहे.

दशमेश रवी व केतू हे वैद्यकीय व्यवसाय दर्शवितात. रवी जीवशास्त्र, चंद्र शुश्रूषाशास्त्र व औषधीशास्त्र दर्शवितात. बुध हा रोग बरे करणारा हीलर आहे. बृहत्संहितेत भिषक् = वैद्य बुधाचेच अमलाखाली येतात असे सांगितले आहे. वैद्यकशास्त्राचे उच्च शिक्षण झाले आहे व वैद्यक हा प्रमुख व्यवसाय आहे.


गुरु धनेश दशमात बुधाचे प्रतियोगात आहे हे दोन्ही ग्रह अध्यापन कार्यही दर्शवितात. वैद्यकीय महाविद्यालयात अध्यापनही करतात.

जातक M.B.B.S. व E.N.T. Specialist आहे. गुरु उजवा कान, शनी डावा कान, वृश्चिक व मंगळ नाक आणि शुक्र व वृषभ रास घसा दर्शवितात.

६

# षष्ठम भाव

सोबतच्या कुंडलीमध्ये ज्या ठिकाणी सहा हा अंक लिहिलेला आहे. त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीमधील 'षष्ठम स्थान' किंवा 'षष्ठम भाव' असे म्हणतात.




या स्थानावरून जातकास होणारे आजार, त्यास असणारे शत्रू, त्यास होत असलेली झालेली कर्जे, देणी, चोरीमुळे नुकसान, नोकर-चाकर व जातकास उदरनिर्वाहासाठी करावी लागणारी नोकरी यांचा विचार करावयाचा असतो.

नातेवाइकांपैकी मामा व मावशा यांचा विचार होतो.

शरीरावयवांपैकी पोटातील आतडी, अपेन्डिक्स, शरीराच्या बाजू, कुक्षी यांचा प्रामुख्याने विचार होतो.

कोणत्याही कुंडलीतील सहा, आठ, बारा ही स्थाने दुःस्थाने असतात. लग्नेश या स्थानात असता तो दुर्बल, आजारप्रवण, अपघातप्रवण व स्वतःच स्वतःच्या नाशाला कारणीभूत होणाऱ्या क्रिया (12th house - a house of self-undoing) करणारा असतो. या तऱ्हेचे अशुभत्व या स्थानांचे असते. तसेच या स्थानांचे अधिपती ज्या भावात असतात त्या भावाने दर्शविल्या जाणाऱ्या फलात अशुभत्व निर्माण होते, उणेपणा असतो व त्या फलांचे नुकसान ऱ्हास नाश होत असतो. म्हणून ही तीन स्थाने दुःस्थाने म्हणून गणली जातात.

सर्वसाधारण नियम असा की, शुभ ग्रह ज्या भावात असतात त्या भावाच्या शुभ फलांची वृद्धी होते. पण पापग्रह ज्या भावात असतात त्या भावोक्त फलांचा नाश होतो. परंतु ६, ८, १२ ही दुःस्थाने आहेत. सहाव्या स्थानात शुभ ग्रह असता ते शत्रू नाहीसे करतात तर पापग्रह शत्रू वाढवितात. आठव्यात शुभ ग्रह आयुष्य वाढवितात तर अशुभ ग्रह आयुष्य कमी करतात आणि १२ व्यात शुभ ग्रह खर्च कमी करतात वा चांगल्या कामासाठी खर्च करतात. उदा., दानधर्म वगैरेंसाठी खर्च. पण अशुभ ग्रह पैशाचा चुराडा करतात, अनाठायी खर्च वा उधळपट्टी करतात.

६ व्या स्थानावरून शत्रूंचा विचार होतो. त्याबद्दल सारावलीत असे सांगितले आहे की, ''रिपुभावे क्षितिसुनूर्मन्देन निरीक्षतो दिशति शत्रून् । शुभयुक्तः शुभदृष्टः शत्रूभयं चैव नात्यन्तम् ।।'' - म्हणजे षष्ठात मंगळ असून तो शनीच्या दृष्टीत असता जातकास शत्रूपासून त्रास होतो. शत्रूंचे भय असते; परंतु शुभग्रह षष्ठात असता अथवा त्यांची दृष्टी षष्ठावर असता शत्रूंचे भय नसते.

आणखी काही पूर्वाचार्यांच्या मतानुसार जातक बलवान शत्रूलाही नामोहरम करतो; परंतु तो भावेश व मातुलपक्षीयास अशुभ ठरतो. जातकास मिळालेली वडिलार्जित मालमत्ता त्याच्या हातातून जाते (चतुर्थाचा षष्ठस्थानाशी संबंध -मातेला व स्थावराला अनिष्टकारक) पण तो अल्पावधीत स्वतःची मालमत्ता कमावतो व संपत्ती मिळवितो. जातक संपत्तिमान व सुखी असतो. जातक प्रसिद्ध होतो. पराक्रमामुळे आपल्या कुलामध्ये श्रेष्ठ होतो. २७ व्या वर्षी कन्या होते. परंतु त्यास नंतर संततिशोकही होतो.

स्त्री-जातकाच्या बाबतीत ती निरोगी असते, तिचा पती चांगला असतो.

मंगळास ३, ६, १०, ११ ही स्थाने अनुकूल असतात, पण २, ८, १२ ही स्थाने प्रतिकूल असतात. तिसरे स्थान हे पराक्रम स्थान व ६ वे स्थान हे शत्रूस्थान आहे. मंगळाच्या पराक्रमास प्रतिस्पर्धी शत्रू असावेच लागतात तरच त्याचे पराक्रम व धाडस हे गुण उठून दिसतात. म्हणूनच मंगळ षष्ठस्थानी शत्रुहंता होतो. ते त्याचे भूषणच !!

षष्ठम स्थानावरून हाताखालचे नोकर-चाकर यांचाही विचार होतो. नोकर-चाकर विश्वासू असले तरच उद्योग-व्यवसायात बरकत होते, यशप्राप्ती होते.

षष्ठम स्थानचा संबंध नोकरीशी येतो. षष्ठ स्थान हे २, ६, १० या अर्थत्रिकोणांपैकी एक असून कर्मस्थानचे भाग्यस्थान आहे. स्वतंत्र व्यवसायाला साहाय्यभूत अशा विश्वासू कर्मचाऱ्यांचा विचार या स्थानावरून होतो, तर दशम स्थानावरून वरिष्ठ अधिकारी दर्शविले जातात. अशा वरिष्ठांना साहाय्यभूत होण्यास कनिष्ठ श्रेणीची आवश्यकता असते. कनिष्ठ नोकरीत शिरून आपल्या गुणांनी व कर्तबगारीने स्वतः वरिष्ठ होतो व अधिकार पदावर जातो. हे षष्ठ स्थान लग्न, भाग्य व दशम यावरून जाणावयाचे असते. म्हणून नोकरीचाही विचार षष्ठस्थानावरून होतो.

षष्ठस्थानी मंगळ असलेला जातक मेहनत, श्रम करण्यात मागे-पुढे पाहत नाही. स्वतंत्र धंदा करणारेसुद्धा सुरुवातीस नोकराप्रमाणेच राबतात, कष्ट करतात तेव्हाच ते मोठे होतात. षष्ठस्थानातील मंगळ अशुभ संबंधित असता हाताखालील कारागीर वा नोकर प्रमाणिक मिळत नाहीत.

अशुभ संबंधातील मंगळ मातुलपक्षाबरोबरील संबंध बिघडलेले दर्शवितो.

मंगळ षष्ठस्थानात असून त्यावर शनीची दृष्टी असता जातकास शत्रूपासून भय असते, पण षष्ठात मंगळाबरोबर शुभ ग्रह असता वा शुभ ग्रहांची दृष्टी मंगळावर असता जातकास

शत्रूंचे भय नसते. षष्ठातील मंगळ शत्रुहंता असतो. यास अपवाद फक्त शनीची दृष्टी हा आहे. - इति सारावली - अध्याय ३४, श्लोक ४३.

शेती, बागाईत मळे वगैरे जमिनीसंबंधी व्यवसाय करणाऱ्या जातकास षष्ठस्थ मंगळ चांगले फल देतो. मंगळ भूमिपुत्र आहे व भूमिकारक आहे. तेव्हा येथील मंगळ शेतीवाडी, स्थावरसंबंधी व्यवसायास चांगला असतो. गुरेढोरे, बैल, गाई यांची समृद्धी होते.

षष्ठस्थानी मंगळासारखा पापग्रह शनी, हर्षल, राहू यांच्या अशुभ योगात असता सप्तम स्थानही बिघडते. पती/पत्नीचा मृत्यू होतो.

षष्ठस्थान हे जातकास होणाऱ्या व्याधी, आजार यांचे निदर्शक आहे. षष्ठातील मंगळ अशुभ दुष्ट वा अशुभ संबंधित असतानाच आजार होतात.

आजार, व्याधी यांचा विचार करताना निसर्गकुंडलीतील षष्ठस्थानदर्शक कन्या राशीचाही विचार करावा लागतो.

## मंगळ आणि व्याधी

मंगळाच्या अमलाखाली नाक, जननेंद्रिये, गुदद्वार, स्नायुबंध व शरीरांतर्गत रक्त व पित्त येतात.

षष्ठस्थ मंगळाच्या राशिस्थितीवर कोणत्या अवयवासंबंधी विकार, आजार, व्याधी होतात हे अवलंबून असते. त्याची तीव्रता वगैरे रवी आणि चंद्र यांच्या राशी स्थिती, कुयोग यांवर आणि षष्ठस्थ मंगळावर असलेल्या दृष्टियोगावर अवलंबून असते.

मंगळाने दर्शविले जाणारे आजार दाह, सूज, तीव्र ताप, शस्त्राच्या जखमा, भाजणे, पोळणे, नाकाचे विकार स्नायूंच्या तक्रारी, जननेंद्रियांच्या तक्रारी, रक्तस्राव (अंतर्गत वा बहिर्गत), भगंदर, रक्तवाहिन्या फुटणे, साथीचे व संसर्गजन्य रोग, देवी, गोवर, कांजिण्या, प्लेग, उच्च रक्तदाब, तीव्र वेदना, उष्णता, क्षते, खुपऱ्या, फाटणे, भेगा पडणे, काळपुळी गळवे, लोहित ज्वर (Scarlet Fever), मेंदूचे ज्वर, विषमज्वर, अंतर्गत उष्माघात, मेनिन्जायटिस, आतड्याला भोके पडणे, लघवीची जळजळ, आंत्रपुच्छदाह (Appendicitis), लोखंड, स्टील वगैरेंमुळे झालेल्या जखमा, स्फोटाने झालेल्या जखमा, गर्भपात.

## षष्ठमस्थ मंगळाची राशीनिहाय भावफले

**(१) मेषेचा मंगळ** : षष्ठम स्थानात जेव्हा एक हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'मेषेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ षष्ठेश असतो व तो षष्ठात स्वगृहीचा असतो. शारीरिक व्यंग वा दोष असतो. मूळव्याधीसारखे आजार होतात. डोकेदुखी, मेंदूत रक्तस्राव, मस्तकास दुखापत, मार लागणे, निद्रानाश आणि उष्णतेचे विकार होतात. कृत्तिका नक्षत्रात असता उष्णतेचे विकार, नाकातून रक्त येणे. जातक शत्रूवर विजय मिळवतो.


## कुंडली : श्रीमती नंदिनी सत्पथी

जन्म - सोमवार दि. ९ जून, १९३० कटक येथे सायं. ५.३० वाजता.

अक्षांश - २०° उत्तर, २८'          रेखांश - ८५° पूर्व ५४

अयनांश - २२° ५३' ११"          सांपातिक समय - १० ता. ५२ मि.

ओरिसा मुख्यमंत्री. १९७२-७३, ७४-७६; राज्यसभा सदस्य १९६२-७२; ओरिसा आमदार १९७२. लघुकथा लेखक, संपादक. काँग्रेसमध्ये मानाच्या जागा, नंतर जनता दलात.




दशमेश रवी सप्तमकेंद्री असून त्याची दृष्टी लग्नावर आहे. या योगावर राजकारण - प्रत्यक्ष मंत्रिपदे भूषविली. रवी लाभयोग हर्षल. भाग्येश चंद्र लग्नी, सप्तमस्थ बुधाच्या दृष्टीत. चंद्र-बुध शुभयोगावर लघुकथा लेखन व वर्तमानपत्राचे संपादक.

लग्नेश मंगळ मेषेत असून त्याचा दशम बिंदूशी त्रिकोण योग आहे. मंगळ-राहू षष्ठात एकत्र शनी त्रिकोण दशम बिंदू.

येथे मंगळ दशमाच्या भाग्यात येतो व रवी दशमाच्या दशमात येतो.

**(२) वृषभेचा मंगळ :** षष्ठम स्थानात जेव्हा दोन हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'वृषभेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

षष्ठावर वृषभ रास येते. मंगळ पंचमेश व व्ययेश असतो व षष्ठात शुक्राच्या राशीत येतो. संततीपासून सुख लाभत नाही. कर्जाचा बोजा, कोर्टकचेऱ्यांचा त्रास आणि खर्च याने जेरीस येतो. पण अशा वेळी मंगळ दूषित असावा लागतो. मंगळ गुरुच्या दृष्टीत असता वरील अशुभ फले मिळत नाहीत. जातक नोकरीच्या माध्यमातून उच्च पदास चढतो.

शनीबरोबर असता अथवा त्याचा अशुभ योग असता प्रथम दिलेली अशुभ फले मिळतात.

मंगळ व्ययेश असतो व तो षष्ठात असता हर्षयोग होतो असे म्हणतात. पण त्याच वेळी शुक्र व्ययात व षष्ठात असता चांगले असते. अष्टमेश चंद्र षष्ठात असता तो उच्च राशीत येतो व हा विपरीत राजयोग होतो.


मंगळाचे आजार- डिप्थेरिया, टॉन्सिलचे विकार, त्यावर शस्त्रक्रिया, स्वरयंत्रास सूज व दाह. मूत्रनलिकेत खडे असे त्रास होतात.

### कुंडली : न्यायमूर्ती श्रीनिवास गौ. मुतालिक

जन्म - सोमवार दि. १८ जून, १९३४ रोजी सातारा येथे सायंकाळी ७.२५ प्र. वेळ.

अक्षांश - १७° उ. ४१',          रेखांश - ७४° पूर्व.

अयनांश - २२° ५६' ४३"       सांपातिक समय -१२ ता ३६ मि. १८ से.




सातारा येथील सुप्रसिद्ध वकील, न्यायखात्यात प्रथम अतिरिक्त - जिल्हा न्यायाधीश कोल्हापूर येथे. नंतर सोलापूर, अकोला व पुणे येथे जिल्हा न्यायाधीश म्हणून उत्तम काम केले व पुणे येथूनच ते मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून घेतले गेले. तेथून निवृत्त झाल्यावर औरंगाबाद येथे स्थायिक झाले. लग्नेश दशमात दशम बिंदूजवळच पंचमेश मंगळ षष्ठात. मंगळ गुरु त्रिकोण योग आहे. भाग्येश रवी सप्तमात त्रिकोण शनी व लाभयोग हर्षल. भाग्यस्थानात चंद्र असून त्याच्या श्रवण नक्षत्रात द्वितीयेत राहू. मंगळ षष्ठात, राहू द्वितीयेत व गुरु दशमात असा हा महात्रिकोण पूर्ण आहे. शिवाय षष्ठेश व लाभेश शुक्र चतुर्थात उच्च राशीत गुरु-शुक्र प्रतियोग आहे. न्यायखात्यात जाण्यासाठी गुरु प्रभावी लागतो. तो येथे आहे. शिवाय सरकारी नोकरीसाठी रवी केंद्रात आहे.

पंचमेश मंगळ गुरुच्या दृष्टीत आहे. संतती चांगली. संततीसौख्य चांगले लाभले. चतुर्थात उच्चांशाच्या निकट असलेला शुक्र याने अभिनय कला दिली व शाळा-कॉलेजमध्ये नाटकातही काम केले. न्यायाधीश या नात्याने कामाचा झपाटा मोठा होता.

**(३) मिथुनेचा मंगळ :** षष्ठम स्थानात जेव्हा तीन हा अंक येतो तेव्हा त्याला 'मिथुनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

षष्ठात मिथुन रास. मंगळ चतुर्थेश व लाभेश असून षष्ठात शत्रुक्षेत्री येतो. स्थावर मालमत्तेसंबंधी कोर्ट खटल्यांना तोंड द्यावे लागते; पण अंतिमतः यश मिळते. लाभेश मंगळ बुधाबरोबर असता जातक यशस्वी वकील होतो. बुध येथे षष्ठेश तसा भाग्येशही असतो आणि भाग्येश व लाभेश यांचा योग उत्तम धनलाभ मिळवून देतो. जातक सर्वसाधारणपणे निरोगी असतो. शुक्र योगकारक असतो. दशमेश ठीक असता व्यवसायात उत्तम यश मिळते.

आजार-संधिवात, फुप्फुसांचा दाह, ब्रॉन्कायटीस, न्यूमोनिया वगैरे विकार होतात. अपघातात हात मोडणे, खांद्यास दुखापत होणे वगैरे प्रकार होतात.


व्ययस्थान व नवम स्थान यावर दृष्टी येते. त्यामुळे असलेले भाग्य नंतर नाहीसे होते. गुप्त शत्रूंचा ससेमिरा, कर्जफेडीचा तगादा यात धननाश होतो.

## कुंडली : श्री. बाबुराव पारखे

जन्म - शुक्रवार/शनिवार दि. १४/१५ एप्रिल, १९१२ रोजी अक्कलकोट येथे पहाटे १.३० प्र. वेळ.

अक्षांश - १७° ३१'  रेखांश - ७६° पूर्व १५'

अयनांश - २२° ३७' ५०",  सांपातिक समय -१४ ता. ३५ मि. २७ से.




प्रसिद्ध उद्योगपती, दानशूर, उपासक-दशमेश शुक्र तृतीयेत उच्च राशीत व तूळ नवांशात. भाग्येश बुध तृतीय चतुर्थ भाव संधित आहे. तो वक्री आहे. लाभेश मंगळ, चतुर्थेशही आहे व तो षष्ठात मिथुनेत पण मकर नवांशांत आहे. मंगळ त्रिकोण दशम.

दशमेशाच्या चतुर्थात मंगळ आहे. शुक्र व प्रजापतीचा लाभयोग आहे. व्यवसाय तृतीयस्थ शुक्रदर्शित कागदाचा आहे. शनीची दशमावर दृष्टी आहे. षष्ठात मंगळ. कारखाना दर्शवितो. पारख्यांचा कागदाचा कारखाना खोपोलीस होता. कारखान्यासाठी जातकाने बँकेकडून कर्ज काढले होते. त्याची फेड न झाल्याने दावे सुरू झाले. व्ययेश गुरु लाभात आहे व लाभेश षष्ठात. गुरुच्या अष्टमात आहे. मंगळाची नवमावर व व्ययस्थानावर दृष्टी आहे. लग्नेशाच्या अष्टमात व्ययेश आहे. तेव्हा सर्व स्थावर कारखाना यामध्ये भरपूर नुकसान व त्यामुळे कारखाना बंद पडला व यामुळे खचून जाऊन बाबुराव मरण पावले.

**(४) कर्केचा मंगळ :** षष्ठम स्थानात जेव्हा चार हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'कर्केचा मंगळ' असे म्हणतात.

मंगळ दशमेश व तृतीयेश असून षष्ठात कर्केत येतो. तेथे तो नीच असतो. जातक भित्रा असतो व अधार्मिक असतो. व्यावसायिक जीवन अडचणी, अडथळे यांनी भरलेले असते.

दशमेश षष्ठात असता न्यायखाते, कारागृह खाते वा इस्पितळे यांच्याशी व्यावसायिक संबंध येतो. कनिष्ठ पदावर वरील ठिकाणी नोकरीस जातो आणि शुभ दृष्टी असता अधिकार पदावर पोचतो.

धनेश गुरुशी शुभ संबंध असता जातकास उद्योग व्यवसायात उत्तम पैसा मिळतो. रवीचा संबंध असता सरकारी नोकरीवर असतो. मंगळ कर्केत असतो म्हणजे जलराशीत असतो. त्यामुळे रसायनशास्त्राचा अभ्यास होतो.

षष्ठातील मंगळ चंद्राशी शुभ असता जातक सामाजिक कार्याकडेही वळतो. लष्कराशीही संबंध येतो.

शनीच्या दृष्टीत असता कष्ट जास्त व प्राप्ती कमी असते. राहू मंगळाबरोबर असता मानहानी होते. फौजदारी खटल्यात सापडतो.

काही भावंडे सैन्यात जातात व एखादा उत्तम डॉक्टर होतो.

आजार-पोटाच्या तक्रारी, अल्सर, पित्त प्रकोप, टॉयफॉईड, रक्त दूषित होणे. स्त्री जातकास गर्भाशयाचे विकार होतात.

## कुंडली : सौ. शुभांगी भागवत


जन्म - शनिवार दि. १० जून, १९६१ रोजी पुणे येथे रात्री १२.२७ प्र. वेळ.

अयनांश - २३° १८' ५९"; सांपातिक समय - १७ ता. ७ मि. ५९ सेकंद.

शिक्षण - बी. एस्सी., विवाह - एप्रिल १९८४ नोकरी बँकेत.

मंगळ कर्केत, चंद्र मेषेत केंद्रयोग. रवी लाभ योग मंगळ.

धनेश गुरु व्ययात. मंगळवार दृष्टी. शुक्र भाग्येश व चतुर्थेश असून तो मंगळाशी १०५° चा शुभयोग करतो. शुक्र-मंगळ शुभयोग. चंद्राचा लग्नेश व धनेश यांचा शुभयोग बँकेत नोकरी. लग्न कुंडलीत भाग्येश-दशमेश शुभयोग आहे.




**(५) सिंहेचा मंगळ :** षष्टम स्थानात जेव्हा पाच हा अंक येतो. तेव्हा तेथील मंगळाला 'सिंहेचा मंगळ' असे म्हणतात.

त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ धनेश व भाग्येश असून षष्ठात सिंह राशीत मित्रक्षेत्री येतो. मंगळाच्या दशेत राजयोग भंग होतो. येथे मंगळाबरोबर राहू असता हृदयविकार होतात.

दशमावर धनु रास येते. दशमेश गुरु मंगळाबरोबर असता नोकरीमध्ये उच्च पद मिळते. चतुर्थेश बुध असतो. त्याचा मंगळाशी शुभयोग असता उच्च शिक्षण होते.

षष्ठातील मंगळाचा द्वितीय व दशम स्थानाशी त्रिकोण योग होतो. मंगळ द्वितीयेश असतो त्यामुळे पैसा मिळतो.

मंगळाशी अशुभ योग होत असता काळ्या बाजारातून काळा पैसा जमा होतो. शत्रूपासून प्राप्ती व खर्च. बनावटगिरी, खोटेपणा करून आणि दुसऱ्याची फसवणूक करून स्वतःचा स्वार्थ साधला जातो. संशयास्पद उद्योगातून पैसा मिळविला जातो. मंगळाबरोबर राहू-केतू असता फौजदारी गुन्ह्यात अडकतो व शिक्षा होते.

नवमेश मंगळ षष्ठात शुभ दृष्टी असता वडिलांच्या घोटाळ्यातून कायदेबाजीने मुक्त होतो व संपत्ती मिळवितो. अशुभ दृष्टी असता वरील कामात अपयश येते.


आजार-हृदयाची धडधड, हृदयविकार, प्लूरसी वगैरे आजार व मलेरिया होतो.

## कुंडली : श्री. टी. एन. शेषन

जन्म - सोमवार दि. १५ मे, १९३३ रोजी पालघाट येथे पहाटे ३वा. २७ मि. प्र. वेळ.

अक्षांश - १०° उत्तर ४६'        रेखांश - ७६° पूर्व ४७'

अयनांश - २२° ५५' ४३",        सांपातिक समय - १८ ता. ३३ मि. ३३ से.




एक कर्तबगार व नावाजलेला सरकारी अधिकारी. तीन मोठे भाऊ. लाभेश लाभात महाबुद्धिमान. शाळेपासूनच्या सर्व परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण. चतुर्थेश बुध व द्वितीयेश भाग्येश. मंगळ यांचा अंशसाम्याने त्रिकोण योग. या दोघांशी गुरुचा त्रिकोण योग व पूर्ण दृष्टी आहे. यश व मान देणारा गुरू आहे. गुरु मंगळ युती, दशमेश भाग्येश यांची युती षष्ठात मित्रक्षेत्री आहे. त्यामुळे पहिल्या क्रमांकाचे यश मिळते. आय. ए. एस. परीक्षेत क्रमांक दुसरा होता पण क्रमांक १ च्या गृहस्थाने राजीनामा दिल्यामुळे शेषनच पहिल्या क्रमांकाने नोकरीवर रुजू झाले. केंद्रीय सचिवालयात अनेक खात्यांचे काम केले. शेवटी निवडणूक आयुक्त म्हणून निवड झाली व ते काम हाती घेताच निवडणुकीच्या प्रकरणास शिस्त लावली गेली व आचारसंहिता अमलात आणली. कडक तऱ्हेने शिस्त लावली. १९८८-८९ पासून निवडणूक आयुक्त.

मंगळ-गुरुबरोबर नेपच्यूनही आहे. त्यामुळे वृत्तीने धार्मिक. कामकोटीचे शंकराचार्य यांच्याकडे जाणे-येणे होते.

**(६) कन्येचा मंगळ :** षष्ठम स्थानात जेव्हा सहा हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'कन्येचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

षष्ठावर कन्या रास येते. येथे मंगळ शत्रूराशीत येतो. कन्या रास ही निसर्गतःच षष्ठस्थान द्योतक रास आहे. निसर्गतः ही रास रोग, रोगामुळे होणारी शरीरपीडा व मानसिक क्लेश या गोष्टींशी, तसेच रोग व्याधी बरे करण्याचे प्रयत्न करण्याचे कार्य करणाऱ्या व्यक्तींचीही निदर्शक आहे. या राशीचा अंमल पचनसंस्था, लहान आतडी, अपचनाचे विकार, पोटाच्या खालील बेंबीजवळचा भाग यांवर असतो.

येथेच शरीरांतर्गत षड्चक्रांपैकी मणिपूर चक्र पाठीच्या कण्याचे भागात आहे. येथे मंगळ असता पोटाचे विकार होतातच पण अपघाताची शक्यता असते. कन्या राशीत पापग्रह असता पोटावर मार बसणे, पोटावरून वाहन जाणे असे अपघात होतात. डोक्यास मार

लागून झालेल्या अपघातात मेषेचे रवी मंगळ सापडतात. अपेंडिसायटीस व त्यामुळे होणारी शस्त्रक्रिया मंगळ दर्शवितो.

मंगळाचे कारकत्व शारीरिक पीडा, क्लेश, आजार, अपघात, आघात, मार, जखम, शस्त्रक्रिया असे षष्ठस्थानातील कारकत्व आहे. कुंडलीत कोणत्याही स्थानी कन्या राशीत मंगळ पापग्रहाने युक्त वा दुष्ट असता तीव्र ताप हे आजार होतात. त्यातच जर रवी वा चंद्र पीडित असले तर विशेषकरून मोठे व गंभीर आजार होतात.

लग्नेश मंगळ षष्ठात कन्या राशीत - तीव्र मोठे आजार, जीवावरचे प्रसंग, शारीरिक पीडा असे त्रास होतात. त्याच वेळी बुधाच्या स्थितीकडे भाव, राशी व योग यांकडे जास्त लक्ष द्यावे लागते. त्यानुसार आजाराचे क्षेत्र, तीव्रता ठरत असते. आजार - आव, जुलाब, कृमी, दाह, आतड्यांची सूज, अपचनाचे विकार, कॉलरा, टायफॉईड, गॅस्ट्रो एंटरायटिस.


## कुंडली : सौ. ल. ल. मोहोळकर

जन्म - मंगळवार दि. ११ जून, १९१८ रोजी बेळगाव येथे पहाटे ३ वा. प्रमाण वेळ.

अक्षांश - १५° उत्तर ५२'        रेखांश - ७४° पूर्व ३०'.

अयनांश - २२° ४३' २२",        सांपातिक समय- २० ता. १२ मि. ५४ से.

भावंडात ज्येष्ठ. ५ लहान बहिणी. विवाह मे १९३६. संतती ३ मुलगे. पतीने पदवी परीक्षेनंतर प्रथम नोकरी. नंतर १९४७/४८ पासून वकिली सुरू केली. १९६४ साली विधी महाविद्यालयात प्राध्यापक. १९६७ पासून प्राचार्य. १९७९ साली निवृत्त. पतीस उत्तम साथ दिली. १९८७ साली पतीस जठराचा कर्करोग झाला. दि. १०/४/१९८७ रोजी शस्त्रक्रिया. जून १९८७ मध्ये सोलापुरास परत आले.



पतीस कर्करोग म्हटल्यावर आयुष्य फार राहणार नाही हे लक्षात आल्यावर या साध्वीने मला (लेखकास) सप्टेंबरमध्ये एक प्रश्न विचारला. 'पतीचे आयुष्य किती आहे ?', ''मी त्यांच्या नंतर राहणार नाही, मला त्यांच्या आधी जावयाचे.'' याचे उत्तर कठीणच होते. साधारण एक वर्ष राहतील असा अंदाज मी प्रकट केला.

जातकीस तोपर्यंत कसलाही आजार नव्हता. पतीच्या मृत्युपूर्वी आपण जावयाचे हा तिचा निर्धार. डिसेंबर १९८७ मध्ये त्यांनाही कर्करोग झाल्याचे कळल्यावर त्यांना पुण्याहून सोलापुरास आणले. शस्त्रक्रियेची त्यांच्या मनाची तयारी झाली. शस्त्रक्रियेला सुरुवात झाल्यावर डॉक्टरांच्या लक्षात आले की कर्करोग जठरात पसरला आहे. शस्त्रक्रियेचा काही उपयोग होणार नाही. शस्त्रक्रिया थांबली.

दि. ३० मार्च, १९८८ रोजी या जातकीचे निधन झाले. पतीचे निधन जून १९८८ मध्ये झाले. त्या साध्वीने आपला निर्धार खरा केला. त्यांचे सर्व कुटुंब व आम्ही यांचे १९४८ पासून घनिष्ठ संबंध होते व अजूनही आहेत.

कन्या राशीचा अंमल पोटावर आहे. लग्नेश मंगळ षष्ठात कन्या राशीत असून त्याचा राहू व गुरुशी २° फरकाने केंद्रयोग आहे. तसेच शनी व मंगळ यांचाही ४५° चा अर्ध केंद्रयोग (अशुभ) आहे. या योगावर कर्करोग, मंगळ अष्टमेश असून षष्ठात आहे तेव्हा निधन याच रोगाने झाले.

**(७) तुळेचा मंगळ :** षष्ठम स्थानात जेव्हा सात हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'तुळेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

षष्ठस्थानी तूळ रास येते. मंगळ सप्तमेश व व्ययेश असून षष्टात तूळ राशीत येतो. सप्तमेश षष्ठात म्हणजे सप्तमाचे व्ययात येतो. वैवाहिक सुखाला विघातक असतो. पत्नी आजारी असते (मंगळ व्ययेश म्हणजे सप्तमाचा षष्ठेश असतो) आणि त्यानिमित्त खर्च होतो.

मूत्राशयास सूज व दाह, नेफ्रायटिस होतो. पायलेटीस बस्ती प्रदेशात दाह. येथे मंगळाबरोबर बुध असता न्यूराब्जिया होतो. मूळव्याधीचा त्रास होण्याची शक्यता असते.

षष्ठातील मंगळाची नवमावर व लग्नावर दृष्टी येते. त्यात शनी वा रवी सापडल्यास पितृछत्र लवकर हरपते.


## कुंडली : श्री. प्रकाश

जन्म - रविवार दि. १५ नोव्हेंबर, १९४२ रोजी सायं. ६ वा. ५० मि. प्रमाण वेळ.

अक्षांश - १७° ४२' रेखांश - ७५° ५४'

अयनांश - २३° ३' २५" सांपातिक समय -२२ तास ० मि.

षष्ठस्थानाला बुध-मंगळ-शुक्र-रवी असे चार ग्रह जवळजवळ आहेत.




मंगळ षष्ठात असून त्याची दृष्टी नवमावर व नवमेश शनीवर आहे. दशमात-दशमाचा षष्ठेश चंद्र केतूने युक्त आहे. पितृकारक रवीचा शनीशी षडाष्टक योग आहे. यामुळे पितृछत्र लवकर हरपले. जातक ६ महिन्यांचा असता मे १९४३ मध्ये वडील वारले. चंद्र चलित गतीने ६ महिन्यात हर्षलशी केंद्रयोग करतो. हर्षल दशमेश आहे. त्याच्याशी होणारा केंद्रयोग घातक ठरतो. चंद्र मंगळाच्या धनिष्ठा नक्षत्रात आहे व तो तीन महिन्यांत शततारका या राहूच्या नक्षत्रात प्रवेश करतो. (दिन वर्ष पद्धतीनुसार)

जातकास फक्त मधुमेहाचा विकार. जातकाच्या पत्नीस हृदयविकार. जातकास ४ बहिणी (मोठ्या) आहेत व दोन सुकन्या आहेत. वडिलार्जित स्थावर मोठी आहे. जातकाचे शिक्षण तंत्रनिकेतनमध्ये झाले. फ्रीज वगैरे दुरुस्तीचा व्यवसाय आहे. स्वभावाने शांत, विचारी व आत्मविश्वासू आहे. दुसऱ्यास मदत करण्यास तयार असतो.

फलज्योतिषाचा अभ्यास चांगला आहे.

दोन्ही कन्या उच्च विद्याविभूषित आहेत.

**(८) वृश्चिकेचा मंगळ :** षष्ठम स्थानात जेव्हा आठ हा अंक येतो तेव्हा त्याला 'वृश्चिकेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

षष्ठावर वृश्चिक रास. मंगळ लाभेश असून षष्ठात स्वतःचे राशीत येतो. मातुलपक्षाची वृद्धी होते. मामा प्रसिद्ध असतो. मातुलपक्षाकडून लाभ होतो. तसेच कोर्ट खटल्यातूनही लाभ होतात. लग्नेश बुध मंगळाबरोबर असता असाध्य व्याधी होतात. अन्य विकार- लघवीची जळजळ व आग, रक्तस्राव, अल्सर, नाक, घसा यातून रक्त. मूत्राशयात व मूत्रनलिकेत खडा, त्याचे दुःख प्रोस्टेट ग्रंथीची वाढ व शस्त्रक्रिया.

सप्तमाचे व्ययात मंगळ येतो. गुरु, शुक्र याशी अशुभ योग असता वैवाहिक सुख बिघडते. पण गुरुशी शुभ संबंध असता व्यवसाय नोकरीस चांगले असते. शनीशीही शुभ योग व्यवसायास चांगला ठरेल.


## कुंडली : शशिकांत मोहोळकर

जन्म - गुरुवार दि. २ मार्च, १९३९ रोजी बेळगाव येथे दुपारी १ वा.४७ मि. प्र. वेळ.

अक्षांश - १५° उत्तर ५२'  रेखांश - ७४° पूर्व ३३'

अयनांश - २३° ०' ३८",  सांपतिक समय - २३ तास ५२ मि. २० से.

गुरुमहादशा भोग्य वर्षे ३ महिने ११ दि. ६.




इंजिनिअरिंगचा डिप्लोमा, त्यानंतर A.M.I.E. पास झाला व नोकरी प्रथम वालचंदनगरला व नंतर असोसिएट सिमेंट कंपनीमध्ये. नंतर दुसरी नोकरी व पुण्यास स्थायिक झाला.

विवाह-पत्नी अनुरूप. दोन मुले : एक मुलगा, एक मुलगी.

बरेच वर्षांपासून पोटात जठरात अल्सर होता. आई-वडिलांचे १९८८ साली कर्करोगाने निधन झाले. त्यानंतर जातकाच्या अल्सरचे रूपांतर कर्करोगात १९८९ साली झाले. १९९० साली मृत्यू.

लग्नेश दशमेश युती दशेमाजवळ व मंगळाच्या दृष्टीत. भाग्येश शनी मीनेत व दशमेश गुरू कुंभेत असा अन्योन्य योग. मंगळ-शनी षष्ठ दशमातून त्रिकोण योग. या सर्व योगांवर जातक अधिकारीही झाला.

षष्ठातील वृश्चिकेतील मंगळाने अल्सर पोटात. लग्नेश बुधाचा षष्ठेश मंगळाशी केंद्रयोग व तृतीयस्थ नेपच्यूनशी प्रतियोग. अल्सरचे रूपांतर कर्करोगात. शुक्र अष्टमात चंद्राचे समोर. शुक्र - महादशा चंद्र अंतर्दशेत मृत्यू.

**(९) धनुचा मंगळ :** षष्ठम स्थानात जेव्हा नऊ हा अंक असतो तेव्हा त्याला 'धनुचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

षष्ठावर धनु रास, मंगळ पंचमेश व दशमेश आणि राजयोगकारक असून षष्ठात मित्रक्षेत्री येतो. न्यायखाते, तुरुंग वा हॉस्पिटलमध्ये नोकरी मिळते. हुद्द्यावर चढतो पण अवनती होते. कारण दशमेश षष्ठात येतो. पुत्राशी संबंध चांगले नसतात. मंगळ, गुरु अगर चंद्राच्या शुभयोगात असता संतती होते. पण संततीचे सुख फारसे नाही. गुरू चंद्राशी शुभ योग नसता व मंगळ अशुभ दृष्टी असता संततीचा मृत्यू होतो. जातकास मानसिक व्याधी होते व संपत्तीचे नुकसान होते.


मंगळाबरोबर राहू असता गैरव्यवहार, अपहार, खोटेपणा, पदावनती, नोकरीतून हकालपट्टी, मानहानी होते. भांडखोरपणा. आजार-सायटिका, बस्तिप्रदेशात व नितंबात शस्त्रक्रिया. आतड्याचा ताप (Enteric Fever).

**कुंडली : श्री**

जन्म - गुरुवार दि. १२ मार्च, १९२६ रोजी दुपारी ४.१५ वाजता.

अक्षांश - १७° उ. ४२', रेखांश - ७५° पूर्व ५४'

अयनांश - २२° ४९' २०", सांपातिक समय - ३ ता. ५ मि. १८ से.




शिक्षण मॅट्रिक. महाविद्यालयीन शिक्षण नाही. शिक्षणात गती नाही. पंचमेश मंगळ केतूच्या युतीत. म्हणून १९५० पासून बँकेत नोकरी. गुरु वा शुक्र यांची युती सप्तमात आहे. विवाह १९५१ साली संतती : एक मुलगी, एक मुलगा. स्वभाव भांडखोर, स्वार्थी, नोकरीत बदल्या. शाखाधिकारी, पण तेथे गैरव्यवहार म्हणून नोकरीवरून काढले. पुन्हा बँकेत नोकरी. तेथे काम करून ती सोडावी लागली. नवीन निघालेल्या बँकेत नोकरी-व्यवस्थापक म्हणून काम केले; पण तेथूनही अवनती. भाग्येश गुरु सप्तमात नीच राशीत पण चतुर्थेश लाभेश शुक्राचे युतीत. यामुळे पैसा चांगला जमविला. पण त्यांची व्ययात

मंगळ-केतू युती यामुळे अवनती व मानहानी झाली. गुरु-शुक्राचे युतीवर नेपच्यूनचा प्रतियोग हा अनर्थकारी ठरला. खोटेपणा हा नेपच्यूनचा गुणधर्म. नेपच्यून लग्नबिंदूवर पण नेपच्यूनचा मंगळाशी व रवीशी षडाष्टक. मंगळ-केतू युतीमुळे कोर्टखटल्यासही तोंड द्यावे लागले. आरडाओरड करणारा.

**(१०) मकरेचा मंगळ :** षष्ठम स्थानात जेव्हा दहा हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'मकरेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

षष्ठात मकर रास-मंगळ चतुर्थेश व भाग्येश असतो आणि तो षष्ठात आपल्या उच्चक्षेत्री येतो. उत्तम उच्च शिक्षण होते. माता दीर्घायू असते पण पिता दीर्घकाळ व्याधिग्रस्त असतो. मातुलपक्षाकडून उत्तम लाभ होतात. तसेच शत्रूकडूनही सांपत्तिक लाभ होतो.

आजार, संधिवात, काही कातडीचे रोग, खरूज, सोरायसीस वगैरे. षष्ठस्थान हे दशमाचे पूरक स्थान आहे. त्यावरून नोकरीचा आणि व्यवसायाचा विचार करावा लागतो.

## कुंडली : डॉ. शिल्पा पोफळे


जन्म - शनिवार दि. १४ एप्रिल, १९६३ रोजी दु. २.३० वाजता.

अक्षांश - २०° उत्तर ५८'        रेखांश - ७७° पूर्व ५०.

अयनांश - २३° २९' १७",        सांपातिक समय - ३ तास ५० मि. ५३ से.

शुक्र महादशा भोग्य वर्षे ५ महिने ३ दि. २३.

चतुर्थेश मंगळ षष्ठात उच्च राशीस व पंचमेश गुरु षष्ठात मकरेत आहे. दोघे युतीत आहेत. शिक्षण उत्तम. M.B.B.S. १९९६ साली, १९९७ साली Internship संपली.




जहांगीर नर्सिंग होममध्ये नोकर. षष्ठेश शनी वृषभेत आहे. गुरु-मंगळ त्रिकोण शनी हा उत्तम योग आहे. वरुण (नेपच्यून) चतुर्थात आहे. तो गुरुच्या लाभात आहे. व्ययेश चंद्र

लग्नी आहे व तो शनीशी केंद्रयोग करतो. दशमेश शुक्र मीन या उच्च राशीत आहे. स्वतंत्र व्यवसाय उत्तम चालेल. राहू गुरुच्या राशीत व शुक्राच्या नक्षत्रात आहे. म्हणून राहू गुरु व शुक्र यांची फले देईल. राहूची महादश ११ ऑगस्ट, २००१ रोजी संपली व गुरुची महादशा चालू झाली व ती उत्तम गेली व व्यावसायिक यश लाभले. चलित रवी ३० वे वर्षी शुक्राशी लाभयोग ३३ वे वर्षी धनेश लाभेश बुधाशी लाभयोग आणि ३४ व्या वर्षी चलित रवीची दशमाशी युती. हा सर्व काळ प्रगतीचा.

**(११) कुंभेचा मंगळ :** षष्ठम स्थानात जेव्हा अकरा हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'कुंभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –

षष्ठात कुंभ रास असते. मंगळ तृतीयेश व अष्टमेश असतो आणि कुंभेत शत्रुराशीत येतो. अष्टमेश षष्ठात असणे हा हर्षयोग होतो. जातक दीर्घायू. निरोगी असतो व शत्रूवर विजय मिळवितो. मंगळ तृतीयेशही असतो. त्यामुळे भावंडांशी सख्य नसते, पण मंगळ शुभसंबंधित असता धाकटा भाऊ सैन्यात जातो वा उत्तम डॉक्टर होतो.

## कुंडली : डॉ. एम. चन्ना रेड्डी

जन्म –सोमवार दि. १३ जानेवारी, १९१९ रोजी सिरपूर, हैद्राबाद येथे रात्री १०.४५ वा.

अक्षांश – १७° उत्तर २०', रेखांश – ७८° ३०' पूर्व.


अयनांश – २२° ४३' ५२", सांपातिक समय – ५ ता. ५७ मि. ४० से.

जन्मकाळी मंगळ महादशा भोग्य वर्षे ५ म. ८ दि. २०

शिक्षण M.B.B.S. परंतु डॉक्टरी व्यवसायात गेले नाहीत. राजकारणात पडले. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. १९५२–६७ आमदार. १९६७–६८ केंद्रीय मंत्री.

पंजाबचे राज्यपाल व उत्तर प्रदेशचे राज्यपाल १९७४–७७.

१९७७–८० आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री.



बुध व गुरु अन्योन्य क्षेत्रयोग. पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. हर्षल त्रिकोण दशम व लाभयोग दशमेश बुध आणि प्रतियोग शनी.

लाभेश चंद्र, उच्च राशीत त्रिकोण मंगळ. मंगळही उच्च राशीत. या योगावर उच्च पदे मिळाली व राजकारणात यश मिळाले.

१९५२-६७ : गुरु महादशेत शुक्र अंतर्दशेत. आमदारकी शुक्र भाग्येश आहे.

१९६७-६८ : शनी महादशेत गुरु अंतर्दशा केंद्रीय मंत्री.

१९७४-७७ : राज्यपाल.

१९७७-८० : बुध महादशा. बुध अंतर्दशा. बुध लग्नेश व दशमेश यांचा त्रिकोण शनीशी.

१९८९ : बुध महादशेतील गुरुचे अंतर्दशेत मूत्रपिंडाचा विकार व दुसरे मूत्रपिंड बसविले. मूत्रपिंडाचा कर्करोग.

मंगळ अष्टमेश आहे. तो षष्ठभावाजवळ आहे. दिसतो पंचमात पण पंचम व षष्ठाचा मध्य मकर २१° येतो. तेव्हा मंगळ षष्ठभाव मध्याजवळ आहे. त्याची शनीवर (षष्ठेश) दृष्टी आहे. शुक्र हा मंगळ व रवी यांच्या मध्ये असून शनीशी षडाष्टकात आहे व नेपच्यूनचे प्रतियोगात आहे. षष्ठेश शनी हा हर्षलचे प्रतियोगात आहे. या योगावर मूत्रपिंड नादुरुस्त झाले. शनीची तूळ राशीवर दृष्टी आहे व शनी हर्षल प्रतियोग गुरुची द्वितीयावर (तूळ राशीवर), हर्षलवर व बुधावर दृष्टी आहे त्यामुळे घात झाला नाही.

**(१२) मीनेचा मंगळ :** षष्ठात स्थानात जेव्हा बारा हा अंक येतो तेव्हा तेथील मंगळाला 'मीनेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

षष्ठात मीन रास येते. मंगळ सप्तमेश व द्वितीयेश असतो. कन्या रास व्ययात येते. तेथे मंगळाची दृष्टी येते. पोटाचे विकार होतात, पायास अपघात होतात.

द्वितीयेश षष्ठात अनैतिक मार्गाने (काळा बाजार, भ्रष्टाचार) पैसा मिळविला जातो. शत्रूकडूनही पैसे मिळतात पण खर्चही होतात.

जातकास दारूचे व्यसन लागते व त्याचे दुष्परिणाम प्रकृतीच्या बिघाडामुळे सहज प्रत्ययास येतात.

सप्तमेश सप्तमाचे व्ययात असतो. त्यामुळे विवाहसुख बिघडते. त्याच अष्टमात शनी वा राहू आल्यास घटस्फोट. द्विभार्या योग संभवतो.

## कुंडली : श्री. अण्णादुराई


जन्म - मंगळवार दि. १५ सप्टेंबर, १९०९ रोजी कांजिवरम् येथे सकाळी ८.३० वा.

अक्षांश - १२° उ. ५०', रेखांश - ७९° पू. ४४'

अयनांश - २२° ३५' ३६" सांपतिक समय - ८ ता. ४ मि. ३५ से.

द्रविड मुन्नेत्र कळघम संस्थापक व तमिळनाडूचे मुख्यमंत्री.


M. A. with Economics and Politics. Good Speaker.




तूळ लग्नास गुरु ३ व ६ या स्थानांचा अधिपती असला तरी तो योग करणारा होतो. भावार्थ रत्नाकर. भाग्येश बुध व्ययस्थानात स्वराशीस येतो व शनी मीनेत आहे. त्या दोघांचा परस्पर दृष्टियोग. राजयोगकारक ठरतो. लग्नेश शुक्र व योगकारक शनी यांचा प्रतियोग ५° ३०' फरकाने आहे. तेव्हा हा परस्पर दृष्टियोग होतो असेच मानले पाहिजे. दशमेश चंद्र व गुरु यांची युती शुभ ठरते. त्यावर धनेश मंगळाची दृष्टी आहे. २, ६, १० यांचा योग होतो. यामुळे अण्णादुराई तमिळनाडूचे मुख्यमंत्री झाले. पण षष्ठातील मंगळ बुध दृष्ट आहे. तसेच चतुर्थेश शनी हर्षल व नेपच्यून यांचे केंद्रयोगात व व्ययेश बुधाच्या प्रतियोगात आहे. यामुळे पोटाचा कर्करोग झाला व त्याच रोगाने त्यांच निधन झाले. १९६८ साली कर्करोग सुरू झाला व फेब्रुवारी १९६९ मध्ये निधन झाले.

७

# सप्तम भाव




सोबतच्या कुंडलीमध्ये ज्या ठिकाणी सात हा अंक लिहिलेला आहे त्या स्थानाला कुंडलीतील किंवा पत्रिकेतील 'सप्तम स्थान' असे म्हणतात.

कुंडलीतील सप्तम स्थानावरून आयुष्याचा जोडीदार, उद्योग-व्यवसायातील भागीदार, व्यापारी व स्वतंत्र व्यावसायिक, प्रतिस्पर्धी कलह, न्यायालयीन खटले, गमन-आगमन, वैवाहिक जीवन यांचा प्रामुख्याने विचार होतो. त्याचप्रमाणे दुसरे मूल, आईची आई, दत्तक पुत्र, नोकर, वडिलांची मित्रमंडळी इत्यादींचा विचार होतो.

वैवाहिक जीवनात शुक्राच्या जोडीला मंगळाचेही स्थान आहे. सबब त्या संदर्भात मंगळाविषयी प्रास्ताविक प्रथम करून मग प्रत्यक्ष सप्तम भावाकडे वळत आहे.

## मंगळाची भूमिका व कार्य

मंगळ हा वासना उत्तेजित करणारा, कामोद्दीपक ग्रह असल्याने जास्त व तीव्र वासनासंवेग असतो. शुक्राबरोबरचे मंगळाचे योग-युती, केंद्रयोग व प्रतियोग विषयवासना भडकविणारे ठरतात आणि अनैतिक मार्गाकडे वासनातृप्तीसाठी साहजिकच जातक वळतो.

मंगळाचे कार्य उत्तेजित व उद्दीपन करणे असल्याने मूलभूत वासनेचे कार्य होत असतानाच भावना वेगाने व अविचाराने संबंध जोडले जातात आणि बहुतांशी त्याचा परिणाम अदूरदर्शी व अविवेकी विवाहसंबंध होताना दिसतात. खरे प्रेम व स्वार्थी विकारवशता यामधील फरक कळण्याइतपत वेळ व उसंत नसते. तडकाफडकी निर्णय घेतले जातात आणि ९० टक्के असे विवाह मंगळाच्या तीव्र भावनावेगाच्या परिणामामुळे मोहाला बळी पडून झालेले असतात आणि मग पश्चात्ताप होतो.

स्त्रियांच्या बाबतीत विवाहाचा विचार करताना मंगळाचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असल्याने घाईघाईने व अविचाराने निर्माण होणाऱ्या संबंधाच्या परिणामांचा विचार करून व मंगळ स्त्री कुंडलीत प्रभावी असता जास्त विचारपूर्वक निर्णय घ्यावा. भावनावेगाने

प्रथम निर्माण झालेली विषयवासना आणि चुंबकीय आकर्षण शक्तीपर्यंतची वैषयिकता यावर मंगळाचा गुणधर्म वर्चस्व गाजवित असतो. हे आकर्षण शारीरिक, मानसिक व बौद्धिक यांपैकी कोणतेही असू शकते.

सामान्यतः स्त्रियांच्या कुंडलीतील मंगळ आपल्या स्थानानुसार व योगानुसार कोणत्या प्रकारच्या पुरुषाकडे स्त्री-जातक आकृष्ट होईल हे कळू शकते आणि मंगळाच्या बलाबलानुसार अशा तऱ्हेची व्यक्ती त्या स्त्रीचे आयुष्यात परिणाम गाजवू शकते हे दिसून येते. ज्या स्त्रियांच्या कुंडलीत मंगळाचे तत्त्व इतर ग्रहांपेक्षा बलवत्तर असते. (उदाहरणार्थ, मंगळाचे राशीत ग्रहाधिक्य असणे अगर जन्मकाली मंगळ बलिष्ठ असणे यांपैकी कोणत्याही स्थितीत) त्या स्त्रिया सैन्यातील व्यक्तीशी वा त्याखालोखाल वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या पुरुषाकडे आकृष्ट होतात.

स्त्रियांच्या बाबतीत पुरुषत्वाचे प्रतिनिधित्व मंगळ करतो, तर पुरुषांच्या बाबतीत स्त्रीत्वाचे प्रतिनिधित्व शुक्र करतो. स्त्री कुंडलीतील शुभसंबंधित मंगळ आणि पुरुष कुंडलीतील शुभसंबंधित शुक्र आपल्या जोडीदाराशी उत्तम संबंध राखतील आणि त्यापासून त्यांना लाभ व सुख मिळते असेही अनुभवास येते. परंतु मंगळ वा शुक्र अशुभ स्थितीत असता जोडीदारापासून त्रास, नुकसान व फारकत दर्शवितात.

याच वेळी मंगळ व शुक्र यांच्या गतींचा विचार जरूर केला जावा. हे ग्रह वक्री असता अनुक्रमे स्त्री व पुरुष यांना विषयसुखात कमतरता आढळते व त्यामुळे हळूहळू दुरावा निर्माण होतो.

वैवाहिक जीवनात अडथळे आणणारे, फसवणूक करणारे व फारकत करू पाहणारे ग्रह अनुक्रमे शनी, नेपच्यून (वरुण), हर्षल (प्रजापती) हे ग्रह प्रमुख असतात. तसेच राहू केतूही आपले कर्तृत्व दाखवितात. राहू स्फोटक आहे.

पण विवाहास विलंब करणाऱ्या ग्रहयोगांचाही विचार करावा लागतो. पुरुष कुंडलीत पत्निकारक ग्रह चंद्र असतो आणि स्त्री कुंडलीत पतिकारक ग्रह रवी असतो. यांच्याशी शनीची युती प्रतियोग वा दृष्टियोग असता तसेच सप्तमावरही शनीची दृष्टी असता विवाहास विलंब लागतो व काही वेळा होतही नाही. नेपच्यून (वरुण) यांचे युती वा प्रतियोगही विलंबदायी व फसवणूक करणारे असतात. प्रजापती (हर्षल) याचा प्रेम आकर्षण यांचेशी संबंध असतो तसाच त्यास बदल हवा असतो. एक-एके-एक हे त्यास पसंत नसते. तो घटस्फोट दर्शवितो. राहूचे संबंध विभक्तीकरण दाखवितात.

स्त्री कुंडलीतील मंगळास महत्त्व आहे ते चंद्र व मंगळ यांच्या प्रतिमासिक विशिष्ट ग्रहयोगामुळे होणाऱ्या मासिक ऋतुस्रावाकरिता आणि म्हणूनच उत्पादन क्षमता ठरविण्यासाठी

चंद्र, मंगळ व गुरु यांच्या राशी अंशकलांच्या बेरजेतून निघणाऱ्या क्षेत्र सहमाचा विचार केला जातो.

सप्तधातूपैकी वीर्यधातू शुक्र हा ग्रह दर्शवितो. त्यामुळे त्याचे महत्त्व पुरुष कुंडलीत विशेष आहे. म्हणूनच रवी, शुक्र, गुरु यांच्या राशी अंशकलांच्या बेरजेतून निर्माण होणाऱ्या बीजसहमाचा विचार प्रजननक्षमतेसाठी केला जातो.

संतती, क्षेत्रसहम, यांचा विचार गुरुवरील ग्रंथात आहे.

कुंडलीतील वधू-वरांच्या पत्रिकेचे गुणमीलन कसे करावे याचा तपशीलवार विचार शुक्रावरील ग्रंथात करावयाचा आहे.

कुंडलीतील बारा, एक, चार, सात, आठ यांतील मंगळाचा विचार विवाहभंग वगैरेंसाठी करावा लागतो. तो विचार उदाहरणासह या ठिकाणी केला जाणार आहे.

सप्तम स्थानावरून व्यापार, स्वतंत्र व्यवसाय, भागीदारी यांचाही विचार होतो. सप्तमातील मंगळाची चौथी दृष्टी दशमावर येते आणि आठवी दृष्टी द्वितीय या धनस्थानावर येते. व्यवसाय व त्यापासून मिळणारे धन अगर धनप्राप्ती कोणत्या माध्यमातून होते याचा अंदाज घेता येतो. त्यामुळे नोकरी, व्यवसायाच्या दृष्टिकोनातूनही हे स्थान महत्त्वाचे ठरते. सप्तम स्थान हे दशमाचे दशमस्थान आहे. तसेच मंगळाची सातवी दृष्टी लग्नावर येते तेव्हा लग्नावर व लग्नस्थ ग्रहावरही मंगळाचा प्रभाव पडतो व जातकाचा कल कोणीकडे झुकतो याचा विचार करता येतो. म्हणून याच प्रकरणाच्या दुसऱ्या भागात सप्तमस्थ मंगळाचा विचार वाचकापुढे ठेवीत आहे.

सारावलीमध्ये कल्याण वर्मा सप्तमस्थ मंगळाबद्दल पुढीलप्रमाणे सांगतात -

**मृतदारो रोगतोऽमार्गरतो भवति दुःखितः पापः ।**
**श्रीरहितः संतप्तः शुष्कतनुर्भवति सप्तमे भौमे ।।**

सप्तमात मंगळ असता पत्नीचा मृत्यू (म्हणून द्विभार्या योग) पतीचा मृत्यू (वैधव्य) होतो. जातक व्याधिग्रस्त असतो. कुमार्गाला लागतो, पापी असतो व दुःखी होतो. संपत्ती मिळत नाही. मिळाली तरी ती राहत नाही आणि शरीराने कृश (शुष्क) असतो.

असा जातक पत्नीकडून अपमानित होतो. पत्नीपासून दुरावतो. (मृत्युमुळे अगर वेगळे राहण्याने) जातकास पोटाचे विकार होतात. शस्त्रापासून इजा (शस्त्रक्रिया वगैरे), पत्नीचा अपघाती मृत्यू होतो अगर व्याधीपासून मृत्यू होतो. जातकाचा विधवेबरोबर पुनर्विवाह होतो वा विषयपूर्तीसाठी अन्य स्त्रियांकडे वळतो असे अन्य पूर्वाचार्य सुचवितात.

महाराष्ट्राचे बी. व्ही. रामन = श्री. द. टा. भट यांचाही अनुभव काही निराळा नाही. ते म्हणतात, कोणत्याही राशींचा मंगळ वैवाहिक सुखाच्या दृष्टीने अशुभ फलदायी असतो. कृत्तिका, आर्द्रा, आश्लेषा, मघा, मूळ व धनिष्ठा या नक्षत्रांतील मंगळ तीव्र अशुभ फले देतो. पती-पत्नीमध्ये मतभेद, मतवैचित्र्य आणि त्यामुळे त्रास, द्विभार्या योग/वैधव्य योग, फारकत वा पती/पत्नीला अपघात अशा प्रकारची फले सप्तमस्थ मंगळाबद्दल अनुभवास येतात. सप्तमस्थ मंगळ हा रवी प्रजापती (हर्षल) वरुण (नेपच्यून) या ग्रहांच्या अंशात्मक कुयोगात असल्यास वैवाहिक सुख लाभू देत नाही. विधुरावस्था /वैधव्यावस्था प्राप्त होते. सप्तमात मंगळ असता धन, व्यय स्थानातील पापग्रहांचा षडाष्टक योग अगर लग्नातील ग्रहांचा प्रतियोग तीव्र परिणाम करणारा असतो.

मंगळ हा ग्रह स्वभावतःच तामसी, अविचारी, अतिरागी आणि शारीरिक बलाचा अहंकार असलेला असतो. तसेच तो जबर विषयवासना देणारा आहे. मी म्हणेन तसे झाले पाहिजे असा त्याचा आग्रह, हट्टाग्रह, दुराग्रह असतो. दुसऱ्यांच्या विचारांची कदर करणे. त्यांच्या भावनांची पर्वा करणे व सहिष्णू असणे हे त्याच्या गावीही नसते. दोन हट्टी व्यक्तींचे मतैक्य क्वचितच असते. मतवैचित्र्य, मतभिन्नता ही असावयाचीच. वरील स्वभावात क्रोध, मद, मत्सर, भांडखोरपणा आणि असहिष्णुता यांची भर पडल्यास वैवाहिक जीवनाचे तीन तेरा होण्यास वेळ लागत नाही. संघर्षाचे बीज मंगळच प्रेरित असतो. कामाग्नी जबर असते. तो भडकला की त्यास दुसरे काही सुचत नाही. ''कामातुराणा न भयं न लज्जा''. विवेक सामंजस्य दुसऱ्याच्या मताचा आदर करण्याची वृत्ती जातकाने जोपासली तर दुरावस्था येणार नाही. विषयतृप्ती न झाली तर जातक क्षुब्ध होतो त्यामुळे मतभेदाची ठिणगी पडते आणि भांडखोरपणा वाढत जातो.

मंगळ हा व्याधी, आजार, अपघात दर्शविणारा ग्रह आहे. त्यामुळे तो अशुभ स्थानचा अधिपती असल्यास जोडीदारास आजार, व्याधी वा अपघात होण्याची शक्यता असते. हेच कारण विधुरावस्था वा वैधव्यता प्राप्त होण्याचे आहे.

पण प्रत्येक लग्नास मंगळ हेच फल देईल असे नाही. मंगळाची राशिस्थिती, त्याचे भावेशत्व व त्याचेशी असलेले शुभाशुभ ग्रहयोग यावर मंगळाची फले देण्याची क्षमता, तीव्रता अवलंबून असते. राजयोगकारक ग्रहाची फले अशुभ मिळत नाहीत. लग्नेश व सप्तमेश एकमेकांच्या शुभयोगात लाभयोग, त्रिकोण योग असता विवाहसुख चांगले मिळते. लग्नेश सप्तमात असणे हेसुद्धा चांगलेच असते. पण तेव्हा मंगळ वक्री वा गतिहीन नसावा.


सप्तम स्थान हे मंगळाचे बाधास्थान आहे. सप्तमावरून मुख्यतः विवाहाचा विचार होत असल्याने विवाहसुखास तेथील मंगळ बाधा करू शकतो. तेव्हा सप्तमातील मंगळाबद्दल


जपूनच विचार केला पाहिजे. सप्तमात मंगळ भावबली नसतो. पण त्यास शुभ भावेशत्व असता राशिबल चांगले असते आणि शुभ ग्रहांच्या शुभयोगात असता विवाहसुखास बाधा येणार नाही. परंतु हा निर्णय कुंडलीचा पूर्ण अभ्यास करून व मंगळाचे राशीबल, योगबल यांचा विचार करूनच करावा लागेल आणि त्यासाठी अनेक कुंडल्यांचा अभ्यास करून अनुभव घेतला पाहिजे.


सप्तमात मंगळ अशुभ योगात असता पापमध्यस्थ व पापकर्तरीत असता काय होऊ शकते याचे थोडक्यात दिग्दर्शन करतो.

शनी, राहू व मंगळ हे तीन ग्रह नैसर्गिक पापग्रह आहेत. त्यांपैकी एक एक जरी ६ व्या, ७ व्या वा ८ व्या स्थानात असता विवाहसुखात बिघाड उत्पन्न होतो. मग हे तीनही ग्रह सप्तम स्थान बिघडवित असता वैवाहिक जीवन सुखकर होणार नाही. त्याच्या जोडीला आता प्रजापती (हर्षल) असता घटस्फोट, नेपच्यून असता फसगत असे परिणाम दिसतील.

जातकतत्त्व या ग्रंथात 'मन्देष्टमे षष्ठे भौमास्तेराहू' भार्या न जीवति असे सूत्र दिले आहे. म्हणजे अष्टमात शनी, षष्ठात मंगळ व सप्तमात राहू असणाऱ्या जातकाची पत्नी लवकर मरते व जातकास विधुरावस्था प्राप्त होते. द्विभार्यायोग होतो असे सूचित केले आहे. या तीन ग्रहांची त्याने पालट केली तरी विवाहसुख मिळत नाही. सप्तम स्थान पूर्ण बिघडते. हे कसे असते यासाठी तीन कुंडल्या उदाहरणादाखल देत आहे.




या तीनही कुंडल्यात सप्तम स्थान पापमध्यस्थ आहे. दुसऱ्या कुंडलीत राहू अष्टमात असल्याने पापकर्तरी योग झाला आहे. सप्तम स्थानात पापग्रह व त्याचे दोन्ही बाजूस पापग्रह असल्याने सप्तम स्थान पूर्ण दूषित झाले आहे.

राहू हा स्फोटक ग्रह आहे. तो म्हणजे एक बाँबगोळा आहे. एकाच स्फोटात तुकडे होतात. मंगळ सप्तमात असता कुरबूर, भांडणे चालूच असतात. प्रत्यक्ष लढाईही चालूच असते. न्यायालयातही प्रकरण गेलेले असते. निर्णय व्हावयाचा असतो. शनी सप्तमात असताही पती-पत्नीचे संबंध दुरावलेले असतात पण जगाच्या दृष्टीने ठीक चालल्याचा आभास चालू असतो. शीतयुद्ध चालू असते व ते दीर्घकाळ चालू राहते.

अशा परिस्थितीत शुक्राचा विचार महत्त्वाचा ठरतो. शुक्र वक्री असता अगर तो अशुभ योगात असता विवाहसुखाची हानीच होते. शुक्र सुस्थितीत व शुभ योगात असता वैवाहिक जीवन साधारणपणे सुखाचे राहते.

जास्त दोषास्पद अष्टमातील मंगळ असतो. मंगळाचा सप्तमातील अगर अष्टमातील दोष गुरुच्या शुभयोगाने नाहीसा होतो. मंगळ-राहू वा मंगळ-केतू यांची सप्तमातील उपस्थिती विवाहसौख्यास बाधा आणणारी असते.

स्त्रियांचे कुंडल्यांत अष्टमातील मंगळ राहू-केतूने दूषित असल्यास वैधव्य लवकर येते.

हर्षल-प्रजापतीचा विचार या संदर्भात करावाच लागेल. प्रजापतीचा शुक्राशी संबंध प्रेमप्रकरणे दर्शवितो. तसेच घटस्फोटही दर्शवितो आणि एकापेक्षा अनेक विवाहही दर्शवितो. प्रजापतीला एक पत्नीव्रत वा पातिव्रत्य या कल्पनाच मान्य नसतात. प्रजापतीस सतत नावीन्य पाहिजे असते.

वरुण नेपच्यून गुप्तरीत्या वा चोरटे संबंध दर्शवितो.

कुंडलीमध्ये मंगळ एकटाच अशुभ असतो असे नाही. पारंपरिक ज्योतिषशास्त्रानुसार शनी व राहू हे मंगळाइतकेच अशुभ आहेत आणि आता हर्षल, नेपच्यून, प्लूटो या त्रयींची त्यात भर पडली आहे. नेपच्यूनचे योग फसवणूक करणारे, हर्षलचे योग विभक्तपणा, घटस्फोट व पुन्हा विवाह दर्शविणारे आहेत. त्याचा अनुभव येतो पण त्यांचा विचार करण्याचे सामान्य लोकांच्या मनातही येत नाही.

स्त्री-जातक या शीर्षकाच्या २४ व्या अध्यायात श्लोक ८ चा उत्तरार्ध -

**उत्कृष्टा रविणा कुजेत विधवा बाल्येऽस्त राशि -**

**स्थिते कन्यैवाशुभवीक्षितेऽर्कतनये द्यूने जरां गच्छति**

**अर्थ :** (१) जेव्हा रवी अशुभ ग्रहांच्या दृष्टीत असतो तेव्हा त्या स्त्रीचा पती तिचा त्याग करतो तसेच पत्नीही पतीचा त्याग करते.

(२) जेव्हा सप्तमातील वा अन्य भावातील मंगळ अशुभ ग्रहांनी दृष्ट असतो तेव्हा ती स्त्री तरुणपणीच विधवा होते.

(३) जेव्हा सप्तमातील शनी अशुभ दुष्ट असतो तेव्हा ती स्त्री आजन्म अविवाहित राहते.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, सप्तमात शनी, मंगळ, रवी नुसते असून चालत नाही. तर ते अशुभ साहचर्यात वा दृष्टीत असले पाहिजेत अगर पापमध्यस्थ असावे लागतात तेव्हाच वैधव्य-विधुरावस्था येऊ शकते. अशा वेळी सप्तम भावही पापमध्यस्थ वा अशुभ योगात येतो.

जातक पारिजात ग्रंथात १६ व्या अध्यायातील श्लोक १४ व ३० असे आहेत -

श्लोक १६ - ''**पापर्क्षे मदनस्थिते शनियुते वैधव्यमैत्यङगना**''

पापर्क्षे - अशुभ राशी, अशुभ नक्षत्र सप्तमात असून मंगळ शनीच्या युतीत असता जातकी विधवा होते.

श्लोक ३० - ''**क्रूरग्रहैरस्तगतौ समस्तै दिलग्नराशे विधवा भवेत्सा**''

मिश्रैः पुनर्भूरिह जातकन्या पत्युज्झिता हीनबलैरसभ्दिः ।

सप्तमात सर्वच पापग्रह असता जातकी विधवा होते, पण सप्तमात शुभ व अशुभ ग्रह अशी संमिश्र स्थिती असता जातकी पुनर्विवाह करते; अशुभ ग्रह बलहीन असता पती तिचा त्याग करतो.

सारावलीमध्ये ३० व्या अध्ययात प्रत्येक ग्रह १ ते १२ भावांत असता काय-काय फले मिळतील हे दिले आहे. प्रथम भावात मंगळ असता सुखी वैवाहिक जीवन नसते. अष्टम भावात मंगळ असता तिला वैधव्य येते आणि बाराव्या भागात मंगळ असता पत्नीचा घात होतो म्हणजे जातकास विधुरावस्था व द्विभार्या योग येतो असे सांगितले आहे.

पण असे असले तरी एकटा मंगळ अशा ठिकाणी आहे एवढ्याच कारणावरून विधुरता/वैधव्य येईल असे नाही. विवाहाचा कारक ग्रह शुक्र हाही बिघडला पाहिजे. या संदर्भात अनुभव घेणे व अनेक कुंडल्या तपासणे व प्रत्येक वेळी एकटा मंगळ स्थानात असता तो अमंगळ काम करू शकतो का याचाही विचार करावा लागेल. त्याचबरोबर शनी, राहू, हर्षल, नेपच्यून, प्लूटो यांचाही विचार क्रमप्राप्त आहे.

तेव्हा मंगळ काही स्थानात आहे एवढ्याच कारणावरून पत्रिका नाकारणे योग्य नाही. सप्तमेशही बिघडावा लागतो.

कुंडलीचा विचार पुढीलप्रमाणे व्हावा.

- स्त्रीचे कुंडलीत पतिकारक रवी;
- पुरुषाचे कुंडलीत पत्नीकारक चंद्र;
- रवी व चंद्र शनीचे युती प्रतियोगात असता विवाहास फार विलंब लागतो, नेपच्यून बरोबरचेही योग विलंब आणि ठरलेला विवाह मोडणे फसवणूक होणे असे होते;
- दोघांचेही कुंडल्यांत विवाहकारक शुक्र असतो;

- शुक्र अस्तंगत, नीच राशीत आहे का, वक्री आहे का;
- रवी/चंद्र व शुक्र मंगळ शनी राहू प्रजापती व वरुण यांच्या शुभयोगात आहेत का अशुभ योगात आहेत;
- सप्तमस्थ ग्रहांचे भावेशत्व;
- सप्तमेशाची स्थिती;
- शुक्र आणि सप्तमेश कोणत्या नक्षत्रात आहेत;

मंगळाकडे पाहताना हर्षल, नेपच्यूनचाही विचार अवश्य करावा.

**कुंडली : अंजली**


जन्म - मंगळवार दि. ९ ऑक्टोबर १९६५ रोजी रात्री १०.५५

अक्षांश - १७° उत्तर ३१', रेखांश - ७६° पूर्व १५

अयनांश - २३° २०' ३०'', सांपातिक समय - ० तास १९ मि. ५४ से.

वैधव्य, पुनर्विवाह, विवाह २५/९/१९८८.

पतीस अपघात - १४/६/८९; पती मृत्यू - १५/६/१९८९. सायं. ५.०० वा.




सप्तमेश गुरु लग्न भावबिंदूच्या मागे. त्यावर मंगळाची ८ वी दृष्टी, नवमात शनी. त्यावर मंगळाची ४ थी दृष्टी व विवाहकारक शुक्राशी युती आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पतिकारक रवीचा मंगळाशी अर्धकेंद्रयोग. म्हणजे सप्तमेश विवाहकारक व पतिकारक हे सर्व एकट्या मंगळाने बिघडलेले शनी सप्तमाचा द्वितीयेश तेथून तृतीयेत व मंगळ सप्तमाच्या व्ययात यांचा केंद्रयोग. पतीस अपघात रवी अर्धकेंद्र मंगळ व १३५° शनी असा आहे. दिनवर्ष पद्धतीत चलित रवीची वरुण नेपच्यूनबरोबर युती, त्याचे फल Tryst with Destination चलित चंद्र (सप्तमाचा अष्टमेश) युती चलित गुरु (सप्तमेश) विशोत्तरी–


प्रमाणे शुक्र महादशा. शनी भुक्ती वा रवी अंतर चालू होते. पुनर्विवाह १९९४ मध्ये शुक्र महादशा केतू भुक्ती.

## कुंडली : अशोक

जन्म - सोमवार दि. २५ नोव्हेंबर, १९४० रोजी रात्री ११ वा. १५ मि.

अक्षांश - १७° उत्तर ४', रेखांश - ७५° पूर्व ५५'.

अयनांश - २३° १' ५८", सांपातिक समय - ३ तास ६ मि. ३ से.




द्विभार्या योग. ही पतीची कुंडली असून खालील कुंडली पत्नीची आहे. या दोघांचा विवाह झाला. दोन पुत्र झाले १६/३/१९७४ व ७/३/१९८४ रोजी १९९१ पर्यंत पती-पत्नी नांदले. पण १९९१ पासून बिनसले. पत्नी सोडून गेल्यावर घटस्फोटाचा दावा. घटस्फोट मंजूर झाल्यावर १९९३ मध्ये दुसरा विवाह.

## कुंडली : मीना


जन्म - मंगळवार दि. ५ ऑगस्ट, १९४७ रोजी सायं. ७.१५ प्र. वेळ

अक्षांश - १७° उत्तर ४०', रेखांश - ७५° पूर्व ५५'.

अयनांश - २३° ७' १५'', सांपातिक समय - १५ तास ३५ मि. ५५ से.

दोन विवाह योग. १९९१ चे मे महिन्यात पत्नी पतीचे घर सोडून गेली व एक महिन्यात परत आली आणि त्यानंतर ६ महिन्यांनी पत्नी पुन्हा घर सोडून गेली व कायमचीच दुसऱ्या पुरुषाबरोबर राहू लागली. पतीने घटस्फोटाचा दावा केला. त्यात घटस्फोट मिळाला. १९९३ मध्ये पतीने दुसरा विवाह केला.

पत्नी तशीच दुसऱ्या पुरुषाबरोबर राहत आहे. सप्तमात प्लूटो, शनी, रवी युतीत आहेत. जवळच शुक्र आहे. यांचा गुरुशी केंद्रयोग आहे. सप्तमेश चंद्र सप्तमाचे अष्टमात असून त्याचा मंगळ-हर्षल युतीबरोबर केंद्रयोग ३° फरकाने आहे.



म्हणजे दीप्तांशात केंद्रयोग आहे व तो सप्तमेशाचा मंगळ हर्षलबरोबर आहे. हे खरे कारण, पहिल्या नवऱ्याचे घर सोडून दुसरा घरोबा केला. गुरु व्ययस्थानाचा अधिपती असून तो नवमात आहे म्हणजे नेहमीचे घर सोडून दुसरीकडे जाणे असा याचा अर्थ आहे.

## कुंडली : श्रीयुत


जन्म - मंगळवार दि. २ फेब्रुवारी, १९५४ रोजी रात्री १० वा. ३० मि.

अक्षांश - १८° उत्तर ५४', रेखांश - ७२° पूर्व ५५.

अयनांश - २३° १३' १२'', सांपातिक समय - ६ तास १० मि. ५८ से.

विधुरावस्था. विवाह २४ डिसेंबर, १९८२.

पत्नीचा १ मार्च, १९८३ रोजी जबरदस्त हार्ट ॲटॅक येऊन मृत्यू झाला.




लग्नेश बुध षष्ठात कुंभेमध्ये असून त्यावर तृतीयेतून मंगळाची दृष्टी अधिष्ठित केंद्रयोग आहे. सप्तमेश गुरु भाग्यात वृषभ या शत्रुराशीत वा वक्री आहे आणि तोही मंगळाच्या दृष्टीत आहे. मंगळ अष्टमेश व तृतीयेश आहे. तो अशुभ परिणामी आहे. त्याने लग्न व सप्तम स्थान बिघडवलेले आहेत. विवाहसुखाचा कारक शुक्र मकरेत आहे व त्याचा तुळेतील शनीशी केंद्रयोग आहे. शुक्र शनीचा परिवर्तन योग येथे शुभ ठरत नाही. शनी सप्तमाच्या अष्टम स्थानात आहे. शनी षष्ठेश याला महत्त्व आहे. चंद्र राशीचा सप्तमेश चंद्रच आहे व तो शनी व वरुण (नेपच्यून) यांच्या केंद्रात आहे. शिवाय तो वद्य चतुर्दशीचा आहे. श्री. द. दा. भट 'कुंडली अभ्यास' या त्यांच्या ग्रंथात पान ७७ वर लिहितात, ''नुसता मकर राशीतील शुक्र फारसा अशुभ नसला तरी असा शुक्र हर्षल नेपच्यून, शनी-मंगळ यांच्या प्रथम दर्जाच्या कुयोगात असता मात्र हमखास अशुभ फलदायी होतो असा माझा अनुभव आहे'' हे मात्र या ठिकाणी पूर्ण अनुभवास आले आहे. जन्मवार मंगळवार आहे. म्हणून मंगळास महत्त्व आहे. तो येथे प्रधानमारक होतो. शिवाय अशुभ तिथीचेही परिणाम दिसले आहेत.

दि. १ मार्च, १९८३ रोजी वार मंगळवारच होता. रवी कुंभेत, चंद्र कन्येत, मंगळ मीनेत १° २७' व शनी तुळेत १०° ३५' अशी गोचर ग्रहस्थिती होती.

### कुंडली : श्री. सूर्यकांत (पती)

जन्म - शनिवार दि. १५ जून, १९३५ रोजी सकाळी १० वा. १५ मि.


अयनांश - २२° ५७' ३६'', सांपातिक समय - १५ तास १९ मि. ४ से.




### कुंडली : सौ. सूर्यकांता (पत्नी)

जन्म - शनिवार दि. २३ ऑगस्ट, १९४१ रोजी सायं. ६ वा. १५ मि.

अयनांश - २३° २' ३१'', सांपातिक समय - १६ तास २ मि. ४५ से.



या दोन्ही कुंडल्या पती-पत्नीच्या आहेत. संतती झाली आहे पण पती आपले राहते घर सोडून दुसऱ्याच स्त्रीबरोबर राहत असे आणि पत्नी आपल्या मुलासह सासरच्या घरातच राहत असे. मोठा मुलगा उत्तम नोकरीत आहे. धाकटा मुलगा भागीदारीत व्यापार करीत आहे.

दोघे पती-पत्नी एकमेकांचे तोंड पाहत नव्हते. फक्त विभक्त राहणे याचाच विचार करणे आहे.

मकर लग्नाचा योगकारक शुक्र सप्तमात कर्क राशीत आहे. त्याचा प्रजापती (हर्षल) व वरुण (नेपच्यून) या दोन ग्रहांशी केंद्रयोग आहे. शुक्राच्या अष्टमात शनी आहे. सप्तमेश चंद्रावर शनीची दृष्टी आहे. राश्याधिपती मंगळाचा शनीशी षडाष्टक आहे.

शुक्राचा हर्षलशी असलेला केंद्रयोग त्यामुळे जातक दुसऱ्या स्त्रीकडे आकर्षित आहे.

सप्तमेश रवी सप्तमात आहे व त्याचा हर्षल व शनीशी केंद्रयोग आहे. त्यामुळे या स्त्रीचा पतीने त्याग केला आहे.

**दोघांचे न जमण्याचे कारण :** (१) पत्नीच्या कुंडलीतील रवी-चंद्राच्या समोर पतीचा शनी. (२) पतीच्या कुंडलीतील चंद्र पत्नीच्या शनी-हर्षल समोर (३) पत्नीच्या शुक्रावर पतीचा मंगळ. (४) दोघांचे लग्न द्विर्द्वांशात आहेत.

## सप्तमस्थ मंगळाची राशीनिहाय भावफले

**(१) मेषेचा मंगळ :** जेव्हा सप्तम स्थानात एक हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'मेषेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ सप्तमेश असून सप्तमातच असतो तसाच तो द्वितीयेशही आहे. जातकास संपत्ती चांगली मिळते पण विवाहसुख दीर्घकाळ राहत नाही. शिवाय अधून-मधून कलह होत राहतात.

मंगळ दोन व सात या दोन मारक स्थानांचा अधिपती होत असला तरी तो जातकास

मारक होत नाही, असे 'भावार्थ रत्नाकर' या ग्रंथाच्या कर्त्याचे मत आहे. त्या मताशी डॉ. बी. व्ही. रामन सहमत नाहीत.

लाभेश रवी, चतुर्थेश पंचमेश शनी आणि भाग्येश बुध हे द्वितीयेश मंगळाचे सहयोगात वा दृष्टीत असता भाग्यप्रद होतात व शुभ फले देतात.

चंद्र-मंगळ सप्तमात मेषेत असणे हाही धनयोग होतो. चंद्र दशमेश-मंगळ द्वितीयेश यांची युती सप्तमात मेष राशीत होते. चंद्र-मंगळ युती हा लक्ष्मीदायक योग आहे.

अशा परिस्थितीत रवी, शुक्र, बुध लग्नी असता अगर शनी, शुक्र, बुध लग्नी असता बुधाच्या महादशेत (बुध भाग्येश आहे) जातकास विपुल संपत्ती प्राप्त होते.

तूळ लग्नास सप्तमातील मंगळ मेषेत मूलत्रिकोणी असतो. केंद्रात असलेला मंगळ हा उच्च वा स्वगृही असता पंचमहापुरुष योगांपैकी ''रुचक'' नावाचा योग होतो. या योगाची फले फार चांगली वर्णिलेली आहेत. जातक राजा होतो वगैरे. पण प्रत्येक कुंडलीत एवढा मोठा राजयोग होत नसतो. राजा होण्याचा योग विरळाच असतो व क्वचितच एखादाच होत असतो. हेर हिटलर व चार्ली चॅपलीन या दोघांच्या कुंडल्या स्थूलमानाने सारख्या आहेत. त्या पुढे देत आहेत.

पण सप्तमातील मंगळाची दशमावर दृष्टी येते व बऱ्याच वेळा त्याचे सुफल मोठा अधिकारी होणे वगैरेसारखे मिळते. पोलीस अधिकारी वा लष्करातील अधिकारी यांच्या कुंडल्यांत सप्तमात मंगळ आढळतो.

## कुंडली : श्री. पु. मराठे

जन्म - बुधवार दि. ९ जुलै, १९१३ रोजी मालदौली चिपळूणजवळ, दु. १ वा. ३० मि. स्था. वेळ अक्षांश - १७° उत्तर ३९', रेखांश - ७३° पूर्व २३'

अयनांश - २२° ३८' ५९'', सांपातिक समय - ८ तास ३६ मि. ४१ से.


१९३६ - एल्फिन्स्टन महाविद्यालयातून संस्कृत पदवी.

१९३८ - कायद्याची पदवी.

१९४२ - सैन्यात प्रवेश - मेजर झाले.

१९४९ - कारवार, बेळगाव, सांगली, मुंबई या ठिकाणी बड्या हुद्द्यावर काम केले. १९६७-७१ पुणे येथे तिसरे कमिशनर म्हणून काम.

८ जुलै, १९७१ रोजी निवृत्त. मृत्यू - फेब्रुवारी १९९८




६ सप्टेंबर, १९९७ रोजी तपस्वी ऋषी म्हणून महापौरांच्या हस्ते सत्कार अनेक संस्थाचे पदाधिकारी - टिळक विद्यापीठ, वैदिक संशोधन मंडळ, वेदशास्त्रोत्तेजक सभा, गीताधर्म मंडळ, विवेकानंद केंद्र. महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभा. त्यांनी शारदा विद्यापीठ स्थापन केले.

मंगळ या सर्व तऱ्हेच्या कार्याचे केंद्र आहे. मंगळ निरनिराळ्या ग्रहांबरोबर शुभ संबंधात आहे. त्या-त्या ग्रहाचे दर्शित कार्य झाले आहे. लग्नेश शुक्र त्रिकोण प्रजापती हर्षल चतुर्थात आहे. त्यामुळे पदवी परीक्षा. बुधाची चतुर्थावर दृष्टी आहे. बुध-प्रजापती परस्पर दृष्टियोग.

योगकारक शनीची बुधावर दृष्टी. बुध-शनी लाभयोग व सप्तमातून मंगळाची बुधावर दृष्टी. यावर उच्च न्यायालयात वकिली. लाभेश रवी भाग्यात व भाग्येश बुध दशमात शिवाय मंगळ रवी लाभयोग. दोघांवर गुरुची दृष्टी म्हणून सरकारी खात्यात सैन्यात प्रवेश. दुसरे महायुद्ध संपल्यावर सैन्यातून निवृत्त पण त्यांची पोलीस खात्यात नियुक्ती. मंगळ सप्तमात मेषेत आहे. तो गुरुदृष्टीत व रवीच्या शुभयोगात असल्याने पोलीस खात्यात उच्च पदावर काम.


सप्तम स्थान कोर्ट खटले. शनी कायदा, मंगळ सुव्यवस्था, गुरुमुळे मोठा अधिकार पोलीस ट्रेनिंग स्कूलचे प्राचार्य म्हणून काम केले.

## कुंडली : श्री. चार्ली चॅपलीन

जन्म - मंगळवार दि. १६ एप्रिल, १८८९ रोजी ग्रीनिच, लंडन येथे रात्री ८ वा.

अक्षांश - ५१° उ ३२', रेखांश - प ०/५

लग्न तुलेत - १६° २०', दशम सिंह ०.२४





**कुंडली : हेर हिटलर**

जन्म - शनिवार दि. २० एप्रिल, १८८९ रोजी ब्रान्नाऊ येथे सायं. ६.३० वा.

अयनांश - ४८° उ १५', रेखांश - १३° पूर्व २.

लग्न तूळेत - २° ५६', दशम कर्क ९° ५६'.




खरे पंचमहापुरुष योग फार क्वचितच आढळतात. ग्रह स्वगृहीचे वा उच्च असावे लागतात व ते केंद्रात असावे लागतात. राजा वा सम्राट एखादाच असतो. म्हणून असे योग सर्वत्र दिसत नाहीत.

वरील दोन व्यक्ती चार दिवसाच्या फरकाने जन्मलेल्या आहेत. 'रुचक' योगावर जातक युद्धप्रिय, पुढारी सेनापती होतो तो आक्रमक असतो. देशभक्त राजा होतो. अशा योगाचा अनुभव येण्यासाठी लग्नही बलवान असावे लागते. लग्नेशाची लग्नावर दृष्टी दोन्ही

कुंडल्यांत आहे. पण चार्लीच्या कुंडलीत बुध मीनेत षष्ठात आहे तर हिटलरच्या कुंडलीत भाग्येश बुध सप्तमात असून त्याचीही लग्नावर दृष्टी आहे. तसेच रवी उच्चांशाचे निकट फक्त १°३०' मागे आहे. रामन अयनांशानुसार रवी परमोच्चांशी आहे. शुक्र-बुध यांची दृष्टी व रवी उच्चांशी यामुळे हिटलरचे कुंडलीत हा योग आलेला आहे. मंगळ दोन्ही कुंडल्यांत जवळ-जवळच्या अंशात आहे.

चार्लीच्या कुंडलीत भाग्येश बुध षष्ठात नीच राशीत प्रजापतीच्या (हर्षलच्या) प्रतियोगात आहे. भाग्येशच बलहीन झाल्यामुळे लग्नाला बल आले नाही. बुधाचा दशमेश चंद्राशी व लग्नाशी षडाष्टक योग आहे.

परंतु चार्ली जगप्रसिद्ध झाला तो त्याचे कुंडलीतील चंद्राचा लग्नबिंदूशी असलेल्या युतीमुळे तूळ या नाट्य, अभिनयादी कलादर्शक राशीत चंद्र असून मीन नवांशी शुक्राच्या दृष्टीत आहे. चंद्र-गुरुचा लाभयोग आहे.

केवळ मंगळ सप्तम केंद्रात मेषेत आहे. म्हणून 'रुचक' योग होत नाही. यातील सर्व उदाहरणांत मंगळाचे अंश जवळजवळ सारखेच आहेत. हिटलरच्या कुंडलीत शनी दशम बिंदूपासून ११° १२' पुढे आहे. तर चार्लीचा शनी दशमबिंदूच्या मागे ९° १७' आहे.

**(२) वृषभेचा मंगळ** : जर सप्तम स्थानात दोन हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'वृषभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ लग्नेश व षष्ठेश असून सप्तमात वृषभेत येतो. वैवाहिक जीवन सुखी राहते पण पत्नीस आजार होतात. शुक्र बलवान असता आजार होत नाहीत. पण शुक्र व्ययेश असल्याने आर्थिक नुकसान होते. शुक्र मंगळाचा शुभयोग असणे चांगले असते. शुक्र मंगळ एकत्र असून अशुभ योगात नसता पती-पत्नीचे एकमेकांवर प्रेम असते व सामंजस्य राहते.

चंद्र भाग्येश असतो तो सप्तमात उच्च राशीत येतो. जातक भाग्यवान असतो. विवाहामुळे भाग्योदय होतो. पत्नी सुंदर असून सरळ स्वभावाची, गोल चेहऱ्याची आणि कलाप्रवीण असते. चंद्र-मंगळ युती लग्नेश-भाग्येश यांची असल्याने लक्ष्मीची कृपा असते.

गुरु धनेश व पंचमेश असतो. तो मंगळाबरोबर असल्याने लग्नेश-पंचमेश यांची युती होते. हे भाग्यवर्धक व संपत्तिदायक ठरते. सहवासोत्तर प्रेमविवाह पण आई-वडिलांचे संमतीने थाटामाटात होतो.

शनीची युती वा दृष्टी विवाहसुखास विघातक ठरते.

बुध वृश्चिक लग्नास अष्टमेश असतो. षष्ठेश मंगळ व अष्टमेश बुध यांची सप्तमात होणारी युती चांगली नाही. द्विभार्या योग होतो. मात्र जातकाचे वक्तृत्व कौशल्यपूर्ण असते. जातक भांडखोर असतो. मोठ्या भावामुळे अडचणीत येतो.

रवी मंगळाबरोबर असता जातक शूर व पराक्रमी असतो. पत्नी चांगल्या मातब्बर घराण्यातील असते व तिच्यामुळे जातकास आर्थिक लाभ होतो. ती स्वतः कर्तबगार असते.


**कुंडली : श्री. केशवराव कोठावळे**

जन्म - सोमवार दि. २१ मे, १९२३ रोजी मुंबई येथे रात्री ७ वा. ३० मि. प्र. वेळ

अक्षांश - १८° उत्तर ५४', रेखांश - ७२° पूर्व ५०'

अयनांश - २२° ४७' ६'', सांपातिक समय - १० तास ४३ मि. ४६ से.

लग्नेश मंगळ हा मिथुन या बौद्धिक व साहित्यदर्शक राशीत आहे. त्याचा अधिपती बुध सप्तमात वृषभेत असून मिथुन नवांशी आहे. सप्तम स्थान व्यापार दर्शविणारे स्थान आहे. शिवाय मिथुन नवांशातील बुध रसिकता, लेखन, साहित्य, पुस्तके या गोष्टी दर्शवितो. बुध कुंडलीचा लाभेश आहे व लाभस्थानात शनी आहे. बुध व शनी यांचा त्रिकोण योग आहे. शनी तृतीयेश आहे. तृतीय स्थानाचाही संबंध वरील गोष्टींशी येतो. शिवाय तृतीयेश शनी छापखाना व मुद्रण यांचाही दर्शक आहे. बुधाचे महत्त्व पुस्तक छपाई, विक्री दर्शवितो तसेच एजन्सीही दर्शवितो. बुध लाभेश आहे. लाभस्थानावरून संपत्तीचा लाभ तसाच मित्रमंडळाचाही द्योतक आहे. तेही मित्र साहित्यिक असतात.




या कुंडलीत 'पारिजात' नावाचा योग आहे. लग्नेश ज्या राशीत आहे त्या राशीचा अधिपती जर केंद्रात वा त्रिकोणात अगर उच्च असेल तर हा योग होतो. असा जातक मध्यम व उत्तर आयुष्यात सुखी होतो. त्यास मान्यवरांकडून मान-आदर मिळतो. तो उदार व दिलदार असतो. येथे लग्नेश मंगळ मिथुनेत आहे व त्याचा अधिपती बुध सप्तमकेंद्री आहे. बुधाची लग्नावर दृष्टी असावी असे शास्त्र सांगते. बुध स्वनवांशी आहे. नवांशात

बुधाचे जोडीस शुक्रही आहे तेव्हा वरील वर्णन जातकासही लागू पडते. जातक मान्यवर असून लोकप्रिय आहे.

बुध शनी त्रिकोण वकिलीचाही व्यवसाय दाखवू शकतो. पण शनीचा दशम भावाशी अगर दशमेशाशी दृष्टी वा शुभसंबंध नाही. दशमेश रवी व शनी यांचा १३५° चा अशुभ योग आहे.

कुंडलीत षष्ठस्थान ते द्वादश स्थान अशा सात स्थानात सर्व पारंपरिक ग्रह आहेत. हा 'अर्धचंद्र' नावाचा नाभस योगापैकी एक योग आहे. त्याचे फल जातक नशीबवान, तेजस्वी व्यक्तिमत्त्व दर्शवितो व तो आपल्या क्षेत्रात प्रमुख होतो. अर्थात हा योग आपोक्लीम स्थानापासून आहे व तो दुसऱ्या प्रतीचा योग असतो.

केशवराव कोठावळे हे मॅजेस्टिक बुक स्टॉल चालवित होते. तसेच त्यांचा छपाई व प्रकाशनाचा व्यवसाय होता अनेक साहित्यिकांचे ते मित्र होते. मॅजेस्टिकवरील गप्पा प्रसिद्ध असत.

भाग्येश चंद्र भाग्यात आहे. त्याचा बध व शनी यांच्याशी शुभयोग आहे. चंद्राचे चतुर्थात गुरु मीन नवांशी आहे. तो कुंडलीचा धनेश आहे. गुरुच्या माध्यमातून म्हणजे प्रकाशन, साहित्य यावर संपत्ती मिळते.

(३) **मिथुनेचा मंगळ** : जेव्हा सप्तम स्थानात तीन हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'मिथुनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –

सप्तमात मिथुन रास येते. मंगळ पंचमेश व व्ययेश असून सप्तमात मिथुनेत येतो. जातक चांगल्या कुटुंबातून आलेला असतो. मिथुनेतील मंगळ गणित विषयात प्रावीण्य देतो व शिक्षण उत्तम होते. मंगळ व्ययेशही असल्याने पत्नीकरिता व संततीकरिता खर्चही होतो. पत्नीही शिक्षित असते आणि सुसंस्कृत घराण्यातून आलेली असते.

एका ज्योतिर्विदाच्या मतानुसार पत्नी उधळी व स्वच्छंदपणे वागणारी असून ती नवऱ्याचा आदर ठेवीत नाही. पत्नीकरिता वा संततीकरिता खर्च करणे वा होणे यात पत्नीच्या हातून उधळपट्टी होते हा अर्थ काढणे बरोबर होणार नाही. पत्नीच्या संदर्भात मंगळ षष्ठेश असतो व तिच्या आजारपणासाठी खर्च होणे अपरिहार्य असते. त्यास उधळपट्टी म्हणता येत नाही.

सप्तमेश बुध कसा आहे अगर शुक्राची स्थिती कशी आहे यावर पत्नीचा स्वभाव चैनी व स्वच्छंदी आहे किंवा कसे हे अवलंबून राहते.

मिथुन राशीत मृगाचा तिसरा व चौथा असे दोन चरण, आर्द्राचे ४ चरण व पुनर्वसू नक्षत्राचे ३ चरण येतात. मृग हे मंगळाचेच नक्षत्र आहे आणि पुनर्वसू हे लग्नेशाचेच नक्षत्र आहे. या दोन्ही नक्षत्रांतील मंगळ अशुभ ठरत नाही, परंतु आर्द्रा या राहूच्या नक्षत्रातील मंगळ चांगला नाही. तो तामसी होतो.

गुरूची मंगळावर दृष्टी असता सप्तमस्थ मंगळ दोषास्पद ठरत नाही. पंचमेश मंगळ व लग्नेश गुरु यांचे शुभसंबंध शुभ फलदायी असतात.

रवी मंगळाबरोबर असता भाग्येश व पंचमेश यांची युती सप्तमात होत असल्याने ती शुभ फले देणारी ठरते. प्रशासनात मोठ्या पदावर जाणारा, लष्करातील अधिकारी वा न्यायाधीश असा जातक होतो अगर राजकारणात जाऊन मंत्रिपदाचा लाभ घेतो.

बुधाचा मंगळाशी योग असता विद्या उत्तम होते. विद्वता असते. जातक हरहुन्नरी असतो.

शुक्र मंगळाबरोबर असता चैनबाजी व उधळपट्टी करणारा जातक असतो. शुक्र हा सप्तमाचा व्ययेश आहे. त्यामुळे खर्च होतो. शुक्र-मंगळ युती जबर विषयवासना व अनैतिकतेकडे कल दर्शविते.

सप्तमस्थ मंगळ असता जातक आपल्या जोडीदारावर वर्चस्व गाजविणारा तसेच सतत टीका व टोचून बोलणारा असतो.

शनीची मंगळावर दृष्टी पंचम, दत्तक या लग्नातून येऊ शकते. पंचमात शनी नीच राशीत येतो. त्याची वा दशमस्थ शनीची मंगळावर येणारी दृष्टी चांगली ठरत नाही. विवाहसुख व संततीसुखही बिघडते. येथे द्विभार्या योगाची शक्यता असते. शनी-मंगळ प्रतियोग तसाच अनिष्ट फलदायी ठरतो. जातकास मोठी दुखणी येतात.

चंद्र अष्टमेश असल्याने त्याची मंगळाशी युती चांगली ठरत नाही.

प्रजापती (हर्षल) व वरूण (नेपच्यून) चे योग पूर्णपणे अशुभ ठरतात. प्रजापतीमुळे अपघात होतात. घटस्फोट वा द्विभार्या योग वगैरे प्रकार घडतात.

मंगळ वरूण यांची युती स्फोटक ठरते. जातक विवाहसंबंधात फसला जातो. अन्य व्यावहारिक बाबतीतही त्यास त्रास व कटकटी सोसाव्या लगातात. मारक स्थानातील ही युती आयुष्य संपवणारी ठरते.


## कुंडली : श्रीयुत

जन्म - शुक्रवार दि. १६ मार्च, १९४६ रोजी पहाटे १ वा. ३५ मि.

अक्षांश - २९° उत्तर २३', रेखांश - ७८° पूर्व ११

अयनांश - २३°६' ४'', सांपातिक समय - १२ ता. ४९ मि. १ से.

मंगळ-शनी युती वचनात मिथुनेत आहे.




मंगळ पंचमेश व शनी धनेश आहे. दोघांची लग्नावर दृष्टी आहे. मंगळाची दशमावर तर शनीची दशमेश बुधावर दृष्टी आहे.

दशमेश बुध चतुर्थात मीनेत नीच राशीत आहे. पण शुक्र तेथेच आहे. त्यामुळे बुधाचा नीचभंग झाला आहे. बुध दशमेश व शुक्र लाभेश यांची युती असून दोघांची दशमावर दृष्टी आहे. प्रजापती षष्ठात आहे. त्याचा दशमबिंदूशी पूर्ण त्रिकोण योग आहे. चंद्राचे दशमात साहसी प्रजापती आहे व लाभात शनी-मंगळ आहेत.

सप्तमस्थ शनी-बुध कायदा व सुव्यवस्था. मंगळ हा गुन्हेगारांवर वचक बसविणारा पराक्रमी व धाडसी आहे. राहू त्रिकोण गुरु (लग्नेश) जातक पोलीस सुररिटेंडेंट आहे.

**(४) कर्केचा मंगळ :** जर सप्तम स्थानात चार हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कर्केचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे-

मंगळ चतुर्थेश व लाभेश असून कर्केत नीच क्षेत्री येतो. पत्नी अशक्त व दुर्बल आणि व्याधिग्रस्त असते. द्विभार्या योग होतो. जातकाचे इतरांशी संबंध चांगले नसतात आणि जातकास त्याच्या उद्योग-व्यवसायात नुकसान येत राहते.

मकर लग्नास मंगळ चतुर्थेश असतो, तोच सप्तमात नीच राशीला येतो. त्यामुळे मातृसुख लहानपणीच हरपते. जातकास अन्य नातेवाईक वाढवितात. लहानपण सुखात जात नाही. लाभेश नीच असल्याने मित्रही चांगले भेटत नाहीत. घरी व दारी सुख-शांती नसते.

परंतु मंगळाच्या नीचत्वाचा भंग होत असल्यास वरीलप्रमाणे अशुभ फले मिळत नाहीत. खालीलप्रमाणे परिस्थिती असता नीचभंग होतो.

मंगळ कर्केत असल्याने त्याचा अधिपती चंद्र हा वृषभ राशीत असता अगर चंद्र मंगळाबरोबर कर्केत असता.

कर्केत गुरु उच्च असल्याने तो मंगळाबरोबर सप्तमात असता तसेच शुभ चंद्राचे अगर लग्नाचे केंद्रात असता.

मकरेत मंगळ उच्च असल्याने त्याचा अधिपती शनी लग्नाच्या अगर चंद्राच्या केंद्रात असता. मंगळ ज्या नवांशांत असतो त्या नवांशाचा अधिपती चंद्राच्या केंद्रात असून चंद्र चर राशीत असता.

मकर लग्नास गुरु तृतीयेश व व्ययेश असल्याने व तो मंगळाबरोबर असल्याने मंगळाचे नीचत्व नाहीसे होत असले तरी गुरुचे व्ययेशत्वामुळे पत्नीची प्रकृती चांगली ठेवीत नाही; पण गुरु तृतीयेश असतो व तो उच्च असल्याने व कारक मंगळाच्या सान्निध्यात येत असल्याने भावाबहिणींची जातकास मदत होते.

पण उत्तरकालामृतातील ''देवाधीशपुरोहितस्य सहजांत्याधीशतः संततं ......... तथा चाष्टमस्थितिरपिस्यात् योगकृत देहीनाम्'' या वचनानुसार गुरुचे व्ययेशत्व शुभ ठरत असल्याने गुरुची सप्तमातील उपस्थिती; यामुळे सप्तमाच्या बाबतीतही अशुभत्व शिल्लक राहत नाही व त्यामुळे पत्नी सौख्य उत्तम मिळावयास हरकत दिसत नाही.

मकर लग्नास शुक्र राजयोगकारक असल्याने त्याची सप्तमातील उपस्थिती मंगळाचे नीचत्व भंग करणारी ठरते व वैवाहिक सुख मिळते, संतती होते.

शनीची लग्नातील उपस्थिती अगर शनीची दशमातील उच्च स्थिती यामुळे जर मंगळाचे नीचत्व नाहीसे होत असेल तर शनीची मंगळावरील दृष्टी अशुभ परिणामी ठरणार नाही. मात्र शनीची पंचमातून येणारी तिसरी दृष्टी अगर शनी-मंगळाचे सप्तमातील सहचर्य सप्तमीचे बाबतीत तीव्र अशुभ परिणामी ठरेल. द्विभार्या योग अगर पत्नीस मोठा आजार वा अपघात होईल असे अनुमान काढण्यास हरकत नाही.

मंगळाबरोबर राहू असता वैवाहिक सुख बिघडते, वैवाहिक जीवन दुःखदायी ठरते. द्विभार्या/वैधव्य योग होतो.


बुधाचे व रवीचे मंगळाबरोबरचे सहकार्य चांगले ठरत नाही. रवी अष्टमेश तर बुध षष्ठेश असून ते सप्तमात नीचस्थ मंगळाजवळ येतात. विवाहसुखात सुधारणा होत नाही.

## कुंडली : श्री. प्रभाकर पणशीकर

जन्म - रविवार दि. १५ मार्च, १९३१ रोजी मुंबई येथे पहाटे ४ वा. प्र. वेळ.

अक्षांश - १८° उत्तर ५४', रेखांश - ७२° पूर्व ५०

अयनांश - २२° ५३' ४२", सांपातिक समय - १४ ता. ५१ मि. ४७ से.




मंगळ सप्तमात नीच राशीत आहे. पण मकर लग्नाचा योगकारक शुक्र लग्नकेंद्रात आहे. तसेच चंद्रही मकरेत आहे व त्या दोघांची मंगळावर दृष्टी आहे. म्हणून मंगळाचे नीचत्व नाहीसे झाले आहे.

सप्तमेश चंद्र व दशमेश-पंचमेश शुक्र लग्नी आहेत. चंद्र-शुक्र युती हीच नाट्यकलेस पोषक आहे. मंगळाने त्यात भर घातली. मंगळ व रवी यांचा त्रिकोण योग आहे. रवी-शनीही लाभयोग आहे.

लग्नेश शनी वर्गोत्तम आहे. मंगळ सिंह नवांशी आहे. मंगळ हा लाभेश आहे व त्याची धनस्थानावर दृष्टी तसेच वरुण (नेपच्यून) चीही धनस्थानावर दृष्टी आहे. तेव्हा नाट्यकला अभिनयाच्या जोरावर जातक जगासमोर आले. 'इथे ओशाळला मृत्यू' यामध्ये औरंगजेबाची भूमिका अजोड व अविस्मरणीय आहे. त्यापेक्षाही 'तो मी नव्हेच' मधील काझी लखोबा लोखंडे हीही भूमिका गाजली आहे. त्या नाटकाचे १००० पेक्षाही जास्त प्रयोग झाले आहेत. लग्नेश शनीची भाग्यस्थानावर व प्रजापतीचीही भाग्यस्थानावर दृष्टी आहे. शुक्र-प्रजापती लाभयोग आहे. गुरु त्रिकोण दशम याने धन व कीर्ती, यश मिळविले. प्रभाकर पणशीकर नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होते. संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांचा लौकिक आहे.

**(५) सिंहेचा मंगळ :** जर सप्तम स्थानात पाच हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'सिंहेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

या लग्नास मंगळ दशमेश व तृतीयेश असतो आणि तो सप्तमात सिंह राशीत मित्रक्षेत्री येतो. मंगळ तृतीयेश आहे तसाच भावंडांचा कारक आहे. त्यामुळे भावंडे असतात.

मंगळाची दशमावर दृष्टी येते ती उद्योग-व्यवसायाचे दृष्टीने शुभ फल देणारी ठरते.

दशमेश मंगळ सिंह या राजराशीत येतो. त्यामुळे जातक पोलीस वा सैन्यदलात उच्च पदावर जातो.

सप्तमातील मंगळ पती/पत्नी उच्च कुलातील व श्रीमंत घराण्यातील देतो. पण सिंहेत मंगळ असल्याने ती जास्त मानी स्वभावाची असते.

येथे मंगळाबरोबर गुरु असता पती/पत्नी सुंदर, बुद्धिमान व खानदानी घराण्यातील असतात. गुरु धनेश व लाभेश असतो. त्याचे दशमेश मंगळाशी होत असलेले साहचर्य उद्योग-व्यवसायात यश, मोठी धनप्राप्ती व विवाहामुळे संपत्ती लाभ होतो तसेच उत्तम घराण्याशी संबंध प्रस्थापित होतो.

शुक्र एकटाही राजयोगकारक असतो. त्याची दृष्टी सप्तमस्थ मंगळावर असता नवमेश दशमेशाचे दृष्टिसंबंधामुळे जातक मोठ्या अधिकार पदावर जातो; त्यास मानमान्यता मिळते. जातकास उच्च व पदव्युत्तर शिक्षणाचा तसेच परदेश प्रवासाचाही योग होतो. त्यास मात्या-पित्यांचे सुख लाभते. स्थावराची व वाहनाची प्राप्ती होते. वैवाहिक जीवन व व्यावसायिक जीवन सुखसमृद्धीचे जाते.

शनीची दृष्टी मात्र विघातक ठरेल आणि युती तर विवाहसुखास बाधा आणणारी ठरते.

चंद्र वा बुध यांचे संबंध वैवाहिक जीवन सुखी करीत नाहीत. चंद्र षष्ठेश तर बुध अष्टमेश असल्याने त्यांचे संबंध अशुभ ठरतात.

पण बुध पंचमेशही असतो. त्याचे लाभ वा त्रिकोण योग शुभ परिणामी ठरतो. विद्या पूर्ण होते. जातक युक्तिवादात प्रवीण असतो. बुध-मंगळ शुभयोग स्थापत्यशास्त्रास अगर वकिलीस चांगला ठरतो.

## कुंडली : श्री. शंकरराव कालेकर

जन्म - शुक्रवार दि. १४ जून, १९१८ रोजी पिलीव (ता. माळशिरस).

रात्री १२ वा. ५ मि.


अक्षांश - १७° उत्तर ५०'

रेखांश - ७५° पूर्व २०'

अयनांश - २२° ४३' २३"

सांपातिक समय १७ ता. ५ मि. ५८ से.

B. A. L.L. B., Advocate.




सोलापुरातील नामांकित वकील. एकूण ५ भाऊ व दोन बहिणी. पिलीव येथे मोठी शेती. सोलापूर येथे मोठा वाडा.

जातक उत्तम वकील. सन १९४४ पासून वकिली. विनोदी व आनंदी स्वभाव, मित्रमंडळ मोठे व चांगले. पत्नी चांगल्या घराण्यातील १९९५ साली मयत. १ मुलगा वकील, २ मुली सुस्थळी दिलेल्या आहेत.

जातक फौजदारी व दिवाणी दोन्ही कामात वाकबगार. सन १९५८ च्या सुमारास जातकाची पत्रिका पाहिली व वय ४४/४५ मध्ये सरकारी वकील व्हाल असे सांगितले. त्यावर कोणाचा विश्वास बसला नाही; पण त्या वेळी असलेल्या सरकारी वकिलांनी सोलापूर सोडून मुंबईस प्रयाण केले व तेथे उच्च न्यायालयात वकिली सुरू केली व नंतर उच्च न्यायालयात न्यायमूर्तीही झाले.

त्यामुळे सोलापूर येथील सरकारी वकिलाची जागा रिकामी झाली होती व ती जागा जातकास मिळाली. ७/८ वर्षे काम केले. फौजदारी सेशन केसेस उत्तम चालविल्या.

रवीची दशमावर दृष्टी आहे. रवी व गुरु यांची युती आहे. गुरुचीही दशमावर दृष्टी आहे. दशमात राहू-मान, यश देणारा सरकारी वकील म्हणून अन्य जिल्ह्यांतही सरकारतर्फे खटले चालविले.

स्वतःची मोटारकार आहे. त्यांनी हिंदुस्थानात बराच प्रवास केला आहे.

मंगळ सप्तम भावात आहे. त्याचा रवी व गुरुशी केंद्रयोग आहे.

**(६) कन्येचा मंगळ :** जेव्हा सप्तम स्थानात सहा हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'कन्येचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ भाग्येश व धनेश असून सप्तमात कन्या राशीत आहे. भाग्येश सप्तमात म्हणून विवाहामुळे भाग्योदय दर्शवितो. पण मंगळ शत्रू राशीत कन्या आजारदर्शक, अपघातप्रवण राशीत आहे. लांबच्या प्रवासात खाण्या-पिण्यामुळे आजार होतात. पत्नीस अपघात होतात. येथील मंगळामुळे जातक न्यायालयीन खटल्यात गुंतला जातो.

चतुर्थेश व सप्तमेश बुध मंगळाबरोबर असल्यास बुध-मंगळ युती मातृसुखास आणि-अथवा पत्नीसुखास विघातक ठरेल. बुध-मंगळ योगावर उत्तम वक्तृत्व असते. चिकित्सक वृत्ती असल्याने प्रत्येक गोष्टीत कीस काढण्याची सवय असते. जातक दोन्ही बाजूंनी युक्तिवाद करण्यात कुशल असतो. शिक्षणास बुध-मंगळ योग उत्तम ठरतो.

चंद्र-मंगळ योग म्हणजे पंचमेश व भाग्येश यांचा योग हा लक्ष्मीदायक ठरतो. गुरुच्या दृष्टीने त्यात भरच पडते व उद्योग-व्यवसायात भरभराट, मोठे यश व मानसन्मान प्राप्त होतात. त्यातच मंगळ हस्तनक्षत्री असता संतती, संपत्ती, विवाहसौख्य चांगले मिळते.

रवी-मंगळ सप्तमात एकत्र असणे चांगले नसते. रवी हा षष्ठेश सप्तमाचा व्ययेश असतो.

शुक्र-मंगळ युती शुभ ठरत नाही. शुक्र हा अष्टमेश असून सप्तमात नीच राशीत येतो आणि वैवाहिक जीवन कटकटीचे बनते. परंतु हाच शुक्र लग्नात असता तो उच्च राशीत येतो आणि त्याची व मंगळाची परस्परावर दृष्टी शुभ फलदायी ठरते. हा योग कलावंतांना चांगला ठरतो.

प्रजापती (हर्षल) मंगळाचा योग घटस्फोट, अपघात होण्याची शक्यता असते.

षष्ठात शनी अष्टमात राहू यांच्या कात्रीत मंगळ सापडल्यास पती-पत्नीमध्ये सतत वाक्युद्धे, वावविवाद, भांडणे आणि अनेक मतभेद दर्शविले जातात. सुख कोणासच लाभत नाही. शनी व मंगळ सप्तमात एकत्र हा तर कुयोगच ठरतो.

गुरु-मंगळ एकत्र वा शुक्राची दृष्टी मंगळावर असता धनेश, दशमेश, भाग्येश-दशमेश असे योग उद्योग-व्यवसायात उत्तम यश, विपुल संपत्ती मानसन्मान आणि सुखी वैवाहिक जीवन असे सर्व लाभ देतात.

## कुंडली : श्री. अरविंद मफतलाल


जन्म - शनिवार दि. २७ ऑक्टोबर, १९२३ रोजी सायं. ५ वाजता प्र. वेळ मुंबई येथे.

अक्षांश - १८° उ. ५४'

रेखांश - ७३° पूर्व ५०

अयनांश - २२° ४७' २८", सां स. १८ तास ४० मि. ३७ से.

महान दानशूर व धर्मशील उद्योगपती. नोसिल या केमिकल्स कंपनीचे संचालक आणि पिढीजात कापड उद्योगाचे मालक प्रामाणिक व साहसी.




भाग्येश व धनेश मंगळ सप्तमात, त्याचा पंचमेश उच्चस्थ चंद्राशी त्रिकोण योग हा महान योग आहे. मंगळाची दशमावर दृष्टी आहे. शनीचीही दशमावर दृष्टी आहे. मीन लग्न असल्याने वरुण (नेपच्यून) ग्रहाचा कर्केतून लग्न बिंदूशी त्रिकोण आहे. यावर प्रमुख व स्वतंत्र धंदा नोसिल केमिकल्सचा काढला.

शनी तुळेत आहे. रवी आणि शुक्र दोघेही तेथेच आहेत. चंद्र वृषभेत आहे. चंद्र लग्नाचा अधिपती शुक्र हा तुळेत आहे. शुक्र व तूळ रास हे कापडाचा धंदा दर्शवितात. तुळेत शनी वर्गोत्तम आहे. शनी दीर्घकाळ चालणारा व्यवसाय वा गोष्टी दर्शवितो. तसेच चंद्र लग्नाचा दशमेश शनीच आहे व तो पिता वा पितरकारक रवीबरोबर आहे म्हणून हा कापड व्यवसाय पिढीजात होता व आहे व तोही धंदा परंपरेने जातकाचे ताब्यात आलेला आहे. व्यापारदर्शक बुध हा वरुणाच्या लाभयोगात आहे.

भाग्येश मंगळ व पंचमेश उच्च चंद्र यांचा त्रिकोण योग आहे. तसेच सप्तमेश व चतुर्थेश बुध आणि लाभेश शनी यांची युती ४° त आहे. हाही उत्तम धनयोग तसेच स्थावर व वाहनादी लाभ आणि त्यांचे व्यवसायात त्यांना कामगार वर्गाची मिळणारी साथ दर्शवितो.

**(७) तुळेचा मंगळ :** जर सप्तम स्थानात सात हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'तुळेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –

मेष व वृश्चिक या मंगळाच्या राशी आहेत. या दोन्ही लग्नांना मंगळ सप्तम स्थानात शुक्राच्या राशीत येतो. पण मंगळ जसा लग्नेश तसाच तो दु:स्थानेशही असतो आणि सप्तमेशाचे स्थितीवर सप्तमस्थ मंगळाचे शुभाशुभत्व अवलंबून राहते.

मंगळ लग्नेश व अष्टमेश असून सप्तमात तूळ राशीत येतो. विवाह लवकर होतो व बऱ्याच वेळा आप्तसंबंधात होतो. मंगळाचा शुक्राशी शुभयोग असेल तर विवाह सुखी व समृद्धीचा होतो. सर्वसाधारण नियम असा आहे की, लग्नेश व सप्तमेश एकमेकांच्या शुभयोगात असता विवाह सुखावह होतो. त्या दोघात कुयोग असता विवाह ताणतणावाचा असतो. शुक्र वा सप्तमेश पापग्रहांच्या अशुभ योगात असता मात्र अशुभ परिणाम दिसतात व वैधव्य/विधुरावस्था येते.

जातकास प्रवासाची आवड असते. शुक्र-मंगळ एकत्र असता लांबचे प्रवास होतात. परदेश प्रवाससुद्धा होतात. जातक अन्य स्त्रीकडे - परदारेकडे वळतो. त्यामुळे अंतिमतः नुकसानीत येतो व दुःखी होतो.

सप्तमात मंगळ व शुक्र एकत्र असता जातक नशीबवान असतो. मंगळ लग्नेश तर शुक्र द्वितीयेश (धनेश) असतो. त्यामुळे स्वतःच्या मेहनतीने व कर्तबगारीने संपत्ती मिळवितो.

सप्तमात रवी नीच राशीत येतो, येथे सप्तम स्थान बिघडते. एक पत्नी मयत होते. संतती (रवी पंचमेश असतो) होत नाही. परिस्थिती प्रतिकूल असते. वडिलार्जित संपत्तीचा ऱ्हास होतो. वैवाहिक जीवन खडतर असते.

मंगळाबरोबर येथे चंद्र असता लग्नेश चतुर्थेश केंद्रात एकत्र येतात. जातकाचे नाक उंच व उठावदार असते. डोळे विशाल असतात. चंद्र क्षीण असता मातेला अनिष्ट ठरतो. शुक्ल पक्षातील चंद्र असता लक्ष्मीदायक योग होतो.

बुध मंगळाबरोबर असता पत्नी सुंदर, बुद्धिमान, सुशिक्षित असते. परंतु ती प्रकृतीने दुर्बल व आजारी असते. (बुध लग्नाचा षष्ठेश व सप्तमाचा व्ययेश असतो.) ती धूर्त असते व जमवून घेत नाही आणि खर्च फार करते. षष्ठेश बुधाच्या सहयोगाने जातकाससुद्धा व्याधी होतात.

गुरु मंगळाबरोबर असता विवाह पारंपरिक पद्धतीने होतो व जीवन सुखी राहते. जातकास वक्तृत्व असते. गुरु भाग्येश असतो आणि विवाहामुळे वा विवाहानंतर भाग्योदयास सुरुवात होते.

शनी सप्तमात उच्च राशीत येतो. त्यास दिग्बल व राशिबल असते. लग्नेश व दशमेश यांची युती चांगलीच ठरते. अधिकार, प्रसिद्धी, संपत्ती मिळते आणि विवाह सुखकर होतो. दीर्घकाळ सहजीवन लाभते.

येथे मंगळ व प्रजापती (हर्षल) यांचा सहयोग चांगला ठरत नाही. तंटेबखेडे, कोर्टकचेऱ्या, घटस्फोट असे प्रकार होतात. अपघात व घातपाती मृत्यूचा संभव असतो.

येथे मंगळ व वरुण (नेपच्यून) यांचा सहयोग विवाहसुखास बाधक ठरतो. अपघाती योग आहे. पत्नीचा अपघाताने वा घातपाताने मृत्यू होतो.

मंगळ-राहू युती विवाहसुख बिघडवते. अनैसर्गिक विषयोपभोगाकडे प्रवृत्ती अथवा पशुतुल्य वर्तन विवाह संबंधात असते. पती व पत्नीचा लवकर मृत्यू, संबंध बिघडतात. मारामारी, कोर्टकचेऱ्या होतात.

सप्तमातील मंगळाचे एक वैशिष्ट्य म्हणजे या स्थानातून दशमावर चौथी व द्वितीयेवर आठवी दृष्टी येते. उद्योग-व्यवसायासाठी ही दोन्ही स्थाने विचारणीय असतात. तेव्हा येथील मंगळाचा व्यवसायासंबंधी परिणाम निश्चित होत असतो. तसेच सप्तम स्थान हे दशमाचे दशम व भाग्यस्थानचे लाभस्थान होते.


मेष लग्नास लग्नेश सप्तमात येतो व त्याची लग्नावरील दृष्टी शुभच असते. व्यक्तिमत्त्व उठावदार असते. पुढील कुंडल्याचा विचार करता याचे महत्त्व लक्षात येते.

**कुंडली : श्री. मोहनसिंग बंकटसिंग बायस**

जन्म - बुधवार दि. १ फेब्रुवारी, १९२२ रोजी सोलापूर येथे दुपारी १२ वा. ३० मि.

अक्षांश - १७° उ. ४७', रेखांश - ७५° पू. ५५.

अयनांश - २२° ४६' १२", सांपातिक समय - २० ता. ४५ मि. ४८ से.




पंचमेश रवी व धनेश शुक्र यांची युती. दशमात व त्यावर मंगळ व गुरु यांची पूर्ण दृष्टी आहे. रवी-प्रशासन सरकारी नोकरी दर्शवितो. मंगळ पोलीस, सैन्य, वैद्यकीय दर्शवितो. सप्तमेश शुक्र दशमात आहे. तो न्यायखात्याशी संबंध दर्शवितो. दशमेश शनी षष्ठात आहे.

शनी व शुक्र पूर्ण त्रिकोण आहे. शनी कायदा व सुव्यवस्था दर्शवितो. षष्ठात राहू आहे. तो गुन्हेगारीशी संबंधित असतो. या सर्वांचा एकत्रित विचार करता पोलीस खात्याशी संबंध येतो. शनी कायदा सुव्यवस्था, शुक्र सप्तमेश म्हणून न्यायालयाशी संबंध, रवी सरकारी खाते, भाग्येश गुरु उत्कर्ष, मान, संपत्तिदर्शक आहे. पोलीस खाते जास्त बरोबर वाटते.

जातक पोलीस खात्यात नोकरीस लागला. १९६० साली तो D.S.P. झाला. एक उत्तम अधिकारी म्हणून लौकिक मिळविला. भरदार व्यक्तिमत्त्व. नागरिकांना दरारा व भीती वाटे. पुढील बढतीची कल्पना नाही. निवृत्त होऊन सोलापुरात स्थायिक झाले.

**(८) वृश्चिकेचा मंगळ :** जर सप्तम स्थानात आठ हा अंक असलेला तर तेथील मंगळाला 'वृश्चिकेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ हा सप्तमेश आहे व तो सप्तमातच आहे. तसाच तो व्ययेशही आहे. पत्नी साधारण कुटुंबातून आलेली असते व वैवाहिक जीवन फारसे सुखावह ठरत नाही. असे सर्वसाधारण मत असले तरी 'भावार्थ रत्नाकर' मध्ये 'वृषभ लग्न विचार' या प्रकरणात ''वृषभे जायमानस्य कुजस्सप्तमगश्शुभम्'' असे सांगितले आहे. म्हणजे वृषभ लग्नास मंगळ अशुभ ठरत नाही. उलट तो शुभ फलदायी असतो.

विवाहसुख चांगले मिळते व तेही दीर्घकाळ मिळते आणि पत्नी चांगल्या घराण्यातून येते.

ज्या-त्या भावाचा अधिपती त्याच स्थानात असावा हा जो सामान्य नियम त्यास अनुसरूनच वरील टिप्पणी आहे.

पण विवाहसुखाचा विचार करते वेळी लग्नेश व सप्तमेश एकमेकांचे शुभयोगात असावे लागतात. तसे असले म्हणजे विवाहसुख चांगले मिळते. शिवाय वृषभेचा अधिपती शुक्रच आहे व तो विवाहाचा कारकही असतो. या दोन्ही दृष्टिकोनातून शुक्र-मंगळ शुभयोग असता विवाहसुख चांगले मिळते व ते दीर्घकाळ टिकते.

उदाहरणार्थ, एका वृषभ लग्नाचे कुंडलीत-शुक्र कन्येत १०° (पंचमात) व मंगळ वृश्चिकेत ८° २२' सप्तमात आहे. हा दोघांमधील लाभयोग आहे. शुक्र नीच असला तरी त्याचा अधिपती बुध चतुर्थकेंद्रात आहे. तेव्हा नीचभंगही झाला आहे. या व्यक्तीचा विवाह होऊन ५२ वर्षे झाली आहेत. दोघेही पती-पत्नी सुखात व मजेत आहेत.

सप्तमातील मंगळाचा व्यवसायावरही परिणाम असतो.


## कुंडली : एक उद्योगपती

जन्म - शुक्रवार दि. २९ सप्टेंबर, १९३३ रोजी रात्री १०.१५ प्र. वेळ.

अक्षांश - १०° ५०' उत्तर,

रेखांश - ७८° पूर्व ४२'

अयनांश - २२° ५६', सांपातिक समय - २२ ता. ३२ मि. ४१ से.




योगकारक शनी नवमात स्वगृही आहे. धनेश व पंचमेश बुध कन्या राशीत मूलत्रिकोणी आहे व तो पंचमातच रवी व गुरुबरोबर आहे. त्याचा तृतीयेश चंद्राशी त्रिकोण योग आहे.

नवमस्थ शनी हा गुरु, रवी व बुध यांचे त्रिकोण योगात आहे. गुरु अष्टमेश व लाभेश आहे. त्याचा व बुधाचा योग आणि योगकारक शनीशी असलेला त्रिकोण योग आर्थिक भरभराट व तीसुद्धा कामगारांवर अवलंबून असलेल्या उद्योगावर आहे. लग्नेश शुक्र षष्ठात असून त्याचा दशमाशी त्रिकोण योग आहे. पण दशमेश शनीची शुक्रावर दृष्टी आहे. शुक्राचा संबंध कापड उद्योगाशी येतो. चंद्राच्या दशमात दशमेश शुक्र आहे. हेही कापड उद्योग दर्शविणारे आहे. टेक्स्टाईल उद्योग-गिरणी या जातकाची स्वतःची आहे.

**(९) धनुचा मंगळ** : जर सप्तम स्थानात नऊ हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'धनुचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मिथुन व कन्या या दोन्ही लग्नात सप्तमात गुरुच्या धनु व मीन या राशी येतात व तेथे मंगळ मित्रक्षेत्री येतो. परंतु मिथुन लग्नास मंगळ षष्ठेश व लाभेश असतो तर कन्या लग्नास तो तृतीयेश व अष्टमेश असतो. या भावेशत्वाच्या दृष्टिकोनातून सप्तमस्थ मंगळाचा विचार करावा लागतो.

सप्तमात धनु रास असून मंगळ लाभेश व षष्ठेश असतो. लाभेश सप्तमात असल्याने विवाह नातेसंबंधात वा ओळखीच्या घरातील होतात. श्रीमंत घराण्यातील जोडीदार मिळतो. सप्तमेश गुरुचा शुभसंबंध असता विवाहसुख चांगलेच मिळते. परंतु मंगळ दूषित असता जोडीदार अशक्त व आजारी असतो. द्वितीय संबंध करावयाची पाळी येते.

राहू, केतू वा हर्षलच्या कुयोगात असता जातक पत्नीचा त्याग करतो. स्त्री-जातकास विभक्त राहावे लागून घटस्फोटाचा मार्ग अनुसरावा लागतो.

धनु राशीत मूळ, पूर्वाषाढा व उत्तराषाढा पहिले चरण अशी नक्षत्रे येतात. पैकी मूळ हे घातकी नक्षत्र आहे. तेथील पतीचा/पत्नीचा अपघाती वा अकाली मृत्यू दर्शवितो. पुनर्विवाह होतो.

चंद्र द्वितीयेश असतो. चंद्राचा मंगळाशी सहयोग म्हणजे धनेश-लाभेश यांची युती आणि हा योग उत्तम संपत्ती देणारा आहे. तसेच भागीदाराचे व्यवहारही फायदेशीर ठरतील. पण जातकात एखादे व्यंग वा वैगुण्य असते.

पूर्वाषाढा हे शुक्राचे नक्षत्र आहे. शुक्र पंचमेश व व्ययेश असतो. शुक्र शुभसंबंधित असता विवाहसुख चांगले मिळते, संततीचा लाभ होतो.

रवी तृतीयेश असतो. तो सप्तमात मंगळाबरोबर असता भावंडांबरोबरचे संबंध चांगले असतात. रवी लग्नातून मंगळाशी दृष्टियोग करीत असता जातक प्रसिद्धीस येतो. तो नशीबवान असतो. त्यास मान-सन्मान प्राप्त होतात.

बुधाचे मंगळाबरोबर संबंध असता जातक विद्वान व बहुश्रुत असतो. शुक्राची दृष्टी असता जातक देखणा असतो आणि स्त्रिया त्याजकडे आकर्षित होतात.

शनीची दृष्टी असता जातक अपंग होतो व दुःखी असतो. पंचमात शनी असता स्त्री वा पुरुष जातकाचा विवाह वयाचे ३६ वर्षांनंतर होतो.

### कुंडली : श्री. आर. एस. पाटील


जन्म - मंगळवार दि. २८ सप्टेंबर, १९५४ रोजी सोलापूर येथे रात्री १२ वा ३० मि. प्र. वेळ.

अक्षांश - १७° ४०' उ.,

रेखांश - ७५° पूर्व ५५.

अयनांश - २३° १७' ४७"

सांपातिक समय - ० ता. ३१ मि. ५ से.




शिक्षण : B. Com., (Hons) १९७५. LL.B., १९७८, M.S.W. १९८५, M.B.A. १९८३.

विवाह : ३ मे, १९८४. संतती : ३ पुत्र. दोन भाऊ.

माता मृत २८/७/१९८९, पिता मृत : १९९८.

काही दिवस वकिली मग वडिलांच्या धंद्यात मंडप कॉन्ट्रॅक्टर या व्यवसायात हुशार हरहुन्नरी, सगळीकडे लक्ष, आर्जवी बोलणे व कामात तत्पर, मदत करण्यास नेहमी तयार. पत्नी मोठ्या श्रीमंत घराण्यातून व ओळखीच्या घराण्यातून. पंचमात शुक्र लाभयोग, मंगळ (सप्तमात) भाग्येश, शनी पंचमात तूळ राशीत. बुध तूळेत युती शनी. म्हणून शिक्षण B.Com., LL.B. सप्तमेश गुरु युती हर्षल कर्केत. गुरु कर्केत उच्चांशाचे निकट.

**(१०) मकरेचा मंगळ :** जर सप्तम स्थानात दहा हा अंक असेल तेथील मंगळाला 'मकरेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

या लग्नास मंगळ पंचमेश व दशमेश असल्याने तो एकटा राजयोगाकारक असतो आणि असा मंगळ सप्तम स्थानात मकर या उच्च राशीत येतो.

अशा योगावर पुरुष जातक श्री, स्त्री, संतती यांनी व मानसन्मान, कीर्ती यांनी युक्त असतो. भार्या सुस्वरूप, सुशील, कष्टाळू व नशीबवान मिळते. मात्र सप्तमेश शनी केंद्रात वा लाभात असावा. संतती : पुत्र व कन्या दोन्ही होतात. मंगळाची स्वगृहावर दृष्टी असल्याने व्यवसाय-उद्योगात भरपूर यश लाभते व नावलौकिक चांगला होतो. जातक कुलदीपक ठरतो. जातकाचे व्यक्तिमत्त्व देखणे असून शरीरयष्टी उंच असते. जातकाचा एखादा पुत्र परदेशातही जातो व तेथे नावलौकिक मिळवितो.

जातक प्रवास बरेच करतो. त्याचे बोलणे मुत्सद्दीपणाचे असते व आपल्या वागण्या-बोलण्याने लोकांना आकर्षित करतो. त्याच्याबद्दल समाजात आदर असतो.

चंद्र लग्नी असता त्याची मंगळावर दृष्टी येते आणि मंगळाचीही दृष्टी चंद्रावर येते. मूळच्या राजयोगात भर पडते. जातक गोरापान व गोल चेहऱ्याचा असतो. हा लक्ष्मीदायक योग असतो.

रवीची मंगळावर दृष्टी असता संपत्ती उत्तम लाभते. संततीही सुस्वभावी होते. जातक तीक्ष्ण बुद्धीचा व धैर्यवान असतो. वर्ण थोडा काळसर असतो.

गुरु लग्नी असता जातक सुंदर व देखणा असतो. भाग्येश गुरु लग्नी येतो.

बुधाची मंगळावर दृष्टी चांगली ठरत नाही. बुध व्ययेश व तृतीयेश असतो. बुध, मंगळ परस्पर दृष्टियोगावर मानसिक संतुलन बिघडते. व्यवसायात मानहानी होते.

शुक्र लग्नी असता शुक्र-मंगळ प्रतियोग होतो व तो विवाहसुखास प्रतिकूल ठरतो. शुक्र लाभात असता उत्तम फल देईल. स्थावर व वाहने यांचा लाभ होतो. शुक्र भाग्यात उच्च राशीस येत असल्याने त्याचीही शुभ फले मिळतील. पत्नी सुस्वरूप व नशीबवान असते व जातकाच्या भाग्यात भर पडते.

शनी मंगळाचे परस्पर दृष्टियोग अशुभ परिणामी ठरतात. अनेक विघ्ने येतात.

## कुंडली : श्री. माधव विष्णू लेले

जन्म - बुधवार दि. १८ मार्च, १८९६ रोजी टेंभुर्णी येथे दुपारी ३ वा. १८ मि. प्र वेळ,

अक्षांश - १८" उ. १,

रेखांश - ७५° पूर्व. १३'

अयनांश - २२° २४' ४९"


सांपातिक समय - २ ता. ३८ मि. १३ से.

B. A. LL. B., वकील. पिता मृत्यू १९१८. माता मृत्यू : १९३९.

मोठा भाऊ मृत्यू १९४६. धाकटा भाऊ मृत्यू १९३२.

वडिलार्जित स्थावर, त्यात भर घातली. नवीन स्थावर घेतली व नवीन बांधकाम केले. पत्नी सुंदर, कष्टाळू, ५ पुत्र, २ कन्या. व्यवसायात उत्तम यश. समाजात मान व आदर. उंच व दणकट शरीरयष्टी. कपाळावर मध्यभागी जखमेची खूण.

यांचे वडील वकील होते. त्यांनीही सोलापुरात नाव कमावले होते. लो. टिळक सोलापुरास आले असता श्री. विष्णुपंतांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली होती.




१९१८ च्या इन्फ्ल्यूएंझाच्या साथीत वडील विष्णुपंतांचा मृत्यू झाला. त्यानंतर जातकानी एल. एल. बी. शिक्षण पूर्ण केले व वकिलीस सुरुवात केली आणि काही वर्षांतच आपला जम बसविला. अनेक मोठी कामे व खटले यासाठी पक्षकार यांच्याकडे येत. सोलापुरातील बडे व्यापारी यांचे पक्षकार होते. रेल्वेचे वकील म्हणूनही काम केले. उत्तम उलट तपासणी व युक्तिवाद करीत. न्यायालयातही त्यांच्या शब्दास वजन असे.

धनेश रवी व भाग्येश गुरु यांच्यात अंशसाम्याने त्रिकोण आहे. पण गुरु भावसंधित होता. त्याने लग्न राशीची फले दिली नाहीत.

चंद्र दशमात, उच्च मंगळ व उच्च शनी यांच्या दृष्टीत तसेच शनी व मंगळ दोघांचीही लग्नावर पूर्ण दृष्टी आहे. दशमेश मंगळ दशमाचे दशमात उच्च आहे. त्याचा वरुण (नेपच्यून) ग्रहाशी त्रिकोण योग आहे.

चतुर्थात शनी उच्च, चंद्रावर योगकारक मंगळाची पूर्ण दृष्टी यामुळे मातृसुख भरपूर मिळाले.

मंगळाची लग्नावर दृष्टी यामुळे कपाळावर जखमेची खूण होती.

दशमेश सप्तमात उच्च व दशमेशाची दशमावर दृष्टी. मंगळ ज्या राशीत आहे त्याचा अधिपती शनीही उच्च राशीत. शनी-मंगळ संबंध दशमाशी व सप्तमाशी आला. सप्तम व तूळ रास न्यायालयाशी संबंधित असतात. दोघांची गुरुवर दृष्टी. यामुळे न्यायालयाशी संबंधित व्यवसाय, वकिलीचा आणि त्यात दिवाणी न्यायालयात काम, दिवाणी कामात निष्णात व वकिलांमध्ये श्रेष्ठ होते. नामांकित वकील.

एका असिस्टंट जज्जने मला सांगितले की, ते सोलापुरात कनिष्ठ न्यायाधीश पदावर प्रथमच आले असताना त्यांच्यासमोरील प्रत्येक दाव्यात माझे वडील असतच. त्यांच्या

शब्दांत सांगावयाचे म्हणजे - He was standing like a wall before me (in every case).

५० वर्षे पत्नीचा सहवास लाभला. ९ ऑगस्ट, १९७४ रोजी मृत्यू आला.

जातकाने काश्मीर ते कन्याकुमारी व द्वारका ते कलकत्ता असा प्रवास केला. सिलोनलाही जाऊन आले होते.

**(११) कुंभेचा मंगळ :** जर सप्तम स्थानात अकरा हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'कुंभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ चतुर्थेश व नवमेश या नात्याने एकटा राजयोगकारक ठरतो. सप्तमात तो कुंभेत येतो पण तेथे तो शत्रुक्षेत्री येतो.

जातक पराक्रमी शूर व धाडसी असतो. शत्रूवर विजय मिळवितो. नवमेश बनून सप्तमात येतो. त्यामुळे पत्नीमुळे भाग्योदय होतो. पत्नी चांगल्या घराण्यातून आलेली असते. जातक सुदैवी असतो.

जातक उच्च विद्याविभूषित व विद्वान असतो. जातकाच्या आयुष्याचा बराच काळ अडथळे, अडचणी व शत्रू यांच्याशी झगडण्यात जातो.

दशमात रवी, बुध, गुरु असता त्यावर मंगळाची दृष्टी येते व उत्तम राजयोग होतो. जातक राजकारणात जातो अगर सरकारी नोकरीतून उच्चपदास जातो.

लग्नी रवि-बुध असता त्यांची व मंगळाची परस्परांवर दृष्टी येते. संपत्ती मिळते, मानसन्मान प्राप्त होतात. सर्व तऱ्हेचे लाभ व सुखे प्राप्त होतात.

गुरूची मंगळावर दृष्टी असता जातक देखणा, राजबिंडा असून जीवनात यशस्वी हातो. अप्तेष्ट व मित्र यांनी युक्त असतो.

शनीची मंगळावर दृष्टी असता संपत्ती व अधिकार मिळेल पण कौटुंबिक सुख बिघडते. दशमातील शनीची दहावी दृष्टी मंगळावर येते. त्यामुळे अधिकार व संपत्ती मिळेल पण कौटुंबिक सुख बिघडते. उद्योगधंद्यात मानहानी, अवनती या केंद्रयोगामुळे येते. पंचमातील शनीची मंगळावर तिसरी दृष्टी येते. तसेच त्याची तिसरी दृष्टी सप्तमावर येते आणि द्वितीयेवर दहावी व लाभभावावरही सप्तम दृष्टी येते. कौटुंबिक सुखास (शनी व मंगळाची एकत्रित दृष्टी शनीची दहावी व मंगळाची आठवी) प्रतिकूल ठरते. धनाचाही व्यय होतो. शनी-मंगळ प्रतियोग विवाहसुखास व उद्योगधंद्यास अनिष्ट ठरतो.

## कुंडली : श्री. रामचंद्र यशवंत काकडे

जन्म - शनिवार दि. ८ नोव्हेंबर, १९२४ रोजी सोलापूर येथे. पहाटे १ वा. ५७ मि. ५८ से. प्र. वेळ


अक्षांश - १७° पू. ४०', रेखांश - ७५° पू. ५५

अयनांश - २२° ४८' १६", सांपातिक समय - ४ ता. ३८ मि. ४३ से.

शनी महादशा भोग्य वर्षे ९ म. १ दि. ३.

शिक्षण B.A.M.A.LL.B., पण हे सलग झाले नाही.

नोकरी करीत B.A. पदवी. प्रथम मास्तर म्हणून, नंतर जाम गिरणीत व नंतर महसूल खात्यात नोकरी. M.A. ही नोकरी करीत झाले. महसूल खात्यातून निवृत्त झाल्यावर LL.B. ची परीक्षा व महसूल न्यायालयात वकिली केली.




पंचमेश गुरु चतुर्थात प्रजापती (हर्षल) चे केंद्रयोगात. चतुर्थेश मंगळाच्या व्ययात केतू व पुढे प्रजापती. यामुळे शिक्षण सलग झाले नाही.

दशमावर मंगळ व गुरु यांची दृष्टी शुक्राचा त्रिकोण योग. प्रजापती (हर्षल) मुळे व्यवसाय ४ वेळा बदलले. गुरु-शिक्षक, शुक्र-गिरणी व महसूल खाते. मंगळ त्रिकोण योग शनी यामुळे वकिली. शिवाय गुरुची दृष्टी.

ऑक्टोबर १९९० मध्ये हृदयक्रिया बंद पडून मृत्यू. लग्नावर प्रजापती व मंगळाची पूर्ण दृष्टी. लग्नेश रवी तुळेत असून त्याचा राहू-केतूशी केंद्रयोग व शनीचा सहयोग.

स्थिर राशीतून अशुभ योग आणि रवी नीच व केंद्र राहू-केतू यामुळे हृदयक्रिया एकदम बंद पडली.

द्विभार्या योगाचा ऊहापोह (अ) विभागात केला आहे.

**(१२) मीनेचा मंगळ :** जर सप्तक स्थानात बारा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मीनेचा मंगळ' असे म्हणतात.

मंगळ तृतीयेश व अष्टमेश असतो. या दोन अशुभ स्थानांचा अधिपती होऊन मंगळ सप्तमात मीन राशीला मित्रक्षेत्री येतो. ही स्थिती अनेक दृष्टींनी दोषास्पद ठरते. जातकाचे बालपण चांगले जात नाही. आयुष्यात बरेच दुःखाचे प्रसंग येतात. अनेक स्थित्यंतरे होतात. तसेच सरकारी अधिकाऱ्यांची अवकृपा होते. प्रवासातही अपघात वा अन्य धोके संभवतात.

मंगळ शुभ दृष्ट असला तरच भावंडाशी संबंध चांगले असतात. जातकाची आयुर्मर्यादाही फार नसते. त्याची पत्नी व्याधिग्रस्त होते. जातक स्वतः व्याधीने पीडित असतो. गुरुची मंगळावर दृष्टी असता अशुभ फलांची तीव्रता कमी होते व जीवन सुसह्य होते.

मंगळ गुरुने युक्त असून अशुभ दृष्टीत नसता जातक परदेशात शासनाचे कामगिरीवर जातो.

रवी व्ययेश असल्याने त्याची मंगळाशी युती वा दृष्टी अशुभ ठरते.

चंद्र लाभेश असतो. त्याच्याशी सहयोग मीन या मित्र राशीत होतो. संपत्ती लाभाच्या दृष्टीने हा योग चांगला ठरतो. स्त्रियांकडून पैसे मिळण्याचा योग होतो. भागीदाराकडून अगर मृत्युपत्राद्वारा पैसा मिळतो.

शुक्र कन्या लग्नास भाग्येश व धनेश असतो आणि तो सप्तमात मीन राशीत उच्च क्षेत्री येतो. हा मालव्ययोग होतो. या योगावर जातकास उत्तम धनलाभ होतो व मान मिळतो. हा भाग्यवर्धक योग आहे. पण शुक्र-मंगळ युती परस्त्री संबंध दर्शवितो. वैवाहिक जीवन सुखी नसते. एक पत्नीव्रत नसते.

शनी मंगळाबरोबर सप्तमात असता षष्ठेश व अष्टमेश यांचा सहयोग विवाहस्थानात होतो. विवाहसुख बिघडते. हा सहयोग विधुरावस्था/वैधव्ययोग दर्शवितो. आयुर्मर्यादा कमी होते. जातकाचा व पत्नीचा मृत्यू अपघाती होतो. संतती सुखही बिघडते.

बुध सप्तमात नीच राशीत येतो. त्यामुळे बुध मंगळ युती शुभ ठरत नाही. बुध दशमेशही असतो. त्यामुळे नोकरीत अवनती, कटकटी, न्यायालयाचे दरवाजे ठोठावणे अशा घटना होतात. द्विभार्या योगाची शक्यता असते. संतती नसते.

मंगळाचा राहूबरोबर होणारा योग विवाहसुखास घातक ठरतो.

प्रजापती व वरुण यांच्याबरोबरचे योग अपघाताला व मृत्यूला आमंत्रण देणारे ठरतात. वैवाहिक जीवनाचा विचका होतो.


## कुंडली : श्रीयुत के. के. देशपांडे

जन्म - शुक्रवार दि. ९ जून, १९११ रोजी सोलापूर येथे दुपारी १ वा. ३७ मि.

अयनांश - १७° उ. ४०', रेखांश - ७५° पू. ५५

अयनांश - २२° ३७' २८", सांपातिक समय - ६ ता. १७ मि. २२ से.

जातक B.A.LL.B. वकील. माता मृत १९१८. पिता मृत २५/१२/ १९४७.
एक भाऊ धाकटा. प्रथम पत्नी मृत २५/६/१९३४
दुसरा विवाह. दुसऱ्या पत्नीपासून २ कन्या, १ पुत्र.




मातृकारक चंद्र तुळेत २६° ४४' ३१" त्या चंद्राशी राहू व शनीचा प्रतियोग व मंगळाची आठवी दृष्टी. चतुर्थेश गुरु तूळ या शत्रुराशीत असून केतूचे युतीत आहे. गुरु मंगळ पूर्ण षडाष्टक आहे. त्यामुळे मातृसुख अल्प.

अष्टमेश मंगळ सप्तमात व षष्ठेश शनी अष्टमात राहूयुक्त. सप्तमेश गुरुचा मंगळ, शुक्र, राहू, शनी यांशी अशुभ योग. शिवाय शुक्र प्रतियोग हर्षल. वर नमूद केलेल्या योगामुळे प्रथम पत्नी लवकर मयत. दुसरा विवाह. दोन्ही कन्या सुस्थळी आहेत. पुत्र न्यायखात्यात चढत-चढत आहे.

वडिलार्जित शेती व स्थावर होती. धाकटा भाऊ कृषी खात्यात. सतत सोलापूरच्या बाहेर असल्याने शेतीचे उत्पन्न व घरभाड्याचे उत्पन्न जातकाने घेतले. वकिलीचा व्यवसाय साधारण असे.


बंधू निवृत्त होऊन सोलापुरी आल्यावर दोघा भावांचे बिनसले व कोर्ट केस चालू झाली. यास सप्तमातील मंगळच जबाबदार आहे.

जातकाचे पायास जखम झाली ती बरी होईना. जातकाचा मृत्यू दि. ७ जुलै, १९८१ रोजी. अष्टमात शनी. त्यामुळे ७० वर्षांचे आयुष्य लाभले.

८

# अष्टम भाव

सोबतच्या कुंडलीमध्ये ज्या ठिकाणी आठ हा अंक लिहिलेला आहे त्या कुंडलीतील किंवा पत्रिकेतील स्थानाला 'अष्टम स्थान' असे म्हणतात.




या भावावरून आयुर्मर्यादा, मरण, मरणाचे कारण, अपमृत्यू, गंडांतर, अपघात, विघ्ने, पराभव, मृत्युपत्रामध्ये अगर वारसा हक्काने मिळणारे धन, भूमिगत धन, भ्रष्टाचार व काळा बाजार यातून अयत्न धन, हुंडा, श्वशुर धन, विम्याची रक्कम, गुप्तरोग, गुप्त प्रेमप्रकरणे, गर्भपात, स्त्रियांचा मासिक धर्म, विषारी प्राणी, विषारी पदार्थ, अघोरी शिक्षा इत्यादींचा विचार होतो.

या स्थानाचा अंमल जननेंद्रिये, गुदद्वार, बस्ति प्रदेश यांवर असतो.

अष्टम स्थान हे मंगळास प्रतिकूल असलेले स्थान आहे.

वराहमिहीर अष्टमातील मंगळाची फले रवीप्रमाणे घ्यावी असे सांगतात. म्हणजे ''स्वल्पात्मजो निधने विकलेक्षणाश्च'' अर्थ : अल्प संतती व क्षीण दृष्टी असे सुचवितात.

सारावलीमध्ये अष्टमस्थ रवीबद्दल व मंगळाबद्दल स्वतंत्र फले दिली आहेत. मंगळाबद्दल सारावलीकार असे सांगतात. -

**'व्याधिप्रायोल्पायु कुशरीरो नाचकर्मकर्ताच' ।**
**निधनस्थे क्षितितनये भवति पुमान् शोकसंतप्तः ।।**

**अर्थ :** अष्टमात मंगळ असता जातक व्याधिग्रस्त असतो. आयुर्मर्यादा थोडी असते, त्याचे शरीर कुरूप, खंगलेले व व्यंग असलेले असते. पोषण नीट न झाल्याने क्षीण व दुर्बल असते. हलकी कामे करण्याकडे प्रवृत्ती असते आणि आप्तस्वकीयांच्या विरहाने गांजलेला असतो.

शरीरावर जखमा असता, अपघाताचे व्रण असतात. शरीर निस्तेज दिसते. मित्र त्यास सोडून जातात. जातकास शिव्या देण्याची वाईट खोड असते. त्यास पत्नीसुख मिळत नाही.

पत्नीचा अकाली मृत्यू होतो. कुष्ठरोग, मूत्रविकार, जननेंद्रियाच्या व्याधी व नेत्रविकार यामुळे त्रासलेला असतो. जातकाची आयुर्मर्यादा कमी असते, एवढ्याच गोष्टीबद्दल पूर्वाचार्यांचे एकमत आहे.

पण संपत्तीच्या बाबतीत मतभेद आहेत. जातकास संपत्ती थोडीच असते. त्यास शत्रूंचा त्रास होत राहतो. त्याची स्वतःची वागणूक चांगली नसते. बोलणे सभ्यपणाचे नसते. कुचके बोलतो. शिव्यांचा सर्रास वापर करतो आणि याच कारणामुळे मित्र-आप्तेष्ट दुरावतात व शत्रू निर्माण होतात. नीच लोकांच्या संगतीने तो पापकर्मे करतो आणि नातेवाईक व मित्र यांचा रोष ओढवला जातो. पत्नीस प्रसूतीच्या वेळी त्रास होतो. पत्नी-विरह होतो. अष्टमस्थ मंगळाचे दुष्परिणाम एवढे बलवत्तर असतात की नवमस्थ गुरु वा शुक्र यांची शुभ फले मिळू शकत नाहीत.

स्त्री-जातकीचे बाबतीत तिला वैधव्य येते; व्याधी होतात व आप्तजन तिला सोडून जातात.

आयुर्मर्यादा निरनिराळ्या वयोगटांपर्यंत पुढीलप्रमाणे -

१. बालारिष्ट - आठ वर्षांपर्यंत
२. अल्पायू - वय वर्षे ८ ते वय वर्षे ३२ पर्यंत
३. मध्यायू - वय वर्षे ३२ ते वय वर्षे ६६ पर्यंत
४. दीर्घायू - वय वर्षे ६६ ते वय वर्षे १०० पर्यंत
५. पूर्णायू - वय वर्षे १०० नंतर

या आयुर्मर्यादेचा कालनिर्णय करणे हे सर्वांत अवघड काम आहे. त्यासाठी खालील तीन गोष्टींचा विचार करावा लागतो.

(१) लग्नेश अष्टमेश (२) लग्नराशी व अष्टमेश (३) लग्नराशी व होरा लग्न.

अल्पायू : (१) लग्नेश व अष्टमेश यांपैकी एक चर राशीत व एक द्विस्वभाव.
(२) दोन्ही स्थिर राशीत

मध्यायू : (१) लग्नेश व अष्टमेश यांपैकी एक चर राशीत व एक स्थिर
(२) दोन्ही द्विस्वभाव राशीस.

दीर्घायू : (१) लग्नेश व अष्टमेश दोन्ही चर राशीत.
(२) लग्नेश व अष्टमेश यापैकी एक स्थिर व एक द्विस्वभाव.

आयुष्याचा कारक ग्रह शनी आहे. त्याच्या स्थितीचाही विचार करावा लागतो.

विंशोत्तरी दशा व अंतर्दशा यांचा विचार करताना मारक ग्रह कोणत्या लग्नास कोण मारक होतो यावरून त्या मारक ग्रहांच्या दशा अंतर्दशा आयुष्याला विघातक होतात.

मारक ग्रह हे तीन प्रकारचे असतात.

(१) प्रधान मारक ग्रह (२) दुय्यम मारक ग्रह (३) गौण मारक ग्रह.

तृतीय व अष्टम भाव हे आयुष्य दर्शवितात. त्यांची व्ययस्थाने ही मारक असतात. म्हणजे दोन व सात ही स्थाने प्रमुख मारक स्थाने आहेत. त्यापैकी द्वितीय स्थान हे सप्तमापेक्षा जास्त मारक असते. म्हणजे -

१. द्वितीयेश व सप्तमेश हे मारक मृत्यू दर्शवितात.
२. दोन व सात स्थानात असलेले पापग्रह
३. द्वितीयेश व सप्तमेशाबरोबर असलेले ग्रह विशेषतः पापग्रह. द्वितीयेश-सप्तमेशाबरोबरचे ग्रह जास्त मारक ठरतात.

**दुय्यम मारक :** (१) द्वितीयेश व सप्तमेशाबरोबर असलेले शुभ ग्रह (२) तृतीयेश व अष्टमेश (३) द्वितीयेश व सप्तमेशाबरोबर असलेले तृतीयेश व अष्टमेश.

**गौण मारक :** (१) वरील ग्रहांपैकी कोणत्याही ग्रहांचे सह वा दृष्ट असा शनी असता (२) षष्ठेश व अष्टमेश (३) सर्वांत दुर्बल ग्रह.

## अष्टमस्थ मंगळाची राशीनिहाय भावफले

**(१) मेषेचा मंगळ :** जर अष्टम स्थानात एक हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'मेषेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ तृतीयेश व अष्टमेश असून अष्टमात स्वगृही येतो. जातकास आयुष्यात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते आणि सांपत्तिक बाबतीत यश मिळत नाही. जातकास गंभीर आजार होतात आणि धाकट्या भावाचा अपमृत्यू होतो.

अष्टमेश मंगळ अष्टमातच असल्याने जातकास दीर्घायुष्य लाभते. त्यास स्थावर, वाहने यांचाही लाभ होतो व मान आणि अधिकार मिळतात.

अष्टमेश पापयुक्त वा पापदृष्ट असता जातकास यश मिळत नाही. तो चुकीच्या मार्गाने जातो व नुकसानीत येतो.


### कुंडली : श्री. बाबुराव पटेल

जन्म - सोमवार दि. ४ एप्रिल, १९०४ रोजी मस्वान (जि. ठाणे) येथे सायं. ५.४३ स्था. वेळ.

अक्षांश - १९° उत्तर ४२', रेखांश - ७२° पूर्व ४६'

अयनांश - २२° ३१' १२", सांपातिक समय - ६ तास ३२ मि. ४५ से.

प्रख्यात पत्रकार. 'मदर इंडिया' व 'फिल्म इंडिया' या नियतकालिकांचे संपादक. होमिओपॅथिक व फलज्योतिष यांचे अभ्यासक. जनसंघाचे खासदार, कट्टर हिंदुत्ववादी, बुद्धिमान, निर्भीड, टीकाकार.




लग्नेश बुध व तृतीयेश मंगळ यांची युती अष्टम मध्याचे निकट. त्यामुळे पत्रकारिता, नियतकालिकांचे संपादक वरुण (नेपच्यून) दशमात. त्यामुळे सिनेसृष्टी संबंधात मासिके चालविली. टीकात्मक लेख, बोचणारी टीका, सिनेसृष्टीतील नटनट्यांच्या खासगी गोष्टींवरही टीका. मल्लीनाथी. मेषेतील बुध-मंगळाच्या युतीमुळे टीका वगैरे.

दोन बायका, दुसरी सुशिला राणी पटेल, तिला नायिका बनवून 'सैरन्ध्री' नावाचा रंगीत चित्रपट तयार केला व तो गाजला.

सप्तमावर मीन रास गुरु सप्तम बिंदूवर त्रिकोण चंद्र दोन बायका. १९५६ पूर्वी बंधने नव्हती. एक पत्नी कायदा नंतर आला. गुरुचा हर्षल-नेपच्यूनशी केंद्रयोग आहे. केंद्रातील रवीमुळे राजकारणात प्रवेश व खासदार.

**(२) वृषभेचा मंगळ :** जर अष्टम स्थानात दोन हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'वृषभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


अष्टमात वृषभ रास आणि मंगळ द्वितीयेश व सप्तमेश असतो व अष्टमात वृषभेत येतो. जातकास संततिसुख मिळत नाही. पत्निसुखही फार नसते आणि जातकास आयुष्यही फार लाभत नाही व मृत्यू भीषणपणाने येतो.

## कुंडली : सौ. सरल

जन्म - शनिवार दि. ३ मे, १९२३ रोजी अकोला येथे सायं. ६ वा. ३६ मि. प्र. वेळ.

अक्षांश - २०° उत्तर ४०', रेखांश - ७७° पूर्व ६.१४ स्था. वेळ

अयनांश - २२° ४६' ५२", सांपातिक समय - ८ तास ५६ मि. २८ से.




पंचमात केतू व पंचमेश शनी कन्या या तथाकथित वंध्या राशीत आणि व्ययस्थानात असल्याने संतती होत नाही असे काही ज्योतिर्विदांचे म्हणणे दिसते. पण हे वस्तु-स्थितीविरुद्ध आहे.

शनी नुसता योगकारक नाही तर तो पंचमेशही आहे. त्यामुळे तो संतती देणार नाही असे होत नाही व्ययस्थाने असूनसुद्धा तो संतती देऊ शकतो. गुरु जरी शत्रुराशीत असला तरी त्याची पंचमस्थ ग्रहावर पूर्ण दृष्टी आहे. त्यामुळे संतती होण्यास अनुकूलताच आहे. शनी फक्त त्यात अडथळा आणतो. तो अडथळा वैद्यकीय उपायाने दूर होऊ शकतो. तसा तो येथे दूर झालेला आहे. त्यामुळे दि. ७/११/१९४७ रोजी पुत्र संतती झाली आणि दि. २०/८/१९५१ रोजी कन्या जन्मली.

अष्टमात मंगळ आहे व त्याच्याजवळच बुध आहे. बुध-मंगळ युती याचे परिणाम मेंदूमध्ये दोष निर्माण होतो हा आहे. तशी मेंदूत अचानक गाठ आली व तडकाफडकी दि. २८/४/१९७९ रोजी जातकीचा मृत्यू झाला.

वृषभ रास ही मेंदूचा मागील भाग मानेजवळचा दर्शविते. त्यामुळे तेथे गाठ होऊन मेंदूकडे जाणारा रक्ताचा पुरवठा थांबला व निधन झाले.

**(३) मिथुनेचा मंगळ :** जर अष्टम स्थानात तीन हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मिथुनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

अष्टमात मिथुन रास येते. मंगळ लग्नेश व षष्ठेश असून तो अष्टमात शत्रुक्षेत्री येतो. जातक मध्यमायू असतो. षष्ठेश अष्टमात काही अंशी बरा असतो. पण ते अष्टमेश बुधावर अवलंबून असते. मंगळ अष्टमात पीडित असून जातकास कर्ज होते.


## कुंडली : पी. पी. सुराणा

जन्म - शुक्रवार दि. १५ एप्रिल, १९२७ रोजी नागोर (जोधपूरजवळ) रात्री ९ वाजता प्र. वेळ.

अक्षांश - २६° उत्तर, रेखांश - ७८° पूर्व.

अयनांश - २२° ५०' १३", सांपातिक समय - १० तास १३ मि. ११ से.

जन्मकाळी चंद्र महादशा भोग्य वर्षे ५ महिने ११ दि. १६




चांगल्या श्रीमंत व खानदानी घराण्यातून आलेला, वकिलीची परीक्षा देऊन वकिली व्यवसाय करण्यास सुरुवात केली. व्यक्तिमत्त्व उत्तम व प्रभावी होते. वक्तृत्व चांगले होते. गोरापान व पुष्ट शरीरयष्टी. सर्वांशी मिळून मिसळून वागत असे. सोलापुरात फौजदारी खटला व्यवस्थित चालविला. पण दि. ४/११/१९६५ रोजी एकदम हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाला.

लग्नी शनी त्याची दशमावर दृष्टी-सिंह राशीवर. लग्नेश मंगळ अष्टमात मिथुनेत राहूच्या युतीत. अष्टमेश बुध मीनेत नीच राशीत हर्षलचे युतीत बुध-हर्षल युती केंद्रयोग. मंगळ राहू. बुध अष्टमेश तसा राश्याधिपतीही आहे. तोच हर्षलचे युतीत म्हणून अकस्मात मृत्यू. चंद्राच्या अष्टमात रवी आहे.

दिनवर्ष पद्धतीत चलित बुध प्रतियोग जन्म शनी, रवी केंद्रयोग, चतुर्थ बिंदू आणि चलित राहू जन्म मंगळाचे युतीत. चलित लग्न जन्म हर्षलच्या केंद्रात व मंगळ राहूच्या प्रतियोगात आले.

मृत्युकाळी गुरुमहादशा केतू भुक्ती होती. गुरु मारकेश आहे व केतू द्वितीय या मारक स्थानात आहे.

**(४) कर्केचा मंगळ :** जर अष्टम स्थानी चार हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कर्केचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

अष्टमात कर्क रास येते, मंगळ पंचमेश व व्ययेश असून अष्टमात नीच राशीत येतो. जातक अल्पायुषी होतो. त्यास संतती नसते. तो उधळ्या असतो आणि दुष्कृत्यात गुप्तपणे पैसे उधळतो.

**टीप :** धनुपासून मेष रास पाचवी असली तरी धनु राशीचे १९° चे वर लग्न असता मेष रास चतुर्थावर येते आणि पंचमावर वृषभ रास येते. म्हणजे संतती मंगळावर अवलंबून नसते. तेथे पंचमेश शुक्र असतो आणि संततीचा विचार शुक्रावरून करावा लागेल. ही गोष्ट बरेच ज्योतिषी लक्षात घेत नाहीत.


सप्तम भावाचा (अ) विभागात शेवटी चार धनु लग्नाच्या स्त्रियांच्या कुंडल्या दिल्या आहेत. त्यात क्रमांक १ वर चतुर्थ भाव मेष ४° २३' आहे. व क्रमांक २ च्या कुंडलीत चतुर्थ भाव मेष १०° ५' आहे आणि दोन्हीही कुंडल्यांत पंचमावर वृषभ रास आहे. क्रमांक १ ला तीन पुत्र, क्रमांक २ ला फक्त एक पुत्र अशी संतती आहे.

## कुंडली : श्रीयुत गुप्ते

जन्म - सोमवार दि. १९ जून, १९६१ रोजी मुंबई येथे रात्री ८ वा. ३० मि.

अयनांश - २३° १८' ५९", सांपातिक समय - १३ वा. ४१ मि. ४२ से.

विवाह - २२/२/१९८६. कन्या १९८७ जातक बी. ए. १९८३ ते १९९३ पर्यंत 'इंडियन एक्सप्रेस' या वर्तमानपत्राच्या कार्यालयात नोकरी केली. नंतर स्वतःचा व्यवसाय Estate Agency व Advertisement.




दशमावर वरुण (नेपच्यून) प्रतियोग शुक्र त्रिकोण बुध व गुरू. शुक्र-कला, बुध-लिखाण, गुरु-जाहिराती. अशा तऱ्हेचा व्यवसाय केला. स्पष्ट चंद्र सिंहेत १५° २६' ३५" चतुर्थेश मंगळ अष्टमात नीचांशी व प्रजापती हर्षलचे युतीत आहे. चंद्रही अष्टमातच आहे. १९९७/९८ मध्ये आईचा मृत्यू अपघाताने झाला.

## कुंडली : श्री. नरेश अनंत आपटे

जन्म - मंगळवार दि. १ ऑगस्ट, १९७२ रोजी डोंबिवली येथे सायं. ५ वा. ३० मि.

अक्षांश - १९° उत्तर १३', रेखांश - ७३° पूर्व ४'.

अयनांश - २३° २८' ४२", सांपातिक समय - १३ तास २२ मि. ०० से.




शिक्षण - B. E. Computer Engineering. First Class with distinction.
M. S. Computer (Software) in Michigen University.

**नोकरी :** अमेरिकेत १९९७ पासून उत्तम पगार. कॉम्प्युटरबद्दल दोन प्रबंध सादर केले. साहित्याची आवड. संगीताकडे कल. आकर्षक व्यक्तिमत्त्व, देखणा, गोरा व उंच.

धनु लग्नास मंगळ पंचमेश आहे व तो अष्टमात कर्केत नीचांशी आहे. पण कर्केचा अधिपती चंद्र हा मेषेत आहे. पण शिवाय तो लग्नाचे केंद्रात आहे. त्यामुळे नीचभंग झालेला आहे. मंगळ हा बुधाचे युतीत आहे. बुध दशमेश असून त्याचा त्रिकोणाधिपती मंगळाबरोबर झालेला योग हा राजयोगदर्शक आहे. बुध-मंगळ युतीचा शनी व प्रजापती (हर्षल) बरोबर लाभयोग आहे. धनेश शनीत षष्ठात असून त्याचा दशमाशी व प्रजापतीशी त्रिकोण योग आहे. बुध मंगळाचाही दशम बिंदूशी अंशात्मक लाभयोग आहे. इंजिनिअर्सच्या कुंडल्यात अष्टमातील ग्रहांनाही महत्त्व असते. तेव्हा मंगळ हा अष्टमात आहे यास बिचकण्याचे काही कारण नाही. उलट बुध-मंगळ युतीमुळेच जातक शैक्षणिक क्षेत्रात पराक्रम करू शकला आहे. भाग्येश रवी दशमेश बुधापासून फार लांब नाही. मंगळ व गुरु यांच्यात १२८° चा योग दीप्तांशांत आहे. म्हणजे त्रिकोण योग दीप्तांशांत आहे.

शनीची अष्टमावर दृष्टी आहे. त्यामुळे आयुष्य लवकर संपणार नाही. अपघात अपमृत्यू होणार नाही.

**(५) सिंहेचा मंगळ :** जर अष्टम स्थानात पाच हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'सिंहेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

अष्टमात सिंह रास, मंगळ लाभेश व चतुर्थेश असून सिंहेत मित्रक्षेत्री येतो. जातक मध्यायू असतो. त्याची पत्नी लवकर जाते. विवाह सौख्य व्यवस्थित नसते. जातक जन्मतः श्रीमंत असतो. पण त्याजवर अनेक संकटे येतात व संपत्तीचा ऱ्हास होतो. तो दुष्टांच्या संगतीत व चक्रात सापडतो, फसविला जातो व लुबाडला जातो.


## कुंडली : श्री. मुकुंद साठे

जन्म - सोमवार दि. १९ जुलै, १९४८ रोजी सोलापूर येथे रात्री ८ वा. प्र. वेळ

अक्षांश - १७° उत्तर ४०', रेखांश - ७५° पूर्व ५५'.

अयनांश - २३° ८' ८", सांपातिक समय - १५ तास २२ मि. १० से.

अष्टमेत मंगळ कन्येत ८° १५' तो नवमभाव मध्यापासून १८° मागे तर अष्टम भाव मध्यापासून १६° पुढे असा जवळ-जवळ संधीत आहे.




षष्ठेश बुध मिथुनेत १३° ३७' त्याचा मंगळाशी व वरुण (नेपच्यूनशी) केंद्रयोग आहे.

शुक्र प्रजापती (हर्षल) युती असून त्याचे केंद्रात मंगळ आहे.

मेष-तूळमधून राहू-केतू त्याचा शनीशी केंद्रयोग. शनीची दृष्टी राहूवर व तिसरी दृष्टी मंगळावर आहे. म्हणजे लग्नेश आश्लेषा नक्षत्रात बिघडला आहे. शुक्र ४५° राहू व १३५° केतू व युती प्रजापती आणि त्याचे चतुर्थात मंगळ-शुक्र पूर्ण बिघडला आहे. त्याच्याशी कोणाचाही शुभयोग नाही. शुक्र मंगळाच्याच नक्षत्रात आहे. म्हणून मूत्रपिंडाचा विकार.

ऑगस्ट १९९७ मध्ये चेन्नईला गेले. तेथे २८/२/१९९८ रोजी दुसरे मूत्रपिंड बसविले. त्यानंतर जातकास सोलापूरला परत आणले. तेथे काही महिने बरा होता. पण नंतर नवीन मूत्रपिंड स्वीकारण्याचे शरीराने नाकारले आणि सन १९९८ च्या अखेरीस मृत्यू आला. राहू महादशा शुक्र भुक्ती शुक्र अंतरमध्ये मूत्रपिंड रोपण पण मंगळ अंतरमध्ये मृत्यू.

**(६) कन्येचा मंगळ :** जर अष्टम स्थानात सहा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कन्येचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –

अष्टमात कन्या रास असते व मंगळ दशमेश व तृतीयेश असून कन्या या शत्रुराशीत येतो. जातक दुःखी असतो. तो ते दुःख बाहेर न दाखविता आपल्या आत कुढतो.

### कुंडली : श्री शिवशंकर थोबडे

जन्म – रविवार दि. ६ ऑगस्ट, १९३३ रोजी सोलापूर येथे साय. ७ वा. ५६ मि. प्र. वेळ.

अयनांश – २२° ५५' ५६'', सांपातिक समय – १६ तास २७ मि. ४२ से.


जन्मकाळी मंगळ महादशा भोग्य वर्षे २ महिने ९ दिवस १७

उत्तम वकील. विधी महाविद्यालयात अध्यापक. उत्तम कामगिरी.

पत्नी सुशिक्षित व कर्तबगार, सोलापूर महानगरपालिकेत अनेक वर्षे सभासद.

एक पुत्र तोही वकील आहे, तीन सुकन्या.

सर्वांचे व्यवस्थित चालले आहे हे पाहून निवृत्तीकडे वळत होते.




बुध अष्टमेश असून तो षष्ठस्थानात केतूने युक्त आहे. मानसिक संतुलन बिघडू लागले होते.

माझ्या बार असोसिएशनच्या अध्यक्ष पदाच्या कारकिर्दीत मी लॉयर्स चेंबर्सचे काम परिपूर्ण केले. त्या सर्व काळात माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहिलेले हे काकासाहेब होते.

५ जून, १९९६ रोजी रात्री ११.३० वाजता हृदयक्रिया एकदम बंद पडली. सप्तमात चतुर्थेश शुक्र वरुण (नेपच्यून) च्या युतीत आहे आणि रवी व शनी अंशसाम्याने प्रतियोग आहे. यामुळे हृदयविकार व मृत्यू. त्या वेळी चलित गतीने रवीची मंगळाशी युती झाली. विंशोत्तरी दशेनुसार अष्टमेश बुधाची महादशा त्यात रवी भुक्ती व शुक्र अंतर चालू होते.

(७) **तुळेचा मंगळ :** जर अष्टम स्थानी सात हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'तुळेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ नवमेश व धनेश असून अष्टमात तूळ राशीत येतो. जातक उच्च स्थानी जातो पण तेथून तो खाली घसरतो. कब्जे खटल्यात त्याची मानहानी होते. कर्ज काढावे लागते.

मंगळ या लग्नास प्रधान मारकेश असतो आणि अष्टमात तो तूळ या शत्रूराशीत येतो. येथे मंगळ आयुष्य फार देत नाही व आजारामुळे मृत्यू होतो. तूळ रास अष्टमात असता शुक्र बिघडला तर मूत्रपिंड, मूत्राशयाचे विकार होऊन मृत्यू होतो. अष्टमातील मंगळामुळे शस्त्रक्रिया अपरिहार्य ठरते.


## कुंडली : श्रीयुत

जन्म - बुधवार दि. १६ ऑगस्ट, १९६७ रोजी बस्ती येथे रात्री ८ वा. ४० मि. प्र. वेळ.

अक्षांश - २६° उत्तर ४८', रेखांश - ८२° पूर्व ४४'.

अयनांश - २३° २४' ८'', सांपातिक समय - १८ तास १० मि. १७ सेकंद

जन्मकाली शुक्र महादशा भोग्य वर्षे १३ म. ५




गंगटोक येथे २९ मार्च, १९८२ रोजी गंभीररीत्या आजारी पडला. २ एप्रिल, १९८२ रोजी दिल्ली येथे आणले. १५ जून, १९८३ रोजी आईने आपले मूत्रपिंड दान केले.

मूत्रपिंड रोपण झाले पण परके अवयव जातकाच्या प्रकृतीस सहन झाले नाही आणि जातक ९ सप्टेंबर, १९८४ रोजी मरण पावला. शुक्र अष्टमेश असून तो षष्ठात आहे. शनीची चंद्रावर दृष्टी. चंद्र शुक्राच्या नक्षत्रात शुक्रही स्वतःच्या नक्षत्रात. शनी सप्तमेश बुधाच्या नक्षत्रात आहे.

अष्टमात मंगळ तुळेत-वरुण (नेपच्यून) चे सहयोगात व केंद्रयोग बुध, गुरु व रवी. रवी-वरुण पूर्ण केंद्रयोग. म्हणून दुसऱ्याचे मूत्रपिंड जातकाचे शरीर सहन करू शकले नाही.

जातकाचा आजार १० मार्च, १९८२ पासून सुरू. रवी-दशा-राहू भुक्ती.

| | |
|---|---|
| जातकाचा आजार १० मार्च, १९८२ गंभीर स्वरूप आले. | |
| मूत्रपिंड दान १५ जून, १९८३ रवी दशा गुरु भुक्ती. | रवी षष्ठेश आहे. |
| मृत्यू ९ सप्टेंबर, १९८४ रवी दशा शनी भुक्ती. | |

**(८) वृश्चिकेचा मंगळ :** जर अष्टम स्थानी आठ हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'वृश्चिकेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ अष्टमात वृश्चिकेत येतो तो स्वगृही असतो. त्यामुळे आयुर्मर्यादा बरी असते. जातकास त्याच्या आयुष्यात बरेच चढ-उतार पाहावे लागतात. आर्थिक नुकसान, पैशाची ओढाताण होण्याची शक्यता असते. वैवाहिक जीवन कधी सुखी, कधी दुःखी राहते. शुक्र बलवान नसता पत्नीचा मृत्यू लवकर होतो.

### कुंडली : श्री. व्ही. बी. पोतदार

जन्म - शुक्रवार दि. १२ मे, १९२२ रोजी बागलकोट येथे पहाटे ५ वा. ४२ मि. प्र. वेळ.


अक्षांश - १६° उत्तर १२', रेखांश - ७५° पूर्व ४६'.

अयनांश - २२° ४६' २६'', सांपातिक समय - २० तास ४५ मि. ४५ सेकंद.

जन्मकाली शनी महादशा १० वर्षे ११ म. ३ दिवस भोग्य.

१९४२ साली मॅट्रिक उत्तीर्ण. संपूर्ण मुंबई प्रांतात त्या वेळचा उत्तम विद्यार्थी म्हणून जाहीर झाले. १९४२-४६ केंद्र सरकारची नोकरी. १९४६-४८ मुंबई सरकारच्या रेव्हेन्यू खात्यात.

१९४९-५१ केंद्र सरकारच्या अर्थखात्यात. याच कालावधीत बी. ए. झाल्यावर ऑगस्ट १९५१ मध्ये नोकरीचा राजीनामा. १९५१ विवाह. १९५३ LL.B., १९५३ पत्नी मृत्यू. १९५६ दुसरा विवाह. सोलापूर येथे वकिली सुरू. विधी महाविद्यालयात प्राध्यापक १९६४ पासून. १९७९ ते १९८४ अर्ध वेळ प्राचार्य. पंचमेश रवी उच्च. वकिलीत उत्तम युक्तिवाद. अभ्यासपूर्ण बाजू मांडत असत. विधी महाविद्यालयात भारतीय घटनेचा विषय उत्तम रीतीने शिकवला.




सप्तमेश शुक्र वृषभेत २०° ४६' केंद्रयोग हर्षल २०° १७' यामुळे प्रथम पत्नी मृत. द्विभार्या योग.

बुध त्रिकोण शनी व गुरू. यामुळे वकिली व अध्यापनाचे कार्य. बुध-गुरु दोघांचाही दशमाशी पूर्ण त्रिकोण. जवळच शुक्र असल्याने अर्थखात्यात व महसूल खात्यात नोकरी. मृत्यू १९८७. त्या अगोदर वर्षभर बरेच आजारी होते. मृत्युकाली चंद्र महादशा. शनी भुक्ती चालू होती.

**(९) धनुचा मंगळ** : जर अष्टम स्थानात नऊ हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'धनुचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ अष्टमात धनु राशीत मित्रक्षेत्री येतो. तो व्ययेश असून अष्टमात येणे हे आयुष्यमान वाढण्याचे लक्षण आहे. पण तेवढे कारण पुरेसे नसते. अष्टमेश गुरु तसेच योगकारक व आयुष्यकारक शनी यांच्या बलाबलावर ही गोष्ट अवलंबून राहते. गुरुची दृष्टी आयुर्मर्यादा वाढविण्याचे लक्षण असते. मंगळ सप्तमेश असतो म्हणून पत्नी उंचीपुरी व धष्टपुष्ट असते. लग्नेश शुक्र त्यापुढे फारच मृदू व मवाळ वाटतो. पत्नीचा मृत्यू लवकर होतो.

## कुंडली : श्री. श्याम केळकर


जन्म - शुक्रवार दि. १५ सप्टेंबर, १९३९ रोजी सोलापूर येथे रात्री ११.३० प्र. वेळ.

अक्षांश - १७° उत्तर ४०', रेखांश - ७५° पूर्व ५५'.

अयनांश - २३° १' ०", सांपातिक समय - २२ ता. ४५ मि. १२ से.

मंगळ महादशा भोग्य वर्षे २ म. ७ दि. २३.

B. E. Civil. खासगी कॉन्ट्रॅक्टरचा व्यवसाय. सिव्हिल हॉस्पिटल. मेडिकल कॉलेज यांच्या इमारती बांधल्या. आणखीही मोठ्या इमारती बांधल्या. स्वतःचे घरही बांधले. मोटारकारही घेतली.




धनेश बुध युती चतुर्थेश रवी व त्रिकोण हर्षल षष्ठेश आहे. तो कन्येत नीच राशीत असून शुक्र-वरुण (नेपच्यून) यांची पूर्ण यूती आहे. षष्ठभाव मध्य प्रजापती (हर्षल) प्रतियोगात आहे. मंगळ अष्टम व नवम भावांचे संधीवर आहे. त्यामुळे तो लवकर फलद्रूप होत नाही. पण मंगळाची शनीवर व शनीची मंगळावर दृष्टी आहे व दोघेही राहू-केतूचे अशुभ योगात आहेत. गुरु अष्टमेश आहे व त्याचा प्रजापती (हर्षल) शी ४५° चा अशुभ योग आहे. षष्ठस्थान बिघडले. षष्ठेश बिघडला. यामुळे मूत्रपिंडाचा विकार. मूत्रपिंड निकामी होत चालले व शेवटी त्यामुळे मृत्यू आला. १९१० साली शनी महादशा व राहू भुक्ती चालू होती. चलित दशम युती केतू.

**(१०) मकरेचा मंगळ** : जर अष्टम स्थानात दहा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मकरेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ अष्टमात मकरेत येतो. तो लाभेश व षष्ठेश असतो. षष्ठेश अष्टमात असल्याने त्यास शत्रू असतात. स्थावराबद्दल वाद उपस्थित होतात. न्यायालयीन खटल्यांना तोंड द्यावे लागते. वैवाहिक संबंधात ताणतणाव येतात. जातकास व्याधी होतात. तो मध्यायू होतो.

## कुंडली : श्री. मधुकर विष्णू


जन्म - शनिवार दि. १९ एप्रिल, १९२४ रोजी पुणे येथे सकाळी १० वा. २८ मि. प्र. वेळ.

अक्षांश -१८° उत्तर ३०', रेखांश - ७३° पूर्व ५८'.

अयनांश - २२° ४७' ५१", सांपातिक समय - २३ ता. ४१ मि. ३९ से.

शिक्षण B. Sc. Agriculture पण लहानपणापासून मेकॅनिकलचा छंद. जपान व जर्मनीत जाऊन स्वतः उत्तम तंत्रज्ञान शिकून आले. सिनेमांच्या यंत्राबद्दल जास्त कुतूहल. स्वतः प्रोजेक्टर तयार करून पेटंट मिळविले. लोणावळ्यास एका कंपनीत नोकरी. महाराष्ट्रातील अनेक ठिकाणच्या सिनेमा थिएटर्समध्ये जाऊन दुरुस्ती व देखभालीची कामे

केली. विवाह मे १९६२. पंचमात शनी, त्याची सप्तमावर, एकादश स्थानावर आणि द्वितीय स्थानावर दृष्टी - द्वितीयेश चंद्र शनी युती व सप्तमेश गुरुच्या व्ययात यामुळे विवाह ३९ व्या वर्षी झाला. पत्नी डॉक्टर. तिची मोटारकार. दोन संतती. पुण्यास स्वतःचा बंगला बांधला. स्वभाव रिझर्व्ह पण श्रम करण्याची तयारी.




अष्टमेश शनी व षष्ठेश मंगळ यांचा केंद्रयोग व या दोघांचीही तृतीयेश रवीवर दृष्टी. तीन ग्रह उच्च पण भाग्य स्थानात त्यांचा प्रभाव पडला नाही. मृत्युकाळी बुध महादशेत राहूची अंतर्दशा चालू होती.

पिता मृत्यू सप्टेंबर १९५६. माता मृत्यू डिसेंबर १९९० स्वतः जातकाचा मृत्यू दि. ७/७/१९९२ रोजी. १९९१ एप्रिल पासून आजार सुरू झाला. प्रोस्टेट ग्लँड आतड्याला चिकटली. त्यामुळे अन्नपचन होईना. शस्त्रक्रिया झाली पण त्यातून आवाजावर परिणाम झाला. नंतर थोडे बरे वाटून घरी आले. पण मार्च १९९२ मध्ये पडले. त्यांचे खांद्याचे हाड मोडले. पुन्हा हॉस्पिटलमध्ये दाखल पण नंतर खंगत चालले व शेवटी मृत्यू ७/७/१९९२ अष्टमात मंगळ केंद्र शनी चंद्र व रवी. लग्न, रवी व चंद्र हे तीनही मंगळामुळे बिघडले.

## कुंडली : श्री. मोरारजी देसाई


जन्म - २९ फेब्रुवारी, १८९६ रोजी भादेली-बलसाड येथे दुपारी १ वाजता.

अक्षांश - २०° उत्तर ३६', रेखांश - ७२° पूर्व ५६'.

अयनांश - २२° २४' २४'', सांपातिक समय - २३ ता. ३४ मि. २० से.

महान गांधीवादी पुढारी. सरकारी नोकरी सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश. स्वातंत्र्यलढ्यात सहभाग. स्वातंत्र्यानंतर मुंबई राज्याचे मुख्यमंत्री. नंतर केंद्र सरकारात व्यापार व उद्योग अर्थमंत्री नंतर उपपंतप्रधान. निग्रही राजकारणी १९७७-७९ मध्ये जनता पक्ष सरकारचे

प्रधानमंत्री. प्रदीर्घ काळ राजकारणात घालवला. दशमेश गुरु धनस्थानात उच्च. भाग्येश शनी, पंचमात उच्च. लाभेश मंगळ अष्टमात उच्च.




लग्नेश बुध व पंचमेश शुक्र यांची युती त्रिकोण नेपच्यून व दोघे गुरुच्या दृष्टीत.

पण कुंडलीचे वैशिष्ट्य म्हणजे केंद्रात एकही ग्रह नाही. रवी भाग्यात व भाग्येश पंचमात आणि गुरु, शनी व मंगळ असे तीन ग्रह उच्च आहेत.

लग्नेश अष्टमात, अष्टमेश पंचमात उच्च यामुळे दीर्घायुष्य पूर्ण १०० वर्षांचे. त्यातच मंगळ उच्च स्थानी असल्याने भरपूर आयुष्य मिळाले. षष्ठेश उच्च गुरुच्या पूर्ण दृष्टीत आहे. मोरारजींना आजार असा नव्हता. त्यांचा योगाभ्यास होता कदाचित त्याचाही परिणाम असेल.

**(११) कुंभेचा मंगळ :** जर अष्टम स्थानात अकरा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कुंभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ अष्टमात कुंभ राशीत शत्रुक्षेत्री असतो. कर्क लग्नास मंगळ पंचमेश व दशमेश असतो. पंचमेश अष्टमात असल्याने विद्येत अपयश येते. एखाद् दुसरे वर्ष फुकट जाते. तसेच संततीसौख्यही बिघडते.

सप्तमेश शनीचा मंगळाशी अशुभ योग असता पती वा पत्नीचा लवकर मृत्यू येतो. स्त्री जातकास वैधव्याचे दुःख भोगावे लागते. तसेच जातकाचीही आयुर्मर्यादा कमी होते. तो मध्यायू होतो. वारसारूपाने धन प्राप्त होते.

## कुंडली : श्री. अलका श्रीराम पटवर्धन

जन्म - शुक्रवार दि. २२ जून, १९५६ रोजी कोल्हापूर येथे सकाळी ८ वाजता प्र. वेळ.


अक्षांश - १६° उत्तर ४२', रेखांश - ७४° पूर्व १९".

अयनांश - २३° १५' १४"

सांपातिक समय - १ तास २८ मि. १७ से.

स्पष्ट चंद्र वृश्चिकेत २३° ४०' ४६" बुध भोग्य ६ वर्षे ९ महिने १३ दिवस.

विवाह १९८१ साली नंतर १ पुत्र. पती रेल्वेत नोकरीस होता. त्यांना कॅन्सर झाला व त्यातच १५ जानेवारी, १९९३ रोजी मृत्यू आला.




सप्तमेश शनी वृश्चिकेत व त्याचा अधिपती मंगळ अष्टमात कुंभेत आहे. सप्तमाचे षष्ठात रवी व शुक्र. सप्तमेचा षष्ठेश हा सप्तमेशाचा अष्टमेश असून त्याची शनीवर पूर्ण दृष्टी आहे.

सप्तमेशाचे चतुर्थात मंगळ आहे. हा मंगळ राहू, केतू व बुध यांच्या केंद्रात आहे. मंगळाची बुधावर पूर्ण दृष्टी आहे. सप्तम प्रतियोग प्रजापती व केंद्रयोग वरुण ग्रह, सप्तमेशाचे अष्टमात शुक्र.

विवाहकारक शुक्र मंगळाच्या मृग नक्षत्रात आहे. पतिकारक रवी हा शनीच्या अष्टमात आहे. रवी शुक्र युती ही पुढे प्रजापती मागे केतू व बुध. कर्क लग्नास बुध अशुभ आहे.

मृत्युकाली रवी महादशा (रवी कुटुंबेश), शनी (सप्तमेश) भुक्ती व बुध आंतरदशा चालू होते.

**(१२) मीनेचा मंगळ :** जर अष्टम स्थानात बारा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मीनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

अष्टमात मीन राशी असते. मंगळ चतुर्थेश व नवमेश असून अष्टमात मित्रक्षेत्री येतो. मंगळाची महादशा बालवयात आली असता जातक अल्पायू ठरतो. पण मंगळाची महादशा तरुणपणी वा प्रौढपणात आली असता जातकास राजयोगाचा लाभ पूर्णपणे मिळतो. परंतु शरीरसौख्य कमी असते. मातृसुख फार मिळत नाही. मातेशी पटत नाही. नवमेश अष्टमात गुरूसह असता वारसारूपाने मोठी मालमत्ता मिळते. जातकाच्या पत्नीचे वा पतीचे मृत्यूमुळे

वा घटस्फोटामुळे बरीच रक्कम मिळते. मंगळ अशुभ ग्रहाने युक्त वा दृष्ट असता पिता-माता व पती-पत्नी यांचा मृत्यू लवकर होतो. मालमत्ता व संपत्ती यांचाही नाश होतो.

## कुंडली : भालचंद्र विष्णू

जन्म - मंगळवार दि. २७ जून, १९११ रोजी सोलापूर येथे सकाळी १० वा. १५ मि.


अक्षांश - १७° उत्तर ४०', रेखांश - ७५° पूर्व ५५'.

अयनांश - २२° ३७' १६"

सांपातिक समय - ४ तास ३२ मि.

गुरु महादशा १४ वर्षे ५ महिने ६ दिवस.

मंगळ अष्टमात मीन या जलराशीत असून त्याचा वरुण ग्रहाशी केंद्रयोग आहे. मंगळाची चंद्रावर, वरुणावर दृष्टी आहे.





शनी षष्ठेश व सप्तमेश आहे व तो नवमात नीच राशीत येतो. त्याच्या व्ययात मंगळ आहे.

षष्ठेश शनी नीच राशीत आहे म्हणून क्षयरोग जडला. लग्नेश रवी मिथुनेत आहे व त्यावर शनीची व मंगळाची दृष्टी आहे. फुप्फुसाचा क्षयरोग झाला होता. जातकाचे वडील १९१८ साली गेले.

जातकाचे मॅट्रिकपर्यंत शिक्षण पूर्ण झाले व नंतर महाविद्यालयात शिकण्यास गेले असता दुसऱ्या वर्षी ते आजारी पडले व घरी परत आले. अनेक उपचार झाले पण जातक खंगतच गेले आणि १९३३ च्या मे महिन्यात मृत्यू पावले. त्या वेळी शनीची महादशा शुक्र भुक्ती सुरू होती. शुक्र व्ययात आहे व त्याचा शनीशी केंद्रयोग आहे. शनी षष्ठेश व सप्तमेश आहे. त्याची महादशा व व्ययस्थ शुक्राची भुक्ती चालू असता मृत्यू.

९

# नवम भाव




सोबतच्या कुंडलीमध्ये ज्या ठिकाणी नऊ हा अंक लिहिलेला आहे त्या कुंडलीतील किंवा पत्रिकेतील स्थानाला 'नवम स्थान' असे म्हणतात.

कुंडलीच्या नवव्या स्थानावरून धर्म, पुण्य, तप, ज्ञान, गुरु, आचार्य संस्थापक, वेदाध्ययन, शील, परोपकार, दूरचे प्रवास, तीर्थयात्रा, पित्याव्यतिरिक्त अन्य पितर, पौत्र आणि प्रामुख्याने मागील जन्मातील कर्मांचे फलस्वरूप जे भाग्य जातक या जन्मासाठी घेऊन आलेला असतो ते नशीब, दैवी साहाय्य ज्यास सर्वंकष रीतीने भाग्य असे म्हणता येईल त्याचा विचार होतो म्हणून या स्थानास भाग्यस्थान असेच सूत्ररूपाने संबोधले जाते. तसेच उच्च शिक्षण, परदेशी प्रवास, नोकरीतील निलंबन, आईचे आजार, संतती आरोग्य इ. गोष्टी येतात.

शरीरावयांपैकी मुख्यत्वेकरून मांड्या या स्थानावरून दर्शविल्या जातात.

या स्थानाचे महत्त्व एवढे आहे की, कुंडलीतील इतर स्थानांपेक्षा याच स्थानाला जास्त महत्त्व द्यावयास पाहिजे असे सारावलीकार आग्रहाने प्रतिपादन करतात.

दैवाची अनुकूलता, पूर्वायुष्याचा पाठिंबा म्हणजेच भाग्य याचा विचार प्रथम करून मग कुंडलीतील इतर भावांचा विचार करावा. कारण भाग्य नसताना जातकास शुभ फले कशी मिळतील?

नवम स्थानचा भाग्यभुवनाचा कारक ग्रह गुरु आहे. गुरु ग्रह पूर्वजन्मीचे पुण्यकर्म, सुकृत व दैवाची अनुकूलता दर्शवितो.

नवम स्थानातील ग्रह, नवमेश यांचे बलावबलावर जातकाच्या नशिबाची श्रेणी ठरवावयाची असते. त्याचबरोबर कारक ग्रह 'गुरु' याचाही विचार क्रमप्राप्त आहे.

नवमात मंगळ ज्याचा आहे असा जातक पापी असल्याने तो पापकर्मे करतो, असे 'धर्मेऽधवान्' या सूत्रात वराहमिहीर सांगतात. त्याचाच विस्तार सारावलीकार पुढीलप्रमाणे करतात.

जातकाच्या नवमात मंगळ असता तो आपले काम नीटपणे, व्यवस्थितपणे कुशलतेने करीत नाही. तो इतरांचा द्वेष करतो, प्राण्यांना ठार मारतो. (मृगया-शिकार-जीवघेणे खेळ) इजा करतो, त्रास देण्यात आनंद मानतो (भूषण मानतो-प्रौढी मिरवतो), तो अधार्मिक असून पापकृत्ये करतो व असे असले तरी राजाकडून प्रशासनाकडून मान मिळवितो.

अन्य पूर्वाचार्यांच्या मते, असा जातक महाबुद्धिमान असतो. तो नेहमी खटले. कज्जे, भांडणे, स्पर्धा युद्धे यात गुंतलेला असतो. वडिलोपार्जित मालमत्ता हातची घालवितो. पित्याशी पटत नाही. जातक पूर्ववयात कृश असतो पण तारुण्यात व प्रौढपणी चांगला सशक्त आणि धष्टपुष्ट होतो. जातक अधार्मिक, कमनशिबी, मान नसलेला व शरीरपीडा असलेला असतो. तो दुसऱ्यांची संपत्ती हिरावून घेतो.

जातकास भावंडे नसतात. जातक अन्य स्त्रियांच्या नादी लागतो आणि काहीही लाभ्यांश नसता भटकंती करतो, परंतु तो प्रसिद्ध होतो (का कुप्रसिद्ध !) खाटीक वृत्तीचा असतो. मंगळ नवमात असल्याने त्याची दृष्टी तृतीयेवर येते. त्यामुळे भावंडांशी पटत नाही व काही भावंडे अल्पायुषी होतात.

जातक कमनशिबी असतो असे काहींचे म्हणणे असले तरी अन्य आचार्यांच्या मताप्रमाणे भाग्य मिळविण्यासाठी त्यास काही अडथळे पार करावे लागतात.

स्त्री जातकाच्या बाबतीत तिला विवाहसुख कमी मिळते. संततीसुख नसते. ती दिसावयास सुंदर व मोहक असते. परंतु दुर्दैवी व रोगट असते. तिचा अन्य कुटुंबीयांशी दुस्वास असतो.

कै. डॉ. बी. व्ही. रामन यांचा अनुभव काही वेगळा आहे. त्यांचे मते, जातक संपत्तिमान असतो व अधिकार गाजवतो. त्यास संतती असते व तो सुखी असतो. जातक आज्ञाधारक व कर्तव्यदक्ष नसतो. (त्याचे पित्याशी पटत नाही, तो पित्याचे ऐकत नाही) परंतु तो उदार हृदयी व प्रसिद्ध असतो. जर गुरु अथवा बुध यांचे सहकार्य मिळाले तर जातक धर्मग्रंथांचे, आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन, पारायण करतो आणि त्यातील ज्ञानाने सुसंस्कृत व विद्वान बनतो. मंगळाबरोबर शुक्र असता द्विभार्या योग होतो. जातकाचे वास्तव्य परदेशात असते. असा जातक कायदेतज्ज्ञही होतो. मात्र शनीचे साहचर्य जातकास दुष्ट प्रवृत्तीचा बनविते. जातक अन्य स्त्रियांची अभिलाषा धरतो. तो स्वार्थी हट्टी व साहसी असतो.

श्री. द्वारकानाथ नारायण राजे यांचा अनुभव काही निराळा आहे. त्यांच्या मते असा जातक स्वतः धार्मिक आचारविचार मानत नाही. पण धर्माच्या बाबतीत प्रसंग पडला तर तो धर्मवेडाने भडकून जातो. अग्निराशीतील मंगळ बंडखोर असतो. प्रजापती (हर्षल) दूषित असता तो अतिरेकी (Fanatic) असतो. मंगळ गुरुच्या अशुभ योगात असता जातक दांभिक असतो. पृथ्वीराशीत मंगळ उत्तम असतो. येथील मंगळास स्वातंत्र्याची आवड असते

व स्पष्टवक्तेपणा जास्त असतो. नोकरीमध्ये या लोकांचे कधी पटत नाही. नवमात मंगळ अशुभ असता परदेश प्रवासात अपघात होण्याची शक्यता असते.

अशा मतामतांच्या गलबल्यात ज्योतिष अभ्यासक गोंधळून जातो. याचा निर्णय करण्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे सारावलीमध्ये दिली आहेत ती अशी -

(१) लग्न व चंद्र या दोहोंचाही विचार करावयाचा आणि लग्नाचे नवम स्थान व चंद्राचे नवम स्थान यांपैकी कोणते विचारणीय? लग्न व चंद्र यांच्या बलाबलाचा विचार करून लग्न किंवा चंद्र यांपैकी कोण जास्त बलवान हे प्रथम ठरवावयाचे आणि मग जे जास्त बलवान त्याचे नवम स्थानचे फले प्राधान्याने मिळतात. जे बलवान तेच विचारणीय आणि अन्य जे कमी बलवान त्याचे नवम स्थानात जरी पापग्रह असले वा त्यावर पापग्रहांची दृष्टी असली तरी त्याची अशुभ फले न मिळता बलवानाचीच शुभ फले मिळतील.

(२) नवमेश ज्या स्थानावर असेल आणि नवमात जो ग्रह असेल त्यांच्या बलावबलाचा विचार करून फलनिर्णय करावयाचा. नवमेश जर केंद्रात वा पंचम स्थानात असेल आणि तो अस्तंगत नसेल, नीच राशीत नसेल वा शत्रुराशीत नसेल अथवा नीच नवांशी शत्रू नवांशी नसेल व शुभयोगात असेल तर पूर्णपणे शुभ फले मिळतील व ती सहज प्राप्त होतील आणि नवमातील ग्रह जर दुःस्थानेश असेल, तो नीचक्षेत्री या शत्रुक्षेत्री असेल, तर शुभ फले मिळण्यात अडचणी, अडथळे येतील.

(३) नवमेश नवमात असता अगर नवमेशाची नवमावर दृष्टी असता जातक आपल्याच देशात भाग्योदय प्राप्त करून घेईल. नवमेशाव्यतिरिक्त ग्रह नवमात असता वा नवमावर दृष्टी करीत असता परदेशात भाग्योदय होतो.

(४) नवमावर बलवान ग्रहाची लग्न वा पंचम स्थानातून पूर्ण दृष्टी असता अथवा तृतीयेतून दृष्टी असता जातक भाग्यवान असतो. म्हणजे बलवान गुरुची, लग्नपंचमातून दृष्टी भाग्यवर्धक ठरेल. तसेच तृतीयेतून बलवान ग्रहाची दृष्टी असताही भाग्यवर्धक ठरते.

(५) पापग्रह नवमेश असेल आणि नवमातच असेल तरी शुभफले मिळतील. त्यातच जर शुभ ग्रहांची दृष्टी असता शुभ फलांची वृद्धी होते.

(६) गुरुशिवाय नवमस्थ ग्रह आपल्या उच्च राशीत मंगळ मकरेत, शनी तुळेत, रवी मेषेत, चंद्र वृषभेत असता जातकास संपत्ती व सोने वगैरेंचा उत्तम लाभ होतो. यातच जर शुभ ग्रहाची दृष्टी उच्चस्थ ग्रहावर असता, शत्रूंचा निःपात करणारा मोठा राजा होतो. त्यास दिव्य कांती असते व सुकीर्ती लाभते.

थोडक्यात, सांगावयाचे म्हणजे कुंडलीत मंगळ कोणत्या भावाचा अधिपती आहे व तो नवमात कोणत्या राशीत आला आहे. त्यास तेथे राशिबल, नवांशबल किती प्राप्त झाले आहे. त्यावर शुभ वा अशुभ ग्रहांची दृष्टी कितपत प्रभावी आहे याचा विचार करून फलनिश्चिती करावी लागेल.

स्थूलमानाने असे सांगता येईल की, मेष, वृश्चिक, सिंह, धनु, मकर, मीन या राशीमध्ये नवमात मंगळ असता तो शुभ फले देईल.

नवमातील मंगळाची तृतीयेवर, चतुर्थावर आणि व्यय स्थानावर पूर्ण दृष्टी येते. त्यामुळे या स्थानांसंबंधी शुभाशुभ फले मिळू शकतील.

येथे असे सुचवावेसे वाटते की, सनमस्थ मंगळाशी (गुरुव्यतिरिक्त) बुध, शुक्र, रवी वा शुक्ल पक्षातील चंद्र यांचा लग्नातून वा पंचमातून अंशात्मक १२० अंशाचा त्रिकोण योग होत असेल तर तोही विचारात घ्यावा. तसेच ६० अंशांचा लाभयोगही उत्तम फले देईल तसेच या ग्रहांचे नवम भाव मध्याशीही अंशात्मक लाभयोग, त्रिकोण योग होत असता त्यांचीही शुभफले मिळतील.

तृतीय व नवम स्थाने एकमेकांशी पूरक असतात. ही दोन्ही स्थाने मर्दानी व मैदानी खेळाची स्थाने असून सर्व प्रकारचे खेळ, स्पर्धा, ताकदीच्या स्पर्धा दर्शवितात. साहसी कामे तृतीयस्थ व नवमस्य मंगळाने दर्शवली जातात.

याही दृष्टिकोनातून काही उदाहरणे वाचकासमोर ठेवली जातील.

### नवमस्थ मंगळाची राशीनिहाय भावफले

**(१) मेषेचा मंगळ :** जर नवम स्थानात एक हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मेषेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


नवमावर मेष रास असते. मंगळ चतुर्थेश व नवमेश असून नवमात स्वगृही येतो. मंगळ एकटा राजयोगदर्शक आहे. जातकाचे नशीब स्वदेशातच उदयास येते. जातक धार्मिक व दानशूर असतो. परदेश प्रवास करतो व लौकिक संपादन करतो. येथील मंगळाची चतुर्थावर स्वगृहावर दृष्टी असते. जातक विद्वान व उच्च विद्याविभूषित असतो. त्याच्या कर्तृत्वाचा लौकिक दूरवर पसरतो. जातकास स्थावर, संपत्ती, संतती, मान, हुद्दा मिळतो. गुरुचा सहयोग किंवा शुभयोग असता संतती चांगली असते व तिही नावारूपास येते. रवी लग्नेश असल्याने मंगळाशी सहयोग करीत असता तो आपले उच्च राशीत येतो. जातक तेजस्वी, धाडसी, कार्यकुशल व राजासम असतो. आपल्या क्षेत्रात तो उच्च पदास पोचतो. शुक्र दशमेश असल्याने त्याचा मंगळाशी सहयोग म्हणजे नवमेश-दशमेश यांचा योग व्यवसायास उत्तम फलदायी ठरतो. त्याचे वास्तव्य व्यवसायानिमित्त परदेशी असते. बुध धनेश-लाभेश असल्याने त्याचा सहयोग धनलाभास उत्तम ठरतो व मोठ्या संस्थांचा पाया घालणारा ठरतो. गुरु मंगळ युती जातकास सेनापती पद देईल वा राजकारणातही यश देईल.

**कुंडली : श्रीयुत**

जन्म - रविवार दि. २० जुलै, १९५८ रोजी सकाळी ९ वाजता.

अक्षांश - १४° उत्तर २६', रेखांश - ७४° पूर्व २२'

अयनांश - २३° १६' ५०", सांपातिक समय - ४ तास २३ मि. १० से.




सिंह हे अग्नितत्त्वाच्या राशीचे लग्न, लग्नेश रवी, कर्केत पण सिंह नवांशी योगकारक मंगळ नवमात मेषेत आपल्या मूलत्रिकोणात असून त्याची लग्नेश रवीवर दृष्टी आहे. तशीच तृतीय स्थानावरही व त्यातील राहू व वरुण ग्रहावर दृष्टी आहे. तृतीयेत राहू पराक्रमी व साहसी असतो. धनेश, लाभेश बुध कर्केच्या अगदी शेवटी व गुरुच्या पूर्ण लाभयोगात आहे. बुध-मंगळ त्रिकोण, गुरु मंगळ प्रतियोग दीप्तांशांत आहेत. शनी षष्ठेश असून षष्ठावर, लग्नावर व दशमावर दृष्टी आहे आणि तो स्वतः मंगळाच्या दृष्टीत आहे. दशमेश शुक्र मिथुनेत मंगळाच्या पूर्ण लाभयोगात तसाच तृतीयस्थ राहूच्या त्रिकोणात आहे. म्हणून धाडस व पराक्रम देणारा व्यवसाय, कायदा व गुन्हेगार यांच्याशी संबंध येणारा असे पोलीस खाते. मंगळ स्वगृही व राजयोगकारक अशा भाग्यदर्शक स्थानात असल्याने जातक (Inspector General) या उच्च पदास पोहोचला. दशांश कुंडलीत दशमवार सिंह रास व तेथे प्रजापती (हर्षल) आहे आणि गुरु कुंभेत, सप्तमात वृषभ, दशांशात मंगळ व गुरु यांची दशमावर दृष्टी आहे.

**(२) वृषभेचा मंगळ** : जर नवम स्थानात दोन हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'वृषभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

नवमात वृषभ रास असते. मंगळ तृतीयेश व अष्टमेश असतो आणि नवमात वृषभेत येतो. विवाहामुळे परिस्थितीत बदल होतो व नशीब जोरावर येऊ लागते. परंतु अष्टमेश नवमात ही स्थिती जातकाच्या दृष्टीने घातक असते. तरी शुक्राचा सहयोग असता जातक परदेशात वास्तव्य करतो. तो वितंडवाद करतो. क्रूर व स्त्री-द्वेष्टा असतो. जातक कृतघ्न असून प्रत्येक गोष्टीत खोटेपणा करतो. बुध व मंगळ एकत्र असता जातक प्रमुखपदी जातो. तो भावनाशील व नशीबवान असतो. शास्त्रे जाणतो व त्यास सर्व सुखे मिळतात. शुक्रामुळे त्यात भर पडते. जातक देखणा व साहसी असतो. पण त्यास पैसा फार मिळत नाही. येथे

चंद्राची सोबत मंगळास असता लाभेश चंद्र उच्च राशीत येत असल्याने लक्ष्मीयोग होतो. जातकाच्या भावंडांना याचा फायदा मिळतो.

### कुंडली : श्रीमती


जन्म - गुरुवार दि. ९ जून, १९४९ रोजी दुपारी २ वा. १० मि.

अक्षांश - ३१° उत्तर ३८', रेखांश - ७४° पूर्व ५३'

अयनांश - २३° ८' ५७", सांपातिक समय - ६ तास ४९ मि. ३ से.

लग्नेश नवमात व नवमेश दशमात बुध-शुक्र अन्योन्य क्षेत्रयोग. नवमात मंगळही आहे. तृतीयेश अष्टमेश मंगळ नवमात गुरुंचे त्रिकोणयोगात आहे.

शनी व्ययस्थानानुवर्ती सिंहेत आहे. शनी-मंगळ दृष्टी अधिष्ठित केंद्रयोग आहे.




मंगळ कृत्तिका नक्षत्रात आहे. तसेच नवमात मंगळ व रवी या दोन अग्नितत्त्वांचे ग्रहासह आहे. मंगळ तृतीयेश आहे. म्हणजे शस्त्राचा वापर करणारा, धाडसी ग्रह आहे. त्यामुळे पोलीस वा लष्करी खाते. बुध मंगळावर शनीची दृष्टी आहे. त्यामुळे कायद्याशी संबंधित नोकरी आहे. शनी षष्ठेश आहे. त्यामुळे सरकारी नोकरी पोलीस खात्याशी संबंधित नोकरी. मंगळ कृत्तिका, रवी मृग नक्षत्रात आहेत.

बुध-मंगळ रवी यांमुळे जातकी पोलीस खात्यात प्रमुख Inspector General व ती तुरुंगावरील उच्च अधिकार पदावर. कैद्यांमध्ये सुधारणा केली. त्यामुळे प्रसिद्ध झाली.

**(३) मिथुनेचा मंगळ** : जर नवम स्थानात तीन हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मिथुनेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

नवमात मिथुन रास, मंगळ धनेश व सप्तमेश असतो व नवमात मिथुन या बुधाचे राशीत येतो. जातकास पत्नी सुशिक्षित व कर्तबगार मिळते. तिच्यामुळे जातक कुमार्गास

जात नाही. बुध हा भाग्येश असून भाग्यातच मंगळाबरोबर असता जातक पुढे येतो व प्रमुखपदी पोहोचतो. तो भावनाशील व नशीबवान असतो. शास्त्रे जाणतो, गणित, तर्कशास्त्र उत्तम येते. सर्व सुखे मिळतात. जातक विद्वान असून कलेचा भोक्ता असतो. वक्तृत्व चांगले असते व अध्यापनाकडे ओढा असतो. शुक्र मंगळ बुधाबरोबर असता लग्नेश, भाग्येश व सप्तमेश यांचा सहयोग होतो. तो भाग्यवर्धक ठरतो.

जातकात क्रीडानैपुण्य असते. बुधाचा व गुरुचा शुभयोग असता जातक खेळामध्ये नावलौकिक मिळवितो.


### कुंडली : श्री. नील हार्वे

जन्म - सोमवार दि. ८ ऑक्टोबर, १९२८ रोजी GST फिट्झरॉय, मेलबोर्न येथे सकाळी ७ वाजता.

अक्षांश - ३७° दक्षिण ५०', रेखांश - १४५° पूर्व.

अयनांश - २२° ५१' ३०", सांपातिक समय - १९ तास ४४ मि. ५८ से.

अष्टपैलू क्रिकेट खेळाडू, आकर्षक शैलीचा आक्रमक फलंदाज व ऑफ ब्रेक गोलंदाज व उत्तम क्षेत्ररक्षक. १९४६ ते ६३ पर्यंत ७९ कसोटीत सहा हजारांवर धावा. निवृत्तीनंतर क्रीडा सामानाचे दुकान चालविले.




भाग्येश बुध लग्नी तृतीयेश गुरुचे प्रतियोगात. या दोघांशी भाग्यस्थानातून अनुक्रमे त्रिकोण योग व लाभयोग आहे. भाग्यातून मंगळाची तृतीय स्थानावर दृष्टी आहे. तृतीय व नवम ही खेळाची स्थाने मंगळाच्या प्रभावाखाली आणि त्यांचे अधिपती मंगळाचे शुभयोगात आहेत. म्हणजे मैदानी खेळात उत्तम प्रगती व यश आणि भाग्येश बुध गुरुच्या पूर्ण दृष्टीत. यामुळे अपूर्व यश लाभले नावलौकिक मिळाला.

दशमात चंद्र स्वगृही असून त्याचा प्रजापतीशी अंशसाम्याने त्रिकोण योग आहे. मंगळ धनेश असून तो मिथुन या द्विस्वभाव राशीत आहे. निवृत्तीनंतर स्वतंत्र व्यवसाय कारण मंगळ सप्तमेश आहे. प्रजापती (हर्षल) पंचमेश आहे व त्याचा चंद्राशी त्रिकोण योग म्हणून खेळाच्या सामानाचे दुकान हा व्यापार केला.

**(४) कर्केचा मंगळ :** जर नवम स्थानात चार हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कर्केचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

नवमात कर्क रास असते. मंगळ लग्नेश व षष्ठेश असून तो नवमात नीच राशीत येतो. भावंडांबरोबरचे संबंध बिघडतात. त्यातच जातकास मूळव्याधीसारख्या व्याधी होतात. मंगळाच्या नीचत्वाचा भंग झाला असल्यास भाग्यवर्धक फले जातकास मिळतात.

नवम स्थानात प्रवासाचे, मैदानी खेळाचे स्थान आहे. त्यामुळे नीचभंग झाला असता. जातक क्रीडापटू होऊन नाव कमावतो व खेळानिमित्त लांबचे प्रवासही घडतात व पैसाही मिळतो.

चंद्र मंगळाबरोबर असता लक्ष्मीयोग होतो.

## कुंडली : श्री. फ्रेडी ट्रूमन


जन्म - गुरुवार दि. ६ फेब्रुवारी, १९३१ रोजी स्टेन्टन शेफील्ड येथे पहाटे ४ वा. प्र. वेळ.

अक्षांश - ५३° उत्तर १८', रेखांश - ०° पूर्व २३'

अयनांश - २२° ५३' ३७'', सांपातिक समय - १२ तास ५९ मि. ५० से.

जन्मकाळी रवी महादशा भोग्य वर्षे १ महिना ० दि. १३ तास

इंग्रज क्रिकेटवीर द्रुतगती गोलंदाज व तडाखेबंद फलंदाज. १९४९ ते १९६८ अशी १९ वर्षांची क्रिकेट कारकीर्द. त्रिशतक पूर्ण करणारा पहिला गोलंदाज.



मंगळ लग्नेश असून तो नवमात कर्केत वक्री आहे. वक्री ग्रह चांगले फल देतात. तो रवीच्या दृष्टीत आहे. मंगळाचा भाग्येश चंद्राशी शुभयोग-लाभयोग आहे. प्रजापतीचा लग्नबिंदूशी त्रिकोण योग आहे.

मंगळ हा वेग दर्शविणारा ग्रह वक्री म्हणून जास्त बलवान. म्हणून फ्रेडी हा द्रुतगती वेगवान गोलंदाज. तृतीयेश शनी, द्वितीयेत बुधाचे युतीत व गुरुचे दृष्टियोगात. प्लूटोच्या प्रतियोगाची यात भर पडली.

चंद्राचे केंद्रात शनी आहे तसा गुरुही आहे. यामुळे मंगळाचे नीचत्व संपुष्टात आले. गुरु व बुध एकमेकांच्या राशीत आहेत व दोन्ही राशी मैदानी खेळाच्या आहेत. ट्रूमनने खेळाच्या मैदानावर आपले कौशल्य दाखविले. १९४९ ते १९६८ राहू महादशा होती. राहू लग्नाचे त्रिकोणात व रवीच्या लाभयोगात आहे. तो गुरुच्या राशीत पण बुधाच्या नक्षत्रात आहे. त्यामुळे राहू दशा सुरू होताना फ्रेडीने टेस्ट खेळात प्रवेश केला व त्याच दशेत आपले कौशल्य दाखविले.

**(५) सिंहेचा मंगळ :** जर नवम स्थानात पाच हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'सिंहेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ पंचमेश व व्ययेश असतो व तो नवमात सिंह राशीत मित्रक्षेत्री येतो. जातक परदेशात नेहमी जातो व त्याचा भाग्योदय परदेश दौऱ्यांमुळे होतो. जातक प्रामाणिक, उदार व मोठ्या मनाचा असतो.

परंतु पारमार्थिक गोष्टींकडे कल नसतो. जातक विद्वान असतो व त्यास अध्यापन क्षेत्रात गोडी असते. व्याख्यानाद्वारे प्रसारकार्य करतो. जातकाचे पुत्रांपैकी एक उत्तम वक्ता वा लेखक होतो. गुरुची दृष्टी असता शुभ फलांची वृद्धी होते. गुरु व रवी मंगळाबरोबर अगर त्याचेशी शुभयोगात असता जातकास श्रीमंत पत्नी मिळते. जातक सद्‌गुणी असतो आणि आपल्या कामात दक्ष असतो. तो देवभक्त असतो.

### कुंडली : श्री. धीरूभाई अंबानी


जन्म - बुधवार दि. २८ डिसेंबर, १९३२ रोजी चोरवाड (बेरावळ) येथे सकाळी ६ वा. ३७ मि. प्र वेळ.

अक्षांश - २०° उत्तर ५३', रेखांश - ७०° पूर्व २२'

अयनांश - २२° ५५' २३"

सांपातिक समय - १२ तास १३ मि. ४८ से.

लग्नेश दशमात व भाग्येश रवी लग्नी व पंचमेश मंगळ भाग्यात राहू व वरुण (नेपच्यून) यांसह आहे.




मंगळाची दशमेश बुध व लाभेश शुक्र यांच्यावर दृष्टी. चंद्र मंगळ त्रिकोण योग. हा धन देणारा तसेच धनेश शनी धनस्थानात त्रिकोण दशम बिंदू. गुरु व्यवसायाची वृद्धी करतो. शनी धनसंचय करणारा. दशमेश बुध शुक्रासह म्हणून कापड उद्योग. मंगळ भाग्यात परदेश प्रवास, उत्तम नशीब. जातक कापड उद्योगाचा प्रमुख संचालक होते. ते आणि त्यांचा उद्योग जगप्रसिद्ध झाले.

**(६) कन्येचा मंगळ** : जर नवम स्थानी सहा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कन्येचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ चतुर्थेश व लाभेश असून नवमात कन्या या बुधाच्या राशीत येतो. जातक उच्च विद्याविभूषित असतो. त्यास स्थावर मालमत्ता व वाहन यांचे सुख मिळते. येथे बुध मंगळाबरोबर असता शास्त्रनिपुण असतो. तो सुदैवी असतो. उत्तम वक्ता व समीक्षक असतो. परदेशात वास्तव्य असते अगर नेहमी जाणे येणे असते.

## कुंडली : श्री. मनोज मधुकर

जन्म - शुक्रवार दि. २३ ऑगस्ट, १९६३ रोजी हुबळी येथे सायं. ५ वा. ४० मि.


अक्षांश - १५° उत्तर २०', रेखांश - ७५° पूर्व १४'.

अयनांश - २३° २०' ४१"

सांपातिक समय - १५ तास १६ मि. ५१ से.

M.B.B.S. नंतर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत प्रयाण.

नोकरी व शिक्षण चालू. प्रेमविवाह केला.




मंगळ नवमात कन्येमध्ये आहे व सप्तमेश चंद्रही तेथेच. सप्तमेश व लाभेश यांची युती भाग्यस्थानात व गुरुच्या पूर्वदृष्टीत आणि शनीचा या युतीशी पूर्ण त्रिकोण योग आहे. सप्तमेश लाभेश ही युती भाग्यस्थानात आहे. हा लक्ष्मीदायक योग आहे. त्यावर गुरुची पूर्ण दृष्टी यामुळे भाग्यवर्धक योग आहे. मकर लग्नास गुरु तृतीयेश व्ययेश असला तरी शुभ फल देतो. त्यामुळे उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत प्रयाण झाले व तेथे काही वर्षे वास्तव्य राहिले. चतुर्थेश मंगळ भाग्यात गुरु दृष्टी आहे. त्यातुळे तेथेच स्थावर व वाहन यांचा लाभ झाला.

पंचमेश शुक्र प्रजापतीच्या युतीत आहे. हा प्रेमविवाहाचा दर्शक आहे.

**(७) तुळेचा मंगळ :** जर नवम स्थानी सात हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'तुळेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


नवमावर तूळ रास येते. मंगळ दशमेश व तृतीयेश असून नवमात शुक्राच्या राशीत येतो. दशमेश नवमात असणे हा मोठा योग असतो. त्यात लग्नेश शनी नवमात तूळ राशीत अगर राजयोगकारक ग्रह. शुक्र नवमात स्वक्षेत्री अगर दशमात आल्यास भाग्य चांगले उदयास येते. विवाहानंतर जातकाचे भाग्य उदयास येते. जातकास त्याच्या भावाकडूनही फायदा होतो.

## कुंडली : श्री. वि. के. फडके

जन्म - रविवार दि. १० सप्टेंबर, १९३३ रोजी जळगाव येथे सायं. ५ वा. ३९ मि. प्र. वेळ.

अक्षांश - २१° उत्तर १', रेखांश - ७५° पूर्व ४१'.

अयनांश - २२° ५६' ९", सांपातिक समय - १६ तास २७ मि. ५५ सेकंद




दशमेश मंगळ नवमात तुळेमध्ये त्याची शनीवर दृष्टी आणि व्ययस्थ शनीची मंगळावर दृष्टी परस्पर दृष्टियोग, लग्नेश व दशमेश यांच्यामध्ये आहे.

चंद्र षष्ठेश आहे व तो चतुर्थात वृषभेत उच्च श्रेणी आहे. त्याचा गुरुशी पूर्ण त्रिकोण योग आहे. चंद्र शनी परस्पर 5/9 व्या राशीत आहेत. म्हणजे चंद्र त्रिकोण गुरु शनी असा हा त्रिकोण चार, आठ, बारा स्थानातून आहे. हा अध्यात्माच्या दृष्टीने मोठा योग आहे. दशमेश मंगळाचा वरुण (नेपच्यून) शी अंशात्मक लाभयोग व रवी बुध मंगळाच्या लाभात (अंशात्मक नाही) आहेत.

धनेश गुरुची धनस्थानावर दृष्टी आहे. जातक Central Excise and Customs Department मध्ये सब-इन्स्पेक्टर म्हणून नोकरीस लागले व सुपरिटेंडेंटचे पदावरून निवृत्त झाले आहेत.

त्यांची उपासना महान आहे. त्यांना बरेच योगी, संत भेटले व त्यांचा कृपाशीर्वादही लाभला. संकटावर मात करणारे मंत्र, उपासना यावरील त्यांची पुस्तके महाराष्ट्रभर गाजली आहेत. ते स्वतः उत्तम ज्योतिषीही आहेत. चंद्र, गुरु, शनी त्रिकोण व मंगळ लाभयोग हा त्यांच्या यशाचा पाया आहे.

**(८) वृश्चिकेचा मंगळ :** जर नवम स्थानी आठ हा अंक असेल तर तेथील मंगळ हा 'वृश्चिकेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ धनेश व नवमेश असून तो नवमांश वृश्चिकेत स्वगृही येतो. नवमेश नवमात असणे हा मोठाच भाग्ययोग. जातक सुदैवी व संपत्तिमान असतो. गुरुशी संबंध असल्यास दशमेश नवमेश योग हा राजयोगकारक ठरतो.

जातक निष्ठूर प्रशासक असतो व तो धाडसाने निर्णय घेतो. पंचमेश चंद्राशी युती वा त्रिकोण योग असता संततीसुख चांगले लाभते व संपत्तीचाही लाभ होतो. त्याचप्रमाणे कर्क,

वृश्चिक, मीन हा अध्यात्म त्रिकोणही संपन्न होतो. जातक अध्यात्म क्षेत्रातही प्रसिद्धीस येतो.

बुधाशी मंगळाचा योग होत असता जातक मोठा शास्त्रज्ञ होतो.


## कुंडली : श्री. केशव विष्णू बेलसरे

जन्म - सोमवार दि. ८ फेब्रुवारी, १९०९ रोजी सिकंदराबाद येथे सकाळी ९ वा ४५ मि.

अक्षांश - १७° उत्तर २७', रेखांश - ७८° पूर्व २७'.

अयनांश - २२° ३५', सांपातिक समय - १८ तास ३९ मि. ४३ सेकंद

गोंदवलेकर महाराजांचे शिष्य, तर्कशास्त्र व तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक, संतवाङ्मयाचा अभ्यास, रामाची उपासना, परमार्थावर विपुल लेखन.




लग्नेश गुरु व पंचमेश चंद्र यांची युती असून त्या युतीशी वरुण (अंतरेंद्रियाचा कारक) व प्रजापती यांच्याशी लाभयोग व त्रिकोण योग, पंचमेश (उपासना दर्शवितो) चंद्र त्रिकोण प्रजापती व लाभयोग वरुण यामुळे उपासना व परमार्थावर लेखन आणि संत वाङ्मयाचा अभ्यास.

भाग्येश मंगळ भाग्यात त्याची चतुर्थस्थ वरुणावर दृष्टी आणि षष्ठेश रवीशी लाभयोग, गुरु दशमेश आहे. त्यामुळे अध्यापन व लोकशिक्षण.

व्ययस्थान हे मोक्षस्थान आहे. त्याचा अधिपती शनी लग्नी मोक्षदर्शक राशीत व नवमस्थ मंगळाच्या त्रिकोण योगात (लग्नबिंदू त्रिकोण मंगळ).

**(९) धनुचा मंगळ** : जर नवम स्थानी नऊ हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'धनुचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

नवमात धनु रास येते. मंगळ लग्नेश व अष्टमेश असतो व नवमात धनु या गुरुचा राशीत मित्रक्षेत्री येतो. जातक धर्मवेडाही नसतो व अधार्मिकही नसतो. त्या बाबतीत उदासीन असतो. तो बुद्धिवादी विचारसरणीचा असतो आणि धार्मिक आचार-विचार समजून घेऊन काम करतो. आध्यात्मिकतेकडे कल असतो.

वाचन सर्व तऱ्हेच्या ग्रंथांचे असते. प्रवासही होतात. जातक प्रसिद्ध होतो व प्रतिष्ठा मिळते. काही दुर्घटना घडतात व त्या भावंडे व आईसंदर्भात असतात. पण चंद्र व बुध पुरेसे बलवान असता वर नमूद केलेली फले मिळत नाहीत, त्याची तीव्रता बरीच कमी होते.

दशमेश शनी असतो. त्याचे मंगळाचे शुभ संबंध असता व्यवसायात यश व संपत्ती मिळते. गुरु शुभ नसताही अशुभ फले मिळत नाहीत.


मंगळाची दृष्टी चतुर्थावर असता स्थावरची प्राप्ती होते. बुध व चंद्राशी शुभयोग नसता भावंडे व माता यांच्याशी संबंध चांगले नसतात.

## कुंडली : श्री. द. मा.

जन्म - शुक्रवार दि. ७ मार्च, १९२४ रोजी दिल्ली येथे सकाळी ८ वा. ५५ मि.

अक्षांश - २८° उत्तर ४०', रेखांश - ७७° पूर्व १४'.

अयनांश - २२° ४७' ५०'', सांपातिक समय - १९ ता. ३२ मि. १६ से.




येथे लग्नेश नवमात आहे पण तो नवमेश नाही. नवमेश गुरु आहे तो वृश्चिकेत आहे. म्हणजे मंगळ व गुरु यांचा परिवर्तन योग झाला आहे. त्यामुळे येथे मंगळ नवमेश नसला तरी तो नवमेशासारखीच फले देईल. म्हणजे जातकाचा भाग्योदय स्वदेशातच झाला आहे. या मंगळाशी तुळेतील उच्च शनीचा व बुधाचा दोघांचाही लाभयोग झाला आहे. शिवाय शुक्राशीही त्रिकोण योग आहे. त्यामुळे मंगळ शुभ फले देणारा आहे.

वयाच्या २५/२६ वर्षांपर्यंत जातक अधार्मिक होता. पण त्यानंतर तो धार्मिक झाला. विवेकानंदांचे ग्रंथ वाचून आध्यात्मिक क्षेत्राकडेही वळला व हळूहळू पूजाअर्चाही करू लागला. योगाभ्यासही केला. एवढेच नव्हे तर वकिलांकरिता योगासनांचे वर्गही घेतले. त्यात काही न्यायाधीशही सामील झाले होते. धारवाडचे कुमारस्वामी यांचा जातक भक्त बनला होता व आहे.

जातकाने व्यवसाय उत्तम केला व व्यवसायातही नावलौकिक मिळविला. जातकाचा वकिलीचा व्यवसाय होता. दिवाणी न्यायालये, कामगार न्यायालये व सहकार न्यायालये अशा विविध क्षेत्रांत काम करून सोलापुरात प्रसिद्ध झाला. जातकाचे वडीलही नामांकित वकील होते.

जातकास अनेक मित्र होते व चाहते होते. पू. कुमारस्वामींच्या प्रार्थना योगमंडळाच्या सोलापूर शाखेचा प्रमुख, वकील संघटनेचा सोलापूरचा अध्यक्ष, दोन वर्षे वकिलीसाठी चेंबर्स बांधण्याचे काम अथपासून इतिपर्यंत केले व तेथे जातकाचे नाव कायम राहणार आहे.

चंद्रकुंडलीच्या भाग्यात वृश्चिक राशी असून तेथे गुरु आहे.

गुरु व वरुण (नेपच्यून) यांच्यातील अंशसाम्याने त्रिकोण योग वृश्चिक व कर्क या अध्यात्म त्रिकोणदर्शक राशीतून आहे व दोघेही मीनेतील चंद्राशी सुमारे 105 अंशाच्या शुभयोगात आहेत.

मंगळाच्या चतुर्थावरील व चंद्रावरील दृष्टीनेही मातृसुख बिघडले नाही. चतुर्थावर शनीची दृष्टी, गुरुची दृष्टी व मंगळाची दृष्टी आहे. त्यामुळे राहता वाडा जुना असला तरी त्यात नवीन बांधकाम झाले व वाडा चांगलाच मोठा होता. राहते घरही प्रशस्त होते. गुरुच्या दृष्टीमुळे हे परिणाम दिसले आहेत.

बुध व शनी यांच्यामध्ये पूर्ण त्रिकोण योग कुंभ व तूळ राशीतून आहे. त्यामुळे वकिलीचा व्यवसाय झाला.

**(१०) मकरेचा मंगळ** : जर नवम स्थानी दहा हा अंक असेल तर त्यावेळी मंगळाला 'मकरेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


नवमात मकर रास, मंगळ सप्तमेश व व्ययेश असून नवमात उच्च राशीत येतो. सारावली अध्याय ३२ श्लोक २९ मध्ये असे सांगितले आहे की, नवमस्थानात आलेला ग्रह जर उच्च राशीत असला तर असा जातक मोठा होतो, उत्तम असतो व तो सोने संपत्ती यांनी युक्त असतो. सप्तमेश नवमात उच्च असतो. त्यामुळे पत्नी चांगल्या कुलातील असते व ती भाग्य घेऊन जातकाकडे येते.

## कुंडली : श्री. सरदार वल्लभभाई पटेल

जन्म - रविवार दि. ३१ ऑक्टोबर, १८७५ रोजी नाडियाद येथे सायं. ६ वा. ४५ मि.

अक्षांश - २२° उत्तर ४१', रेखांश - ७२° पूर्व ५२'.

अयनांश - २२° ७' २३", सांपातिक समय - २१ ता. २२ मि. ५२ से.




भारताचे पोलादी पुरुष व भारताचे प्रिन्स बिस्मार्क म्हणून प्रसिद्ध असलेले पहिले गृहमंत्री. यांनी आपल्या कौशल्याने सर्व संस्थानिकांना भारतात सामील व्हावयास लावले.

नवम स्थानात मंगळ (पोलादच) आहे. वृषभ लग्न देते कणखर वृत्ती, शनी देतो करारी बाणा व कठोर हृदय, बॅरिस्टर होते. नामांकित वकील, वकिलीवर उत्तम संपत्ती मिळविली. उत्तम चाललेला वकिली व्यवसाय सोडून स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली. महात्मा गांधींचे अनुयायी.

योगकारक शनी दशम बिंदूवर. राश्याधिपती मंगळ, चंद्राचे तृतीयेत व लग्नाचे भाग्यात उच्च.

शनी प्रतियोग प्रजापती (हर्षल) ने वकिलीवर पाणी सोडून स्वातंत्र्यसंग्रामात उडी देण्याचे धैर्य व बदल घडविला गेला. लग्नेश शुक्र शनीच्या पूर्ण दृष्टीत आहे. शनी हा त्याग दर्शवतो.

वल्लभभाईंनी थोरल्या भावाकरिता दोनदा त्याग केला. ते इंग्लंडला बॅरिस्टर होण्यासाठी जाणार होते. सर्व तयारी झाली. पण ऐन वेळी विठ्ठलभाई पटेलांनी इंग्लंडला जाण्याची इच्छा व्यक्त केली. वल्लभभाईनी तत्काल त्यांना आपले तिकीट वगैरेवर इंग्लंडला जाऊ दिले. मोठा भाऊ एकादश स्थान व गुरु यावरून पाहिला जातो. गुरु, शुक्र युतीच्या चतुर्थात शनी आहे.

सकल गगन गेहा वगैरेचे फल नवमांतील उच्च मंगळाचे दिले. वल्लभभाई मोठे झाले. प्रत्येक काम त्यांनी उत्तम केले. धनदौलतीवर पाणी सोडले हा भाग निराळा.

**(११) कुंभेचा मंगळ :** जर नवम स्थानात अकरा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कुंभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

नवमावर कुंभ रास असून मंगळ षष्ठेश व लाभेश असतो. तो कुंभेत शत्रूराशीत येतो. लाभेश नवमात असता वाडवडिलार्जित मालमत्ता वारसरूपाने मिळते आणि जातक नशीबवान ठरतो. त्याजपाशी स्थावर वाहने व सर्व प्रकारची सुखसाधने उपलब्ध होतात. मंगळ षष्ठेशही असल्याने त्यास शत्रू होतात. त्यांचेशी झगडावे लागते. कोर्टकचेऱ्या कराव्या लागतात व वरील शुभ फले मिळण्यात अडथळे येतात व ही शुभ फले कमी प्रमाणात मिळतात. भावंडांशी शत्रुत्व होते.

गुरूचा शुभयोग असता अडथळे पार करण्यात यश मिळते. नोकरीत सारखे बदल होत राहतात. निरनिराळे व्यवसाय केले जातात. षष्ठेशत्वामुळे आजार होतात. शस्त्रक्रिया कराव्या लागतात. त्या निमित्ताने खर्च होतो. मंगळाची चतुर्थावर दृष्टी येते. जातकास नोकरी व्यवसायानिमित्त नेहमीच बाहेर राहावे लागते. शनी अष्टमेश असल्याने तो अडथळे व अडचणी आणतो.


## कुंडली : श्री. मधुकर शंकर

जन्म - शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी, १९१९ रोजी पुणे येथे दुपारी ३ वा. ४० मि.

अक्षांश - १८° उत्तर ३०', रेखांश - ७३° पूर्व ५८'

अयनांश - २२° ४३' ५५"

सांपातिक समय - ० ता. ८ मि. १२ से.



भाग्येश शनीची भाग्यस्थानावर व भाग्यस्थ प्रजापती, शुक्र व मंगळ यांच्यावर दृष्टी आहे. तशीच गुरुचीही या तिघांवर दृष्टी आहे. पण लग्नेश अष्टमात आहे आणि अष्टमेश शनी शत्रुराशीत व नीच नवांशी आहे.

नवमात मंगळ शत्रुक्षेत्री आहे. तो षष्ठेश व लाभेश आहे. षष्ठात राहू आहे व मंगळाचा राहूशी पूर्ण केंद्रयोग आहे. मंगळाजवळचा पंचमेश शुक्र आहे. तो राहू-केतूच्या केंद्रयोगात आहे. शिवाय तो व्ययेशही आहे. थोडक्यात, नवमस्य व नवमेश बलवान नाही. मंगळ राहू केंद्रयोगामुळे जातकास व्याधी उत्पन्न झाल्या व शस्त्रक्रिया करून घ्याव्या लागल्या.

१९२८ साली टॉन्सिलची शस्त्रक्रिया झाली. शुक्र युती मंगळ-शुक्र व्ययेश ही आहे आणि व्ययस्थानावर मंगळ व शनी दोघांची दृष्टी आहे. शिवाय राहू-केतू केंद्रयोग शुक्राशी आहेत.

१९३८ साली उष्माघात (Sun-stroke).

६/८/१९४७ रोजी अपेंडिसायटीसची शस्त्रक्रिया. षष्ठात राहू केंद्र मंगळ.

६/९/१९५९ अल्सर व आतडी चिमटली होती. त्याची शस्त्रक्रिया.

मार्च १९६२ दुसरी शस्त्रक्रिया Keloid. ५/१२/१९६४ तिसरी शस्त्रक्रिया Keloid आणि नंतर Cataract ची शस्त्रक्रिया. व्ययेश शुक्र युती मंगळ आणि व्ययस्थानावर शनी व मंगळ या दोन पापग्रहांची दृष्टी तसेच द्वितीयेश चंद्र केंद्रयोग वरुण (नेपच्यून). शिवाय रवी अष्टमात मकरेत.

थोडक्यात, जातकास आरोग्याचे भाग्य लाभले नाही.

धन मिळविण्यातही अनेक अडथळे आले. जातकाने रिक्षाही चालविली. आणखी काही उद्योग करून मिलिटरीमध्ये गेला. तेथे पाच वर्षे नोकरी केली व त्यातून बाहेर पडला व त्यास अबकारी खात्यात घेतले. तेथून रेल्वे प्रोटेक्शन फोर्समध्ये नोकरी व तेथून वय झाल्यावर निवृत्त झाला. षष्ठेश मंगळ हा षष्ठस्थ राहूचे केंद्रयोगात असल्याने अनेक व्यवसाय व नोकऱ्या.

वडिलोपार्जित स्थावर मिळकत दोघा भावांनी लाटली त्याच्याविरुद्ध दावा करून आपला हिस्सा घेतला.

मंगळ षष्ठेश असल्याने व तो शत्रुराशीत असल्याने व्यवसायात बदल. शिवाय लग्नेश बुध अष्टमात व दशमेश लग्नी बुध-गुरु षडाष्टक हा खडतर योग. व्यवसायात स्थिरता येत नाही.

गुरु लग्नी असल्याने जातकास ८० वर्षांपेक्षा जास्त आयुष्य मिळाले.

**(१२) मीनेचा मंगळ :** जर नवम स्थानी बारा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मीनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


मंगळ दशमेश व पंचमेश असतो आणि नवमात मीन राशीत मित्रक्षेत्री येतो. दशमेश दशमाच्या व्ययस्थानात (म्हणजे नवमात) येणे चांगले नाही. पितृसुख लवकर हरपते. मंगळाची तृतीयेवर दृष्टी असते. त्यामुळे भावंडांचे सुख नसते. भावंडे नसतात तरी अगर त्यांच्याशी पटत नाही. बुध तृतीयेश असतो. त्याचा मंगळाशी शुभयोग असेल तर धाकटे भाऊ-बहीण असतात. मंगळाशी गुरुचा सहयोग, शुभयोग असला तर मंगळाचा राजयोग सफल होतो. लग्नेश चंद्र मंगळाबरोबर असता संपत्ती चांगली मिळते. इतर ग्रहांशी असलेल्या संबंधावर संबंधित भावाची फले अवलंबून राहतात.

## कुंडली : श्री. अजय जोगळेकर

जन्म - शनिवार दि. ३१ जानेवारी, १९७० रोजी पोफळी (जि. रत्नागिरी) येथे सायं. ६ वा. १५ मि.

अक्षांश - १७° उत्तर २५', रेखांश - ७३° पूर्व ४१'.

अयनांश - २३° २६' २७'', सांपातिक समय - २ ता. २१ मि. १ से.




दशमात शनी नीच राशीत, दशमेश मंगळ दशमाचे व्ययात शिवाय तो शनी व राहू यांच्यामध्ये सापडला व प्रजापतीचे प्रतियोगात पितृकारक रवी शनीच्या दृष्टीत.

पिता मृत्यू जून १९९१.


पंचमेश मंगळ वरीलप्रमाणे बिघडला असल्याने शिक्षण जेमतेम एस. एस. सी. पास महाविद्यालयीन शिक्षण - चतुर्थात गुरू प्रतियोग शनी, तसेच चतुर्थेश शुक्र शनीच्या दृष्टीत. चतुर्थाच्या दोन्ही बाजूस प्रजापती व वरुण. विद्याकारक बुध षष्ठात केंद्रयोग प्रजापती व मंगळ म्हणून महाविद्यायलीन शिक्षण नाही.

विवाह १२/७/१९९१ पण सप्तमेश शनी नीच, त्याचे व्ययात मंगळ आहे. १९९४ साली घटस्फोट. शुक्र सप्तमात त्रिकोण प्रजापती यामुळे वादनकला अवगत. पेटीची साथ नामवंत गायकांना करतो.

# १०

# दशम भाव

सोबतच्या कुंडलीमध्ये ज्या ठिकाणी दहा हा अंक लिहिलेला आहे. त्या स्थानाला कुंडलीतील किंवा पत्रिकेतील 'दशम स्थान' असे म्हणतात.




दशम स्थान हे सर्वांत महत्त्वाचे स्थान आहे. ते अर्थत्रिकोणाचे केंद्रस्थान. द्वितीय हे कणखर स्थान अर्थसंचय दर्शविणारे आहे. जातक कोणत्या माध्यमातून संपत्ती मिळवितो व धनसंचय करू शकतो हे या स्थानावरून जाणून घेऊन तद्दर्शक मध्यम व्यवसायाचा अवलंब केला जातो. म्हणून हे व्यवसायदर्शक दुय्यम पण पूरक स्थान आहे. षष्ठस्थान हे आपोक्लीम स्थान असून नोकरी वा नोकर आणि साहाय्यक कामगार कर्मचारी यांचा विचार होतो. स्वतंत्र व्यवसाय, दुकानदारी, कारखानदारी वा बडे उद्योग यांमध्ये कर्मचाऱ्यांना महत्त्व येते. त्यांच्याकडून जरूर काम करून घेतले जाते. कामगार, मुनीम व नोकर हे स्वतंत्र व्यवसायास आवश्यक असतात. त्यांच्या साहाय्याने उद्योग-व्यवसायाचा पसारा वाढला जातो. द्वितीय स्थान भांडवल, षष्ठम स्थान हे कर्मचारी आणि दशम स्थान हे जातकाचे कर्म यामध्ये नोकरी-धंदा यांचा समावेश होतो. ते जातकाचे स्वतःचे कर्तृत्व, योजकत्व व व्यवस्थापन हे दर्शविले जाते. व्यवसायाचे वृद्धीतून मान दर्शविला जातो. नोकरी करणारे अधिकार पदावर जातात. ते त्यांची कर्तृत्वशक्ती, कामाचा चोखपणा यावर अधिकारी होतात व तसा मान त्यांच्या कर्मामुळे, कर्तबगारीमुळे मिळतो.

या तिन्ही स्थानांचा विचार करून जातकाचे उपजीविकेचे साधन, त्याच्या हातून या जन्मी घडणारे कर्म आणि त्यापासून मिळणारा मान-सन्मान, यश, अपयश, उन्नती-अवनती यांचा निर्णय केला पाहिजे. या स्थानावरून पत्नीचे, वाहनसौख्य, संततीचे आजार, सासू या गोष्टी पाहिल्या जातात.

जीवन चांगल्या तऱ्हेने जगण्यासाठी जे परिश्रम-जे कर्म करावे लागते, जो उद्योग उपजीविकेसाठी करावा लागतो असा व्यवसाय, व्यापार, उदीम, उद्योग, कारखानदारी, शासन, प्रशासन, नोकरी, राजकारण, समाजकारण, धर्मकारण या सर्वांतीत यश-अधिकार

योग, वरिष्ठांची मर्जी, गैरमर्जी, मुत्सद्दीपणा आणि या उद्योग-व्यवसायासाठी करावा लागणारा प्रवास, होणारा आत्मगौरव प्राप्त होणारा मान-सन्मान असा विचार दशम स्थानावरून केला जातो.

दशमातील मंगळाच्या फलाबद्दल हवाला रवीचा दिला आहे आणि रवीबद्दल वराहमिहीर, 'सुख शौर्यभाक् खे' म्हणजे जातक पराक्रमी व सुखी असतो असे सांगतात. रवी व मंगळ हे दशमात दिग्बली असतात आणि शनी हा दशमाचा कारक ग्रह आहे. पराक्रम कोणत्या क्षेत्रात होतो हे कर्मजीवाध्यायमध्ये नवांशाधिपतीवरून सांगितले आहे. मात्र सारावलीकार दशमस्थ रवीच्या कार्याचा विस्तार -

**अतिमतिरवि विभवबलो धनवाहन बंधुपुत्रवान सूर्ये ।**
**सिद्धारम्भः शूरो दशमेऽधृश्यः प्रशस्यश्च ।।**

याप्रमाणे करतात. याचा अर्थ - जातक महाबुद्धिमान, श्रीमंत, बलवान व शूर असून संतती, नातेवाईक, संपत्ती व वाहने यांनी युक्त असतो. तो आपल्या कामात यशस्वी होतो. पराक्रमी, सदाविजयी आणि महान होतो. एवढे महत्त्व दशमस्थ रवीचे आहे. एखादे काम सुरू केले की ते सिद्ध होते. यशस्वी होते. (सिद्धारम्भः) त्यास समाजात मान मिळतो. रवी दशमात दिग्बली असतो.

परंतु मंगळाबद्दल सारावलीकार स्वतंत्रपणे असे सांगतात की,

**कर्मोद्युतो दशमे शूरोऽधृश्यः प्रधान जनसेवी ।**
**सुतसौख्ययुतो रुधिरे प्रतापबहुलः पूमान् भवति ।।**

म्हणजे दशमस्थ मंगळ असलेला जातक आपल्या कामात निपुण व चोख असतो. पराक्रमी असतो. त्याचा पराभव होत नाही. मोठ्या माणसांची कामे करतो, धाडसी असतो. त्यास संतती असते व तो सुखी असतो.

राजदरबारी जातकाचे वजन असते. त्यास उत्तम मान-सन्मान प्राप्त होतात. तो इतरांच्या मताची पर्वा करीत नाही. आपल्या समाजात तो प्रमुख असतो. त्याची संपत्ती कमी होत नाही. आपल्या भावंडांना पुढे येण्यास मदत करतो.

जातकाचे पूर्वायुष्यात सुखोपभोगाकडे लक्ष असते पण उत्तरायुष्यात तो अध्यात्माकडे वळतो आणि त्यास साक्षात्कारही होतो. तो खर्चही पुष्कळ करतो. जातक गरिबांचा पोशिंदा असतो आणि धातुकामात कुशल असतो. त्याच्या कुटुंबात एकामागून एक समारंभ होतात. हाती घेतलेल्या कामात सहज यशस्वी होतो. इतरांना मदत करण्यास तयार व तत्पर असून दागदागिने, संपत्ती व स्थावर भरपूर असते. उत्तम संततीसुख लाभते. पितृछत्र मात्र लवकर हरपते.

केंद्रात ग्रहांचा प्रभाव जास्त असतो. दशम केंद्रात मंगळ जास्त प्रभावी असतो. त्यास उद्देशून 'जातकी' या ग्रंथात असे वर्णन आहे -

**शुक्रो यस्य बुधोयस्य केन्द्रे बृहस्पतिः ।**
**दशमोंगारकों यस्य स भवेत् कुलदीपकः ।।**

लग्नी बुध-गुरुसारखे शुभ ग्रह असावेत. चतुर्थात शुक्र असावा आणि दशमात मंगळ असता जातक कुलदीपक होतो; पण

**शुक्रो नास्ति बुधो नास्ति नास्ति केन्द्रे बृहस्पतिः ।**
**दशमोंगारको नास्ति स जातः किं करिष्यती ।।**

म्हणजे ज्याच्या कुंडलीत केंद्रात शुक्र नाही बुध नाही, आणि गुरुही नाही आणि दशमात मंगळसुद्धा नाही तो काय दिवे लावणार ?

एकूण दशमातील मंगळाचे महत्त्व जास्त जोर देऊन सांगितले आहे. मंगळ हा ग्रह उत्साह, जोम उद्योगशीलता, कर्तृत्व, पुढारीपणा आणि धाडस असे गुण दर्शवितो आणि या गुणाचा खरा उपयोग समाजात, राजकारणात, उद्योग-व्यवसायात होतो. म्हणून दशमात मंगळ बलिष्ठ असतो. दशम स्थान हे कर्माचे-कर्तृत्वाचे स्थान आहे आणि या गुणसमुच्चयांच्या जोरावर जातक आपल्या जीवनात पुढे येतो. अधिकार पदे मिळवितो व उच्च दर्जा प्राप्त करून घेतो. आलेल्या संधीचा ताबडतोब फायदा घेतो व त्यामुळेच मोठ्या जबाबदाऱ्या पत्करण्यास लागणारे धाडस त्याच्यामध्ये असते. विरोधास तोंड देऊन यशस्वी होण्याची जिद्द मंगळामुळे जातकात येते. जातक जो पवित्रा घेतो. तो जे कार्य, उद्योग व खटपट करतो, ज्या अधिकार पदावर तो असतो अथवा ज्या उद्योगधंद्यात कर्तृत्व दाखवितो त्यावर जातकाचे अंतिम यश अवलंबून असते.

मंगळ वर वर्णन केलेले गुण जरूर दर्शवितो पण तो जर अशुभ ग्रहामुळे, अशुभ दृष्टीमुळे बिघडला असेल तर तो दूराभिमानी, स्वयंकेंद्रित, विघातक, उद्धट, संतापी, अविचारी बनतो. म्हणून कुंडलीतील त्याचे भावेशत्व, त्याची राशीस्थिती, त्याच्याशी असलेले अन्य ग्रहांचे साहचर्य यांना महत्त्व येते.

मंगळ हा अग्नितत्त्व, स्पर्धा, भांडणे, धाडस, बेडरवृत्ती, जिद्द, शस्त्रचापल्य दर्शवित असल्याने पोलीस, सैन्यदले यात कनिष्ठ स्तरापासून वरच्या श्रेणीपर्यंत, अग्निशामक दले, धातूशी संबंध असल्याने लोहारापासून ते थेट लोखंड, पोलाद यांचे कारखाने व लोखंडी आणि पोलादी सामान यांचे विक्रेते व कारागीर मेटॅलर्जिस्ट; शस्त्रांशी संबंध असल्याने खाटिकापासून ते सुतार, लोहार, दंतवैद्य, शल्यचिकित्सकापर्यंत लागणारी सर्व तऱ्हेची हत्यारे, उपकरणे आणि पोलीस सैनिक यांना लागणारी शस्त्रास्त्रे, दारूगोळा यांचे कारखाने, शस्त्रास्त्र विक्रेते हार्डवेअरचे कारखानदार, व्यापारी अशा तऱ्हेच्या व्यवसायाशी संबंध येतो. तसेच लाकूडकामाशीही संबंध येतो.

प्रजापती (हर्षल) ची जोड मिळत असता सर्व तऱ्हेची अवजड व गुंतागुंतीची यंत्रे, यंत्रसामग्रीचे कारखानदार, व्यापारी होतात.

बुधाशी संबंध येत असता गणितज्ञ, स्थापत्य तसेच भांडणांचा, गुन्हेगारांचा संबंध येत असल्याने फौजदारी कामे करणारे वकील, शिक्षा देणारे न्यायदंडाधिकारी व न्यायाधीश हेही व्यवसाय व नोकरपेशा दर्शवितात.

शनी हा कायद्याचा व शांतता सुव्यवस्थेचा कारक आहे. त्यामुळे दिवाणी कामे करणारे वकील, न्यायाधीश यांच्या बाबतीत बुध, शनी, मंगळ यांचा संबंध येतो. तसेच रसायनाशी (केमिकल्स) संबंध येतो.

गुरुशी संबंध असता बँकिंग, ऑडिटिंग, अकौन्टन्सी यामध्ये प्रभाव दिसतो.

मंगळास ताबेदारी आवडत नाही. हुकूमत व अधिकार गाजविणे हा त्याचा धर्म आहे. म्हणून स्वतंत्र उद्योग, व्यवसाय यामध्ये जातक चमकतो. नोकरीत जावे लागल्यास लवकरच अधिकार पदावर जातो व तेथेही स्वतंत्रपणे अधिकार चालवतो.

रवी-मंगळाच्या अशुभ योग राजकीय कारकीर्द चांगली जात नाही. वडिलार्जित मालमत्तेच्या बाबतीत भांडणे, दावे यामुळे नुकसान पोहोचते. चंद्र-मंगळाचे अशुभ योग असता जातकाच्या श्रमाचे चीज होत नाही.

शनीशी अशुभ योग असता अवनती होते, अनेक अडथळे येतात.

मकर, मेष, सिंह, धनु व वृश्चिक या राशीत मंगळास आपली कर्तबगारी दाखविण्यास वाव मिळतो. मिथुन कन्येतही चांगला ठरतो. वृषभ, तूळ व कुंभ राशीत त्याची स्थिती अवघड असते तर कर्क या नीच राशीत त्यास तारेवरची कसरत करावी लागते.

राहू हा मंगळाचा शत्रू आहे. त्यांच्याशी शुभयोग असणे चांगले असते पण अन्य योगात मंगळ बिघडतो.

मंगळ शिपाईगडी तर वरुण (नेपच्यून) कारस्थानी, पाताळयंत्री व खोटारडा असल्याने मंगळ-वरुण योगाचा काळजीपूर्वक विचार करावा लागतो. ज्वालाग्राही द्रव पदार्थांशी संबंध येतो.

### दशमस्थ मंगळाची राशीनिहाय भावफले

**(१) मेषेचा मंगळ** : दशम स्थानात ज्या वेळी एक हा अंक असतो तेव्हा तेथील मंगळाला 'मेषेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

या लग्नास मंगळ दशम व पंचम स्थानाचा अधिपती असून तो दशमात स्वगृही येतो. या लग्नास मंगळ एकटा राजयोग करणारा असतो. त्याचे दशमातील वास्तव्य दिग्बल, राशीबल व भावबल यांनी युक्त असते. जातकास भरपूर संपत्ती व मोठी मालमत्ता मिळते व ती सर्व जातक स्वकर्तृत्वाने मिळवितो. असा मंगळ असलेला जातक पोलीस, संरक्षण, गुप्तहेर वा तत्सम खात्यात जातकास अधिकार पदावर पोहोचवितो.

मंगळाची लग्नावर व पंचमावरही दृष्टी असते. जातक तेजस्वी, देखणा असतो व लोकप्रिय होतो. चतुर्थावर योगकारक मंगळाची दृष्टी असल्याने कौटुंबिक सुख उत्तम मिळते. तो मोठ्या प्रासादात राहतो. तो उच्च शिक्षण प्राप्त करून घेतो.

रवीचा मंगळाशी सहयोग असता जातक राजकारणातही चमकतो व मोठ्या हुद्द्यावर जातो. त्यास स्त्री, संतती व संपत्ती आणि मान मिळतो. तो मंत्री होतो. संरक्षण मंत्रीही होतो. रवी दशमात उच्च असतो व तो जणू राजाच असतो.

गुरुचा योग म्हणजे नवमेश, दशमेश यांची युती व हा सर्वोत्तम राजयोग होतो. जातक विद्वान, सुदैवी, मधुरभाषी असतो. जनता त्याला राजाप्रमाणे मान देते. जातक कार्यकुशल, धार्मिक परंपरा पाळणारा, गुरुजनांचा आदर करणारा, विद्वानांचा सन्मान करणारा असतो. त्याची कीर्ती दूरवर पसरते.

मेष राशीतील पहिल्या, पाचव्या वा नवव्या नवांशात मंगळ असता वरील फले मिळतील.

कर्क नवांशी मंगळ नीच नवांशी येतो. अधिकारभंग होतो. त्यातच मंगळ दूषित असता गुन्हेगारी वृत्ती व घातपात करण्याकडे कल दर्शवितो.


## कुंडली : श्री. कस्तुरभाई लालभाई

जन्म - बुधवार दि. १९ डिसेंबर, १८९४ रोजी अहमदाबाद येथे रात्री ८ वा स्था. वेळ.

अक्षांश - २३° उत्तर २', रेखांश - ७२° पूर्व ३६'

अयनांश - २२° २३' २४", सांपातिक समय - १ तास ५२ मि. ४७ से.

सुप्रसिद्ध उद्योगपती व बँकर, टेक्स्टाईल, विमा, वीज, आगबोटी इत्यादी २० कंपन्यांचे संचालक, गिरणी मालक संघाचे अध्यक्ष.




दशम बिंदूचे निकट योगकारक मंगळ आहे. मंगळ त्रिकोण धनेश रवी, लाभेश शुक्र व लाभयोग नवमेश गुरु, गुरु त्रिकोण शनी. शनी चतुर्थात उच्च, शनी-मंगळ परस्पर दृष्टियोग कारखाने, मंगळ त्रिकोण शुक्र-टेक्स्टाईल उद्योग दर्शवितो. खुद्द मंगळाचा ऊर्जेशी संबंध व

रवीचाही संबंध. मंगळ त्रिकोण रवी (वीज). विमा अष्टमेश शनी प्रतियोग मंगळ आगबोटी वाहतूक तृतीयस्थ चंद्र केंद्रयोग शुक्र व गुरु.

मंगळ रवी त्रिकोण संचालक पदे व गिरणी मालक संघाचा अध्यक्ष. बँकर-सावकारी शुक्र-गुरुशी मंगळाचा शुभयोग.

**(२) वृषभेचा मंगळ** : जर दशम स्थानात जेव्हा दोन हा अंक असतो तेव्हा तेथील मंगळाला 'वृषभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

या राजराशीच्या लग्नास मंगळ नवमेश व चतुर्थेश असतो आणि दशमात वृषभेस येतो. जातक चांगला बलवान व विद्वान असतो. राजकीय क्षेत्रात यशस्वी व लोकप्रिय होतो. जातक आपल्या देखण्या व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने लोकांना प्रभावित करतो. विद्वत्तेमुळे, शहाणपणाने, धाडस व जिद्द यामुळे तो लोकांची मने जिंकतो. प्रशासनात मोठ्या अधिकार पदावर जातो. जातक आपल्या शत्रूंना नामोहरम करतो आणि आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवितो. जातक सन्मार्गाने व साधन शुचितेने संपत्ती मिळवितो व त्यास सर्व तऱ्हेचे ऐषाआराम व सुखोपभोग मिळतात.

जातक रसायनशास्त्रात प्रावीण्य मिळवितो.

बुध धनेश व लाभेश असतो. त्याचा दशमस्थ मंगळाशी सहयोग सेनापतीपद देईल. जातक उत्तम वक्ता, बुद्धिमान व शत्रुपक्षाची मर्मस्थळे हुडकून काढून त्यावर हल्ला चढवितो. पराक्रमी, कारस्थानी व निष्ठुर असतो.

मिथुन कन्या नवांशांत सखोल अध्ययन, स्थापत्यशास्त्र व गणित यात गती असते.

शुक्र तृतीयेश व दशमेश असतो. नवमेश मंगळ आणि दशमेश शुक्र यांचा सहयोग उत्तम ठरतो. जातक बुद्धिमान, हुशार व विद्वान असतो. जातक मंत्री होतो व प्रसिद्ध होतो.

गुरुचा सहयोग 'पार्थिवो विपुलकीर्तीः बहुधन जनपरिवारः कर्मसु निपुणो भवेत् पुरुष.'

राजा असतो. विपुल कीर्ती, मोठा परिवार आणि अत्यंत कार्यकुशल असतो.

शनीचा सहयोग असता जातक खोटारडा व फसवणारा असतो. मोठ्या गुन्ह्यात त्यास शिक्षा होते. पैसा पुष्कळ जमा केलेला असतो.

मंगळ राहू दशमात एकत्र असताही जातक मोठ्या पदावर जातो.


## कुंडली : श्री. बाळासाहेब देसाई

जन्म - गुरुवार दि. १० मार्च, १९१० रोजी पाटणा येथे सायं. ५ वाजता.

अक्षांश - १७° उत्तर २५', रेखांश - ७३° पूर्व ५५'

अयनांश - २२° ३५' ५६", सांपातिक समय - ३ तास ३४ मि. ४५ से.

महाराष्ट्रातील लोकप्रिय राजकीय नेते. महसूल मंत्री, गृहमंत्री, दुर्बल घटक पुढारी. करारी तडफदार व कडक शिस्तीचे नेते.




विधानसभेचे सभापती, मंगळ दशमबिंदूचे अगदी निकट, मंगळ त्रिकोण योग प्रजापती हर्षल, दशमेश शुक्र त्रिकोण गुरु दशमावर व दशमेशावर आणि शनीवर गुरुची दृष्टी धनेश लाभेश बुध सप्तमात चंद्राच्या युतीत आहे. भाग्येश मंगळ दशमात राहूयुक्त. भाग्येश दशमात यामुळे मंत्रिपदे व सभापती पद.

**(३) मिथुनेचा मंगळ** : दशम स्थानात जेव्हा तीन हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'मिथुनेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

दशमावर मिथुन रास आहे. मंगळ तृतीयेश व अष्टमेश असून दशमात मिथुन राशीत येतो. जातकाच्या व्यवसायाचा पट लवकर उलगडत नाही व सरळ उलगडला जात नाही. संथ गतीने व अनेक अडथळे पार करीत प्रगती होते. जातकाची सेवाज्येष्ठता डावलली जाते. त्यामुळे फसवणूक वा अन्य गैरमार्गाचा अवलंब केला जातो. व्यवसायानिमित्त फिरावे लागते. प्रवासापासून मात्र फायदा होतो.

दशमात बुध असता जातक दुभाषी होतो. त्यास गणित व भाषा यामध्ये गती असते.

दशम भावात मुख्यतः मृग नक्षत्राचे तिसरे व चौथे चरण, आर्द्रा नक्षत्राचे 4 चरण व पुनर्वसू नक्षत्राचे 3 चरण येतात. मृग नक्षत्र मंगळाचेच आहे. तेथे मंगळ चांगली कामगिरी करतो. आर्द्रा या राहूच्या नक्षत्रात मंगळास फारसा वाव मिळत नाही. मंगळाचे अष्टमेशत्व आड येते.

बुध मंगळाच्या सहयोगावर गणित विषय, स्थापत्यशास्त्र, अभियांत्रिकी, भूगर्भशास्त्र वा मेकॅनिक्सच्या व्यवसायास उत्तम असतो.

मंगळाबरोबर रवी असता जातक सरकारी नोकरी अगर राजकारण करतो.

शुक्र भाग्येश व धनेश असतो. त्याचा सहयोग आर्थिकदृष्ट्या लाभदायक ठरतो.

## कुंडली : सर बेसिल झहरॉफ


जन्म - शनिवार दि. ६ ऑक्टोबर, १८४९ रोजी मुग्ला टर्की येथे सकाळी ५ वाजता.

अक्षांश - ३७° उत्तर १३', रेखांश - २८° पूर्व २२'

अयनांश - २१° ४५' ३२'', सांपातिक समय - ५ तास ५९ मि. ८ से.

विख्यात श्रीमंत उद्योगपती व युरोपमधील एक गूढ व्यक्ती.

व्यवसाय - शस्त्रास्त्रे व युद्धसामग्री विक्रीचा. मृत्यूचा व्यापारी म्हणून प्रसिद्ध. या व्यापारावर अलोट संपत्ती मिळविली.




मंगळ दशमबिंदूवर धनु नवांशी. दशमेश बुध द्वितीयेत कुंभ नवांशी. आर्द्रा प्रथम चरणात त्रिकोण मंगळ-वरुण (नेपच्यून) व बुध. लाभेश चंद्र भाग्यात उच्च स्थानावर पंचमेश शनीची दृष्टी, मंगळ तृतीयेश असल्याने शस्त्रे. मिथुनेत असल्याने फिरता विक्रेता.

**(४) कर्केचा मंगळ :** जर दशम स्थानात जर चार हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कर्केचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ द्वितीय व सप्तम स्थानांचा अधिपती असून दशमात कर्क या जनतत्त्वाच्या राशीत येतो. मंगळाच्या गुणास ही जलरास चांगली नसते. अग्नितत्त्वाचा मंगळ जलराशीत आल्याने जातकाचा जोम, उत्साह व उद्यमशीलता विझून गेल्यासारखे होतात. मंगळ येथे नीच राशीत येतो तेव्हा नीचभंग होत असल्यासच याची चांगली फले मिळतात अन्यथा अशुभ फले मिळतात.

मात्र मंगळाबरोबर चंद्र असता अगर अन्य तऱ्हेने मंगळाचा नीचभंग होत असता मात्र परिस्थिती उलट होते. चंद्र-मंगळ युती ही लक्ष्मीदायक असते आणि दशमेश चंद्र व धनेश मंगळ यांची युती धनदायक, अधिकारदायक ठरते. जातकाचा जन्म श्रीमंत घराण्यात होतो. त्याचे व्यावसायिक कर्तृत्व व प्रगतिपद उत्तरोत्तर विकसित होत जातात.

तूळ लग्नास शनी हा राजयोगकारक असल्याने व बुध भाग्येश असल्याने या दोन ग्रहाशी मंगळाचे शुभसंबंध असता उत्तम फले मिळतात.

शिवाय तूळ लग्नास मंगळ दोन व सात मारक स्थानांचा अधिपती होत असल्याने तो मारक ठरतो, अशी समजूत होऊ शकते. पण भावार्थ रत्नाकरमध्ये असा मंगळ मारक ठरत नाही असे मत प्रतिपादन केले आहे.

सर्व काही चंद्राच्या बलाबलावर अवलंबून असते. शुभ ग्रहांच्या दृष्टीत असल्यास यश लाभते अन्यथा आयुष्य दुःखी व कटकटीचे जाते.

मंगळ आश्लेषा नक्षत्रात मात्र चांगलाच बिघडतो. पुष्य नक्षत्रात बऱ्यापैकी फले मिळतात. पुनर्वसू नक्षत्राचे चौथे चरण कर्क राशीचे पहिल्या नवांशाचे व गुरुचे असते. तेथे फले उत्तम मिळतील. मंगळ तेथे वर्गोत्तम असतो.


## कुंडली : श्री. ए. डी. जोशी

जन्म - सोमवार दि. २० ऑक्टोबर, १९४७ रोजी सोलापूर येथे सकाळी ६ वा. ३० प्र. वेळ.

अक्षांश - १७° उत्तर ४०', रेखांश - ७५° पूर्व ५५'

अयनांश - २३° ७' ३७'', सांपातिक समय - ७ तास ५३ मि. ३६ से.

जातक M.Sc. उत्तम तऱ्हेने उत्तीर्ण झाला. शिक्षण योग्य तऱ्हेने नोकरी कोठे मिळेना.




दशमात शनी व मंगळ दोन ग्रह दिसतात. पण एकादश भावमध्याजवळ ६ अंशात शनी आहे. तर मंगळ दशम एकादशच्या भावसंधीजवळ आहे. त्यामुळे हे दोन्ही ग्रह दशम स्थानची फले देण्यात असमर्थ आहेत. बुध प्रत्यक्षात धन भावाजवळ आहे. द्वितीय भावमध्य बिंदूपासून ७° अंतरावर आहे. गुरु धन भावमध्यावर आहे तो चंद्र राशीचा अधिपती आहे.

चंद्र दशमेश आहे पण तो तृतीय भावात आहे. त्याचा दशमाशी षडाष्टक योग आहे. राज्याधिपती गुरु व भाग्येश बुध एकमेकांपासून १० अंश अंतरात आहेत. बुध, गुरु द्वितीय स्थानची फले देण्यास समर्थ आहेत. जातकाजवळ वक्तृत्व उत्तम आहे आणि या दोघांचा दशम बिंदूशी त्रिकोण योग आहे. म्हणून वक्तृत्वाच्या व शैक्षणिक अध्यापनाच्या माध्यमातून पैसे मिळण्याचा योग आहे. जातकाने विद्यार्थ्यांसाठी अभ्यासवर्ग चालविले. स्वतंत्र व्यवसाय, नोकरी ताबेदारी नाही आणि या माध्यमातून त्यास उत्तम धनप्राप्ती होत आहे. चतुर्थेश व पंचमेश शनीचा रवीशी व प्रजापतीशी लाभयोग आहे. यामुळे शिक्षण उत्तम झाले.

(५) **सिंहेचा मंगळ :** दशम स्थानात जेव्हा पाच हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'सिंहेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ लग्नेश व षष्ठेश असून दशमात सिंह राशीत मित्रक्षेत्री येतो. लग्नेश दशमात हा उच्च प्रतीचा अधिकार योग होतो. मंगळ षष्ठेश असल्याने राजरस्ता नोकरीच्या माध्यमातून गवसतो.

सिंह राशीत मघा व पूर्वा ही प्रमुख नक्षत्रे आहेत. त्यामध्ये मघा हे उत्तम रजोगुणी आहे व ते महत्पदाला नेणार आहे. ध्येय उच्च असते. जातक मोठा अंमलदार होतो. सचिवालयात श्रेष्ठपदी जातो. पण त्याहीपेक्षा लष्करी महत्पद देणारा हा नक्षत्र विभाग आहे. जातक लढाऊ वृत्तीचा व शत्रूंना नामोहरम करणारा व सर्वांवर धाक, जरब बसविणारा असतो. पहिले चरण त्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

पूर्ण नक्षत्र शुक्राच्या अमलाखाली आहे. जातक व्यापारी दृष्टीचा व वैभवाची इच्छा करणारा असतो. तो मोठा कारखानदार होतो. पूर्वाचा पहिला चरण त्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. चौथा चरण रसायनशास्त्र या शल्यशास्त्राकडे कल दर्शवितो.

उत्तरेचा पहिला चरण सिंह राशीत व धनु नवांशात येतो. हा चरण उत्तम पैसा व संपत्ती देणारा आहे.

मंगळाचा प्रजापती (हर्षल) शी शुभयोग असता जातक नशीबवान असतो. यंत्रविद्या व कारखानदारीस हा योग चांगला आहे.

मंगळाचा रवीबरोबर योग लग्नेश दशमेश यांचा संबंध मोठा राजयोग साधणारा असतो. शासकीय उच्च अधिकारी या राजकारणात उडी घेऊन ते क्षेत्र गाजवतो व प्रसिद्धीस येतो.

चंद्र भाग्येश असल्याने त्याचा मंगळाशी सहयोग लक्ष्मीयोग तर होतोच पण समाजात मोठा मान व लोकप्रियता मिळवितो. सामाजिक संस्थांच्या यशस्वी उभारणीमुळे प्रसिद्ध होतो. जातकाचे लोकहिताच्या कामाकडे जास्त लक्ष असते.

गुरु धनेश व पंचमेश असल्याने त्याचा व्यवसायनिश्चितीसाठी चांगला उपयोग होतो. जातक ज्ञानवान विचारी आणि उच्चशिक्षित असतो व मोठ्या हुद्द्यावर जातो.


बुध अष्टमेश व लाभेश असतो आणि त्याचा मंगळाशी सहयोग अभियांत्रिकीच्या दृष्टीने चांगला ठरतो. बुध-गुरुचे योगावर दोन, पाच, आठ, अकरा या संपत्तिदायक स्थानांच्या संबंधामुळे जातकास अनेकविध मार्गाने धनलाभ होतो.

## कुंडली : श्रीयुत

जन्म - मंगळवार दि. २ एप्रिल, १९१८ रोजी रात्री १० वा. २२ मि.

अक्षांश - १९° उत्तर ३०', रेखांश - ८०° पूर्व.

अयनांश - २२° ४३' १३", सांपातिक समय - ११ तास ० मि. ० से.




लग्न वृश्चिक वर्गोत्तम आहे व त्यावर गुरुची व मंगळाची दृष्टी आहे. भाग्येश चंद्र लग्नी केंद्रयोग मंगळ.

लग्नेश मंगळ दशमभाव मध्यावर आहे. त्याचा अधिपती रवी हा पंचमात मीनेत आहे. त्याचा अधिपती गुरु सप्तमकेंद्री वृषभेत आहे व तो वर्गोत्तम आहे.

गुरु धनेश व पंचमेश आहे व तो अर्थदर्शक वृषभ राशीत आहे.

मंगळ दशमात आहे. तो अधिकार पदावर जाणारा आहे. मंगळ दिग्बली व राशीबली आहे. पण दशमेश दशमाचे व मंगळाचे अष्टमात आहे. तसेच दशमाचे व्ययात शनी व वरुण (नेपच्यून) आहेत. त्यामुळे सर्वांत श्रेष्ठ पद मिळणार नाही आणि उत्तरार्धात यश व अधिकार पद निश्चित मिळू शकेल.

मंगळापेक्षा गुरु जास्त प्रभावी आहे. तो धनेश व पंचमेश असून वृषभ या अर्थदर्शक राशीत वर्गोत्तम आहे व त्याची लग्नावर पूर्ण दृष्टी आहे. म्हणून ज्या व्यवसायात अर्थ, पैसा याशी संबंध येईल अशा व्यवसायात जातक जाईल तो आर्थिक सल्लागारसुद्धा होऊ शकेल.

मंगळ षष्ठेश आहे. त्यामुळे नोकरीत कनिष्ठ श्रेणीपासून सुरुवात होऊन तो अधिकार पदावर जाईल.

बहुसंख्य ग्रह (७) क्षितिजाचे खाली आहेत. त्यामुळे भाग्योदय उत्तरायुष्यात होतो.

जातक बँकेत नोकरीस लागला आणि राष्ट्रीयीकृत बँकेचा असिस्टंट जनरल मॅनेजर पदापर्यंत चढला व तेथून निवृत्त झाला.


## कुंडली : श्री. आनंदराज सुराणा

जन्म - सोमवार दि.२८ सप्टेंबर, १८९१ रोजी जोधपूर येथे सकाळी १०.३० वा.

अक्षांश - २६° उत्तर १८', रेखांश - ७३° पूर्व ४.

अयनांश - २२° २०' ३८", सांपातिक समय - १० तास ५६ मि. २० से.

उद्योगपती १९२६ साली कंपनी सुरू. इंडो-युरोप ट्रेडिंग कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक. छपाई, मुद्रण यंत्रे व साहित्य यांचे कारखाने जोधपूर व दिल्ली येथे सुरू झाले.




दशमात मंगळ, बुध, शनी हे तिथे युतीमध्ये आहेत. चतुर्थातून धनेश गुरुची तिघांवर पूर्ण दृष्टी.

शनी मंगळ यांच्या युतीमुळे यंत्रे- गुरु कुंभेत मोठ्या यंत्रदर्शक राशीत प्रजापती (हर्षल) च्या त्रिकोणात आहे.

शनी तृतीयेश - छपाई मुद्रणाची यंत्रे, बुध त्याचे साहित्य दशमेश रवीचा लग्नबिंदूशी पूर्ण लाभ योग. दशमेश रवी युती शुक्र. शुक्र सप्तमेश आहे. त्यामुळे स्वतंत्र व्यवसाय व व्यापार दर्शवितो. तेव्हा मुद्रण साहित्याचा व्यापार व त्याचा कारखाना.

गुरुमुळे समृद्धी, मंगळ व्यवस्थापन प्रमुख अधिकारी चंद्र भाग्येश भाग्यात यामुळे वरील उद्योगात नशिबाने हात दिला व भरभराट झाली.

(६) **कन्येचा मंगळ** : दशम स्थानात जर सहा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कन्येचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ पंचमेश व व्ययेश असून तो दशमात कन्या राशीत शत्रुक्षेत्री येतो. पंचमेश दशमात शुभ फले देणारा ठरतो. मंगळ या ठिकाणी अभ्यासू वृत्ती आणि उच्च दर्जाची बुद्धिमत्ता दर्शवितो. असा जातक शास्त्रे जाणणारा असतो आणि शास्त्रीय विषयावरील लिखाण, प्रबंध पुस्तके लिहून प्रसिद्ध करतो. जातक अध्यापनाचेही कार्य उत्तम करतो. मंगळाची महादशा चांगली जाते.

चंद्र अष्टमेश असतो आणि त्या चंद्राचा अशुभ योग संततीस मारक ठरतो. शिवाय मातृसुखही बिघडते. बुधाच्या अशुभ योगात द्विभार्या योग येतो. बुध सप्तमेश व दशमेश असतो. बुध मंगळाचा सहयोग वा शुभयोग असता गणित विषयात प्रावीण्य दर्शवितो. शैक्षणिक क्षेत्रातही चांगली कामगिरी होते. जातक चांगला वक्ता असतो. बुध मंगळाच्या योगावर अनेक भाषा शिकतो व बोलतो. बुद्धी चिकित्सक असते.

रवी भाग्येश असतो. त्याचा मंगळाशी शुभयोग असता जातक आपल्या कर्तृत्वाने व्यवसायात प्रगती साधतो. त्यास दैवाची चांगली अनुकूलता मिळते. जातकास प्रशासकीय खात्यात अधिकार योग येतो.

मंगळ शुभ ग्रहांच्या शुभयोगात असता जातक बुद्धिमान व कलाप्रेमी असतो. गणित, यंत्रशास्त्र, स्थापत्यशास्त्र यांच्या अभ्यासात उत्तम असतो.

कन्या राशीत उत्तरा नक्षत्राचे २, ३, ४ चरण आणि चित्रा नक्षत्राचे १ व २ तसेच हस्त नक्षत्राचे चारही चरण येतात. चित्रा हे मंळाचेच नक्षत्र आहे. त्यात सिंह व कन्या नवांश येतात. सिंह नवांशांत असता रवीसंबंधी वर नमूद केलेली फले मिळण्याची शक्यता असते. कन्या नवांशात दशमस्थ मंगळ वर्गोत्तम होतो. येथे मंगळ चांगला फलदायी ठरतो. जातक वाक्पटू असतो. पण चिकित्सक व संशयी असतो (अतिचिकित्सक). वकिली व्यवसायातील फौजदारी विभागात चांगले यश संपादन होते. शुभ-योगात साहित्य, कला, काव्य इत्यादींच्या अभ्यासास अतीव शुभदायी ठरतो. पोलीस वा लष्करात तसेच गुप्तहेर खात्यात अधिकार योग लाभतो. मंगळाची लग्नावर पूर्ण दृष्टी येते. त्यामुळे जातक देखणा, रुबाबदार व उंचापुरा असतो.

उत्तरा नक्षत्रातील २ रा नवांश मकर नवांश, हस्त नक्षत्रातील पहिला नवांश मेष नवांश व तिसरा नवांश मिथुन नवांशाचा असतो. पैकी मकर नवांशी, मंगळ उच्च नवांशी, मेष नवांशी स्व नवांशी असतो. या दोन्ही नवांशात मंगळ असलेला जातक आयुष्यात पुढे येतो. मिथुन नवांशातील मंगळ बुधाच्या शुभयोगात असता बऱ्यापैकी फले मिळतील.

वृश्चिक व धनु लग्नाच्या काही वैशिष्ट्यांपैकी दशमावर सिंह, कन्या वा तूळ राशी येतात व त्या वेळी लग्नराशीवरून दशम भाव ग्रह न घेता दशमावर असलेल्या ग्रहाला

प्राधान्य द्यावे लागते अगर लग्नबिंदूशी केंद्रयोग करणारा ग्रह दशम स्थानचे कार्य करताना दिसून येतात.

### कुंडली : पोलीस आयुक्त


जन्म - बुधवार दि. ६ सप्टेंबर, १९४४ रोजी दुपारी ७ वा. ४५ मि.

अक्षांश - ३१° उत्तर ३२', रेखांश - ७५° पूर्व ५७'.

अयनांश - २३° ४' ४५", सांपातिक समय - १३ तास २४ मि. २३ से.

मंगळ केंद्रयोग लग्नबिंदू व केंद्रयोग शनी. लाभयोग गुरु त्रिकोण लग्न व चंद्र.

मंगळाची चंद्रावरही दृष्टी आहे.




चंद्र कुंडलीचा विचार करता चंद्र लग्नेश मंगळ चंद्रापासून षष्ठस्थानात, चंद्राचे तृतीयेत शनी, चंद्राचा द्वितीयेश शुक्र मंगळाच्या युतीत, मंगळाची लग्न व चंद्रावर दृष्टी. त्यामुळे पराक्रम, धाडस, वगैरे गुण दर्शविणारा मंगळ बलिष्ठ आहे. नवांश लग्न कर्क असून मंगळ नवांशात मेष नवांशी आहे व त्याचा नवांशात गुरुशी त्रिकोण योग आहे. नवांशात रवी चतुर्थात मंगळाचे समोर.

भाग्येश रवी भाग्यात दशमेश बुधाच्या युतीत आहे. यामुळे सरकारी नोकरी व ती पोलीस खात्यात, मंगळाच्या दृष्टीमुळे व नवांशात दशमात स्वनवांशी. यामुळे उच्च अधिकार पद प्राप्त झाले. पोलीस कमिशनर या हुद्द्यापर्यंत गेले. लग्नेश भाग्येश दशमेश एकत्र यामुळे मान-सन्मान, यश वा उच्च अधिकारप्राप्ती नवांश कुंडली पुढे दिली आहे.

(७) **तुळेचा मंगळ :** दशम स्थानात सात हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'तुळेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ चतुर्थेश व लाभेश असून दशमात तूळ या शुक्राच्या राशीत येतो. दशमातून मंगळाची लग्नावर, चतुर्थावर व पंचमावर म्हणजे वृषभ राशीवर दृष्टी येते.

तूळ राशीचे स्वरूप वजन काटा-तराजू हे आहे. तराजू हे दोन गोष्टींचे प्रतीक आहे. एक व्यापारी वृत्तीचे-विकावयाच्या मालाचे वजन करणे आणि दुसरे न्यायालयाचे दोन विरोधी पक्ष-पक्षकार यांच्यामध्ये धारवाडी काट्याप्रमाणे समतोल न्याय करणे. दशमातील मंगळाचा संबंध व्यापाराशी येतो. तेव्हा मोठ्या प्रमाणावरील व्यापार-धंदा, ठोक मालाची विक्री करणारे (उदा. किराणाभुसार मालाचे व्यापारी)

न्यायालयाशी संबंध म्हणजे न्यायाधीश, त्यांचे कर्मचारी, अधिकारी, न्यायालयात काम करणारे वकील, कारकून वगैरे.

तूळ रास ही स्पर्धकांचीही रास आहे. उत्तम क्रीडापटू व क्रीडाप्रेमी लोक दर्शविले जातात.

तूळ रास ही शुक्राच्या अमलाखालील रास आहे. शुक्राची आणखी एक रास वृषभ ही आहे. ती मकर लग्नास पंचमावर येते. पंचम स्थान व तूळ आणि वृषभ यांचा संबंध निरनिराळ्या कलांच्या आविष्काराशी येतो. तसेच स्टेशनरी, तयार कपड्यांचे व्यापारी, शिवणकाम, भरतकाम, विणकाम, कापडाचा व्यापार, सुगंधी पदार्थांचा व्यापार, चित्रकला, छायाचित्रण, चलच्चित्रण, ड्रेपरी, सौंदर्य प्रसाधने, चैनीच्या वस्तू, सराफी, सिनेमागृहे आणि नाट्यगृहे.

तूळ राशीत चित्रा नक्षत्राचे ३ रा व ४ था चरण येतात. स्वातीचे चारही चरण येतात व विशाखाचे पहिले तीन चरण येतात. म्हणजे मंगळ, राहू, व गुरु यांचे संबंध येतात. चित्राचा ३ रा चरण तूळ नवांश (मंगळ येथे वर्गोत्तम), ४ था चरण वृश्चिक नवांशी (स्व-नवांशी), स्वातीचा १ ला चरण धनु नवांश (मित्र नवांश) दुसरा चरण मकर नवांश (उच्च नवांशी), विशाखाचा पहिला चरण (मेष नवांशी) एवढे नवांश मंगळाच्या आविष्काराच्या दृष्टीने योग्य ठरतात.

वर्गोत्तम नवांशी अधिकार योग असतो. वाहन खाते, बँकिंग, स्थापत्यशास्त्र वगैरेंत भाग्योदय होतो. वृश्चिक नवांशी पोलीस, अंमलबजावणी खाते, येथे दुय्यम प्रतीचा अधिकार योग येतो. खेळात प्रावीण्य मिळते.

मकर नवांशी नोकरीत अधिकार योग व्यवस्थापकीय वा न्यायखात्यात शनीशी शुभ-योगात असता न्यायालयाशी संबंध येतो. तसेच स्थापत्यशास्त्रात ही गती असते. एखादी कला व हुन्नर असते पण नोकरीत स्थैर्य नसते.

मेष नवांशी पोलीस, लष्कर वा अन्य अंमलबजावणी खात्यात नोकरी होते. शुभयोगात खेळाची आवड असते.

राहूच्या नक्षत्रात (स्वातीत) सिनेमाधंद्यांशी संबंध येतो. धनु, कुंभ व मीन नवांशी.

वृषभ व मिथुन नवांशांत उत्तम वक्तृत्व व न्यायालयाशी संबंधित नोकऱ्यांमध्ये प्रवेश होतो.


## कुंडली : श्री. संजीवकुमार

जन्म - शुक्रवार दि. ९ जुलै, १९३७ रोजी मुंबई येथे रात्री ९ वाजता प्र. वेळ.

अक्षांश - १८° उत्तर ५४', रेखांश - ७२° पूर्व ५५'.

अयनांश - २२° ५९' २१'', सांपातिक समय - १५ तास २९ मि. ३४ सेकंद

उत्तम अभिनेता, महान कलावंत. दशमावर वृश्चिक १° ५२' म्हणजे कर्क नवांश. गुरु लाभयोग दशम बिंदू. दशमेश मंगळ, दशम बिंदूचे मागे ४° २०' आहे. मंगळाची दशम बिंदूशी युती आहे. तो तुळेच्या शेवटी मिथुन नवांशी आहे. मंगळाचा रवीशी त्रिकोण व वरुण (नेपच्यून) शी लाभयोग आहे व बुधाशीही त्रिकोण आहे. तसेच दशम बिंदूवर शुक्राची पूर्ण दृष्टी आहे. दशमेश मंगळ तूळ रास-मिथुन नवांशी वरुणाचे लाभात व बुधाचे त्रिकोणात हे सर्व कलादर्शक, अभिनय क्षेत्र, सिनेमा व्यवसाय दर्शवितात. गुरु मंगळ लाभयोग (२° ३८' अंतर) आहे.




**(८) वृश्चिकेचा मंगळ** : दशम स्थानात जेव्हा आठ हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'वृश्चिकेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

दशमावर वृश्चिक रास असून मंगळ तेथे स्वक्षेत्री येतो. मंगळ तृतीयेश आहे. दशमेश दशमात असल्याने जातक आपल्या जीवनात मोठ्या पदावर जातो. त्याच्या भाग्याचा लोक हेवा करतात. जातक श्रीमंत व समृद्ध असतो. तसाच तो उच्चशिक्षित व विद्वान असतो. आपल्या व्यवसायात यशस्वी होतो.

पोलीस अधिकारी, अग्निशामक दलात मोठा अधिकारी होतो. रसायनशास्त्रात, खाण-कामात तज्ज्ञ अगर शस्त्रास्त्रांचा व्यापारी वा तत्सम खात्यात नाव कमावतो.

हल्लीच्या युगात पेट्रोकेमिकल इंजिनिअर होईल. मंगळ तृतीयेशही असल्याने उत्तम सर्जन होण्याची शक्यता असते. मंगळाबरोबर रवी असता वैद्यकशास्त्राकडे कल असतो. अगर राजकारणातही पुढे येतो.

वरुण (नेपच्यून) मंगळ दशमात असता व त्यास शनीचा पाठिंबा असता पेट्रोकेमिकल इंजिनिअर होतो.

शुक्र नवमेश व चतुर्थेश असतो आणि तो मंगळाबरोबर असता उच्च शिक्षणासाठी परदेशात जातो, शिक्षणक्षेत्रात नाव कमावतो व संशोधनाकडे वळतो अगर परदेशाशी व्यापार करणारा बडा व्यापारी होतो.

गुरु धनेश व लाभेश असतो व त्याचा मंगळाशी सहयोग वा दृष्टियोग उत्तम धनलाभ दर्शवितो व तो आपल्या समाजाचा पुढारी होतो.

लग्नेश शनी मंगळाच्या शुभयोगात, सहयोगात असणे हा राजयोगही असतो. जातक धाडसी असतो. तो केमिकल इंजिनिअर वा खाण इंजिनिअर होतो.

शेवटी प्रभावी ग्रह, त्यास पुष्टी देणारे दुय्यम ग्रह व ग्रहयोग यावर व्यवसाय ठरतो.


## कुंडली : श्री. पटवर्धन

जन्म - मंगळवार दि. ३ जानेवारी, १९२८ रोजी बागलकोट येथे सकाळी १० वा. २० मि.

अक्षांश - १६° उत्तर १४', रेखांश - ७४° पूर्व ४७'.

अयनांश - २२° ५०' ५४", सांपातिक समय - १६ तास ३९ मि. २० सेकंद

नवमेश शुक्र त्रिकोण गुरु व प्रजापती लग्नेश दशम बिंदूवर व दशमेश मंगळ जवळच. शनी व मंगळ यांची युती वृश्चिकेत आहे. पण शनी लग्नेश तसा व्ययेश आहे व तो शत्रू-राशीत आहे.



मंगळ दशमेश दशमात असला तरी नवमेश शुक्र दशमात जास्त महत्त्वाचा ठरतो. शुक्र व गुरु प्रजापती यांचा त्रिकोण योग आहे तो महत्त्वाचा ठरतो. सप्तमेश रवी लाभस्थानात बुधाच्या युतीत आहे.

नवांशांत शुक्र दशमेश आहे. तेव्हा प्रथम शुक्र तो शनीच्या नक्षत्रात, शनी, केतू, मंगळ, बुधाच्या नक्षत्रात, गुरु प्रजापती शनीचे म्हणून शनी कायदा, न्याय देणारा. जातक कनिष्ठ श्रेणीचे न्यायाधीश म्हणून न्यायखात्यात आले व निवृत्त झाले ते जिल्हा न्यायाधीश म्हणून. नवांशात बुध, शुक्र, गुरु सिंहेत मंगळाच्या प्रतियोगात.

**(९) धनुचा मंगळ :** दशम स्थानात जेव्हा नऊ हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'धनुचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ धनेश व भाग्येश असून दशमात धनु राशीत मित्रक्षेत्री येतो. भाग्येश दशमात हाच संबंध राजयोगकारक असतो. व्यावसायिक प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत शुभ फलदायी ठरतो. असा जातक कर्तबगार व शक्तिमान असून आपल्या कर्तृत्वाने प्रसिद्ध पुरुष होतो. तो मोठ्या अधिकार पदावर जातो. जातक सर्व दृष्टींनी नशीबवान ठरतो. संपत्ती, स्थावर, वाहने यांची प्राप्ती होते. तो सुखी होतो. जातक सरळमार्गी असून न्याय्य मार्गाने पैसा मिळवितो.

जातक मुख्यत्वेकरून लष्करात फार मोठ्या हुद्द्यावर जातो. मंगळाची दशमातील उपस्थिती सेनापती पदास चांगली ठरते. जातक आपल्या डावपेचाने व अक्कलहुशारीने युद्धे जिंकतो. त्याची कसोटी रणांगणावर दिसून येते. निधडी छाती व धाडस असते पण जातक निष्ठुर असतो.

गुरु मंगळाचा सहयोग जबरदस्त राजयोगदर्शक असतो. या योगावर जातक धार्मिक प्रवृत्तीचा असून तो तीर्थयात्रा व परदेश प्रवास करतो.

मूळ पूर्वाषाढा व उत्तराषाढाचे पहिले चरण अशी नक्षत्रे धनु राशीत येतात. मूळ नक्षत्र हे उग्र गुणाचे नक्षत्र आहे. पण ते मंगळासारख्या ग्रहास योग्यच आहे. जातक साहसी, महत्त्वाकांक्षी व राजकीय उलाढाल्या करणारा होतो.

मेष, सिंह, धनु व वृश्चिक नवांश वैद्यकशास्त्र, शल्यशास्त्र, यंत्रशास्त्र व धातुशास्त्र यांच्या अभ्यासास चांगले ठरतात. जातक पोलीस खात्यात वा लष्करात पुढे येतो. तो संघटनाचतुर तसेच धाडसी असतो व मान्यता पावतो.

वृषभ, कर्क, कन्या नवांशी मंगळ शुभ फले देत नाही. मिथुन नवांशी शास्त्रीय व टेक्निकल (तंत्रविद्या) स्वरूपाचे अभ्यासास चांगला असतो. त्यात अधिकार योग येतो.


पूर्वाषाढा हे शुक्राचे नक्षत्र आहे. तेथे मंगळ काही कलात्मक कामगिरी दर्शवितो.

## कुंडली : पुरुष जातक

जन्म - दि. २४ फेब्रुवारी, १९११ रोजी सकाळी ७.४४ स्थानिक वेळ.

अक्षांश - २०° उत्तर २८', रेखांश - ८५° पूर्व ५४'.

अयनांश - २२° ३६'४७", सांपातिक समय - १७ ता. ५५ मि. ५६ से.




मीन लग्न तृतीयेश शुक्र लग्नी, शुक्र कलेचा कारक असून तो तृतीयेश आहे. म्हणजे हाताने कलाकुसर निर्माण करण्यात तो हुशार असतो.

मंगळ धनेश व भाग्येश आहे. ते व्यवसायातून उत्तम पैसा प्राप्त करून देणारा व यश देणारा आहे.

दशमेश गुरु तुळेत आहे व तो शनीच्या दृष्टीत आहे. शनी हा शिल्पकला दर्शवितो जातक लाकडातून शिल्पाकृती तयार करण्याचा व विक्रीचा व्यवसाय करत असे. त्यात तो यशस्वी व संपत्तिवान झाला.

**(१०) मकरेचा मंगळ** : जर दशम स्थानात जर दहा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मकरेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ लग्नेश व अष्टमेश असून दशमात मकर राशीत येतो. येथे त्यास दिग्बलाचे जोडीस राशिबलही प्राप्त होतो. या मंगळाची लग्नावर, चतुर्थावर व पंचमावर दृष्टी येते व त्या-त्या स्थानांची शुभ फले मिळतात. जातकास मात्या-पित्याचे सुख लाभते. अष्टमेश उच्च असल्याने त्यास दीर्घायुष्य लाभते. जातक भौतिकवादी असून शरीराने बळकट व सौष्ठ व युक्त, देखणा व सुस्वभावी असतो. तो श्रीमंत व सुखी असून आपल्या कर्तबगारीने यशस्वी होतो. तो विद्वान व संशोधक असून कोणत्या तरी ज्ञानशाखेत विशेष प्रावीण्य

मिळवतो. ती ज्ञानशाखा शनी-मंगळ यांच्या संबंधावरून आणि चतुर्थेश पंचमेश यांच्या संबंधावरून ठरते. जातकास वडिलोपार्जित मालमत्ता मिळते.

मकर राशीत उत्तराषाढा नक्षत्राचे २, ३, ४ चरण, श्रवण नक्षत्राचे चारही चरण व धनिष्ठाचे १ व २ चरण येतात. उत्तराषाढाच्या दुसऱ्या चरणात तो वर्गोत्तमबली तर चौथ्या चरणात मित्रक्षेत्री येतो. या दोन्ही स्थिती चांगल्या व शुभ असतात. वडिलोपार्जित मोठी मालमत्ता मिळते. जातकास पोलीस खाते, सैन्यदल, करसंकलन खाते वा अन्य प्रशासकीय खात्यात प्रवेश मिळतो व तो लवकरच अधिकार पदावर येतो. न्यायखात्यातही कनिष्ठ श्रेणीत सुरुवात होऊन उच्चपदास येतो.

रवी व गुरु यांचा मंगळाशी शुभसंबंध असता धडाडी व कर्तृत्व दाखविता येते व अधिकार प्राप्त होतो. रवीमुळे राजकीय क्षेत्रही कर्तबगारी दाखविण्यात मोकळे असते.

श्रवण नक्षत्र चंद्राचे आहे. चंद्र हा मंगळाचा मित्र असून तो चतुर्थेशही असतो. वडिलोपार्जित मालमत्तेत जातक स्वतःची भर घालतो. त्यास समाजात मानमान्यता मिळते. सामाजिक संस्थांशी संबंध येतो. पण जातक अहंकारी, तत्त्वनिष्ठ व स्पष्टवक्ता असतो. श्रवणाच्या पहिल्या चरणात तो स्वनवांशी असतो. द्वितीय चरणात वृषभ नवांशी येतो व बँकिंग क्षेत्राशी संबंध येतो. शुक्राशी शुभयोग असता वक्तृत्व प्रभावी असते व व्यवसायात चांगला लाभ मिळतो.

तिसरे चरणात मंगळ मिथुन नवांशी येतो. जातक चिकित्सक, टीकाखोर व विनोदी स्वभावाचा असतो. जातक यंत्रशास्त्रज्ञ वा स्थापत्यविशारद असतो. तंत्रकला अवगत असते. न्यायखात्याकडेही प्रावीण्य मिळते.

धनिष्ठा नक्षत्र हे मंगळाचेच नक्षत्र आहे व पहिल्या दोन चरणांत तो परमोच्चत्वात येतो. पहिले चरण सिंह नवांशाचे असते. त्यामुळे जातकाचा भाग्योदय होतो. जातक उत्तम गणिती, स्थापत्यशास्त्रज्ञ व रसायनशास्त्रज्ञ असतो.


गुरुचा मंगळाशी शुभयोग असता कॉमर्स, बँकिंग, ऑडिटिंग व्यवसाय तर बुधाच्या शुभसंबंधात असता शैक्षणिक क्षेत्र, वकिली व्यवसाय; शनीशी संबंध येत असता कायदेशास्त्र, न्यायालये या क्षेत्रात सल्लागार होतो.

## कुंडली : श्री. जी. एन. रजपूत

जन्म - शनिवार दि. ९ जानेवारी, १९३२ रोजी सोलापूर येथे दु. १ वा. ३० मि. प्र. वेळ.

अयनांश - २२° ५४' २८"

सांपातिक समय - २० ता. १० मि. १९ से.




लग्नेश मंगळ व दशमेश शनी यांची युती दशमात मकरेत व तेही वर्गोत्तम. धनेश सप्तमेश शुक्र भाग्येश गुरुचे दृष्टीत आहे. शुक्र-गुरु केंद्रात यामुळे उत्तम वक्तृत्व त्याचबरोबर बुध गुरुचे राशीत त्रिकोण गुरु १२३° बुध-शुक्र-गुरु यामुळे आलंकारिक भाषा व वक्तृत्व आहे. बुध, शनी व मंगळ यामुळे वकिली करतात. स्वतःची स्थावर व वाहन, नवांशात चंद्र-बुध युती मेष नवांशी.

B.A.LL.B. Advocate

तसेच चंद्र बुधामुळे अध्यापनाचाही व्यवसाय, कॉमर्स कॉलेजमध्ये मर्कंटाईल लॉ शिकवित होते. जातक उत्तम कायदेतज्ज्ञ आहेत.

**(११) कुंभेचा मंगळ :** दशम स्थानात अकरा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कुंभेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

दशमावर कुंभ रास असते आणि मंगळ सप्तमेश व व्ययेश होऊन दशमात शत्रुक्षेत्री येतो. बऱ्याच वेळा वृषभेचे सुरुवातीचे अंश लग्नी असता दशमावर मकरेचे शेवटचे दोन नवांश म्हणजे धनिष्ठा नक्षत्राचे पहिले व दुसरे चरण येतात. तशा स्थितीत धनिष्ठाचे चारही चरण दशमावर येतात. धनिष्ठा हे मंगळाचेच स्वतःचे नक्षत्र असल्याने तेथे असलेला मंगळ उत्तम फले देईल. पहिल्या दोन चरणात तर मंगळ परमोच्चांशाच्या जवळपास असतो. धनिष्ठाच्या तिसऱ्या व चौथ्या चरणावरसुद्धा मंगळ शुभफले देईल.

कायदातज्ज्ञ, वकिली व्यवसाय, न्यायखात्यात नोकरी हे व्यवसाय. बुधाशी संबंध असल्यास जातक लेखक, चिंतक आणि वक्ता असतो. बुध धनस्थानचा व पंचम स्थानचा अधिपती असल्याने बुधाने दर्शित व्यवसायांच्या माध्यमातून पैसा मिळतो. शिक्षण क्षेत्र अगर छापखाने वगैरेशी संबंध येतो. चौथ्या चरणात कुशाग्र बुद्धीचा जातक असतो व संशोधन कार्याकडे कल राहतो. पोलीस, लष्कर वा अंमलबजावणी खात्यात नोकरी होते

अथवा स्थापत्यशास्त्र, अभियांत्रिकी, धातुशास्त्र, रसायनशास्त्र, स्फोटक पदार्थांच्या कारखान्यात काम करतो तसेच वैद्यकशास्त्राशी संबंध येतो.

शततारका नक्षत्र राहूचे आहे. तेथे मंगळ असता स्फोटक पदार्थ, रसायने, औषधे, कीटकनाशके यांचे कारखाने दर्शविले जातात. तर एच. आर. शंकर या विद्वान ज्योतिषाच्या मताप्रमाणे हे नक्षत्र वैद्यकीय व्यवसाय दर्शविणारे नक्षत्र आहे.

वृषभ लग्नास शनी नवमेश व दशमेश असल्याने तो राजयोगकारक असतो. त्याच्याशी मंगळाचा संबंध असता जातक मोठ्या पदावर जातो.

कुंभ ही संशोधकांची रास आहे व ती प्रजापती (हर्षलच्या) अमलाखाली येते. प्रजापतीच्या शुभयोगात यंत्रे व मोठ्या अवजड यंत्रांचे कारखाने यांच्याशी संबंध येतो. जातक यंत्रशास्त्रज्ञ असतो. मेकॅनिकल इंजिनिअरिंग व ऑटोमोबाईल इंजिनिअरिंगचे व्यवसाय दर्शविले जातात.


जातकाचे भाग्य जन्मस्थानापासून दूरच्या ठिकाणी उदयास येते व जातकास व्यवसायानिमित्त प्रवास करावे लागतात. मंगळाच्या व्ययेशत्वामुळे जातकास संपत्ती मिळविण्यासाठी परिश्रम व दीर्घोद्योग करावे लागतात.

**कुंडली : श्री. वामन गणेश गाडगीळ**

जन्म - बुधवार दि. १९ सप्टेंबर, १८७७ रोजी पुणे येथे रात्री ११.३०.

(इ.घ. ४२ प. ४५) अक्षांश - १८° उत्तर ३०', रेखांश - ७३° पूर्व ५८'

अयनांश - २२° ९' ५६", सांपातिक समय - २२ ता. ५० मि. ५१ से.




जातकाचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले. महाविद्यालयीन शिक्षण गरिबीमुळे झाले नाही. जातकास दोन भाऊ होते ते लवकर मयत झाले. द्विभार्या योग झाला.

नोकरी रेल्वेखात्यात आपल्या अक्कलहुशारीने व परिश्रमाने चढत-चढत सुपरिंटेंडेंट रेल्वे बोर्डच्या पदापर्यंत चढले. पुढे त्यांना सरकारने सक्तीने सेवानिवृत्त केले. पुण्यास स्थायिक होऊन छान बंगला बांधला.

बुध १४ सप्टेंबरला वक्री झाला. तसेच शनी, मंगळ व वरुण हेही वक्री आहेत. पंचमेश बुध, नवमेश दशमेश, शनी व सप्तमेश, व्ययेश मंगळ हे ग्रह वक्री आहेत. बुध व मंगळ १७ व्या वर्षी मार्गी झाले. त्याच्या अगोदरपासून ते दोघे गतिहीन अवस्थेत होते. त्यामुळे त्यांची अशुभ फलेच मिळाली. उच्च शिक्षण लाभले नाही व उदरनिर्वाहासाठी कारकुनाची नोकरी रेल्वेमध्ये पत्करली. पण बुध मुळातच आपल्या मूलत्रिकोणात असल्याने बुद्धिमत्ता होती व त्याच्या जोरावर आपले काम चोखपणे लवकर करून इतरांच्याही कामात जातक मदत करीत. योगकारक शनी दशमात आहे. त्यामुळे हळूहळू वरचे पद जातकास मिळत गेले व सुपरिटेंडेंट ऑफ रेल्वे बोर्ड हे त्या काळातील (ब्रिटिश राजवटीतील) पद मिळाले.

सन १९२६ पूर्वी दिल्लीत कायदे कौन्सिले होती आणि हिंदुस्थानातील मोतीलाल नेहरू वगैरे सारखे त्यामध्ये होते. रेल्वेबद्दलची इत्यंभूत माहिती जातकास होती. ती माहिती सरकाराविरोधी सभासदांना जातकाने पुरविली. विरोधी लोकांना बारीकसारीक तपशील कसा कळतो याचा शोध घेण्याचा सरकारने प्रयत्न केल्यावर त्यांना जातकाचे नाव कळले आणि इंग्रज सरकारने त्यांना सक्तीने सेवानिवृत्त केले. फंड व पेन्शन दिली. फर्स्टक्लासचा पास कुटुंबीयांसाठी दिला. मुदतपूर्व निवृत्ती हे दशमस्थ शनीचे फल (एक प्रकारची अवनती) जातकास मिळाले.

शनी-मंगळ जोडी दशम बिंदूचे निकट आहे व त्याची पूर्ण फले जातकास मिळाली. शनि-मंगळ युतीचे एक फल भावंडांचा अकाली मृत्यू ते मिळाले. मंगळ सप्तमेश आहे. तो शनीचे युतीत. तसेच शनीची सप्तमावर दृष्टी आणि विवाहकारक शुक्राचा शनीबरोबर १३५° चा अशुभ योग. यांचा एकत्रित परिणाम म्हणजे पहिल्या पत्नीचे निधन झाले. तिच्यापासून दोन कन्या; त्यापैकी धाकटी कन्या बालवयात गेली.

दुसरा विवाह १९१२ च्या सुमारास झाला व त्यापासून ४ पुत्र व ४ कन्या झाल्या.

जातक स्वभावाने रागीट व कडक शिस्तीचे आणि उत्कृष्ट इंग्रजी भाषा बोलणारे होते. मुले धाकात असत.

मार्च १९६३ मध्ये हृदयक्रिया बंद पडून मृत्यू झाला. त्या वेळी शुक्राच्या महादशेत मंगळाची अंतर्दशा चालू होती.

**(१२) मीनेचा मंगळ :** दशम स्थानात बारा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मीनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

दशमावर मीन रास येते. मंगळ षष्ठेश व लाभेश असून दशमात मित्रक्षेत्री येतो. जातकाचे वरिष्ठांशी पटत नाही. व्यावसायिक जीवनात अडथळे येत राहतात. शैक्षणिक गुणवत्तेनुसार नोकरी मिळत नाही.

शिक्षणाचा व व्यवसायाचा संबंध येत नाही. जातक नोकऱ्या बदलत राहतो. त्याचा संबंध हॉस्पिटल्स, दवाखाने, औषधाची दुकाने अगर फिरते विक्रेते अशांसी येतो. बुध मंगळाचा शुभ संबंध असता कंपन्यांचे सेक्रेटरी, अकौंटंट वा तत्सम नोकरी मिळते. बुध दशमात असल्यास तो आपल्या नीच राशीत येतो. त्यामुळे त्याचा मंगळाशी दशम स्थानाशी संबंध सहयोग चांगला ठरत नाही. पण बुधाचा लाभयोग वा त्रिकोण योग अगर प्रतियोग चांगली फळे देतात. अशा योगावर जातकास उच्च शिक्षण लाभते. तो हुशार असतो आणि अनेक पदव्या मिळविण्याच्या प्रयत्नात असतो.

दशमेश गुरु बलहीन असता जातकास नोकरीवरून काढले जाते. मंगळ लाभेश असून दशमात असता समृद्धी होते. भागीदारी व्यवसायात फायदा होतो. त्यास निरनिराळ्या मार्गांनी पैसा मिळत राहतो. पैसे मिळवावयाच्या बाबतीत जातकास विधिनिषेध नसतो. अशुभ ग्रहांची दृष्टी असली तरीही जातक प्रबल व श्रीमंत असतो.

मिथुन लग्न उदित होत असता दशमावर सुरुवातीस कुंभ रास येते आणि मिथुन लग्न ७/८ अंशांच्या पुढे गेल्यास मीन रास दशमावर येऊ लागते. त्यामुळे पूर्वा भाद्रपदा हे गुरुचे नक्षत्र दशमावर असते. गुरुशी शुभयोग असता पूर्वा भाद्रपद नक्षत्रातील मंगळाचे अस्तित्व शुभ फलदायी असते. जातकाचा भाग्योदय विवाहानंतर सुरू होतो.

उत्तरा भाद्रपदा हे शनीचे नक्षत्र आहे व शनी भाग्येश असतो. शनी मंगळाचा शुभयोग होत असल्यास कायद्याशी संलग्न व्यवसाय असतो. सेक्रेटरी, आयकर, विक्री कर अशा तऱ्हेच्या खात्यात कायद्यांचा संबंध येतो. मोठ्या कंपन्या, सहकारी संस्था वा तत्सम संस्थांशी निगडित व्यवसायातून लाभ होतो. पोलीस वा तत्सम खात्यातही नोकरीची शक्यता असते.

रेवती नक्षत्र बुधाचे आहे. या नक्षत्रातील मंगळ, बुध वा गुरु यांच्या शुभयोगात असता भौतिकशास्त्र, अभियांत्रिकी वा अर्थशास्त्र, बँकिंग क्षेत्राशी संबंध येतो.

मंगळ वर्गोत्तम असता प्रतिकूल वातावरणात शिक्षण पूर्ण होते. द्रव पदार्थांचा व्यापार वा समुद्र, पाणी याशी संबंधित व्यवसायाशी जातकाचा संबंध येतो. उदा. पेट्रोल, पेट्रोकेमिकल्स वा मर्चन्ट नेव्ही.


दशमावर मीनेचे शेवटचे ८/१० अंश असता कर्क लग्न येते. अशा वेळी बराच फरक होतो.

## कुंडली : D. I. G. Police

जन्म - शनिवार दि. २४ फेब्रुवारी, १९५१ रोजी दुपारी १ वा. ५३ मि.

अक्षांश - ३०° उत्तर १९', रेखांश - ७६° पूर्व ४९'.

अयनांश - २३° १०' ३३", सांपातिक समय - २३ ता. ४३ मि. ५४ से.





अलग्नी प्रजापतीसारखा बुद्धिमान, चौकस, साहसी ग्रह आहे आणि तृतीयेश रवी नवमात आहे. रवी व प्रजापती यांत पूर्ण त्रिकोण योग आहे व गुरु रवीजवळ नवमात व त्याची दृष्टी लग्न व प्रजापतीवर आहे. दशमात मंगळ व दशमेश भाग्यात आहे. मंगळ षष्ठेश व लाभेश असा दशमात दिग्बली, मित्रक्षेत्री आणि पंचमेश शुक्राचे युतीत व भाग्येश शनीच्या प्रतियोगात आहे. धनेश चंद्रसुद्धा भाग्येश शनीच्या युतीत आहे. शनी व मंगळ या दोघांची लग्नावर व लग्नस्थ प्रजापतीवर दृष्टी आहे. मंगळाचा धाडसीपणा व पराक्रम यामुळे त्यास नोकरीच्या माध्यमातून आपली कर्तबगारी दर्शविण्यास संधी मिळाली. मंगळ दिग्बली, राशिबली व योगबली आहे व तो पोलीस, सैन्यदल यासारख्या ठिकाणी आपले कर्तृत्व दाखवू शकतो.

जातक सरकारी नोकरीत पोलीस खात्यात सामील झाला आणि आपल्या कर्तबगारीवर वर-वरच्या श्रेणी मिळवत D.I.G. झाला.

११

# एकादश भाव




सोबतच्या कुंडलीमध्ये ज्या ठिकाणी अकरा हा अंक लिहिलेला आहे. त्या स्थानाला कुंडलीतील किंवा पत्रिकेतील 'एकादश स्थान' असे म्हणतात.

या स्थानावरून लाभ, प्राप्ती, सिद्धी, मित्र, पराधीनता, वैभव, सार्वजनिक कार्य, सहकारी संस्था, कंपन्या, मंडळे, पत्नीच्या माहेरकडील कुटुंबीय आणि इच्छापूर्ती यांचा विचार केला जातो. सोईंकरिता व संक्षेपाने या स्थानास लाभस्थान असे संबोधले जाते.

जवळच्या नातेवाइकांपैकी जातकाचा मोठा भाऊ, बहिणी यांचा विचारही याच स्थानावरून होतो आणि मोठ्या भावंडांचा कारक ग्रह गुरु आहे. शरीरावयांपैकी डावा कान, पोटऱ्या, घोटे यांचा विचार होतो.

कुंडलीतील ३, ६, १० व ११ ही स्थाने उपचय स्थाने म्हणून गणली जातात. लग्नापासून चारही उपचय स्थानात शुभ ग्रह, चंद्र, बुध, शुक्र असता जातक चांगलाच धनाढ्य श्रीमंत असतो. तीन स्थानात शुभ ग्रह असता जातक सधन असतो. दोन स्थानात शुभ ग्रह असता जातक बऱ्यापैकी सधन असतो. शुभ ग्रह कमी श्रमात जास्त पैसा देतात.

पापग्रहसुद्धा या स्थानात पैसा लाभ देतात पण तो लाभ, श्रम जास्त व त्या मानाने पैसा कमी असा असतो. थोडक्यात, सर्वच ग्रह लाभस्थानात संपत्ती देतात.

मंगळाच्या बाबतीत एकादश स्थानाची फले रवीप्रमाणे घ्यावी असे सांगून रवीबद्दल वराहमिहीर 'लाभे प्रभूत धनवान्' असे सूत्ररूपाने सांगतात म्हणजे रवी (तसाच मंगळही) उत्तम लाभसंपत्ती देतो.

सारावलीमध्ये एकादश स्थानातील मंगळ कशापासून लाभ देतो ते सांगितले आहे ते असे -

**एकादशगे गुणवान् प्रियसुखभागी तथा भवेच्छूरः।**
**धनधान्यसुतैः सहितः क्षितितनये विगतशोकश्च ।।**

**अर्थ :** एकादशात मंगळ असता जातक शूर, सद्‌गुणी, धैर्यवान्, जिद्दी, धनधान्य यांनी समृद्ध असून त्यास दुःखे नसतात. त्यास संततीसुखही मिळते.

ज्याच्या एकादशात मंगळ असतो तो आपल्या नातेवाइकांचा रोष ओढवून घेतो. तो कोणासही भीत नाही. निर्भय असतो. शत्रूंचा पराभव करतो. पैसा मिळविण्यात प्रयत्नशील असतो. स्थावर, वाहने, संपत्ती यांची प्राप्ती होते. मित्रपरिवार मोठा असतो. जातक विद्वान असतो. त्यास अनेक स्त्रियांची अभिलाषा असते. त्यास पोटाचे विकार होतात. त्यास मोठा भाऊ नसतो. जातकास अग्नी व चोर यांच्यापासून त्रास होतो. गुरुशी व लाभेशाशी शुभ-संबंध असता मोठे भाऊ, बहीण असतात.

सारावलीतील वर दिलेला श्लोक ग्रहभावफलाध्यायामधील आहे. परंतु चौतिसावा अध्याय 'लोकयात्राध्याय' या शीर्षकाचा आहे. त्यामध्ये सर्वच भावाबद्दल काही विशेष योग दिले आहेत व त्यामध्ये एकादश भावातील फलांसंबंधी आणखी जादा विचार मांडले आहेत. त्यात मंगळासंबंधी पुढीलप्रमाणे विशेष विचार दिला आहे तो असा.

**हेमप्रवालभूषण माणिक्यं धनं कुजे भवेदेवम् ।**

**साहसगमनागमनैः पावकशस्त्रैश्च वक्तव्यम् ।।**

(मंगळ कोणत्या तऱ्हेने व कोणत्या प्रकारचे लाभ देईल व तो विविध लाभ कसा प्राप्त होईल, कोणत्या माध्यमातून, कशाचा जोरावर, आधारावर मिळेल हे सांगितले आहे.)

**अर्थ** : साहस, पराक्रम, प्रवास, अग्नी, शस्त्रास्त्रे यांच्याद्वारा पोवळे, माणिक वगैरे रत्ने, सोने व दागदागिने व संपत्ती मंगळ देईल असे जाणावे व सांगावे.

मंगळाचा गुण साहस व पराक्रम आहे. हे साहस आणि पराक्रम करताना बाहुबलाचा, हस्तकौशल्याचा, शस्त्रांचा वापर अनिवार्य आहे. दागिने तयार करताना, धातुकाम करताना, अग्नीचा वापर करावा लागतो. सोनारकाम, लोहारकाम करताना अग्नीचा वापर होतोच. पूर्वीच्या काळी प्रवास करणे हे साहसाचे, धाडसाचे काम असे (सिंदबादच्या सफरी). पोवळे मोतीसारख्या रत्नासाठी समुद्रात जाण्याचे साहस करावेच लागते. सोने मिळविण्यासाठीही साहस करावे लागते. दागिने तयार करताना हत्यारे वापरावी लागतात. अशा दृष्टिकोनातून विचार केला तर या श्लोकाचा अर्थ बरोबर लक्षात येतो. सोने आणणे, पोवळे-मोती वगैरे रत्ने मिळविणे, त्यांची विक्री करणे व त्यापासून धन मिळविणे. दागिने तयार करून विकणे व पैसा मिळविणे. हल्लीच्या परिस्थितीस अनुसरून सर्व तऱ्हेच्या हत्यारांचा वापर (मारण्यासाठी, कलाकुसरींसाठी, तारण्यासाठी) करावाच लागतो. शस्त्रक्रिया करताना हत्यारे आवश्यक आहेत. त्यांचा उपयोग करून सर्जन धन मिळवतो. याच तत्त्वांचा वापर करून मंगळ कशा तऱ्हेने धन मिळवेल हे जाणावे लागते.

दारूगोळ्यांचे कारखाने व शस्त्रास्त्रे तयार करणे, त्यांचा वापर करणे असाही धनप्राप्तीचा मार्ग असू शकतो. अशा कारखान्यातील कारागीरही मंगळाच्या अमलाखाली येतात. नोबेलने शस्त्रास्त्रांचा व्यापार करून चिक्कार पैसा मिळविला होता. तसेच बेसील झहरॉफ यांनी शस्त्रास्त्रे विक्रीचा व्यवसाय करून अलोट पैसा जमविला होता.

व्यापार उघडपणे करता येत नसेल तर चोरट्या मार्गाने, चोरून, तस्करी करूनसुद्धा धनप्राप्ती होते. त्यासाठी धाडस, साहस लागते आणि प्रवासही करावा लागतो.

लाभस्थानी शुभ ग्रहांची दृष्टी असता वरील फलांची वृद्धी होते. म्हणजे केवळ भावेशाची दृष्टी असता जेवढी प्राप्ती होईल त्यापेक्षा जास्त प्राप्ती होते आणि अशुभ ग्रहांची दृष्टी असता प्राप्तीचे मान कमी असते.

मंगळ या स्थानी उच्च असता वरील फले पूर्ण मिळतात. पण तो स्वगृही असता ७५ टक्के, मित्रक्षेत्री असता ५० टक्के व शत्रुक्षेत्री असता २५ टक्के प्राप्तीचे मान राहील आणि अस्तंगत असता त्याहीपेक्षा कमी प्राप्ती होते. नीचक्षेत्री असता ५ टक्क्यांपेक्षाही कमी फले मिळतील.

एकादश स्थानातील मंगळाची धनस्थानावर दृष्टी येते म्हणून वक्तृत्व व संपत्तीचा लाभ, पंचम स्थानावर दृष्टी म्हणून संततीचा लाभ, पण मंगळ दूषित असता गर्भपात वा अल्पायू संतती होते. षष्ठस्थानावर आठवी दृष्टी येते. त्यामुळे शत्रू नामोहरम करतो. त्यामुळे जातक सुखी असतो.

स्थावर व वाहने यांची प्राप्ती होते. जातक विद्वान व सुशिक्षित असतो. शत्रूवर विजय मिळवतो. दूषित असता जातकास चोरीमुळे अथवा आगीमुळे नुकसान होते. मोठा भाऊ अल्पायू होतो. पत्नीस गर्भपात होतो.

स्त्री-जातकास उत्तम धन मिळते. ती धार्मिक असते.

डॉ. बी. व्ही. रामन एकादशातील मंगळाबद्दल काही विशेष सांगतात. जातक उत्तम वक्ता असतो. तो जोरदार व ठासून बोलतो. तो हुशार व श्रीमंत असतो. परंतु त्यास विषयवासना जास्त असते. स्थावर मालमत्ता कमावतो आणि समाजातील उच्च वर्गात त्याचा चांगला प्रभाव असतो.

कारखान्यापासून, न्यायालयीन खटल्यापासून जमिनीच्या व्यवहारापासून संपत्ती लाभ होतो. भाड्याचे विपुल उत्पन्न आणि शिवाय स्वतःच्या परिश्रमाने पैसा मिळवतो.

पापग्रह एकादश स्थानात असता अनीतिमान व अयोग्य मार्गाने पैसा मिळवतो. त्यापाशी साधनशुचिता नसते. म्हणून चोरट्या मार्गाने, बेकायदेशीर, भल्याबुऱ्या मार्गाने पैसा मिळवतो. तसा पैसा मिळवणे हेच ध्येय असते.

## एकादश मंगळाची राशीनिहाय भावफले

**(१) मेषेचा मंगळ :** जर एकादश स्थानामध्ये एक हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मेषेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ षष्ठेश व लाभेश आहे आणि तो लाभस्थानी मेषेत स्वगृही (व मूलत्रिकोण राशीत) येतो. लाभेश लाभात असणे उत्तम फलदायी ठरते. जातकास स्थावर व वाहनांची प्राप्ती होते. भावंडांची मदत मिळते. परंतु संततीच्या बाबतीत तो सुखी नसतो. जातकास

यश मिळविण्यासाठी फारसे श्रम करावे लागत नाहीत. तो आपल्या व्यवहारात प्रामाणिक असतो. त्यामुळे ग्राहकांच्या सदिच्छा मिळतात. तो कर्तव्यदक्ष असतो. जातकाचा मोठा भाऊ चांगला प्रसिद्ध पुरुष असतो. रसायने, औषधे, जमिनी, लाकडाचा अड्डा, खाणी, धातू, खेळाचे सामान यांच्या व्यवहारातून लाभ होतो. जातकाचे मित्र व भाऊ यांचे उत्तम सहकार्य मिळते. जातक घर, संपत्ती, संतती आणि पत्नी या बाबतीत सुखी असतो.

चंद्र द्वितीयेश असल्याने त्याचे द्वितीयातील वास्तव्य अगर मंगळाशी सहयोग वा दृष्टी लाभदायक ठरते. गुरुची दृष्टी मंगळाच्या शुभ फलांची वृद्धी करणारी असते. बुध लाभात असणे चांगले ठरते. बुध, मंगळ योग सहयोग शिक्षण, वक्तृत्व या बाबतीत लाभदायी असतो. शुक्र वा शनीची दृष्टी लाभदायक ठरत नाही.

**कुंडली : श्री. रामनाथ पोतदार**


जन्म - शुक्रवार दि. २१ जानेवरी, १९१० रोजी नवलगढ येथे सायंकाळी ४ वा. ३० मि.

अक्षांश - २७° उत्तर ५१', रेखांश - ७५° पूर्व १८'

अयनांश - २२° ३५' ४९", सांपातिक समय - ० तास ० मि. ४३ से.

प्रसिद्ध उद्योगपती. बँक ऑफ जयपूरचे अध्यक्ष १९४९-५७

१९४३-५२ मुंबई महानगरपालिका सदस्य. १९४६-५२ आमदार, १९५२-५४ खासदार




लग्नेश बुध अष्टमात आहे. धनेश चंद्र व्ययात आहे. पण तो उच्च राशीस आहे. बुधाची धनस्थानावर पूर्ण दृष्टी आहे. शिवाय बुध व चंद्र यांचा अंधसाम्याने त्रिकोण असून दोघेही गुरुच्या दृष्टीत आहेत व त्याचे त्रिकोण योगात आहेत. लग्नेश, दशमेश व धनेश

यांचा हा महात्रिकोण आहे. त्यामुळे जातक उद्योगपती झाले. लाभेश मंगळाची धनभावावर व पंचम भावावर पूर्ण दृष्टी असून पंचमेश शुक्राशी लाभयोग आहे. यामुळे जातक उद्योग व्यवसायातून श्रीमंत झाला.

धनेश चंद्र वृषभ या अर्थ राशीत व बुध गुरुच्या शुभयोगात म्हणून बँकिंग व्यवसायात प्रमुख पद. भाग्येश शनी दशमात आहे. तो उच्च पदास नेतोच व नेले आहे. मंगळ-शुक्र लाभयोग, कापड उद्योगाशी संबंध आला. दोन्ही ठिकाणी जातक अध्यक्ष या महत्पदावर आला. पोतदार कुटुंबीयांचे अनेक व्यवसाय, व्यापार व उद्योगधंदे आहेत.

**(२) वृषभेचा मंगळ :** एकादश स्थानात जर दोन हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'वृषभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ पंचमेश व दशमेश असून एकादश स्थानात वृषभेत येतो. दशमेश लाभात असल्याने उद्योग-व्यवसायात उत्तम लाभ होतो. पंचमेशाची पंचमावर दृष्टी असल्याने संततीसुख उत्तम मिळते. जातक प्रत्येक बाबतीत नशीबवान असतो व तो अनेक प्रशंसनीय कार्यात रस घेतो. तो अनेकांना रोजगार उपलब्ध करून देतो. तो मोठा कारखानदार असतो. त्यास मित्र चांगले असतात आणि त्यास सुखे प्राप्त होतात. संतती, संपत्ती, स्थावर, वाहने, मान-सन्मान यांनी युक्त असतो.

गुरु भाग्येश असतो. त्याची मंगळावर दृष्टी व लग्नावर दृष्टी म्हणजे दुधात साखर पडणे असते. जातकाची प्रतिमा कधीच मलीन होत नाही. पंचमातून गुरुची दृष्टी, लग्न, लाभ व भाग्यस्थानावर येते.

चंद्र लग्नेश लाभात मंगळाच्या सहयोगात येतो. तेव्हा तो उच्च राशीत येतो. जातकाचे व्यक्तिमत्त्व देखणे, आकर्षक, पौरुषत्वाने भरलेले असते. जातक राजाच ठरतो.

शुक्र लाभेश व चतुर्थेश असतो. त्याचा मंगळाशी सहयोग वा शुभयोग झाल्यास जीवनात जे मिळवावयाचे असते ते सर्व मिळते. पत्नी सुंदर लाभते. गोड, गुणी व आज्ञाधारक संतती होते.

बुध तृतीयेश व व्ययेश असतो. त्याचा सहयोग चांगला ठरत नाही. शनी सप्तमेश तसा अष्टमेश असतो. त्याची दृष्टी वा सहयोग अशुभ ठरते.

## कुंडली : श्री. य. द. जोशी


जन्म - मंगळवार दि. २० मे, १९१९ रोजी सोलापूर येथे सकाळी १० वा. स्थानिक वेळ.

अक्षांश - १७° उत्तर ४०', रेखांश - ७५° पूर्व ५४'

अयनांश - २२° ४४' ९", सांपातिक समय - १ तास ४७ मि. १४ से.

M.A.LL.B वकील, सोशालिस्ट पार्टीचा कार्यकर्ता. वकिली चालली नाही.

पण ३३ व्या वर्षी लेबर ऑफिसर म्हणून गुलबर्गा येथील गिरणीत नोकरी. त्यानंतर टाटा कन्सलटन्सीमध्ये नोकरी त्यात पुढे आले.




कर्क लग्नाचा मंगळ राजयोगधारक, तो लाभात वृषभ राशीत, रवीच्या युतीत व लग्नेश चंद्राचे त्रिकोण योगात आहे.

शनी धनभावावजळ आहे. तो चलितात १४ व्या वर्षी सिंहेत आला व ३३ व्या वर्षी जन्म मंगळाचे केंद्रयोगात आला व रवी-मंगळ युतीस चालना मिळाली. धनस्थानातील शनी पैसा उत्तम जमवून देतो. शनी चलित गतीने जसजसा धनभाव बिंदूजवळ आला तसतशी जातकाची भरभराट होऊ लागली. चलित रवीही त्याच सुमारास दशमाच्या लाभभावात आला.

टाटांचे कामगार प्रश्नावरील खटले जातकाने समर्थपणे हाताळले. रवी-मंगळ युतीमुळे वक्तृत्व उत्तम. त्याचबरोबर बुधाचा द्वितीय भावाशी त्रिकोण योग आहे. उत्तम युक्तिवाद व जोरकस प्रतिपादन.

दि. १३/३/१९६० रोजी जातक इंग्लंडला रवाना झाला. त्या वेळी चलित रवीची जन्मस्थ शुक्राशी युती झाली.

जातकाने पुणे येथे मोठा बंगला बांधला आहे. जातक सध्या हयात नाही. संतती चांगली आहे.

**(३) मिथुनेचा मंगळ :** एकादश स्थानात जर तीन हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मिथुनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ भाग्येश व चतुर्थेश असा राजयोगकारक असून लाभस्थानात मिथुनेत येतो. जातक गर्भश्रीमंत असतो. मोठी स्थावर मालमत्ता, जमीनजुमला व उत्तम वाहने असतात. जातक स्वतः कर्तबगार व धनाढ्य होतो. त्याचे मित्र बलिष्ठ व वजनदार असतात. त्यास

उत्तम शिक्षण लाभते. जातक विद्वान असतो. आपल्या विद्वत्तेवर, अक्कल हुशारीवर आयुष्यात यशस्वी होतो. तो उदार असतो. स्थावर मालमत्तेच्या खरेदी-विक्री व बांधकामे अशा व्यवसायात यशस्वी होतो.

रवीची मंगळावर दृष्टी असता जातक धैर्यवान, विद्वान व संपत्तिवान असतो.

बुध धनेश व लाभेश असून लाभस्थानात मंगळाच्या युतीत अगर दृष्टिसंबंधात असता उत्तम लाभदायी ठरतो. जातकास उत्तम वक्तृत्व लाभते. वाङ्मयीन क्षेत्रातील धुरंधर मित्र असतात. जातक स्वतः लेखक असतो व त्याची गणित विषयातही गती असते. तो आपल्या वक्तृत्वावर उत्तम वकीलही होतो.

गुरुची दृष्टी मंगळावर असता जातक मोठ्या दर्जावर अधिकारी होतो आणि परराष्ट्र खात्यात मोठ्या अधिकारावर असतो व परदेशात आपल्या देशाची वकिली करतो.

शुक्र दशमेश असतो. त्याचा मंगळाशी शुभयोग लाभदायी असतो.


## कुंडली : श्री. मुरारजी गोकुळदास

जन्म - मंगळवार दि. २८ ऑक्टोबर, १८३४ रोजी मुंबई येथे पहाटे २ वा ३० मि. स्था. वेळ.

अक्षांश - १८° उत्तर ५४', रेखांश - ७२° पूर्व ५०'

अयनांश - २१° ३३' ३', सांपातिक समय - ४ तास ५२ मि. १ से.

महान उद्योगपती, कापड उद्योगात अग्रणी, कापडाच्या गिरण्या. मोरारजी मिल्सचे मालक.




भाग्येश मंगळ लाभात द्वितीयस्थ शनीच्या पूर्ण दृष्टीत. दशमेश शुक्र चतुर्थात. शुक्रावर शनीची व दशमस्थ गुरुची पूर्ण दृष्टी. दशमेश शुक्र कापड व्यवसाय दर्शवितो. मंगळ, शनी

परस्पर दृष्टियोग. शनी षष्ठेश आहे. तो हाताखालच्या कामगार वर्गाचा निदर्शक आहे. गुरुची शनीवर पूर्ण दृष्टी आहे. यामुळे मोठा व्यवसाय, त्यात समृद्धी व भरभराट. लग्नेश रवी तृतीयेत तुळेत. त्याचा चंद्राशी लाभयोग आहे. रवीचाही कल तूळ शुक्रदर्शक, स्वतंत्र उद्योग व कापड उद्योग मंगळ-शनीमुळे कारखानदारी.

**(४) कर्केचा मंगळ :** एकादश स्थानात जर चार हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कर्केचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

एकादशात कर्क रास असते. मंगळ या लग्नास तृतीयेश आणि अष्टमेश असतो व तो लाभस्थानात कर्क या नीच राशीत येतो. जातकास धाकटी भावंडे नसतात. पण थोरली भावंडेही अल्पायुषी ठरतात. मंगळाची पंचमावर दृष्टी येते. शेअर्स वगैरे गुंतवणुकीत नुकसान होते.

लाभेश चंद्र उच्चात नवम स्थानात येतो पण त्यामुळे मंगळाच्या नीचत्वाचा भंग होत नाही.

गुरुची तृतीय, पंचम वा सप्तमातून दृष्टी येत असता पत्नी चांगल्या घराण्यातील मिळते. ती सुस्वरूप असते. जातकास स्थावर, वाहन व संततीचे सुख मिळते. गुरुची लाभस्थानातील उपस्थिती नीचत्वाचा भंग करणारी ठरते आणि मोठ्या भावंडांच्या आयुष्यावर परिणाम होत नाही. कारण गुरु हा मोठ्या भावंडांचा कारक असून एकादशात उच्च राशीत येतो. तसे झाल्यास जातकास उत्तम स्थावर, सुविद्य पत्नी व कर्तबगार संतती प्राप्त होते.

गुरुची सप्तमातून दृष्टी, लग्न, तृतीय व एकादश स्थानावर पडते. जातक सुविद्य व विद्वान असतो.

दृष्टी मंगळावर असता जातक सामाजिक कार्यात रस घेतो. शुक्र धनेश व भाग्येश असतो.

पंचमेश शनीची दृष्टी लाभदायक ठरते. शनी द्वितीय भावात तूळ राशीत उच्च असतो व तेथून त्याची लाभ भावावर दृष्टी येते व त्यामुळे शेअर्स वगैरेचे व्यवहार लाभदायक ठरतात.


हर्षलचा प्रतियोग सट्टा, लॉटरी, रेसेस यामध्ये नुकसानकारक ठरतो. मंगळ अष्टमेशही असल्याने हा दृष्टियोग अपघातास कारणीभूत होईल.

### कुंडली : डॉ. श्री. ग. गोगटे

जन्म - गुरुवार दि. ४ मे १९१६ रोजी सोलापूर येथे दुपारी ४ वा. प्र. वेळ

अक्षांश - १७° उत्तर ४०', रेखांश - ७५° पूर्व ५४'

अयनांश - २२° ४१' २३", सांपातिक समय - ६ तास २० मि. ५४ से.



शिक्षण M.B.B.S. रोगनिदान उत्तम व अचूक. नेत्ररोगतज्ज्ञ. तृतीयेश मंगळ त्रिकोण गुरु. यामुळे वैद्यकीय शिक्षण व व्यवसाय. षष्ठेश शनी दशमात, व्ययेश (अष्टमस्थ) रवीचे लाभयोगात याची त्यास जोड आहे. गुरु व हर्षल लाभयोग. यामुळे अचूक व उत्तम रोग निदान.

लाभस्थानात मंगळ नीचांशाच्या निकट आहे. धाकटी भावंडे नाहीत. दोन मोठे भाऊ व एक बहीण अल्पायुषी. सर्वांत मोठे भाऊ १९४३ मध्ये वारले. दि. ४ मे, १९६३ रोजी रात्री गाडी उभी असता शेजारच्या डब्यातून मित्राची आई ओरडली असे ऐकल्याने मित्र व जातक उतरले पण गाडी स्टेशनवर नसता पुलावर थांबली होती. त्यामुळे हे दोघे उतरले ते थेट खोल खड्ड्यात पडले. हात-पाय फ्रॅक्चर. ते व्यंग राहिले. मंगळ प्रतियोग हर्षल व दोघांचा अष्टमस्थ रवीशी केंद्रयोग हे अपघाताचे कारण. जातकास दोन मुलगे, दोन मुली. सर्व सुस्थितीत आहे. ८० वर्षांचे पूर्ण आयुष्य लाभले. चतुर्थेश गुरु सप्तमात स्वगृही यांच्या वडिलांनी फार मोठी स्थावर मागे ठेवली होती.

**(५) सिंहेचा मंगळ :** एकादश स्थानात जर पाच हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'सिंहेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

एकादश स्थानी सिंह रास असते. मंगळ सप्तमेश व धनेश असून लाभस्थानी मित्रक्षेत्री येतो. धनेश लाभात हाच उत्तम संपत्तिदायक योग ठरतो. जातकास विवाहापासून आणि त्यामुळे येणाऱ्या संबंधामुळे फायदा होतो. मंगळाची धनस्थानावर (स्वक्षेत्रावर) दृष्टी येते व जातकास मित्र परिवार व उच्चपदस्थ लोकांकडून फायदा मिळतो. जातकास सावकारी, फायनान्स, बँकिंग अशा व्यवसायातून संपत्ती प्राप्त होते अथवा खानावळी, मोठी रेस्टॉरंटस्, केटरिंग अशा व्यवसायातूनसुद्धा फायदा होऊ शकतो. सिंह या थिॲट्रिकल राशीत मंगळ येतो. त्यामुळे नाट्यकलेशी संबंध येतो.

सिंहेतील मंगळास रवीचा सहयोग मिळाल्यास विशेष धनप्राप्ती होते. रवी द्वितीयेत असल्यास रवी-मंगळ अन्योन्य संबंध प्रस्थापित होतो व संपत्ती लाभ उत्तम होतो. परंतु दोन्ही ठिकाणी हृदयविकाराची शक्यता असते तसचे पाठीची वा पृष्ठवंशरज्जू मणके यांची दुखणी उद्‌भवतात.

योगकारक शनीची दृष्टी चांगली असते. दशमेश चंद्र व मंगळ यांची युती वा दृष्टियोग लक्ष्मीदायक असते.

शुक्राची दृष्टी कामवासना उत्तेजित करणारी असते व जातक अनैतिक संबंधाकडे वळण्याची शक्यता असते. पण त्रिकोण वा लाभयोग शुभ परिणामी ठरतो.

भावार्थ रत्नाकरमध्ये तूळ लग्नाच्या विचारात मंगळास बरेच महत्त्व दिले आहे. दोन व सात या मारक स्थानाचा अधिपती असूनसुद्धा तो निर्धन करणारा नसतो. रवी, शनी व बुध या तिघांचा मंगळाशी संबंध भाग्य देणारा ठरतो. तसेच रवी, शनी, बुध यांचा चंद्र अगर मंगळाशी योग राजयोग देणारा ठरतो. त्याचे कारण स्पष्ट आहे. रवी लाभेश, चंद्र दशमेश, बुध भाग्येश, शनी चतुर्थेश व पंचमेश आणि मंगळ सप्तम केंद्र व धनस्थानाचा अधिपती यांचे परस्परसंबंध राजयोग देणारेच ठरतात.


या परिस्थितीत खालील कुंडली विचारार्ह ठरते.

**कुंडली : श्री. वसंतदादा पाटील**

जन्म - बुधवार दि. १४ नोव्हेंबर, १९१७ रोजी पद्‌माळे जिल्हा सांगली येथे पहाटे ५ वा. ३० मि.

अक्षांश - १६° उत्तर ५२', उत्तर रेखांश - ७४° पूर्व. ३४

अयनांश - २२° ४२' ५५", सांपातिक समय - ८ ता. २८ मि. ४५ से.



१९५२-५७ : आमदार, १९७२-७७ : आमदार
१९७२-७६ : मंत्री १९७७-७८ : मुख्यमंत्री
१९७८-७९ : विधान परिषदेत, १९८७ : खासदार, १९८५ : राज्यपाल
सांगली येथे साखर कारखाना काढला.

धनेश मंगळ लाभात त्रिकोण लग्नेश शुक्र (तृतीयेत) बुधावर दृष्टी, दशमात शनी कर्केत, दशमेश चंद्र लग्नी. चंद्र केंद्रयोग शनी. लाभेश रवी तुळेत केंद्रयोग प्रजापती (हर्षल).

राजकारणाचे ग्रह केंद्रात आहेत. दशमेश चंद्र लाभेश रवी - दोघे लग्नात. शनी कालपुरुषाच्या दशम राशीचा अधिपती दशमात. रवी-चंद्र युती.

रवीच्या क्षेत्रात मंगळ, मंगळाची भाग्येश बुधावर दृष्टी तसेच चंद्राच्या क्षेत्रात शनी, चंद्र-मंगळ लाभयोग.

भावार्थ रत्नाकरप्रमाणे रवी, शनी, बुध यांचा मंगळ व चंद्राशी संबंध प्रस्थापित दिसतोच. यामुळे राजयोग उत्तम झाला. आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री व शेवटी राज्यपाल अशी राजयोगाची चढती कमान १९५२ ते १९८५ - ३३ वर्षे अस्तित्वात आली.

शिवाय साखर कारखान्याचे संस्थापक हेही मोठे कार्य.

**(६) कन्येचा मंगळ :** एकादश स्थानात जर सहा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कन्येचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

लाभस्थानी कन्या रास असते व मंगळ लग्नेश व षष्ठेश आहे. तो बुधाच्या राशीत शत्रुक्षेत्री येतो. जातकास भाऊ-बहिणी असतात. मंगळाची द्वितीय, पंचम व षष्ठ या तीन स्थानावर दृष्टी येते. येथे मंगळ षष्ठेश असून आजारदर्शक कन्या राशीत आहे. मंगळामुळे वृश्चिक व कन्या राशींशी निकटसंबंध येतो. कन्या, वृश्चिक, राशींचा संबंध वैद्यकीय व्यवसायाशी येतो व त्या माध्यमातून धनलाभ होतो.

प्रास्ताविकात लिहिल्याप्रमाणे शस्त्रांशी-शस्त्रक्रियेशी संबंध येतो व जातक सर्जनही असू शकतो.

मंगळ षष्ठेशही असल्याने जातकास स्वतः शस्त्रक्रियेस तोंड द्यावे लागते.

पंचमावरील दृष्टीमुळे संततीसुखास बाधा येऊ शकते. धनेश गुरु पंचमेशही असतो. त्याची दृष्टी वा शुभयोग धनवृद्धी करील. रवीचा सहयोग वा दृष्टियोग उद्योग-व्यवसायास चांगला ठरेल. रवी दशमेश असतो. त्यामुळे उद्योग-व्यवसायात प्रगती असते.


चंद्र भाग्येश असतो. त्याचा सहयोग लाभस्थानात लक्ष्मीदायक ठरतो.

### कुंडली : डॉ. श्रीरंग

जन्म - बुधवार दि. २० मार्च, १९३५ रोजी सोलापूर येथे रात्री ११ वा. ४३ मि.

अक्षांश - १७° उत्तर ४२', रेखांश - ७५° पूर्व ५४'

अयनांश - २२° ५७' २३", सांपातिक समय - ११ तास ६ मि. ३२ से.




लहानपणी उंचावरून पडला व हात फ्रॅक्चर झाला. तो दुरुस्त झाला. टॉन्सिलची शस्त्रक्रिया व नाकातील हाड वाढल्याने त्यावर शस्त्रक्रिया.

ग्रँट मेडिकल कॉलेजातून M. B. B. S. पुढील शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये गेला व आर्थोपीडिक सर्जन झाला.

दशमेश रवी मीन राशीत असून गुरुची वृश्चिकेतून पूर्ण दृष्टी आहे. लग्नेश मंगळ व भाग्येश चंद्र कन्या राशीत, कन्या-वृश्चिक-मीन या राशींतून लग्नेश, दशमेश व धनेश यांचे योग. त्यामुळे वैद्यकीय व्यवसाय.

जातकास लहान मोठे भाऊ-बहिणी आहेत. जातक अमेरिकेत १९७४ पासून आहे. लग्नेशाची धनस्थानावर व दशमेशावर पूर्ण दृष्टी. यामुळे व्यवसायात प्रगती चांगली. तेथे स्वतःची स्थावर केली. वाहनही आहे.

संतती : एक कन्या व एक पुत्र ८/२/१९९७ रोजी पुत्राचा आकस्मिक मृत्यू. कन्या नाट्यकलेमध्ये प्रवीण आहे. जातक स्वतः शाळा व कॉलेजमध्ये नाटकात काम करीत होता.

**(७) तुळेचा मंगळ :** एकादश स्थानात जर सात हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'तुळेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

एकादश स्थानी तूळ रास येते आणि मंगळ पंचमेश व व्ययेश असून तूळ राशीत येतो. जातकास स्त्रियांमार्फत अगर स्त्रियांना लागणाऱ्या वस्तूंच्या संबंधातील व्यवसाय केल्याने लाभ होतो. जातकास पुत्रसंतती होते. जातकाचे अन्य स्त्रियांशी गुप्त संबंध असण्याची शक्यता असते. मंगळाची षष्ठस्थानावर दृष्टी घशाचे विकार दर्शविते. येथील मंगळाची द्वितीय व पंचम स्थानावर दृष्टी असते व तो स्वतः लाभस्थानात असतो. तीन धनस्थाने मंगळाचे प्रभावाखाली येतात. अष्टमेश चंद्राचा सहयोग, दृष्टियोग लाभल्यास चारही

धनस्थाने मंगळाचे प्रभावाखाली येतात. पैसा भरपूर मिळतो पण तसाच लक्झरीसाठी खर्च केला जातो.


### कुंडली : सौ. वासंती

जन्म - शनिवार दि. १४ जानेवारी, १९३९ रोजी हुबळी येथे सकाळी ६ वा. प्र. वेळ.

अक्षांश - १६° उत्तर ५१', रेखांश - ७४° पूर्व ५०.

अयनांश - २३° ००' ३३", सांपातिक समय - १२ तास ५९ मि. ९ से.

येथे लाभेश व व्ययेश यांचा अन्योन्यक्षेत्र योग आहे.




मंगळ व चंद्र यांची युती लाभस्थानी प्रजापती (हर्षल) च्या प्रतियोगात आहे. चंद्र-मंगळ लाभातील युतीच लक्ष्मीदायक ठरते. ही युती गुरूचे दृष्टीत आहे. मंगळाची द्वितीय स्थानावर दृष्टी आहे आणि चंद्र मंगळ-युतीमुळे मंगळाच्या प्रभावाखाली धन, पंचम, अष्टम तसेच लाभस्थान आले आहे. हा मोठा धनयोग आहे. सप्तमेश बुध लग्नी आहे व त्याच्या लाभात ही युती आहे. म्हणजे पतीचे भाग्य व धन यांची प्राप्ती आहे. चंद्र सप्तमाचा धनेश लाभस्थानात आहे म्हणजे विवाहानंतर पतीचे भाग्य उघडले. पतीने उत्तम पैसा मिळविला आहे. स्वतंत्र फ्लॅट आहे व त्याचे नूतनीकरण केले. त्यासाठी मोठा खर्च झाला. जातकाच्या कुंडलीतील धनयोग पतीस धन उपलब्ध करण्यास मदत करता झाला. पतीचे मिथुन लग्न असून भाग्यात रवी गुरुदृष्ट आहे. दोन पुत्र मिळविते आहेत.

**(८) वृश्चिकेचा मंगळ :** एकादश स्थानात जर आठ हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'वृश्चिकेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ चतुर्थेश व लाभेश असून लाभस्थानी वृश्चिकेत स्वगृही येतो. जातकास उच्च शिक्षण लाभते. त्यास स्थावर, जमीनजुमला, घरे असतात. संपत्ती चांगली मिळते.

राजयोगकारक शुक्राचा शुभयोग असता उत्तम लाभ होतो. गुरुची पंचमातून सप्तमातून दृष्टी असता जातक नशीबवान असतो. भावंडांकडूनही लाभ होतो.


### कुंडली : श्रीमती शोभना समर्थ

जन्म - शुक्रवार दि. १७ नोव्हेंबर, १९१६ रोजी मुंबई येथे दुपारी १२ वा. १० मि.

अक्षांश - १८° उत्तर ५४', रेखांश - ७३° पूर्व ५०.

अयनांश - २२° ४२' ३", सांपातिक समय - १५ ता १५ मि. २० से.

चित्रपटसृष्टीतील जुन्या काळातील अत्यंत लोकप्रिय अभिनेत्री. सौंदर्यसम्राज्ञी. राम-राज्यमधील सीता, रसिकमान्य व अजरामर. दोन मुली त्याही अभिनयसंपन्न.




शुक्र भाग्यात, बुध दशमात. दोघांचा अन्योन्यक्षेत्र संबंध आहे. शुक्राचा लग्नस्थ हर्षलशी त्रिकोण व सप्तमस्थ चंद्राशी लाभयोग. चंद्राची स्वगृहातून लग्नावर दृष्टी. दशमेश शुक्र भाग्यात बुधाच्या परिवर्तन योगात व शुक्र-हर्षल त्रिकोण. यामुळे अभिनय-संपन्नता व सौंदर्य लाभले. चंद्र सप्तमात. त्यामुळे लोकप्रियता लाभली. चतुर्थेश व लाभेश मंगळ लाभात, त्रिकोण मंगळ लाभयोग. शुक्र व प्रजापती (हर्षल) शुक्र पंचमेश दोन कन्या. मंगळाचे चंद्र, शुक्र प्रजापतीशी असलेल्या शुभयोगामुळे, स्थावर, संपत्तियुक्त.

**(९) धनुचा मंगळ** : एकादश स्थानात जर नऊ हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'धनुचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


मंगळ तृतीयेश व दशमेश असून लाभस्थानी धनु राशीत मित्रक्षेत्री येतो. जातक स्वतःच्या परिश्रमाने पराक्रमाने व प्रवासातून चांगला पैसा मिळवितो. तो रसायनशास्त्र, स्थापत्यशास्त्र अगर सैन्यदल यांतून नावारूपास येतो. तो उत्तम सर्जनही होऊ शकतो. लेखन, प्रकाशन या माध्यमातूनही लाभ होऊ शकतो. गुरु व शुक्र शुभ असता अनेक तऱ्हेने लाभ होतात व मानमान्यता मिळते.

## कुंडली : बाबुभाई पटेल

जन्म - गुरुवार दि. ९ फेब्रुवारी, १९११ रोजी नडियाद येथे सकाळी ८ वा. ३० मि. प्र. वेळ

अक्षांश - २२° उत्तर ४१', रेखांश - ७२° पूर्व ४८'.

अयनांश - २२° ३६' ४५", सांपातिक समय - १७ तास ४ मि. ४४ से.




गुजरातचे राजकारणी, मुंबई राज्याचे आमदार १९३७ व १९४६. सन १९५२-५७ व १९६७-७१ विविध मंत्रिपदे. सन १९७५-७६ वा १९७७-८० मुख्यमंत्री. उपकुलगुरू, अनेक सन्माननीय पदे.

लग्नेश शनी द्वितीयेत मेष राशीत त्रिकोण दशमेश व तृतीयेश मंगळ. चतुर्थात चंद्र उच्च राशीत त्याचा रवीशी त्रिकोण योग. यामुळे राजकारणात प्रवेश व विविध पदे मिळाली. भाग्येश शुक्र लग्नी लाभयोग, दशमेश मंगळ, लाभेश व धनेश गुरु भाग्यशाली आहे.

बुध युती प्रजापती दोघेही लग्नेश शनीच्या दृष्टीत आहेत. शनी महादशेत बुध भुक्तीमध्ये मंत्रिपदे मिळाली. बुधाच्या महादशेत मुख्यमंत्री झाले आणि उपकुलगुरू झाले.

**(१०) मकरेचा मंगळ :** एकादश स्थानात जर दहा हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'मकरेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ धनेश व भाग्येश असून लाभस्थानी मकर या उच्च राशीत येतो. धनेश लाभात उच्च हाच उत्तम संपत्तिदायक योग असतो. गुरुची तृतीय व सप्तमातून दृष्टी चांगली फलदायी ठरते. पंचमातूनही गुरुची दृष्टी मंगळावर, लग्नावर व भाग्यस्थानावर येते. तिही चांगली ठरते.

बुधाची दृष्टी वा सहयोग चांगला ठरेल पण बुध मंगळ युतीमुळे द्विभार्या योगाची शक्यता असते. शुक्र या लग्नास तृतीयेश व अष्टमेश असतो. त्याचा सहयोग अनिष्ट असतो.

पंचमेश चंद्राची दृष्टी लाभदायक ठरते. चंद्र पंचमात असता चंद्रापासून मंगळ राजयोगदर्शक असून उच्च असल्याने पत्नीमुळे वा पत्नीपासून लाभ दर्शवितो.


### कुंडली : हरिभाऊ पाटसकर

जन्म - सोमवार दि. १६ मे, १८९२ रोजी चाळीसगाव येथे पहाटे २ वाजता.

अक्षांश - २०° उत्तर २८', रेखांश - ७५° पूर्व १'.

अयनांश - २२° २१' १४", सांपातिक समय - १८ तास ३६ मि. १० से.

जन्मकाळी शुक्राची महादशा भोग वर्षे १३ म. १ दि २४.




१९२७ : B.A.LL.B. LL.D. वकिली.

१९३७ : मुंबईचे आमदार आणि १९४५ : घटना समितीचे सदस्य होते.

१९५२ : खासदार. १९५४-५७ : मंत्री, १९५७-६५ राज्यपाल आणि १९६७ : पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू. उत्तम राजकारणी. अनेक पदे भूषविली व उत्कृष्ट काम केले.

भाग्येश मंगळ लाभात उच्च, पंचमेश चंद्र दशमात व लग्नकेंद्री गुरु. येथे उत्तम गजकेसरी योग झाला आहे. जातक विनम्र स्वाभावाचा व उदार असतो. मंत्रिपदे, राज्यपाल पद व उपकुलगुरू पद अशी मोठी पदे मिळाली आणि 'पद्मविभूषण' हा किताबही त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल १९६३ साली मिळाला. शिवाय गुरु लग्नकेंद्री स्वगृही आहे. पंचमहापुरुष योगापैकी हंसयोग हा महापुरुष योग झाला आहे. असा जातक शुद्ध मनाचा व शुद्ध

चारित्र्याचा असतो. भाग्येश मंगळ उच्च असल्याने त्याने अनेक तऱ्हेचे लाभ, मानसन्मान प्राप्त करून दिले. जातक जनतेच्या आदरास पात्र ठरले होते. गुरुची महादशा १९४६ पासून सुरू झाली व तेव्हापासून यांची चढती कमानच होती. घटना समिती सदस्य. खासदार-मंत्री-राज्यपाल-पद्मविभूषण- उपकुलगुरू पद.

**(११) कुंभेचा मंगळ :** एकादश स्थानात जर अकरा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कुंभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ लग्नेश व अष्टमेश असून लाभस्थानात कुंभ राशीत शत्रुक्षेत्री असतो. लाभस्थान थोरल्या भावंडांचे तसेच मित्रांचेही निदर्शक आहे. जवळचा मित्र अगर मोठा भाऊ संकटात येतो. त्याच्याबरोबरचे संबंध बिघडतात असा मोठा भाऊ वा त्याची पत्नी यांच्यापासून जातकास त्रास होतो. मोठा भाऊ भल्याबुऱ्या मार्गाने जात असतो. त्याच्यामुळे जातक अडचणीत येतो. व्यवसायात नुकसान होते व कर्ज काढावे लागते. शुभ ग्रहांची दृष्टी असता अडचणी फारशा कमी होत नाहीत पण मित्रांची मदत मिळते. शनीचा स्वगृही वास वा सहवास अगर त्याची दृष्टी यामुळेच व्यवसायात, उद्योगधंद्यात प्राप्तीचे मान वाढते एवढे शुभ फल मिळेल. पण जातकास अनेक आघाड्यांवर त्रास सोसावा लागतो. कौटुंबिक संबंध चांगले राहत नाहीत.

पंचमेश रवीची दृष्टी असता चांगली फले मिळतील. संतती व संपत्तीचा लाभ होईल. भाग्येश गुरुची दृष्टी उन्नतिकारक व लाभदायक ठरेल. चंद्राची मंगळाशी युती मातृसुखास घातक ठरते. कारण चंद्र व मंगळ दोघेही चतुर्थाचे अष्टमात असतात.

शुक्राची दृष्टी वा युती संपत्तीचा लाभ करून देईल. बुधाचा सहयोग अनिष्टदायक ठरतो. पण शुभयोग उत्तम असतो.

प्रजापतीचा मंगळाशी शुभयोग उत्तम फलदायी ठरेल. मोठ्या कारखान्याशी संबंध येईल. वरुण (नेपच्यून) ग्रहाची मंगळाशी युती चांगली नाही. त्या युतीशी शुभ ग्रहाची दृष्टी असता युतीपासून फायदा होईल. तसे नसल्यास जातकाची मोठी फसवणूक होईल अगर पैशाचे व्यवहारात घोटाळा उत्पन्न होईल.

राहू लाभस्थानात चांगला असतो. राहू-मंगळ सहयोग शुभ परिणामी ठरेल. फक्त संपत्ती लाभाच्या दृष्टीने अयोग्य मार्गाने पण साहसाने लाभ होण्यास ही युती चांगली ठरेल. येथे साधनशुचिता नसतेच.


## कुंडली : ग. ल. ठोकळ

जन्म - बुधवार दि. २६ मे, १९०९ रोजी कवठे (नेवासे तालुका) येथे पहाटे ४.३० प्र. वेळ.

अक्षांश - १९° उत्तर ३२', रेखांश - ७४° पूर्व ५७'.


अयनांश - २२° ३५' १५", सांपातिक समय - २० तास ११ मि. २० से.

मराठीतील सुप्रसिद्ध साहित्यिक सन १९३८ ते १९६६ दरम्यान १४ पुस्तके, कादंबऱ्या, लघुकथासंग्रह प्रकाशित झाल्या व लोकप्रिय ठरल्या.




लग्नेश मंगळ लाभात कुंभेत आहे. तृतीय स्थानात बुध मिथुनेत स्वगृही आहे. बुध मंगळ यांचा तीन व अकरा या स्थानातून त्रिकोण योग आहे. पंचमात भाग्येश गुरु असून त्याची मंगळावर दृष्टी व बुधाशी लाभलोग आहे. मिथुनेतील बुध वाङ्मय क्षेत्रात कामगिरी येतो. शिवाय तो तृतीयेत आहे.

## नवमांश कुंडली



दशमात शुक्र मिथुनेत, त्रिकोण बुध तुळेत. बुध व शुक्र एकमेकाच्या नवांशांत आहेत. मंगळ तृतीयेश असून चतुर्थात आहे. मंगळाचा बुधाशी लाभयोग व शुक्राशी परस्पर दृष्टियोग. शुक्र ललितकला मिथुन नवांश-वाङ्मय गुरु लाभस्थानी उच्च नवांशी आहे.

**(१२) मीनेचा मंगळ :** एकादश स्थानात जर बारा हा अंक असेल तेव्हा तेथील मंगळाला 'मीनेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ सप्तमेश व व्ययेश असून लाभस्थानात मीन राशीत मित्रक्षेत्री येतो. येथील मंगळ उत्तम धनप्राप्ती देईल. उद्योगधंद्यातील भागीदारीमुळे लाभ होतो. रवीची दृष्टी असता जातक विद्वान व संपत्तिमान होतो. गुरुची दृष्टीसुद्धा अनेक मार्गांनी धनलाभ देणारी ठरते. गुरु अष्टम व लाभ या दोन धनस्थानांचा अधिपती असल्याने त्याची स्वगृहावरील दृष्टी संपत्तिदायक ठरते. गुरुची सप्तम व भाग्यस्थानावरही दृष्टी असते.

धनेश व पंचमेश बुध असल्याने बुधाचा सहयोग वा शुभयोग असता जातक लेखन कुशल, गोड बोलणारा व गणितज्ञ असतो व पैसे चांगले मिळवितो. शनी योगकारक असल्याने त्याचा सहयोग व दृष्टियोग शुभच ठरतो. शुक्राचा मंगळाशी सहयोग उत्तम फलदायी असतो. कारण मीन राशीत तो उच्च असतो. लग्नेश लाभात उच्च असणे ही स्थिती अनेक दृष्टींनी चांगली ठरते. पण पंचमात तो नीच राशीत येतो. तेथून त्याचा मंगळाशी प्रतियोग होतो. तो चांगला नाही. त्यामुळे द्विभार्या योग संभवतो.

## कुंडली : श्री. हेमंत

जन्म - बुधवार दि. २६ जानेवारी, १९७२ रोजी पुणे येथे दुपारी २ वाजता.


अक्षांश - १८° उत्तर ३०', रेखांश - ७३° पूर्व ५८'.

अयनांश - २३° २८' १६".

सांपातिक समय - २१ तास ५६ मि. ५२ से.


तृतीयेश लग्नी उच्च राशीत व चतुर्थेश रवी भाग्यस्थानी, पंचमातील प्रजापतीशी लहानसा शुभयोग करतो. लग्नेश शुक्र दशमात व दशमेश लग्नी. उत्तम विद्या प्राप्त झाली आहे. शाळा-कॉलेजात शिष्यवृत्त्या व बक्षिसे मिळविली आहेत. M. Tech. व M. E. मध्ये सुवर्ण पदके मिळविली असून अत्युच्च शिक्षणासाठी जातक अमेरिकेत आहे. अमेरिकेत एका संशोधन केंद्रात वरिष्ठ संशोधक इंजिनिअर म्हणून उत्तम पगारावर नोकरी व संशोधन आहे.

चंद्र मंगळ लाभयोग आहे. लाभेश गुरु धनु राशीत चतुर्थ बिंदूशी पूर्ण त्रिकोण योग करतो. गुरु महादशा सुरू झाली असता. तो नावारूपास आला.



१२

# द्वादश भाव




सोबतच्या कुंडलीमध्ये ज्या ठिकाणी बारा हा अंक लिहिलेला आहे. त्या स्थानाला कुंडलीतील किंवा पत्रिकेतील 'द्वादश स्थान' असे म्हणतात.

बाराव्या स्थानावरून सर्व प्रकारचा व्यय-खर्च ऱ्हास, अवनती, गुप्त शत्रू, दुष्कीर्ती, शयनसुख, झोप-निद्रा, रुग्णालये आणि रुग्णालय निवास कारागृह निवास, व्यंग-अपंगत्व यांचा विचार केला जातो. तसेच हे मोक्षस्थान आहे. चार, आठ, बारा ही स्थाने अध्यात्म त्रिकोणाची स्थाने आहेत. या त्रिकोणातून अध्यात्म विकासाचा विचार केला जातो. साधनेसाठी एकांतात राहणारे सत्पुरुष जगापासून दूर राहतात. अज्ञातवासात जाणारे Exhiles हेही यावरून पाहिले जातात. तसेच आईचे परदेशगमन, काका, आत्या, ज्येष्ठ भावाचे धन इ. गोष्टी पाहतात.

शरीरावयंपैकी पावले व डावा डोळा यांचा विचार होतो. म्हणून पंगूपणा आणि अंधत्व हे यातील पापग्रहावरून जाणता येते. नातेवाइकापैंकी चुलते, आत्या यांचा विचार केला जातो.

व्ययस्थान जातकाच्या अकार्यक्षमतेचे व स्वतः होऊनच खर्च, ऱ्हास, दुष्कीर्ती, अवनती ओढवून घेण्याचे स्थान आहे. A house of self undoing. जातकच आपल्या कर्माने खड्डा खणतो व त्यातच तो पडतो. गुन्ह्यांबद्दल शिक्षा भोगण्याशी तुरुंगवास यावरून दर्शविला जातो.

षष्ठस्थानचे समोरचे हे स्थान आहे. आजारावर उपचार करण्यासाठी रुग्णालयात राहावे लागते. त्या रुग्णालयाचा, अनाथालयाचा विचार येथून होतो.

गुप्तरूपाने काम करणारे म्हणजे गुप्तहेर यांचा विचार याच स्थानावरून होतो.

व्ययस्थानातील ग्रह ज्या गोष्टींचा वा ज्या व्यक्तीचा कारक असतो त्या गोष्टी व त्या व्यक्तींना येथील वास्तव्यामुळे त्रास होत नाही. कारकत्व अबाधित राहते. व्ययात रवी पितृसुख राहते. व्ययात शनी दीर्घायुष्य देतो. व्ययातील मंगळ भावंडांसाठी वाईट ठरत नाही.

व्ययस्थानातील मंगळाची फले रवीप्रमाणे घ्यावी असे सुचवून वराहमिहीर रवीबद्दल 'पतित' या एका शब्दाशिवाय जास्त काही सांगत नाहीत. पतित म्हणजे अवनती झालेला.

मानहानी झालेला असा. पापकर्मामुळे ज्याची दुष्कीर्ती झाली आहे तो पतित होय. परंतु सारावलीकार रवीबद्दल 'पतित' पेक्षा जास्त काही सांगतात.

**विकल शरीरः काणः पतितो वंध्यापतिः पितुरमित्रः ।**
**द्वादशसंस्थे सूर्ये बलरहितो जायते क्षुद्रः ।।**

म्हणजे जातक विकलांग, अपंग, दुर्बल, एकाक्ष, पतित म्हणजे नैतिक अधःपात, संतती नसलेला म्हणून वंध्या स्त्रीचा पती आणि पित्याशी शत्रुत्व करणारा असतो.

परंतु प्रत्यक्षात हे अनुभवास येत नाही. एका कन्या लग्नाचे कुंडलीत बुध, रवी, व्ययात असलेला जातक उंचापुरा, गोरापान, सुनयन, संतती : २ कन्या एक पुत्र असलेला, सरकारी नोकरीत न्यायाधीश पदावर होता. तेव्हा नुसता रवी व्ययात गेला म्हणजे तो पतित होत नाही. त्याचेशी इतर ग्रहांचे अशुभ योग व्हावे लागतात व तो अशुभ स्थानाचा अधिपती असावा लागतो.

व्ययातील मंगळाबद्दल सारावलीत स्वतंत्र विचार प्रकट केले आहेत.

**नयनविकारी पतितो जायाघ्नः सूचकश्च रौद्रश्च ।।**
**द्वादशगे परिभूतो बन्धनभाक् भवति भूपुत्रे ।।**

द्वादश स्थानात भूमिपुत्र मंगळ असता जातकास डोळ्यांचे विकार होतात. त्याचा अधःपात झालेला असतो. आपल्या पत्नीला मारक ठरतो (द्विभार्या योग वा विधुरावस्था) तो क्रूर रागीट अपमानित झालेला (पराभवामुळे) आणि तुरुंगवास भोगणारा जातक असतो. या सर्व गोष्टी एकाच कुंडलीत दिसत नाहीत. निरनिराळ्या लग्नस्थिती, ग्रहस्थिती, मंगळाचे भावेशत्व, त्याचेशी होणारे अशुभ योग यावर निरनिराळ्या परिस्थितीत निरनिराळी फले दिसतात.

व्ययस्थानातील मंगळाबद्दल डॉ. बी. व्ही. रामन थोडक्यात असे सांगतात -जातकाच्या पत्नीचा वा पतीचा मृत्यू (कारण सप्तम स्थानावर मंगळाची आठवी दृष्टी) जातक स्वार्थी, परद्वेषी असतो. उष्णतेच्या व पित्ताच्या प्रकोपाने व्याधिग्रस्त असतो. शस्त्रक्रिया होतात, जातक फसला जातो आणि धननाश होतो.

व्ययात मंगळ, द्वितीयेत शनी व लग्नी चंद्र व सप्तमान रवि असा ग्रहयोग असता-कोडाचा प्रादुर्भाव होतो. व्ययातील मंगळावर रवीची दृष्टी असता दुष्ट लोकांपासून आणि आगीपासून धोका दर्शविला जातो. मंगळाच्या दशेत व्याधी जडतात, अपघात होतात नोकरीधंद्यात हानी होते. लोकप्रियता घटते. जातक अप्रामाणिक असतो व तो लुबाडला जातो. संततीचा नाश होतो.

व्ययातील मंगळामुळे न्यायालयीन खटल्यांमध्ये जातक गुंतला जातो व धननाश होतो. त्यास शत्रू असतात. खंडणी द्यावी लागणे हाही एक प्रकारचा धननाश मंगळामुळे होतो.

या सर्वांचा सारांश असा निघतो की, व्ययातील मंगळ वैधव्य/विधुरता देतो. बंधनयोग होतो. अपघात होतात, व्याधी जडतात. त्यासाठी रुग्णालयात जावे वा राहावे लागते. शस्त्रक्रिया होतात आणि या ना त्या कारणाने धननाश होतो अवनती होते.

परंतु वरील सर्व कटू फले एकट्या मंगळामुळे होत नाहीत. त्यास अन्य पापग्रहांची जोड वा त्यांच्याशी कुयोग असता वरील गोष्टी अनुभवास येतील. एकेरी योगावर विसंबून फले

वर्तविणे योग्य नाही व तशी फले मिळतही नाहीत. हे पुढे काही कुंडल्यांचा विचार करून स्पष्ट केले आहे.

वैधव्य/ विधुरता या संदर्भात सप्तमातील मंगळाचा विचार सप्तम स्थान या प्रकरणात केला आहे. तेथेही काही कुंडल्यांचे या संदर्भात विवरण केले आहे. व्ययस्थानातील मंगळाची आठवी दृष्टी सप्तम स्थानावर येते व ते स्थान अंशतः दूषित होते. पण सप्तमावर मेष रास व वृश्चिक रास असता मंगळ सप्तमेश असतो आणि तो स्वस्थानावर पाहतो. तेथे वैधव्य /विधुरता योग होतो असे म्हणणे बरोबर ठरत नाही. पण त्याच्या जोडीला सप्तमात पापग्रह असता, सप्तम स्थान पापमध्यस्थ असता, सप्तमेश दूषित असता आणि प्रमुख म्हणजे कारक ग्रह 'शुक्र' बिघडला असता वैधव्य/विधुरता येऊ शकेल.

बंधन योग - राहू हा बंधन आणि योग दर्शवितो. तो त्याचा कारक आहे. एकटा व्ययस्थ मंगळ बंधनयोग देत नाही. व्ययस्थ मंगळाचा राहू, नेपच्यून यांच्याशी अशुभ योग, असावा लागतो. बंधन योगात पुन्हा प्रकार आहेत. गुन्हा केला व शिक्षा झाली यामुळे येणारा बंधनयोग, राजकीय वा सामाजिक चळवळीमुळे येणारा तात्पुरता बंधनयोग यात फरक राहतो.

अपघात योग - लग्नाचे व्ययात मंगळ जातकास अपघातप्रवण करतो. पण चंद्राचे व्ययात वा अष्टमात मंगळ बिघडलेला असावा लागतो. शिवाय व्ययस्थ मंगळ पापग्रहाच्या दृष्टीत युती, केंद्रयोग, प्रतियोगात असावा लागतो.

व्याधी - यासाठी षष्ठस्थान, षष्ठेश व चंद्र, रवी हे बिघडलेले असावे लागतात.

धननाश व मानहानी हे मात्र व्ययस्थ मंगळाचे कर्तृत्व आहे. पण मंगळ शुभयुक्त वा शुभ दृष्टीत असता तेही आढळून येत नाही.

### द्वादश मंगळाची राशीनिहाय भावफले

**(1) मेषेचा मंगळ** : द्वादश स्थानात एक हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मेषेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मंगळ सप्तमेश व व्ययेश असतो आणि तो व्ययस्थानी स्वगृही येतो. मंगळाच्या दशेमध्ये उत्तम धनलाभ होतो. अवाजवी खर्च होत नाही. शुभ ग्रहाचा मंगळाशी योग असता त्या ग्रहाच्या दशेत योग्य कारणासाठी व समाजोपयोगी कारणासाठी पैसा खर्च होतो. योगकारक शनीशी शुभसंबंध असता व्यवसायातूनही उत्तम लाभ होतो. मंगळाशी कोणाचा शुभयोग नसता कर्ज बरेच काढावे लागते. दुष्कृत्यावर पैसे खर्च होतात.

### कुंडली : श्री. प्रदीप वि.


जन्म - गुरुवार दि. २१ मे, १९६४ रोजी पुणे येथे पहाटे ५ वा ४५ मि. प्र. वेळ.

अक्षांश - १८° उत्तर ३०', रेखांश - ७३° पूर्व ५८'

अयनांश - २३° २१' २८", सांपातिक समय - २१ तास ५ मि. ४३ से.

जन्मकाळी रवी महादशा भोग्य वर्षे १ महिने ७ दि. १२ आहे.

जातक B. E. Mechanical आहे. लग्नेश शुक्र धनस्थानी धनेशाच्या लाभयोगात व चंद्राच्या त्रिकोणात आहे.




दशमेश व लाभेश शनी लाभ स्थानात आहे व त्याची व्ययस्थानावर पूर्ण दृष्टी आहे.

व्ययस्थानात मंगळ, गुरु व बुध आहेत व ते युतीतच आहेत. गुरु अंशतः भाग्येश आहे. धनेश व षष्ठेश बुध ही व्ययातच असून त्याचा प्रजापती (हर्षल) बरोबर त्रिकोण आहे. मंगळ, बुध व गुरु यांचा प्रजापतीशी असलेला त्रिकोण यामुळे जातक B. E. झाला. मंगळ प्रजापती हर्षल व शनी यांच्यामुळे यांत्रिकी, जातक B.E. Mechanical झाला व सध्या उत्तम नोकरीत आहे. बुध, षष्ठेशही आहे व तो गुरुच्या युतीत व शुक्र, शनी प्रजापती यांच्याशी असलेल्या शुभयोगाने तो उत्तरोत्तर प्रगती करत आहे.

सन २००० च्या शेवटी गुरुची महादशा सुरू झाली. हा काळ उत्तम गेला.

**(2) वृषभेचा मंगळ :** द्वादश स्थानात दोन हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'वृषभेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्ययात वृषभ रास, मंगळ षष्ठेश व लाभेश असून तो वृषभेत शत्रुक्षेत्री येतो. शुक्र जर उच्च, शुभस्थानी शुभ ग्रहाच्या दृष्टियोगात असेल तर त्यांची शुभ फले मिळतात. तसे नसल्यास मंगळाचे षष्ठेशत्वाची फले मिळतात व्याधी होतात, शत्रूंचा ससेमिरा, कर्ज, पत्नी वियोग, व्यंग, अपघात आणि मंगळ पापग्रहांचे योगात असता बंधन योग येतो. मंगळ लाभेश असल्याने धंद्यात नुकसान, कौटुंबिक ताणतणाव व मोठ्या जबाबदाऱ्या.

## कुंडली : श्री. प्रदीप अरविंद


जन्म - शुक्रवार दि. १७ जुलै, १९६४ रोजी पुणे येथे सकाळी ५ वा. २७ मि.

अक्षांश - १८° उत्तर ३०', रेखांश - ७३° पूर्व ५८'

अयनांश - २३° २१' २६", सांपातिक समय - ० तास ३२ मि. २१ से.

शिक्षण - बी. कॉम.. विवाह - ४ जून १९९४. पत्नी १९९५-९६ साली सोडून गेली.

जातकास बरेच आजार झाले. जन्मल्यास तिसऱ्या दिवशी डायरिया व डिसेंट्री. टॉन्सिल काढले शस्त्रक्रिया. गळ्याला गाठी Urinary Infection आणि Heart dilated.



षष्ठेश मंगळ व्ययेश शुक्रासह, दोघांची षष्ठावर दृष्टी. शनी अष्टमेश त्याची दृष्टी षष्ठम स्थानावर आहे. वृश्चिक-वृषभेचे सर्व आजार. शनी प्रतियोग प्रजापती, प्रजापतीचा शुक्र-मंगळाशी केंद्रयोग तसेच शुक्र-मंगळाशी शनीचाही केंद्रयोग. वृषभ, सिंह, कुंभ या राशींतून सर्व अशुभ योग त्यामुळे हृदय दुबळे झाले. लग्नेश बुध द्वितीयेत त्याचा वरुण (नेपच्यून) बरोबर अंशात्मक केंद्रयोग, लग्न व लग्नेशाशी कोणाचाही शुभयोग नाही. पत्नी जातकास सोडून माहेरी गेली.

**(3) मिथुनेचा मंगळ** : द्वादश स्थानात तीन हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मिथुनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

या लग्नास व्ययस्थानात मिथुन रास येते. मंगळ हा दशमेश व पंचमेश असून तो मिथुनेत येतो. जातक परदेशात फिरत असतो. जाऊन-येऊन असतो व तो व्यवसायाच्या निमित्ताने परदेश दौरा करतो. भाग्येश गुरुशी शुभसंबंध असता. चांगल्या कार्यासाठी पैसे खर्च करतो. दानशूर असतो. जातक नशीबवान असतो.


### कुंडली : श्री. केशवराव भगत

जन्म - मंगळवार दि. १९ जुलै, १९०४ रोजी लोहगाव (पुणे) येथे सकाळी ६ वा. स्था. वेळ

अक्षांश - १८° उत्तर ४०', रेखांश - ७३° पूर्व ५८'

अयनांश - २२° ३१' २५", सांपातिक समय - १ तास ४५ मि. ३७ से.

पुण्याचे व्यापारी. लोखंडाचे प्रमुख कारखानदार व विक्रेते. परोपकारी व दानशूर. धर्मार्थ दवाखाना काढला. पुण्याचे नगराध्यक्ष होते.




कर्क लग्न मंगळ दशमेश व पंचमेश असून व्ययस्थानात मिथुनेत आहे. नवमेश गुरु दशमात आहे व त्याची द्वितीयेवर दृष्टी आणि मंगळाबरोबर 73 अंशाचा दृष्टियोग आहे. हा दृष्टियोग शुभ आहे. मंगळाची तृतीय, षष्ठ स्थान आणि सप्तम स्थानावर दृष्टी आहे. तृतीयेश व व्ययेश बुध लग्नी असून त्याची सप्तमावर दृष्टी आहे. सप्तमेश सप्तमात आहे. मंगळ, बुध व शनी या तिघांचा सप्तम स्थानाशी संबंध आहे. त्यामुळे स्वतंत्र व्यवसाय. दशमेश मंगळ लोखंड व पोलाद यांच्याशी संबंध दर्शवितो व त्याचा व्यापार व कारखाना.

षष्ठात प्रजापती त्रिकोण, दशमस्थ गुरु यंत्राशी संबंध. कारखाना

धनेश रवी व लाभेश शुक्र यांची युती लग्नी आहे. त्यामुळे व्यवसायातून भरपूर पैसा मिळतो. जन्म श्रीमंत घराण्यात झाला.

परोपकारी व दानशूर - वरुण (नेपच्यून) रुग्णालयाशी संबंध. धर्मार्थ दवाखाना काढला.

नवमेश गुरू दशमात. नगराध्यक्ष पदाचा मान मिळाला. लग्नेश व तृतीयेश परिवर्तन योग, स्वपराक्रमाने जातक पुढे आले.

**(4) कर्केचा मंगळ :** जर द्वादश स्थानात चार हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कर्केचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


मंगळ नवमेश व चतुर्थेश असून व्ययस्थानी कर्क या नीच राशीत येतो. त्याची अशुभ फले आहेत. जातकाजवळ संपत्ती नसते. पण मंगळाच्या नीचत्वाचा भंग झाला असल्यास अशुभ फले मिळत नाहीत. तसेच रवी, शुक्र, गुरु यांचे शुभसंबंध असता जातक महत्त्वाची व्यक्ती ठरतो व तो नावारूपास येतो.

## कुंडली : श्री. स. गो. बर्वे

जन्म - सोमवार दि. २७ एप्रिल, १९१४ रोजी तासगाव (सांगली) येथे दुपारी २.२० वा.

अक्षांश - १७° उत्तर २', रेखांश - ७४° ३४' पूर्व

अयनांश - २२° ३९' ४४", सांपातिक समय - ४ तास ६ मि. ३० से.




नामवंत I. C. S. अधिकारी अर्थतज्ज्ञ पुणे महानगरपालिकेचे पहिले आयुक्त. पुणे शहराचे रस्ते रुंदी वगैरे सुधारणा केल्या व लोकप्रिय झाले. निवृत्त झाल्यावर आमदार व अर्थमंत्री झाले. नंतर खासदार म्हणून निवडून आले. परंतु हृदयविकाराच्या झटक्याने अचानक मृत्यू.

लग्नेश रवी भाग्यस्थानी उच्चांशाचे निकट दशमेश व व्ययेश शुक्र व चंद्र यांची युती दशमात आहे. मंगळ व्ययात नीच पण त्याचा अधिपती चंद्र उच्च दशमात त्यामुळे मंगळाचा नीचभंग झाला आहे. वृषभेत चंद्र व शुक्र यामुळे अर्थतज्ज्ञ व नंतर अर्थमंत्री.

षष्ठेश शनी दशमात प्रजापती व गुरु यांच्या त्रिकोणात आहे. नवमात उच्च रवी. दशमात उच्च चंद्र यामुळे सरकारी अधिकारी व तेथे नावलौकिक.

दशमात उच्च चंद्र यामुळे आयुक्त म्हणून लोकप्रिय झाले. मंगळ नवमेश (नीचत्व भंग) धडाडीचे अधिकारी.

वृषभेत शनी - लग्न सप्तमातून राहू केतूच्या केंद्रयोगात व हे सर्व स्थिर राशीतून तसेच लग्नेश रवी प्रजापतीच्या केंद्रयोगात. यामुळे हृदयप्रक्रिया बंद पडून अचानक मृत्यू.

**(5) सिंहेचा मंगळ** : जर द्वादश स्थानात पाच हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'सिंहेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


व्ययात सिंह रास असते. मंगळ तृतीयेश व अष्टमेश असतो आणि तो व्ययस्थानात मित्रक्षेत्री येतो. अष्टमेश व्ययात असता अपघाताने व्यंग येण्याची शक्यता असते. या ठिकाणी मंगळ जातकास कर्जबाजारी करतो पण ते जातकाच्या स्वतःच्याच कृतीने होते. तृतीयेश व्ययात भावंडांशी पटत नाही.

## कुंडली : श्री. न. गो. कालाणी

जन्म - शनिवार दि. १ सप्टेंबर, १९२३ रोजी सोलापूर येथे सकाळी ८ वा. ४८ मि. प्र. वेळ.

अक्षांश - १७° उत्तर ४०', रेखांश - ७४° पूर्व ५४'

अयनांश - २२° ४७' २०", सांपातिक समय - ६ तास ३७ मि. १० से.




मध्यम बांधा, उंच, सावळा वर्ण. एक मोठा भाऊ व एक धाकटा भाऊ. एक बहीण. धाकटा भाऊ चुलत्यास दत्तक गेला. शिक्षण मॅट्रिक पास. पिता मयत सन १९४४. माता दीर्घायुषी, यंत्रमाग कारखानदार. सन १९५५-५६ च्या सुमारास कापूस, सुताचे सट्ट्यात जबरदस्त नुकसान. त्यातून कोर्टकचेऱ्या, सर्वोच्च न्यायालयापर्यंत. व्यवहारात बुद्धी उत्तम चाले. बहुभाषी, हजरजबाबी, प्रसंगावधान आणि मुस्तद्देगिरी. शेवटपर्यंत कर्ज फिटले नाही. यंत्रमाग कारखानदारांचा पुढारी. वकिली बुद्धी चाले. अनेक उलाढाल्या केल्या. शेवटी स्वतःचे घर बांधले.

संतती : चार पुत्र, एक कन्या. कॅन्सरने मृत्यू.

मंगळ व्ययसायात रवीच्या युतीत. सिंहेत रवी व भाग्येश शुक्र मंगळासह, शुक्र अस्तंगत. धनेश व्ययात अस्तगंत. रवी, शुक्र, राहू व्ययात असता कज्जे, खटले यामध्ये खर्च. त्यातच मंगळ तेथे आल्याने भर पडली व कर्जे काढावी लागली. त्याची फेड करता आली नाही. सावकारांचे (बँकेचे) कर्जवसुलींसाठी दावे, त्यांचा शेवटपर्यंत निकाल लागला

नाही. यांच्या कारखान्यास एकदा आग लागून कापूस जळाला. यंत्रे खराब झाली. विम्याच्या पैशाबद्दल दावा झाला.

रवी, शुक्र, राहू व्ययात त्यामुळे पित्याचा मृत्यू २१ व्या वर्षी. भावंडांवर याची हुकूमत चाले. धाकटा भाऊ दत्तक गेल्याने धाकटा भाऊ उरलाच नाही. मंगळाची तृतीयेवर दृष्टी व तृतीयेश व्ययेश व राहूसह.

षष्ठात प्रजापती केतू मंगळ दृष्ट (मंगळ अष्टमेश) मृत्यू कॅन्सरने.

**(6) कन्येचा मंगळ :** जर द्वादश स्थानी सहा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'कन्येचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्ययस्थानी कन्या रास आणि मंगळ द्वितीयेश सप्तमेश होऊन शत्रुस्थानी येतो. व्याधी व अपघात होतात. मंगळ मारकेश असतो आणि तो व्ययात येतो. त्यामुळे अल्पायू होतो. पत्नीही लवकर जाते. पैसे फार खर्च होतात.

### कुंडली : श्री. अरुण


जन्म - गुरुवार दि. २९ ऑक्टोबर, १९७० रोजी बेलफास्ट येथे सकाळी ७ वा. २६ मि. स्था वेळ

अक्षांश - ५४° उत्तर ३४', रेखांश - ५° पूर्व ५४'.

अयनांश - २३° २७' ८", सांपातिक समय - ८ तास ५३ मि. ५० से.

जन्मकाली मंगळ महादशा भोग्य वर्षे ३, महिना १, दिवस १५.

अमेरिकेत स्थायिक झालेल्या हिंदू व्यक्तीच्या मुलाची ही कुंडली.




लग्नेश शुक्र द्वितीयेत. द्वितीयेश मंगळ व्ययात आणि व्ययेश बुध लग्नात नीच रवीच्या युतीत आहे. चतुर्थेश पंचमेश शनी (राजयोगकारक) हा सप्तमात मेषेत नीचराशीत आहे. त्याचा मंगळाशी 135 अंशाचा अशुभ योग आहे.

वद्य चतुर्दशी संपून अमावस्या सुरू झाल्यानंतरचा हा जन्म आहे. लग्नाचे पुढे वरुण (नेपच्यून) व मागे प्रजापती व मंगळ आहेत. लग्नभाव पापमध्यस्थ, लग्नेश वृश्चिकेत त्याचा अधिपती व्ययात, भाग्येश बुध अस्तंगत. लग्नेश शुक्राचा राहू-केतूशी केंद्रयोग व वरुण (षष्ठेश आहे) या ग्रहाशी युती या सर्व ग्रहयोगामुळे लग्न, लग्नेश, चंद्र रवी (परम नीचांशी) यामुळे जातक अल्पायू ठरला.

मृत्यू - ८ फेब्रुवारी, १९९७

मृत्युकाळी गुरु महादशा - बुध भुक्ती व शुक्र अंतर्दशा चालू होती. अष्टमेश शुक्र युती नेपच्यून. यामुळे गूढ रीतीने मृत्यू. सॅनफ्रॅन्सिस्को.


जातकाने बराच प्रवास केला. भारत, सिंगापूर, मलाया, जपान असा प्रवास झाला. भारतात दोन वेळा एकटा आला होता. त्याला भारत आवडायचा.

## कुंडली : श्री. डॉ. पुरुषोत्तम गणेश

जन्म - बुधवार दि. १७ जुलै, १९०१ रोजी सोलापूर येथे दुपारी १२ वा. ४१ मि. प्र. वेळ.

अक्षांश - १७° ४०' उत्तर, रेखांश - ७५° पूर्व ५४'.

अयनांश - २२° २९' ९", सांपातिक समय - ७ तास ५१ मि. ३९ से.




वडीलही डॉक्टर होते. वडील मृत : १९४९ जातक स्वतःही उत्तम डॉक्टर प्रॅक्टिस चांगली चालत होती. दोन धाकटे भाऊ व एक धाकटी बहीण. क्रमांक एकचा धाकटा भाऊ १९२५ साली मयत, बहिणीचा विवाह. तिला संतती होऊन तिही १९३६ च्या सुमारास मयत झाली. जातकाचा विवाह झाला. चार कन्या व एक पुत्र संतती जातक मध्यायु.

मृत्यू - १४ मे, १९४३.

मंगळ धनेश व सप्तमेश आणि व्ययात कन्या राशीत. तृतीयांश गुरु व शनी युती. नवमात वरुण (नेपच्यून) मंगळ व शनी यांचा परस्पर दृष्टियोग, मंगळ केंद्रयोग गुरु तसाच वरुणाबरोबर. यामुळे भाऊ बहीण यांचा लवकर मृत्यू, भाऊ अल्पायू, बहीण मध्यायू.

दशमेश चंद्र दशमत युती शुक्र व त्रिकोण प्रजापती (हर्षल) रवी दशम बिंदूनजीक, कर्केत. धनेश मंगळ व्ययात कन्या या आजाराच्या राशीत पण आजार व त्यावर उपचार-दवाखाने यांच्याशी संबंध येतो. मंगळ केंद्र वरुण व षष्ठेश गुरु. कर्क राशीचा संबंध औषधी व शुश्रूषा, रोग बरे करणे याचेशी. सहा-आठ बारा ही स्थाने व कन्या वृश्चिक, मीन यातून योग झाले आहेत. म्हणून वैद्यकीय व्यवसाय.

चंद्राचे षष्ठात षष्ठेश गुरु व अष्टमेश शनी आणि व्ययात बुध वरुण हेही वैद्यकीय व्यवसाय दर्शवितात.

शनीची पंचमावर दृष्टी. कन्या संतती, पंचमेश शनी गुरुच्या युतीत म्हणून एक पुत्र.

अष्टमात प्लूटो असून अष्टमावर द्वितीय स्थानातून प्रजापतीची पूर्ण दृष्टी आहे. चंद्रपासून अष्टमेश षष्ठात षष्ठेशाचे युतीत असून त्यावर मारकेश मंगळाची पूर्ण दृष्टी आहे. यामुळे मध्यायुष्य लाभले.

**(7) तुळेचा मंगळ :** द्वादश स्थानी सात हा अंक असेल तर तेथील मंगळास हा 'तुळेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्ययस्थानी तूळ रास येते. मंगळ लग्नेश व षष्ठेश असून व्ययस्थानी तूळ या शत्रुराशीत येतो. दृष्कृत्यात पैसे खर्च होतात.

### कुंडली : श्री. शरद पवार


जन्म - गुरुवार दि. १२ डिसेंबर, १९४० रोजी बारामती येथे पहाटे ५ वा. ३० मि.

अक्षांश - १८° उत्तर १२', रेखांश - ७४° पूर्व ३९'.

अयनांश - २३° २' ००", सांपातिक समय - १० तास २० मि. ४६ सेकंद.

महाराष्ट्राचे तडफदार काँग्रेस नेते. १९६७ पासून आमदार. १९७२ पासून विविध खात्यांचे मंत्री. १९७८-८० मुख्यमंत्री, १९८८ पासून मुख्यमंत्री १९८० ते १९८७ विरोधी पक्षनेते.

खासदारही झाले. संरक्षणमंत्री पण सुधाकर नाइकांना राज्यपाल केले व शरद पवार पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री १९९३ पासून. शिवसेना - भाजप सरकार आल्यावर ते लोकसभेत विरोधी पक्षनेते. १९९९ च्या एप्रिलमध्ये भा. ज. प. चा पराभव झाला व नवीन निवडणुका जाहीर झाल्या. सोनिया गांधींविरुद्ध आवाज उठवून राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष संगमा व तारीक अन्वर यांचे सहकार्याने काढला.




लग्नेश मंगळ व्ययात शुक्राच्या युतीत आणि त्यावर भाग्येश चंद्र तसेच गुरु शनी यांची दृष्टी आहे.

दशमेश रवी लग्नी आल्याने रवीला जास्त महत्त्व आणि भाग्येश चंद्राच्या दृष्टीने मंगळाचे अशुभत्व कमी झाले.

नवमातील प्लूटो हा फूटपाड्या आहे. शरद पवार यांनी दोन-तीन वेळा काँग्रेसमध्ये फूट पाडली. पुरोगामी लोकशाही आघाडी करून सत्ता काबीज केली.

गुरु व शनी यांचा दशमबिंदूशी पूर्ण त्रिकोण योग आहे. गुरु धनेश व पंचमेश तर शनी तृतीयेश व चतुर्थेश म्हणजे केंद्रकोणाधिपतींची युती. या युतीच्या प्रभावाने मंगळाचे दुष्कृत्य नाहीसे झाले व मंगळ व्ययेश शुक्रासह व्ययस्थानी आहे. ते दोघे कारस्थाने करतील व त्यांचे फायदे शरद पवार उचलतील.

**(8) वृश्चिकेचा मंगळ :** जर द्वादश स्थानी आठ हा अंक असेल तर तेथील मंगळाला हा 'वृश्चिकेचा मंगळ' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्ययस्थानी वृश्चिक राशी आणि मंगळ पंचमेश असून व्ययस्थानात स्वगृही येतो. मंगळाची दृष्टी कुंभ, वृषभ व मिथुन या तृतीय, षष्ठ व सप्तम स्थानातील राशीवर येते. षष्ठस्थानावरील दृष्टी आजार, व्याधी व त्यासाठी शस्त्रक्रिया, सप्तम स्थानावरील दृष्टी विवाहसौख्यास बाधक ठरते व तृतीय स्थानावरील दृष्टीने प्रवासात वा वाहनामुळे अपघात व आगीमुळे नुकसान होते. पंचमेशही मंगळ असल्याने संततीसुखही बिघडते.

## कुंडली : श्री. जगदीश

जन्म - गुरुवार दि. २ नोव्हेंबर, १९३३ रोजी पुणे येथे सकाळी १० वा. ३४ मि.


अक्षांश - १८° उत्तर ३०', रेखांश - ७३° पूर्व ५८'.

अयनांश - २२° ५६' ६", सांपातिक समय - १२ तास ४४ मि. ७ सेकंद

प्रेमविवाह १९५८. शुक्र-त्रिकोण हर्षल संतती कन्या.

१९६१ : पत्नी व मुलगी यांचा अपघाती मृत्यू, शुक्र मूळ नक्षत्री. लग्न व शुक्र शनी व मंगळ यांच्यामध्ये व मंगळाची सप्तमावर दृष्टी आणि सप्तमेशही व्ययात.

१९६२ : दुसरा विवाह, संतती : कन्या व नंतर २ पुत्र. दुसऱ्या कन्येचा मृत्यू. दुसरी पत्नी आजारी असते.




मंगळाची षष्ठावर दृष्टी, षष्ठेश शुक्र लग्नी मूळ नक्षत्री. टॉन्सिलची शस्त्रक्रिया.

अपघात - रेल्वे ट्रॉलीवरून जात असताना ट्रॉली घसरली व जातक उडून पडला. मांडीचा खुबा मोडला. फ्रॅक्चर. आत नळी बसवली. मंगळ केंद्रयोग वरुण (नेपच्यून) यामुळे अपघात.

**(9) धनुचा मंगळ** : जर द्वादश स्थानी नऊ हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'धनुचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्ययस्थानात धनु रास येते. मंगळ चतुर्थेश व लाभेश होऊन व्ययस्थानी मित्रक्षेत्री येतो. कुंडलीतील अन्य शुभयोगास वा राजयोगास बाधा येते. त्याची फले मिळत नाहीत. राजयोगकारक शुक्र मंगळाच्या दृष्टीत येत असल्यास अनेकदा प्रतिकूल परिस्थिती उत्पन्न होते. लाभेश मंगळ व्ययात येतो. त्यामुळे व्यवसाय वगैरेपासून होणारे लाभयोग हातातून सुटून जातात. शुक्राची मदत असता परिस्थितीत फरक पडतो. लग्नेश शनी मंगळाच्या अशुभ योगात असता अपघात होतात.


## कुंडली : श्री. संजय गांधी

जन्म - शनिवार दि. १४ डिसेंबर, १९४६ रोजी दिल्ली येथे सकाळी ९ वा. २७ मि.

अक्षांश - २८° उत्तर ४०', रेखांश - ७७° पूर्व १३'.

अयनांश - २३° ६' ४४", सांपातिक समय - १४ ता. ३४ मि. ४६ से.

केतू महादशा भोग ० वर्षे ५ महिने ७ दिवस.




लग्नेश सप्तमात व सप्तमेश चंद्र अष्टमात. चंद्राचे दोन्ही बाजूस पापग्रह व्ययात शनी प्लूटो व द्वितीयेत वरुण (नेपच्यून) म्हणजे चंद्र पार बिघडला. शनीचा अष्टमेश रवीशी १३५° चा अशुभ योग. अष्टमेश रवीचा प्रजापती (हर्षल) बरोबर प्रतियोग म्हणजे रवीही बिघडला आहे. चंद्र बिघडला + रवी बिघडला आणि लग्नेश शनी १३५° रवी व मंगळाशी षडाष्टक. यामुळे लग्नेशही बिघडला. लग्नबिंदूशी कोणाचाही शुभयोग नाही. दशमेश शुक्र व्ययेश व तृतीयेश गुरुचे युतीत. त्यामुळे राजकारणात ढवळाढवळ व मारुती उद्योगात चालना मिळाली.

वरील अशुभ योगामुळे आयुष्य फार नाही. जातक मध्यायू पण ते आयुष्यसुद्धा लवकर संपणारे २३ जून, १९८० रोजी जातक स्वतः विमान चालवित असता अपघात झाला. विमान पडले आणि त्यात जातकाचा मृत्यू झाला. चंद्र महादशा (सप्तमेश) गुरुभुक्ती (व्ययेश) गुरु अंतर चालू होते.

**(10) मकरेचा मंगळ :** द्वादश स्थानी दहा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मकरेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


व्ययात मकर रास, मंगळ दशमेश व तृतीयेश असून व्ययस्थानात उच्च राशीस येतो. यास लग्नेशाची व योगकारक शुक्राची जोड मिळाल्यास जातक मोठा होतो. मंगळ तृतीयेश व्ययात उच्च त्यामुळे धाडसीपणा दर्शवितो.

## कुंडली : श्री. घनश्यामदास बिर्ला

जन्म - शनिवार दि. १४ एप्रिल, १८९४ रोजी पिलानी येथे पहाटे २ वा. ५४ मि.

अक्षांश - २८° उत्तर २२', रेखांश - ७५° पूर्व ३२'.

अयनांश - २८° २२' ५०", सांपातिक समय - १६ ता. २४ मि. ३८ से.




विख्यात उद्योगपती ब्रोकर. १९१२ साली ताग उद्योगास सुरुवात. ३२ व्या वर्षी उद्योगपती म्हणून ख्याती व कीर्ती. खूप प्रवास अनेक उद्योगांचे मालक. १९५७ पद्मविभूषण, हिशेबी, साहस, शीघ्र आकलन शक्ती. नवमेश शुक्र लग्नी आहे. रवी उच्च, मंगळ उच्च, लग्नेश शनी उच्चाभिलाषी. रवी-प्रतियोग शनी.

दशमेश मंगळ व्ययात मकरेत आहे. तो तृतीयेशही आहे. धाडसाने नवीन उद्योगांची स्थापना केली. चंद्राकडून दशमेश मंगळ सप्तमात उच्च व लाभात गुरु. गुरुची जन्म दशमावर दृष्टी आहे. त्यामुळे व गुरुची दशमेश मंगळावरही दृष्टी यामुळे धाडसास यश प्राप्त झाले व अनेक उद्योगांची भर पडली. चंद्राचा दशमेश मंगळ त्याची चंद्राच्या दशमावर पूर्ण दृष्टी, चंद्राकडून मंगळ योगकारक व स्वतंत्र उद्योगाचा प्रणेता.

गुरु-चंद्र लाभयोग त्याचे वर्ष ३२ वे बसते व त्या वर्षी कीर्ती पसरली.

शुक्र वर्गोत्तम, शनी वर्गोत्तम, रवी वर्गोत्तम.

**(11) कुंभेचा मंगळ** : जर द्वादश स्थानी अकरा हा अंक असेल तर तेथील मंगळाला कुंभेचा मंगळ म्हणतात. त्याचे फल.

मंगळ द्वितीयेश व नवमेश असून व्ययस्थानात कुंभेत शत्रुक्षेत्री येतो. वडिलोपार्जित मालमत्तेचा नाश होतो व खर्च फार वाढतो.


व्यंग अगर अपंगत्व येते. सप्तमावर कन्या रास येते व त्यावर मंगळाची दृष्टी येते. द्विभार्या योगाची शक्यता असते.

## कुंडली : श्री. नंजुंडा राव

जन्म - शनिवार दि. २४ मार्च, १८८३ रोजी सायं. ६ वा. स्थानिक वेळ.

अक्षांश - १३° उत्तर, रेखांश - ७७° पूर्व ३५'

अयनांश - २२° १३' ३४", सांपातिक समय - १८ ता. ४ मि. ४४ से.




लग्न बलवान नाही. षष्ठेश रवी लग्नी आहे व लग्न आणि रवी यांच्या दोन्ही बाजूस पापग्रह आहेत. व्ययात मंगळ व द्वितीयेत केतू-वरुण (नेपच्यून) सप्तमात चंद्र आहे. त्याच्या मागे प्रजापती व पुढे राहू असा पापकर्तरी योग होतो.

द्वितीयेश मंगळ व्ययात आहे. म्हणजे नेत्रकारक रवी-चंद्र आणि नेत्रस्थान युतीत व प्रजापतीच्या प्रतियोगात आहे. कलत्रकारक शुक्रही राहू-केतू व वरुण यांच्या केंद्रात आहे. त्यामुळे द्विभार्या योग.

चतुर्थात गुरु, अष्टमात राहू व व्ययात मंगळ भाग्येश व धर्मस्थानेश यामुळे अध्यात्म योगसाधना झाली.

पंचमेश सप्तमात व चंद्र गुरु केंद्रात व परस्परांचे केंद्रात यामुळे संतती झाली. चंद्राचे दशमात गुरु यामुळे प्रथम पुत्राने नावलौकिक मिळविला.

**(12) मीनेचा मंगळ :** जर द्वादश स्थानी बारा हा अंक असेल तर तेथील मंगळाला 'मीनेचा मंगळ' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्ययभागात मीन रास येते व लग्नेश आणि अष्टमेश मंगळ तेथे मित्रक्षेत्री येतो. येथील मंगळ जर कुयोगात असेल तर जातकास अनेक त्रास व दुःखे सहन करावी लागतात. व्ययस्थान व मीन रास या दोघांचा अंमल पावलावर येतो. अपघात होण्याची व तो जायबंदी होण्याची शक्यता असते.


मीनेचा पारंपरिक अधिपती गुरु हा मेष लग्नास भाग्येशही असतो आणि तो जर सुस्थानात राजयोग करीत असता वरील अशुभ फले मिळत नाहीत.

## कुंडली : न्यायमूर्ती श्री. विद्यारण्य दत्तात्रय तुळजापूरकर

जन्म - शुक्रवार दि. ९ मार्च १९२१ रोजी मुंबई येथे सकाळी ९ वा. ५८ मि. प्र. वेळ.

अक्षांश - १८° उत्तर ५४', रेखांश - ७२° पूर्व ५०'.

अयनांश - २२° ४५' ३२", सांपातिक समय - २२ ता. २८ मि. ४६ से.




मुंबई उच्च न्यायालयात वकिलीचा व्यवसाय करीत असताना ते नामंकित वकील झाले. त्यांना नंतर सिटी सिव्हिल कोर्टात व तद्नंतर मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून घेतले. तेथे निर्भीडपणे उत्तम काम केल्यावर त्यांना सर्वोच्च न्यायालयात घेतले. तेथेही त्यांनी आपला ठसा उमटविला व तेथून योग्य वेळी निवृत्त झाले.

लग्नेश मंगळ व्यय स्थानात मीनेत आहे. त्याचा पारंपरिक अधिपती गुरु भाग्येश आहे व तो दशमेश शनी यांची युती पंचम या त्रिकोण स्थानात आहे. त्यावर रवी व चंद्र यांची पूर्ण दृष्टी आहे. ते दोघे लाभस्थानात आहेत. तेथेच तृतीयेश बुध व प्रजापती (हर्षल) यांची अंशसाम्याने युती कुंभ या बौद्धिक राशीत आहे. हा अपूर्व योग आहे. यावर न्यायखात्यात सर्वोच्च न्यायालयामार्फत आपल्या कर्तृत्वाने चमकत गेले. या योगामुळे मंगळाच्या व्ययस्थानातील कटू फल त्यांना मिळाले नाही. पण निवृत्त झाल्यावर त्याच्या पायास किरकोळ अपघात होऊन प्लास्टर करावे लागले.